# घटक -१

## लोकशाही विकेंद्रीकरण

- डॉ. क्लेमेन्टाईन ज्यु. रिबेलो

**पाठाची रुपरेषा :**

१.० उद्दीष्ट्ये
१.१ प्रस्तावना
१.२ प्राचीन भारतातील पंचायती राज
१.३ गांधीचे पंचायत राज संबंधी विचार
१.४ पंचायत राजची संकल्पना
१.५ बलवंत राय मेहता समिती
१.६ महाराष्ट्रातील पंचायत राज
१.७ सारांश
१.८ मार्गदर्शक सूचना
१.९ स्वाध्याय

## १.० उद्दीष्ट्ये (OBJECTIVES)

- पंचायत राजची पार्श्वभूमी अभ्यासणे.
- पंचायत राजची रचना समजून घेणे.
- पंचायत राजची कार्ये अभ्यासणे.

## १.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

भारतात ग्रामपंचायती प्राचीन काळापासून ग्रामीण जीवनाचे एक अंग आहे, पंचायतीची रचना आणि कार्ये प्रणालीवर क्षेत्रीय इतिहास अत्यल्प आहे. सध्याच्या काळात पंचायत राज व्यवस्था स्थानिक प्रशासनाचे एक अंग आहे. पंचायत राजचे सध्याचे स्वरुप स्वातंत्र्य प्राप्तीनंतर केल्या गेलेल्या अनेक प्रयत्नांचे फळ आहे. परंतु पंचायती आमच्या राष्ट्रीय जीवनाची ती धारा राहिली आहे. जी अनेक वर्षापासून प्रवाहीत झालेली आहे. आता पंचायत राजची संकल्पना नवीन नाही.

munotes.in

## १.२ प्राचीन भारतातील पंचायती राज

स्वातंत्र्य प्रप्तीनंतर भारतात पंचायत राजचा उदय लोकशाही विकंद्रीकरणावर रचित श्री. बलवंतराय मेहतांच्या अभ्यास गटाने केलेल्या शिफारशींचा स्विकार केल्यावर झाला असला तरीपण भारतात पंचायत राजची संकल्पना प्राचीन काळापासून चालना आलेली आहे. प्राचीन भारतात सुध्दा स्थानिक सरकार स्थापन होऊन कार्य करीत राहिलेली आहे. या स्थानिक संस्थाचे स्वरुप, तसेच कार्य प्रणालीचे वर्णन करीत, सर चार्ल्स मेटकाफ यांनी सन १८३० मध्ये लिहिले होते. 'ग्रामीण समुदाय लोकशाहीमध्ये लहान रुप आहे. प्रत्येक वस्तू त्यांच्या जवळ आहे. त्या त्यांना स्वतःकरिता हव्या आहेत. त्या कोणत्या ही प्रकारच्या बाह्य संबंधाकरिता पूर्णपणे स्वातंत्र्य आहे.'

### १.२.१ वैदिक कालीन पंचायत राज

वैदिक युगात जेव्हा नगरांचे विशेष स्थान नव्हते. ग्रामीण शासन अधिक महत्वपूर्ण मानले जात होते. गावाच्या पंचायती गावच्या लोकांव्दारे तयार होत होती. वैदिक मंत्रात खेड्यातील अधिकाऱ्यांना "ग्रामीणी" महटले जाते. वैदिक काळात राज्ये लहान लहान होती. याचे कारण खेड्यांचे महत्व अधिकच वाढले होते.

वैदिक युगात लोकशाहीचे महत्व परंपरेपेक्षा खेड्याचे महत्व अधिकच वाढले होते. वैदिक ग्रंथात राष्ट्राध्यक्षाला 'राजग' शब्दाने संबोधले गेले. राजाची निवड जनतेच्या मताव्दारे होत होती. लोक योग्य विचार करुन पराक्रमी, ऐश्वर्यशाली, मेघावी, यशस्वी, वकृत्वगुण संपन्न तसेच दिव्य गुणयुक्त नेत्याला राजाचे रुपात निवडत होते. लोकांच्या विरुध्द कार्य करुन कोणताच राजा पदावर राहू शकत नव्हता. अथर्व वेदात उल्लेख मिळतो की, फार पूर्वी राजा नव्हता. तेव्हा राज्याचे संचालनाकरिता गृहपती, सभासमिती, मंत्रिमंडळ तसेच पंचायतीची निर्मिती झाली. प्राचीन भारतात लोकशाही शासन व्यवस्था प्रचलित होती.

वैदिक कालीन पंचायत पध्दती गावांपासून राष्ट्रांपर्यंतचेच हित हवे होते. ह्या काळात पंचायत प्रतिनिधींचा दृष्टीकोन सर्वांकरिता समान होता.

रामायण आणि महाभारताच्या काळात गावांच्या संस्थेचे सुव्यवस्थित व सुस्पष्ट वर्णन मिळते. "ग्रामीण" ग्राम प्रशासनाचा मुख्य होता.

स्मृतीग्रंथात स्थानिक संस्थांचा उल्लेख मिळतो. मनुस्मृतीनुसार एक ग्राम, दहा ग्राम (गाव), शंभर ग्राम आणि एक हजार गावाच्या अलग अलग रचना होत्या. आजच्या संदर्भात क्रमाने ग्राम, ग्रामपंचायत, तहसिल, उपजिल्हा केंद्र तसेच जिल्हा स्तरावर समकक्ष मानले जाते. मनुच्या अनुसार ग्राम शासनाची सर्वात लहान संस्था आहे. ज्यांचे प्रमुख अधिकारी यास 'ग्रामीणी' म्हटले गेले होते.

कौटिलीय अर्थशास्त्रात सुध्दा स्थानिक शासनाचा उल्लेख मिळतो. कौटिल्याचे म्हणणे आहे की, समाहर्ताचे आदेशानुसार पाच किंवा दहा गावांचा समूह बनविण्यात यावा. आणि त्यांचे नियोजन 'गोप' नावाचा अधिकारी करील. गोपला वाटल्यास तो प्रत्येक कुटुंबाचे स्त्री-पुरुषांची

munotes.in

मोजणी करावी, त्या सर्वांचे वर्ण, आचरण, उत्पन्न आणि खर्चाची पूर्ण माहिती ठेवतील आणि कर वसूल करतील.

### १.२.२ राजस्थानातील प्रचीन काळातील पंचायती राज

चितोड जवळ राशमी नावाच्या गावात एक शिलालेख सापडला आहे. त्यावरुन समजून येते की, तेथील जहागीरदाराने कर वाढविले होते. ग्रामीण जनतेने ते कर कमी करण्याची विनंती जहाँगीर-दाराला केली होती. प्रा. शर्माने ग्रामसभेच्या तीन प्रमुख भूमिका दाखविल्या.

१) जमिनीची देखभाल ग्रामसभा करीत होती. परंतु जमिनीची मालकी शेतकरी किंवा एखाद्या व्यक्तीच्या मालकीची नव्हती, तर ती संपूर्ण ग्रामसभेची होती. पूर्ण ग्रामीण जनतेची होती.
२) जंगल साऱ्याचा फायदा ग्राम सभेला मिळत होता.
३) ग्रामसभा गावातून जाणाऱ्या व्यापाऱ्याकडून कर गोळा करीत होती.

### १.२.३ मौर्य युग (३२४ इ.पू - २३६ इ.पू. )

ग्रामीण शासन पूर्णपणे शेतीशी संबंधित होते. एका गावात १०० ते ५०० पर्यंत कुटुंबे होती. प्रत्येक खेड्यात एक सभा होती. ही सभा पूर्ण समुदायाकरिता फायद्याच्या कायद्याची निर्मिती करीत होती. मौर्य काळात पंचायत राजला विकसित करुन मोठी दूरदर्शिता आणि राजनितिज्ञतेचा परिचय दिला. ग्रामसभा किंवा पंचायती, सार्वजनिक हिताच्या योजना सुध्दा तयार करीत होती. ग्रामसभा सिंचनासाठी सरोवरे तयार करुन त्यांची देखरेखही करीत होती. ग्रामसभांना आपल्या कडून अतिरिक्त कर लावण्याचा अधिकार होता. मौर्य काळच्या प्रशासन व्यवस्थेत पंचायती राज चांगल्या प्रकारे कार्य करीत होती.

### १.२.४ गुप्तकाळ

गुप्तकाळचे प्रशासन काही बाबतीत मौर्य युगासमान होते. गावाचे प्रशासन "ग्रामध्यक्ष" नावाचे पद धारण करणारे मुखीयाच्या अधिन होते. ग्रामसभेची मुख्या जबाबदारी गावांचे संरक्षण, वादाचा निकाल लावणे, सरकार करिता राजस्वाचा संग्रह, जनतेच्या उपयोगी कार्याचे संगठन, अल्पसंख्याकरिता एक विश्वस्ताच्या रुपात कार्य करणे.

ऐतिहासिक अनुसंधानाने हे स्पष्ट केले आहे की, 'प्राचीन भारतात स्थानिक प्रशासन ब्रिटीश शासन किंवा वर्तमानाच्या अपेक्षेपेक्षा जास्त विस्तृत, अधिक वास्तविक आणि अधिक यशस्वी होते.'

प्राचीन भारत विकेंद्रीकरणाच्या सिध्दांताव्दारे बनलेला होता. त्यांचा विश्वास समुहाच्या स्वशासनास होता. त्यामुळे सत्तांतरे होवून सुध्दा संपूर्ण भारतात ग्राम समुदाय कायम राहिला. ग्रामसंस्थाचे स्वरुप लहान राज्याच्या समान होती.

दहाव्या शताब्दीचे कृती "नितीसार" ज्याचे रचनाकार शुक्राचार्य आहेत. त्यांनी सुध्दा ग्रामपंचायतीचे वर्णन केले आहे की, पंचायत ही प्रशासकीय आणि न्यायीक या दोन्ही शक्तींनी सुक्त अशी होती.

उक्कल गावच्या शिलालेखावरुन राधाकुमुप मुखर्जींनी असे दाखविले आहे की, उक्कल गावचे शासन एक सभा अथवा महासभेव्दारे होत होते. निरनिराळ्या समित्यांच्या संख्या आणि त्यांची नावे खालील प्रकारे होती.

१) **वार्णिक समिती** - सदस्य संख्या १२ होती. ही सर्वात महत्वपूर्ण प्रभावशाली आणि प्रतिष्ठित होती.

२) **बाग समिती** - हिची सदस्य संख्या १२ निश्चित होती.

३) **तालाब समिती** - हिची सदस्य संख्या ६ होती. ही समिती शक्यतो गावाच्या पंचाच्या समितीची देखरेख करीत होती.

४) **पंचवार समिती** - हिची संख्या ६ होती. ही समिती मुद्रेला विनियमीत करीत होती.

५) **न्यायाच्या देखरेखीसाठी समिती** - या समितीचे कार्य निरनिराळ्या समितीच्या निवडणुकीचे न्यायीक देखरेख करणे. ह्या समितीमधील उमेदवारांसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे होते.

१) तो कमीत कमी जमिनी कर देणार ¼ चा मालक असावा.

२) तो आपल्या जमिनीवर तयार करण्यात आलेल्या घरात राहाणारा असावा.

३) त्याचे वय ३५ ते ७० वर्षाच्या आत असावे.

४) तो मंत्र - ब्राम्हण अर्थात वेदांना जाणणारा असावा. वेद तोंडपाठ असावेत.

### १.२.५ मोगल काळ

गावाची रचना मुस्लिम शासनाच्या काळात पूर्णपणे परिवर्तित झाली नाही. मोगल कालीन शासन व्यवस्थेत मौर्यकालीन व गुप्तकालीन शासन व्यवस्था क्रियाशील होती. गाव विकासाच्या विविध संस्था तशाच कार्यरत होत्या. परंतु मोगल व मराठा शासनात थोडासा बदल केला गेला.

एस.बी. सामंत यांच्या मतानुसार, गावाच्या सभा मुस्लिम काळात राज्याचे समर्थन ठेवीत होती. शासकामार्फत पंचायतीच्या निर्णयांना लागू केले जात होते, राज्याची शक्ती ही नेहमी गावाच्या सभेत सामील राहिली. यावरुन असे स्पष्ट होते की, मौर्यकाळ व गुप्त काळातील पंचायतीचे रुप व त्यांच्यामागील भावना मुस्लिम काळात सुध्दा विद्यमान होत्या. मुखिया, लेखाकार व चौकीदार जे पूर्वीच्या काळी पाळले जात ते मुस्लिम काळात ही शासन करीत होते.

मध्य काळात दिल्ली साम्राज्याला शासन व्यवस्थेकरिता अनेक भागात व उपभागात वाटले गेले होते. सुरवातीला प्रांताला 'इंन्ता' म्हटले गेले. अल्लाउद्दीनने त्यास 'सुबा' म्हटले त्यानंतर परगण्याचा मुख्य आलम आणि मुशारक आणि गावाचा प्रमुख लंबदार, पटवारी होते. पंचायत शासन व प्रबंध व्यवस्था स्वत:च्या क्षेत्रात जवळ-जवळ स्वतंत्र आणि आत्मनिर्भरपणे कार्य करीत होती.

ह्यू टिंकर ह्यांच्या मते, ग्रामीण प्रशासनाचे लोकशाही स्वरुप मोगल काळात गाव हे शक्तिशाली मुखियाव्दारे नियंत्रित केले जात होते. हे एका माणसाचे शासन होते. पंचायताचे स्वरुप पूर्णपणे प्रतिनिधीत्मक होते. ह्यामध्ये जास्तीत जास्त सदस्य समृध्द कुटुंबातील किंवा ब्राम्हण आणि श्रेष्ठ शेतीमधील हिस्सा असणारे, शुद्रासहित गावच्या सर्व समुदायाचे प्रतिनिधीत्मक स्वरुपाचे होते. पंचायती गावाबाबत पर्यवेक्षण, वादाचा निकाल, तसे कर निश्चित करीत होती. प्राचीन पंचायती, हवे तर जाती पंचायतीच्या रुपात असो किंवा एक न्यायीक किंवा प्रशासकीय संस्थाच्या रुपात आपला विचार-विमर्श सर्व लोकांच्या उपस्थितीत करीत होती. जे उपस्थित राहण्याकरिता जागृत होते. जदूनाथ सरकारच्या शब्दात "मोगल भारतात शुध्द रुपाने नागरीक होते."

## १.२.६ ब्रिटीश काळ

लॉर्ड एल्फीस्टन लिहीतात की, ग्राम समुदाय आपल्या लहान रुपात सर्व शासन पध्दतीची तत्वे ठेवतात आणि आपल्या सदस्यांचे रक्षण करण्यात ते स्वतः समर्थ आहेत. त्यांचे कार्य योग्य पध्दतीने चालत राहिल, जरी इतर सर्व शासन दूर सरले गेले तरीही मात्र ब्रिटीशांनी आपल्या अंमलकाळात ही संस्था कमजोर करण्याचा प्रयत्न केला. लॉर्ड हेलींची मान्यता आहे की, पंचायत एक जीवंत संस्था होती. त्यांच्यावर विशेष कार्याची जबाबदारी होती. परंतु ही स्थिती देशाच्या काही नगण्या भागात राहिली असेल. इतर सर्व स्थानात पंचायत वयोवृध्द लोकांच्या हाती राहिली आहे. म्हणजेच भारतात सर्वाधिक भागात पंचायती निर्जीव आणि निष्क्रिय झाली होती. कारण इंग्रज शासकांनी ग्रामीण स्वशासनाचे स्थानावर अधिकारी तंत्राला प्रोत्साहन दिले. ज्याचा प्रमुख उद्देश आपल्या शासकांना प्रसन्न ठेवून भारतीय जनतेचे शोषण करण्याचा होता. वस्तुतः ब्रिटीश शासनाच्या काळात अंतर्गत गावाची आत्म-निर्भरता नष्ट होत होती आणि याकरिता पंचायती व्यवस्था सुध्दा पूर्णपणे शिथिल झाली होती.

सुरवातीला ब्रिटीश शासकांची भारताच्या ग्रामीण जीवनात केवळ इतकीच दिलचस्पी होती की, शासनाचे काम चालविण्याकरिता गावांतून शेतसारा वसूल होत राहिल. मात्र नंतर इंग्रजांनी पंचायती राज व्यवस्थेला पुनर्जीवीत करण्याचा प्रयत्न केला. ह्याचा संदर्भ प्रशासन सन १८०२ च्या प्रस्तावात पाहावयास मिळतो. याची पुनरावृत्ती सन १८१६ मध्ये झाली. जेव्हा ग्रामस्तरावर संस्थाना आरंभ झाला. सन १८८२ च्या वर्षात स्थानिक स्वशासनाचे विकासात एक नवीन अध्यायाचा शुभारंभ झाला. लॉर्ड रिपन जो भारतात स्थानिक स्वशासनाचा पिता मानला जात होता. त्याच्या प्रस्तावात त्याने १८७० च्या लॉर्ड मेयोच्या इराद्यांना अग्रिम व्यवहारिक विकासाच्या स्थितीत आणण्याचा प्रयत्न केला. आणि ब्रिटीश शासनाच्या अधिन राहून सर्व गावापर्यंत कायदेशीररित्या स्थानिक स्वशासनाचा विस्तार केला.

विकेंद्रीकरणाबाबत शाही आयोगाच्या शिफारशींना १९१५ मध्ये भारत सरकारच्या स्थानिक स्वशासनावरील प्रस्तावात स्थान मिळाले. सन १९१९ मध्ये मॉन्टेस्कू चेम्सफर्ड सुधारणा धोरणानंतर स्थानिक स्वशासनात एक नवीन युग सुरु झाले. शासन व्यवस्थेची जबाबदारी जनतेमार्फत निर्वाचीत मंत्र्यावर आली.

स्थानिक शासनाच्या इतिहासात सन १९३९ पासून सन १९४६ पर्यंतचा काळ अंधकाराचा मानला जोतो. सन १९४७ मध्ये जेव्हा भारत स्वतंत्र झाला. सन १९४८ मध्ये स्थानिक स्वशासन अधिनियम मध्ये अंगीकारण्यात आले, ते जनपद 'स्थानिक स्वशासन' या नावाने.

**आपली प्रगती तपासा.**

पंचायत राजची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद करा.

## १.३ गांधीजींचे पंचायतराज संबंधी विचार

गांधीजींच्या मतानुसार, भारत हा गावात राहतो. म्हणूनच त्यांनी संपूर्ण भारताची रचना दाखविली. भारत हा खेड्यांचा देश आहे. खेड्यांचा विकास झाल्यास संपूर्ण देशाचा विकास सर्वार्थाने होईल हा आशावाद त्यांना होता. ह्यासाठी त्यांनी स्वातंत्र्या मिळण्यापूर्वी 'यंग इंडिया' ह्यामध्ये पंचायती मार्गदर्शनाकरिता दहा नियम प्रस्तृत केले ज्यामध्ये सत्ता विकेंद्रीकरण व विकासाबाबत प्रस्ताव होता. महात्मा गांधीच्या विचारांना त्यांच्या कार्यकर्त्यांनी, श्री विनोबा भावे व विशेषता अत्यंत कट्टरपणे, सुसूत्रतेने व पध्दतशीरपणे पुरस्कार केला तो श्री. जयप्रकाश नारायण ह्यांनी.

**आपली प्रगती तपासा.**

महात्मा गांधीचे पंचायत राज संदर्भात विचार सांगा.

## १.४ पंचायत राजची संकल्पना

पंचायत राज ही राजकीय स्वरुपाची संरचना असली तरी तिच्या मागचे कारण परंपरा व प्रेरणा ही आर्थिक स्वरुपाची आहे. ग्रामीण जनतेचा सर्वांगीण विकास आणि प्रामुख्याने ग्रामीण जीवनातील कृषी व तत्सम संलग्न घटकांचा विकास म्हणजेच पर्यायाने गावाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याची यंत्रणा म्हणून ही व्यवस्था अस्तित्वात आणण्यात आली. राजकीय सत्ता प्रदान करण्याची संरचना म्हणून ती अस्तित्वात आली नाही. पंचायत राजमागील आदर्शाचा विचार केल्यास सत्तेचे राजकारण हे उद्दिष्ट नसून विकासाची रणनिती म्हणून तिचे अनन्य साधारण महत्व आहे.

munotes.in

भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यानंतर भारतीय जनतेची विकासासंबंधी अपेक्षापूर्तीसाठी घटनानिर्मिती प्रक्रिया सुरु झाली. २६ जानेवारी १९५० ला भारताचे नवीन संविधान लागू झाले. आणि भारताला एक लोकशाही राज्य घोषित करण्यात आले. भारतीय घटनेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे भारताचे लोकशाही स्वरुप होय. भारतीय घटनेने भारतात जनतेच्या सरकारला जन्म दिला. ज्यामध्ये प्रत्येक पाच वर्षानंतर जनतेला आपले सरकार निवडण्याचे व बदलण्याचा अधिकार आहे. भारतीय लोकशाहीने देशात संघात्मक लोकशाही स्थापन केली आहे. संघराज्य लोकशाहीने देशाच्या राजधानीपासून ग्रामीण क्षेत्रापर्यंत सत्तेचे विकेंद्रीकरण खालील प्रकारे केले आहे.

केंद्रसरकार
↓
राज्यसरकार
↓
जिल्हा सरकार किंवा स्थानिक प्रशासन

| | |
|---|---|
| ↓ | ↓ |
| जिल्हा पंचायत | नगर नियम |
| ↓ | ↓ |
| जनपद पंचायत | नगर पालिका |
| ↓ | ↓ |
| ग्रामपंचायत | नगर पंचायत |
| ↓ | |
| ग्रामसभा | |

भारतात हे वर्गीकरण अशासाठी करण्यात आले आहे की, भारत एक मोठा देश आहे. आजही मोठ्या संख्येने जनता ग्रामीण भागात आहे. लोकशाही राज्यात सर्वोच्च स्तरावर भारतात केंद्र सरकार आहे. यालाच संघसरकार म्हणतात. संघराज्य व्यवस्थेत प्रत्येक राज्यात अलग सरकार असते. त्याला राज्यसरकार म्हणतात. त्यानंतर तिसऱ्या स्तरावर स्थानिक शासन कार्यरत आहे. (वरील तक्त्यावरुन कळेल)

'पंचायत राज' हा शब्द स्वतंत्र भारतात श्री बलवंतराय मेहता ह्यांच्या शिफारशीतील शब्दांतून आला आहे. लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पना ह्यातून स्पष्ट होते. शाब्दिक दृष्टीने पंचायत राज शब्द हिंदी भोषेचे दोन शब्द "पंचायत" व "राज" पासून बनला आहे. ज्याचा अर्थ होतो. पाच व्यक्ति प्रतिनिधींचे शासन. संस्कृत भाषेच्या ग्रंथानुसार एखाद्या आध्यात्मिक पुरुषांसह पाच पुरुषांचा समुह अथवा वर्ग हा पंचायतच्या नावाने ओळखले जात होते.

काही काळानंतर पंचायतच्या या आद्यात्मिक संकल्पनेत बदल होत गेला. आणि आज वर्तमान काळातील संकल्पनेत पुढील अभिप्राय आहे की, ज्यांची सदस्य संख्या व्यक्तिसह पाच किंवा त्यापेक्षा अधिक असते, जे स्थानिक विकासात महत्वपूर्ण भूमिका करते.

munotes.in

**आपली प्रगती तपासा.**

पंचायत राजची संकल्पना सांगा.

## १.३ बलवंतराय मेहता समिती

स्वतंत्र भारतासमोर अनेक समस्या होत्या त्यातून मार्ग काढण्यासाठी देशव्यापी विकास योजना आखण्यात आल्या. त्यातीलच एक सामुहिक विकास योजना ही होय. सामुहिक विकास योजना व त्याला पुरक अशी राष्ट्रीय विस्तार सेवा योजनांचे मूल्यमापन करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली. ती समिती अध्यक्षांच्या नावाने म्हणजे "बलवंतराय मेहता समिती" या नावाने ओळखली जाते. ग्रामीण स्थानिक शासनासाठी मेहता समितीने सुचविलेल्या त्रिस्तरीय आराखड्यापासून "पंचायती राज" व्यवस्था निर्माण झाली.

विकसनशील देशांनी "नियोजनामधून विकास" ही संकल्पना स्विकारली आहे. विकसनशील देशातील निरक्षरतेचे प्रमाण, दारिद्र्य , जातीभेद या वृत्तीही विकेंद्रीकरणाच्या आड येतात. पण ती कारणे असण्यापेक्षा त्यांच्या अविकसित स्थितीची जणू ती परिमाणे आहेत आणि म्हणूनच विकेंद्रीकरणाची खरी गरज अशा देशातच आहे. हे महत्व जाणून घेवून बलवंतराय मेहता समितीने पंचायत राजचे लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पना आपल्या शिफारशीव्दारे २४ नोव्हेंबर १९५७ रोजी सादर केली. त्यातील काही शिफारशी थोडक्यात पुढीलप्रमाणे

१) विकास कार्यक्रमांचे स्वरुप आणि विविध क्षेत्रांमधील कार्यक्रमांमध्ये अग्रक्रम द्यावा.

२) कार्यक्रमाची अंमलबजावणी करतांना शेतीविषयक कार्यक्रमांना अधिक चालना आणि विविध मंत्रालये, वा खाते वा संघटना तसेच केंद्र, राज्य आणि सामुहिक विकास कार्यक्रमात सहभाग असलेल्या संस्थामध्ये कार्य-समन्वय असावा.

३) संघटनात्मक रचनेत सुधारणा करण्यात यावी.

४) स्थानिक उपक्रमशीलतेला वाव देण्याच्या दृष्टीने सुधारणा करण्यात यावी.

५) कार्यक्रमाच्या मूल्यमापनासाठी यंत्रणा असावी.

बलवंतराय मेहता समितीने त्रिस्तरीय विकास यंत्रणा सुचविली. ग्रामपातळीवर ग्रामपंचायत, विकास गट (तालुका) पातळीवर पंचायत समिती, जिल्हापातळीवर जिल्हापरिषद प्रत्येक पातळीवर सदस्य निवडून दिले जावेत व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या साह्याने लोकहितकारक विकास कार्य व्हावे असे सुचविले आहे. लोकशाही विकेंद्रीकरण आणि लोकसहभाग ह्यावर मेहता समितीने भर दिला आहे.

munotes.in

राष्ट्रीय विकास मंडळाने बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशी स्विकारुन प्रत्येक राज्याने आपळ्या राज्याकरिता परिस्थितीनुसार त्या अंमलात आणाव्यात असे सुचविले. ग्रामीण विकास प्रशासन रचना, सत्ता व जबाबदारीचे वास्तव हस्तांतरण साधनांची पर्याप्त उपलब्धी, पंचायत राज संस्थामार्फत विकास कार्यक्रम अंमलबजावणी व अधिक विकेंद्रीकरणाची सहज शक्यता ही पंचायत राजची वैशिष्टये होत.

**आपली प्रगती तपासा.**

बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशी सांगा.

## १.६ महाराष्ट्रातील पंचायत राज

मेहता समितीने सुचविलेल्या पंचायत राज व्यवस्थेच्या चौकटीत राहून स्थानिक गरजांनुसार पंचायत राज स्थापन करण्याची मुभा राज्यांना दिली. त्यानुसार २ ऑक्टोबर १९५८ रोजी राजस्थान आणि १ नोव्हेंबर १९५८ रोजी आंध्रप्रदेश या राज्यांनी पंचायत राज संस्थाची स्थापना केली. व्दिभाषिक मुंबई राज्याच्या पुर्नरचनेचा प्रश्न विचाराधीन असल्यामुळे मुंबई राज्यात पंचायत राज निर्मितीचा विषय लांबणीवर टाकण्यात आला. १ मे १९६० रोजी नवीन महाराष्ट्राची निर्मिती झाली. महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी वसंतराव नाईक समिती नेमण्यात आली होती. ह्या समितीच्या शिफारतीनुसार १९६१ साली राज्य विधीमंडळाने महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती कायदा पास केला गेला. १ मे १९६२ रोजी महाराष्ट्र राज्यात पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आली. महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्थेतील तरतुदी १९५८ चा मुंबई राज्य ग्रामपंचायत कायदा अस्तित्वात आधीच होता. त्यानुसार महाराष्ट्रात त्रीस्तरीय पंचायत राज यंत्रणा कार्यरत आहे. वेळोवेळी पंचायत राज यंत्रणेत बदल करण्यात आले आहे. १९९२ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायत राजमध्ये आमुलाग्र बदल करण्यात आले. पंचायत राजने नवे रुप धारण केले. त्यामुळे ग्रामपातळीवर अमुलाग्र बदल होत आहेत.

महाराष्ट्रातील त्रिस्तरीय रचनेचा उल्लेख सामान्यत: पंचायत राज असा करण्यात येतो. ग्रामपंचायत हा या रचनेचा सर्वात तळाचा व प्रमुख आधार असून पंचायत समिती ही विकासाच्या नियोजन व अंमलबजावणीसाठी महत्वाचा स्तर आहे. जिल्हा परिषद ही समन्वय साधणारी व देखरेख करणारी शिखर संस्था आहे.

**महाराष्ट्रातील पंचायत राज यंत्रणा**

| स्तर | संस्था | लोकप्रतिनिधी | शासकीय प्रतिनिधी |
|---|---|---|---|
| जिल्हा | जिल्हा परिषद | जिल्हाध्यक्ष | विशेष कार्यकारी अधिकारी (CEO) |
| तालुका | पंचायत समिती | सभापती | गटविकास अधिकारी (BDO) |
| गाव | ग्रामपंचायत | सरपंच | ग्रामसेवक /ग्रामीण विकास अधिकारी |

महाराष्ट्र राज्यातील पंचायत राज कायद्याविषयी थोडक्यात खालीलप्रमाणे

### १.६.१ जिल्हापरिषद

ग्रामीण संस्थामधील सर्वात शिखर संस्था जिल्हापरिषद आहे.

**सदस्यत्व –**

जिल्हा परिषदेत पाच प्रकारचे सदस्य असतात. जिल्ह्याच्या एक सदस्यीय मतदार संघातून निवडून आलेले ५० ते ७५ सदस्य, त्यात स्त्री सदस्य नसल्यास स्विकृत (को-ऑप्ट)केलेल्या दोन स्त्री सदस्या, त्या जिल्ह्यातील पंचायत समित्यांचेसभापती हे पदसिध्द सदस्य तसेच अनुसुचित जाती किंवा जमातींचा कोणीच उमेदवार निवडून आलेला नसल्यास असा सदस्य स्विकृत (को-ऑप्ट) करण्यात येतो. राजपत्रात (गॅझेट) मध्ये सूचना करुन प्रसिध्द केलेल्या जिल्ह्यातील पाच संयुक्त सहकारी संस्थांचे अध्यक्ष सहकारी सदस्य महणून राहतात.

**कार्यकाल –**

जिल्हा परिषदेचा कार्यकाळ पहिल्या बैठकीच्या दिवसापासून पाच वर्षाचा राहील. त्यापूर्वी राज्य सरकार आदेश काढून जिल्हा परिषदेला विसर्जित किंवा निष्प्रभावित करु शकेल.

**पदाधिकारी - अध्यक्ष**

जिल्हा परिषदेच्या सदस्यांतून एकाची अध्यक्ष तर कमी मत मिळालेल्या उमेदवाराला उपाध्यक्ष म्हणून निवडले जाते. जिल्हा परिषदेचे प्रशासकीय कार्य अध्यक्ष व उपाध्यक्ष हे पदाधिकारी पाहत असतात. जिल्हा परिषदेच्या निवडून आलेल्या सदस्यांमधून त्यांची निवड होते. असा सदस्य पंचायत समितीचा सभापती किंवा उपसभापती असल्यास जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी पदावर निवड झाल्यास त्या तारखेपासून त्याचे पंचायत समितीमधील पद रिक्त होते. अध्यक्षपदाचे महत्व लक्षात घेता त्याला राज्यमंत्रीपदाचा दर्जा दिला आहे. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडीच्या सभेची तारीख जिल्हाधिकारी निश्चित करतो. जिल्हाधिकारी किंवा त्यांनी नियुक्त केलेला किमान उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी या सभेचा अध्यक्ष असतो. ही निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने होते. स्पर्धक उमेदवारास समान मते पडल्यास चिठ्ठ्या टाकून निवडणूक होते. अध्यक्षांच्या अनुपस्थित उपाध्यक्ष अध्यक्षांचा कार्यभार सांभाळतो. व सभेच्या अध्यक्षस्थानी असतो.

munotes.in

**अध्यक्षांची कार्ये -**

जिल्हा परिषद अध्यक्षांची कार्ये व अधिकार अधिनियमाच्या कलम ५४ मध्ये नमूद करण्यात आली आहेत. च्याची माहिती थोडक्यात खालील प्रमाणे.

१) जिल्हा परिषदेच्या सभा बोलाविणे, सभेच्या कामकाजाचे नियमन करणे, सभेचे अध्यक्षस्थान भूषविणे.

२) जिल्हा परिषदेचे अभिलेखन पाहणे.

३) जिल्हा परिषदेच्या वित्तिय आणि कार्यकारी प्रशासनाच्या कारभारावर लक्ष ठेवणे.

४) जिल्हा परिषद स्थायी समिती, विषय समित्या तसेच पंचायत समितीच्या ठरावांची अंमलबजावणी होतांना त्यावर देखरेख ठेवणे.

५) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे व त्यांचा गोपनिय अहवाल विभागीय आयुक्तांना पाठविणे.

६) अंदाजपत्रकात तरतूद नसलेल्या विकास योजनांच्या खर्चाची तरतूद जिल्हा निधीतून करुन त्यांच्या अंमलबजावणीचे आदेश देणे.

७) आणिबाणीच्या प्रसंगी लोकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कार्य चालू ठेवणे.

**विषय समित्या –**

जिल्हा परिषद स्थायी समिती, कृषी व सहकार समिती, शिक्षण समिती व इतर विषय समित्या असतात. (वित्त समिती, कामकाज समिती, आरोग्य समिती, पशुसंवर्धन व दुग्ध विकास समिती, जल व्यवस्थापन व जलनिस्मारण समिती) स्थायी समितीचा अध्यक्ष जिल्हापरिषदेचा अध्यक्ष स्वतःच असतो. समाजकल्याण समितीचा अध्यक्ष अनुसुचित जाती, जमातीपैकी सदस्यांकडून असावा असे बंधन आहे.

**उत्पन्नाची साधने –**

**१) जिल्हा परिषद –**

कर बसवू शकते. उदा. जिल्हा परिषदेच्या हद्दीत येणाऱ्या व्यवसाय व्यापार, धंदा, नोकरी करणाऱ्यांवर कर, यात्रेवरील कर, सार्वजनिक मनोरंजन व करमणूक कर, सार्वजनिक पिण्याच्या पाण्यावरील कर, बाजारामध्ये विकल्या जाणाऱ्या मालावर कर इ. परंतु सामान्यतः हे कर जिल्हा परिषदा बसवित नाही कारण त्यामुळे अप्रियता वाढते.

**२) सरकारी अनुदाने –**

परिषदेला जिल्हा परिषदेच्या हद्दीत येणाऱ्या जमिनीवरील कराच्या ७०% अनुदान मिळते. जिल्ह्यातील लोकसंख्येला दरडोई दोन रुपये रक्कम येईल. त्यापेक्षा वरीलरक्कम जितकी रक्कम कमी तितके समकरण अनुदान मिळते. जी कामे सरकार परिषदेकडे सोपविल. त्यासाठी सहेतुक अनुदान विकास योजना त्वरेने अंमलात याव्यात म्हणून त्यांची प्रगती पाहूनही अनुदान मिळते.

**अधिकारी वर्ग -**

मुख्य कार्यकारी अधिकारी हा जिल्हा परिषदेचा प्रशासकीय प्रमुख असतो. भारतीय प्रशासकीय सेवेमधील या अधिकाऱ्याच्या कार्य कर्तृत्वाचा ठसा संबंधित जिल्हा परिषदेच्या यशापयशावर उमटत असतो. त्यांची निवड संघ लोकसेवा आयोगा कडून केली जाते. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या मदतीला उपमुख्य कार्यकारी अधिकारी असतात. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर खालील कार्ये सोपविली आहेत.

१) जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय यंत्रणांचा प्रमुख म्हणून कार्य करणे. प्रशासकीय यंत्रणेला मार्गदर्शन करणे व नियंत्रण ठेवणे.

२) महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती कायद्यातील तरतुदीनुसार जिल्हा परिषदेच्या अधिकारी व सेवक वर्गाची नेमणूक करणे.

३) जिल्हा परिषद व विषय समित्यांच्या सभांना उपस्थित राहून मार्गदर्शन करणे.

४) जिल्हा परिषदच्या आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण ठेवणे व योग्य त्या खर्चास सहमती देणे.

५) जिल्हा परिषदेच्या विकास कार्यास गती देणे, योजना कार्यान्वित करणे आणि त्यासाठी अधिकारी व लोकप्रतिनिधी यामध्ये समन्वय घडवून आणणे.

६) जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून कार्याची माहिती हिशेब अहवाल मागविणे.

**जिल्हा परिषदेची कार्ये –**

विकास कार्याचे नियोजन आणि अंमलबजावणी या दृष्टीने जिल्हा परिषदेस स्थानिक शासन व्यवस्थेमध्ये महत्वाचे स्थान आहे. त्याला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे.१९६१ च्या महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती कायद्यानुसार १२८ विषयांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यातील काही प्रमुख कार्ये थोडक्यात पुढीलप्रमाणे.

**१) शेतीविषयक** – पीक स्पर्धा घेणे, पिकांचे संरक्षण करणे, पीक मोहिमा हाती घेणे, शेतीचे सुधार प्रयोग व प्रात्यक्षिके, शेती अवजारे व साधनांचे वाटप करणे, खते, मिश्र खते पुरविणे. सुधारित बी-बियाणांचे वाटप.

**२) पशुसंवर्धन** - पशू पैदासित सुधारणा घडवून आणणे, सुधारित मेंढ्या, शेळ्या, कोंबड्या यांची पैदास व वाटप करणे, कुक्कुटपालन, वराहपालन.

**३) सहकार** - सहकारी संस्थांची नोंदणी करणे, सहकारी संस्थांची वाढ करणे, सहकारी संस्थांना अर्थसहाय्य देणे, उपविधीस मान्यता, सहकारी संस्थावर देखरेख ठेवणे, कृषी उत्पादनांच्या बाजारावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

**४) उद्योग व कुटीरोद्योग** - लघु उद्योगांना प्रोत्साहन देणे, कुटोरोद्योग, ग्रोमोद्योग, स्वयंरोजगार यांची वाढ, शेतीपुरक उद्योग, व्यवसायाचा व्यापक कार्यक्रम राबविणे, जिल्हा उद्योग केंद्र, चर्मोद्योग, खादी ग्रामोद्योग, ग्रामीण कामगिरीचे पुर्नवसन, कच्चा माल पुरवठा, विक्री व्यवस्था.

५) **शिक्षण** - प्राथमिक शाळा, माध्यमिक शिक्षणाची सोय, शाळांची तपासणी, शाळांच्या इमारती बांधणे, क्रिडांगणांची सोय करणे, सर्व शिक्षण मोहिम राबविणे.

६) **आरोग्य** - प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करणे, फिरती आरोग्य पथके, देवीप्रतिबंधक लस, संपूर्ण स्वच्छता अभियान, निर्मल ग्राम योजना, गलिच्छ वस्त्यांचे पुर्नवसन, शिशू संगोपन केंद्र.

७) **इमारत, दळणवळण** - ग्रामीण रस्त, जिल्हा रस्ते, पूल बांधणे, जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारती बांधणे, दळणवळणांची इतर साधने.

८) **समाज कल्याण** - मागासवर्गीयांचा शैक्षणिक विकास, शिष्यवृत्ती देणे, त्यांच्याकरिता शाळा, वसतीगृह बांधणे व अनुदान देणे, आदिवासी विकास, आर्थिक दुर्बल घटकांचे कल्याण, अस्पृश्यता निर्मूलन, माता बाल कल्याण कार्यक्रम.

९) **पाटबंधारे व जलसिंचन** - लघु पाटबंधाऱ्यांची कामे, उपसा सिंचन योजना, ग्रामीण पाणीपुरवठा.

१०) **परिसर अभियांत्रिकी** - पिण्याच्या पाणीपुरवठ्याच्या योजना, ग्रामीण भागातील रहिवासीसाठी पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा पुरवठा, जलनिस्सरण, स्वच्छ पाण्यासाठी बांधकाम.

**आपली प्रगती तपासा.**

महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेची रचना व कार्ये सांगा.

___

___

___

___

___

### १.६.२ पंचायत समिती

त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेमध्ये ग्रामपंचायत व जिल्हा परिषद यांना जोडणारा दुवा म्हणजे पंचायत समिती होय. वेगवेगळ्या राज्यांत पंचायत समिती वेगवेगळ्या पातळ्यांवर संघटित झाली असून तिची रचना आणि अधिकार या दृष्टीनेही त्यांच्यामध्ये फरक आढळून येतो. महाराष्ट्रात पंचायत समिती तालुका पातळीवर कार्यरत असून तिचे स्वरुप महाराष्ट्र अधिनियमाव्दारे आहे, पंचायत समिती ही जिल्हा परिषदेची क्षेत्रिय समिती म्हणून कार्य करते. वसंतराव नाईक समितीने केलेल्या शिफारशीनुसार जिल्हा परिषद हा पंचायत राजचा प्रमुख घटक असल्यामुळे पंचायत समितीचे स्थान व कार्यक्षम दुय्यम स्वरुपाचे आहे. इ.

**पंचायत समितीची रचना –**

महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनिय १९६१ कलम ५८ नुसार तयार केलेल्या मतदार संघामधून पंचायत समितीवर थेट निवडून गेलेल्या सदस्यांचा अंतर्भाव

असतो. एक जिल्हा परिषद मतदार संघाचे साधारणतः २०,००० लोकसंख्येचे दोन पंचायत समिती मतदार गट तयार केले जातात. प्रत्येक गटांतून एक असे प्रतिनिधी थेट मतदारांकडून निवडले जातात.

पंचायत समितीमधील प्रत्यक्ष निवडणुकीव्दारे भरावयाच्या जागांच्या ३३ % आरक्षण स्त्रियांसाठी असतात. आणि अशा जागा पंचायत समितीमधील वेगवेगळ्या निर्वाचक गणांना आळीपाळीने नेमून दिल्या जातात. एकूण जागांपैकी २७ % जागा मागासवर्गातील प्रवर्गासाठी राखीव असतात. अनुसुचित जाती जमातीचे एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण लक्षात घेवून त्या प्रमाणात अनुसुचित जाती-जमातीकरिता पंचायत समितीवर राखीव जागा ठेवल्या जातात.

**पंचायत समितीचा कार्यकाल –**

पंचायत समितीचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकानंतर पंचायत समितीच्या पहिल्या तारखेपासून तिचा कार्यकाल गणला जातो. या कालावधी आधी पंचायत समिती बरखास्त केल्यास ६ महिन्याच्या आत पुन्हा निवडणुका घ्याव्या लागतात. पंचायत समितीच्या कालावधीची मुदतवाढ करण्याची तरतूद अधिनियमांमध्ये नाही.

पंचायत समितीच्या वर्षातून १२ बैठका होतात. संबंधित अधिनियमातील कलम ११७ मधील तरतुदी विचारात घेता दोन बैठकांमधील कालावधी तीस दिवसांपेक्षा जास्त असू नये.

**सभापती –**

पंचायत समितीच्या निर्वाचित सदस्यांमधून सभापतीची निवड केली जाते. ही निवड पंचायत समितीच्या निवडणुकीनंतरच्या पहिल्या सभेमध्ये केली जाते. पहिली सभा जिल्हाधिकारी बोलवितात. जिल्हाधिकारी किंवा त्यांनी नेमून दिलेला अधिकारी पहिल्या सभेचा अध्यक्ष असतो. निवडणुकीत उमेदवारास समान मते पडल्यास निर्वाचित अधिकारी चिठ्ठया टाकून निर्णय देतात. पंचायत समितीच्या सभापती व उपसभापतीचा कार्यकाल अडीच वर्षे इतका असतो.

सभापती पदासाठी आरक्षण पध्दती असून ते विविध प्रवर्गासाठी फिरते असते. संपूर्ण अनुसुचित क्षेत्रामध्ये ते पद केवळ अनुसुचित वर्गासाठी राखून ठेवलेले असते. राखीव पदांपैकी ३३% पदे त्या त्या प्रवर्गातील स्त्री प्रतिनिधींसाठी आरक्षित असतात. पंचायत समित्यांमधील एकूण सभापती पदांपैकी २७% पदे मागासवर्गीयांच्या प्रवर्गासाठी राखीव असतात. सभापती पदाच्या एकूण पदांपैकी ३३% पदे स्त्रियांसाठी राखीव असतात.

**सभापतीची कार्ये –**

पंचायत समितीच्या सभापतीचे अधिकार व कार्ये थोडक्यात पुढीलप्रमाणे –

१) पंचायत समितीची सभा बोलविणे, सभेचे अध्यक्षस्थान स्विकारणे व सभांचे कामकाज चालविणे.

२) विविध योजनांवर चर्चा घडवून बैठकामध्ये त्यांना मान्यता मिळविणे, तसेच संमत झालेल्या ठरावांची व निर्णयांची अंमलबजावणी करणे.

३) पंचायत समितीच्या क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या जिल्हा परिषदेच्या तसेच राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

munotes.in

४) पंचायत समितीच्या क्षेत्रातील मालमत्तेचे संपादन विक्री इत्यादी बाबत कार्यवाही करणे.

५) पंचायत समितीच्या कागदपत्रांची अभिलेखा इत्यादी नोंद पाहणे व महत्वांच्या कागदपत्रांची नोंद घेणे.

सभापतीच्या अनुपस्थित उपसभापती पंचायत समितीचे कामकाज बघत असतो.

**गटविकास अधिकारी** -

पंचायत समिती पातळीवर प्रशासनाचे नेतृत्व गटविकास अधिकारी करतो. त्यांची निवड महाराष्ट्रात राज्य सेवा आयोगाकडून (MPSC) केली जाते. तसेच विस्तार अधिकाऱ्यांकडून पदोन्नतीने ही जागा भरल्या जातात. गट विकास अधिकारी अनेकदा महसूल सेवेकडून आलेले असतात. प्रशासनाचा अनुभव तसेच समाजसेवा क्षेत्राचा अनुभव या दोन्हींची जोड गटविकास अधिकाऱ्यांच्या पदासाठी महत्वाची असते. गटविकास अधिकाऱ्याची कार्ये थोडक्यात खालील प्रकारे सांगता येतील.

१) पंचायत समितीच्या प्रशासकीय कार्यावर देखरेख ठेवणे, कर्मचारी वर्गाला मार्गदर्शन करणे व त्यांच्या कामावर नियंत्रण ठेवणे.

२) जिल्हा परिषदेला सादर करण्यासाठी पंचायत समिती क्षेत्रातील विकास योजनांचा आराखडा तयार करणे, गट अनुदानातून घ्यावयाच्या कार्याचा व विकास योजनांचा आराखडा तयार करणे, अनुदानातील रक्कमांचे वाटप करणे.

३) विविध पदांवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याचे अहवाल आणि हिशोब मागविणे.

४) पंचायत समितीच्या बैठकीत सहभागी होणे. सचिव या नात्याने बैठकीचे नियमन करणे व त्यांचे इतिवृत्त तयार करणे.

५) पंचायत समितीच्या कार्याचा अहवाल व पंचायत समितीच्या सभांमध्ये घेतलेल्या निर्णयाचा अहवाल जिल्हा परिषदेस पाठविणे.

६) जिल्हा परिषदेच्या पंचायत समिती क्षेत्रातील विकास कार्याची अंमलबजावणी करणे व देखरेख ठेवणे.

७) पंचायत समितीची अर्थसंकल्प मंजूर करणे व शासनाने सोपविलेली कामे पार पाडणे.

**पंचायत समितीची कार्ये** -

महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम १०१ नुसार पंचायत समितीकडे सोपविलेली मुख्य कार्ये थोडक्यात पुढीलप्रमाणे -

१) **कृषी विकास** -

शेती पिके, फळे, भाजीपाला, फुले इ उत्पादने सुधारणा, वैरण सुधारणा, जमीन विकास, खार जमीन विकास, खार जमीन विकास, मृदूसंधारण, जलव्यवस्थापन, आदर्श शेती प्रात्यक्षिके, शेती अवजारांचे वाटप, पीक संरक्षण, कृषी विस्तार.

munotes.in

**२) पशुसंवर्धन –**

दुभत्या जनावरांची पैदास, गुरे पशु सुधारणा, सुधारीत जातीची पैदास, दुग्धउत्पादन, संकलन, साठवण, वाहतूक, प्रक्रिया, वितरण, मृत जनावरांची व्यवस्था.

**३) मत्सोद्योग व जलचर व्यवस्था -**

गोड्या पाण्यातील व सागरी मासेमारी.

**४) सहकार विकास** -

सहकारी संस्थाची संख्या वाढविणे व देखरेख ठेवणे.

**५) कुटीर उद्योग विकास** -

कुटोरोद्योग, ग्रोमोद्योगांचा व्यवसायांचा विकास साधणे, शेती पुरक व्यवसायांचा विकास, चार्मोद्योग, रेशीम उत्पादन, मधुमक्षिकापालन, खादीग्रामोद्योग ग्रामीण कारागीरांचे पुर्नवसन.

**६) रोजगार निर्मिती** -

रोजगार निर्मितीच्या योजनांची अंमलबजावणी करणे, रोजगार व स्वयंरोजगाराला चालना देणे.

**७) शैक्षणिक** -

प्राथमिक शिक्षण विकास, मोफत प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शाळांची तपासणी, इमारतींचे बांधकाम, शैक्षणिक साहित्याचा पुरवठा.

**८) समाजकल्याण** -

आदिवासी विकास, मागासवर्गीयांचा आर्थिक विकास, अस्पृश्यता निवारण कार्यक्रम, महिला व बालकांच्या कल्याणांचे कार्यक्रम.

**९) सार्वजनिक आरोग्य -**

संपूर्ण ग्राम स्वच्छटा, निर्मल ग्राम योजना, शालेय आरोग्य सेवा, साथीच्या रोगांबाबत प्रतिबंधक उपाय.

**१०) इमारत व दळणवळण** –

प्रशासन व इतर इमारतींची बांधकामे, ग्रामीण रस्ते, जोड रस्ते, वाडी पाडा यांना जोडणारे रस्ते, पुल व मोऱ्यांची लहान कामे, सार्वजनिक उत्पादने, तीर्थक्षेत्रे, निसर्गरम्य स्थळे, ऐतिहासिक स्थळे ह्यावर लक्ष ठेवणे.

**११) लघु पाटबंधारे** –

पाटबंधाऱ्याची कामे, लघु सिंचन योजना.

munotes.in

**आपली प्रगती तपासा.**

पंचायत समितीची रचना व कार्ये सांगा.

## १.६.३ ग्रामपंचायत

महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्थेचा ग्रामपंचायत हा पायाभूत घटक आहे. ग्रामपंचायतीला ग्रामसभेची कार्यकारी समिती समजली जाते. त्यामुळे ग्रामपंचायतीला ग्रामसभेकडून अधिकार मिळालेले आहेत. प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेली आणि शासनाची कार्ये ग्रामपातळीवरपार पाडणारी ग्रामपंचायत खऱ्या अर्थाने एक छोटीशी स्थानिक स्वराज्य संस्था आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार ग्रामपंचायतीची स्थापना झाली आहे. ७३ व्या घटना गुरुस्ती अन्वये ग्रामपंचायतींना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे.

**ग्रामपंचायतीची रचना -**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ नुसार जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अधिकाऱ्यांच्या शिफारतीनुसार महसुली गावासाठी किंवा त्यांच्या गटासाठी ग्रामपंचायत स्थापन केली जाते. ३०० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावाला महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार महसुली गावाचा दर्जा मिळतो. गावाचा विस्तार लोकसंख्या व महसूल नुसार ग्रामपंचायतीचा दर्जा ठरविण्यात येतो. महाराष्ट्रात ग्रामपंचायतीच्या सभासदांची संख्या ७ ते १७ असून लोकसंख्येनुसार प्रत्येक ग्रामपंचायतीच्या सदस्यांची संख्या जिल्हाधिकारी निर्धारीत करतो. ६०० पोक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांसाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यात येते. तर ६०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावांसाठी ग्रुप ग्रामपंचायत स्थापन करण्यात येते. ग्रामपंचायतीतील सदस्यांची निवड पौढ मतधिकार व गुप्त मतदान पध्दतीने होते. यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रात प्रभाग तयार करण्यात येतात. एका प्रभागातून जास्तीत जास्त तीन प्रतिनिधी निवडण्यात येतात. ग्राम लोकसंख्येनुसार सदस्य संख्या पुढीलप्रमाणे.

| गावाची लोकसंख्या | ग्रामपंचायत सदस्य संख्या |
|---|---|
| ६०० ते १५०० | ७ |
| १५०१ ते ३००० | ९ |
| ३००१ ते ४५०० | ११ |
| ४५०१ ते ६००० | १३ |
| ६००१ ते ७५०० | १५ |
| ७५०१ ते अधिक | १७ |

प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये स्त्री प्रतिनिधीसाठी एकूण जागांच्या ३३% जागा राखीव असतात. या जागा प्रत्यक्ष निवडणुकीव्दारे भरण्यात येतात. खेड्यातील अनुसुचित जाती जमातींची लोकसंख्या विचारात घेवून राखीव जागांची संख्या निर्धारीत केली जाते. ही संख्या निर्धारीत करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असतात. मागासवर्गाच्या प्रवर्गाकरिता २७ % जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

**ग्रामपंचायतीचा कार्यकाल -**

ग्रामपंचायतींचा कार्यकाल पाच वर्षाचा असून तो ग्रामपंचायतीच्या निवडणुकी नंतरच्या पहिल्या सभेपासून सुरु होतो. सदस्यांचाही कालावधी पाच वर्षाचा असतो. पहिल्या सभेची तारीख जिल्हाधिकारी निश्चित करतो. ग्रामपंचायतीचा कालखंड पूर्ण होण्या आधी तिचे विसर्जन करण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे. पण ग्रामपंचायतीचा कालावधी ६ महिन्यापेक्षा अधिक वाढविता येत नाही. सरपंच तसेच उपसरपंच पदाचा कालावधीदेखील पाच वर्षाचा असतो. ग्रामपंचायतीच्या वाढीव कालावधीतही तेच पदाधिकारी कार्य करतात.

**सरपंच –**

सरपंच हा ग्रामपंचायतीचा लोकनियुक्त प्रमुख असतो. त्यांची निवड ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल्या सदस्यांमधून केली जाते. ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकानंतर बोलविलेल्या पहिल्या बैठकीत ही निवड केली जाते. या बैठकीचे अध्यक्षस्थान जिल्हाधिकारी किंवा त्याने नियुक्त केलेल्या किमान उपजिल्हाधिकारी या दर्जाचा अधिकारी भूषवित असतो. पहिल्या बैठकीत उपसरपंचही सरपंचाच्या निवड पध्दतीनुसार निवडला जातो. निवडणुकीत दोघांनाही मते समान पडल्यास सभेचा अध्यक्ष चिठ्ठी टाकून सरपंच व उपसरपंचाची निवड करतो. ग्रामपंचायतीच्या सभेचे कामकाज सरपंचाच्या अध्यक्षतेखाली होत असते. गावाच्या कारभारवर त्याचे प्रत्यक्ष नियंत्रण असते. गावतील विकासाची कामे त्यांच्या देखरेखखाली केली जातात. सरपंचाच्या अनुपस्थितीत उपसरपंच सरपंचाची कामे पार पाडतो.

सरपंच पदासाठी आरक्षण असते. ज्या गावातील ६०% पेक्षा जास्त लोकसंख्या अनुसुचित जाती-जमातींची किंवा भटक्या विमुक्त जमातींची असते. अशा ग्रामपंचायतीतील सरपंचाची निवड त्या जाती-जमातीतून केली जाते. मागास वर्गाच्या प्रवर्गासाठी २७ % पदे राखून ठेवलेली असतात. राज्यातील एकूण सरपंच पदांपैकी ३३ % पदे स्त्री सरपंचासाठी राखून ठेवलेली असतात. सरपंचांना ग्रामपंचायतीच्या उत्पन्नापैकी २ % किंवा ६०००/- रु. यापैकी जी रक्कम कमी असेल ती वार्षिक आतिथ्य भत्ता म्हणून दिली जाते.

**सरपंचाची कार्ये –**

ग्रामपंचायतीने संमंत केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करुन ग्रामपंचायतीने कामे पार पाडण्याचे कार्यकारी अधिकार सरपंचाला देण्यात आले आहेत. ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३८ नुसार सरपंचाची कार्ये थोडक्यात खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) ग्रामपंचायतीची बैठक बोलावून बैठकीचे अध्यक्षस्थान स्विकारणे व सभेचे नियमन करणे.
२) ग्रामपंचायतीचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.
३) कायद्यामधील तरतुदी व ग्रामपंचायतीचे ठराव यांची अंमलबजावणी करणे.

४) ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक तयार करुन पंचायत समितीकडे मंजुरीला पाठविणे.

५) ग्रामपंचायत क्षेत्रातील विविध योजना तयार करणे त्यांना मान्यता मिळवणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे.

६) ग्रामपंचायत क्षेत्रातील लोकांना विविध दाखले देणे.

७) करवसुली वेळेवर होईल याची काळजी घेणे.

८) महत्वांच्या कागदपत्रांवर सह्या करुन त्यांची नोंद घेणे.

**ग्रामसेवक –**

ग्रामसेवक हा ग्रामपंचायतीचा प्रशासकीय प्रमुख असतो. ग्रामपंचायतीचे दैनंदिन कार्य व कार्यालयीन कामकाज ग्रामसेवक पार पाडत असतो. ग्रामपंचायतीच्या सभेचे आयोजन करणे, सभेचे इतिवृत्त ठेवणे, तसेच ग्रामपंचायतीने ठराव पास केलेल्या कार्याची अंमलबजावणी करणे, पंचायत समितीचे आर्थिक हिशोब आणि विविध अहवाल जिल्हा परिषदेला सादर करणे, कार्यालयीन पत्रव्यवहार तसेच कागदपत्रांच्या नोंदी आणि त्यांची सुरक्षितता ह्यांची जबाबदारीही ग्रामसेवकावर असते. ग्रामसेवकाची नेमणूक जिल्हा परिषदेचा मुख्या कार्यकारी अधिकारी करतो. त्यांचे वेतनही जिल्हा निधींतून दिले जाते.

**ग्रामपंचायतीची कार्ये –**

ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्व लोकांना लाभदायक असलेली सर्व विकास काम योजना व उपक्रम ग्रामपंचायतीकडे संपूर्ण केलेली आहेत ती थोडक्यात पुडीलप्रमाणे -

१) कृषी विकास

२) पशुसंवर्धन

३) मत्स्योद्योग विकास

४) वनीकरण व वनसंवर्धन

५) सहकार विकास

६) शैक्षणिक विकास

७) सार्वजनिक आरोग्य

८) सार्वजनिक बांधकाम

९) दिवाबत्ती व्यवस्था

१०) जन्म, मृत्यू, विवाह यांची नोंद ठेवणे

११) ग्रामपंचायत हद्दीत कर वसूली करणे.

१२) संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान राबविणे

१३) निर्मल ग्राम योजनेची कार्यवाही करणे.

१४) पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे.

१५) पाटबंधारे विकास

वरील विषयांबाबतची कार्ये ग्रामपंचायतीला आपल्या ग्रामपंचायत हद्दीत पार पाडावयाची असतात.

**आपली प्रगती तपासा.**

ग्रामपंचायतीची रचना व कार्ये स्पष्ट करा.

## १.६.४ ग्रामसभा

१९९२ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीने प्रत्यक्ष लोकशाही संस्था म्हणून प्रत्येक ग्रामामध्ये प्राथमिक स्तरावरची ग्रामसभा निर्माण केली गेली. या सभेत ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील मतदारांच्या यादीतील सर्व प्रौढ नागरिकांचे सदस्यत्व असते. राज्य विधीमंडळाने केलेल्या कायद्यानुसार ग्रामसभा आपली सत्ता वापरेल. असा स्पष्ट उल्लेख कलम २४३ क) मध्ये करण्यात आला आहे. सन २००३ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ कलम३ अन्वये वरील कलमात पुन्हा दुरुस्ती करुन प्रत्येक वित्तीय वर्षी विहित करण्यात येईल अशा दिनांकास ग्रामसभेच्या निदान सहा सभा घेण्यात येतील. अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे एका वित्तीय वर्षात ग्रामसभेच्या किमान सहा बैठका घेणे बंधनकारक आहे.

**ग्रामसभेचा अध्यक्ष –**

सार्वजनिक निवडणुकीनंतरच्या पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्ष तसेच वित्तीय पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्ष सरपंच हाच असतो. ग्रामसभेच्या उर्वरीत सभांचे अध्यक्षपद ग्रामसभेच्या बैठकीस उपस्थित असलेल्या व्यक्तींकडून त्या त्या बैठकीच्या वेळी निवडलेली एखादी व्यक्ती भूषविते.

**ग्रामसभेची सूचना –**

ग्रामसभेची सूचना सभेच्या तारखेच्या किमान सात दिवस अगोदर द्यावी लागते. तर असाधारण सभेची सूचना सभेच्या तारखेच्या किमान चार दिवस अगोदर द्यावी लागते. सदर सूचना ग्रामपंचायतीच्या कार्यलयावर चावडी किंवा सार्वजनिक ठिकाणी लावावी लागते. सभेच्या तारखेच्या चार दिवस आधी दवंडी पिटली जाते.

**गणपूर्ती –**

ग्रामसभेची गणपूर्ती एकूण मतदार संख्येत्या १५ % किंवा किमान १०० व्यक्ती अशी असते. गणपूर्ती अभावी ग्रामसभेने कामकाज तहकूब केल्यास त्याचवेळी पुढील सभेचा कार्यक्रम जाहीर करावा लागतो.

**ग्रामसभेची उद्दिष्ट्ये –**

१) आपण निवडून दिलेले, प्रतिनिधी कारभार नीट चालवीत आहेत की नाहीत ते पाहाणे आणि त्यांना जाब विचारणे.
२) ग्रामस्थ ग्रामसभेत आपल्या गावातील विकास व नियोजनाबाबत अडचणी मांडू शकतात.
३) गावाच्या कारभारासाठी सर्वानुमत बहुमताने निर्णय घेणे.
४) गावाच्या विकासाची जबाबदारी ग्रामस्थांवर सोपविणे.

**ग्रामसभेचे नियम –**

१) वर्षातून किमान सहावेळा ग्रामसभा झाल्या पाहिजेत.

२) ग्रामसभेत कोणीही प्रश्न विचारु शकतो आणि अध्यक्ष उत्तरे देतो.

३) वर्षातून किमान चारवेळा ग्रामसभा न घेतल्यास सरपंच व उपसरपंच यांना पदावरुन काढता येते.

४) प्रत्येक वित्तीय वर्षात किमान सहा सभा घेण्यात येतात. (१ एप्रिल ते ३१ मार्च ) परंतु आवश्यकता असल्यास असाधारण बैठकाही बोलविता येते.

**ग्रामसभेची कार्ये –**

ग्रामसभेच्या कार्यामध्ये मागील वर्षाच्या प्रशासकीय कार्याचा अहवाल तपासणे, वार्षिक हिेब व लेखाशेरे तपासणे, स्थायी समिती, पंचायत समिती, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तसेच राज्य शासनाने द्रासभेपुढे मांडावयास कळविलेले विषय ग्रामसभेसमोर मांडणे, पुढील वर्षाचा विकास कार्यक्रम आणि अंदाजपत्रक तपासणे व ग्रामस्थांनी सुचविलेल्या विषयांचा ठराव घेवून त्यांची नोंद करणे, त्याचबरोबर महाराष्ट्र जल व्यवस्थापनाचे कार्य ग्रामसेवेकडे सोपविण्यात आले आहे.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील तरतुदीनुसार ग्रासमभेच्या बैठकी बोलविण्याची जबाबदारी सरपंच किंवा त्यांच्या अनुपस्थित उपसरपंचाची आहे. दोघांच्या अनुपस्थित गटविकास अधिकारी ग्रामसभेची बैठक बोलावू शकतात. ग्रामसभेची बैठक बोलविण्यास योग्य कारणांशिवाय सरपंच किंवा उपसरपंच असमर्थ ठरल्यास त्यांचे अपात्र ठरु शकते.

**आपली प्रगती तपासा.**

ग्रामसभेवर टिपण करा.

## १.७ सारांश

प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या पंचायतीला पुर्नजीवीत करण्याचा प्रयत्न स्वातंत्र्य प्राप्तीनंतर करण्यात आला. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण विकासासाठी स्वतंत्र विकास प्रशासनाची यंत्रणा असे म्हणतात. भारतात पंचायत राज व्यवस्था बलवंतराय मेहता यांच्या शिफारशीव्दारे तयार करण्यात आली तर महाराष्ट्रात वसंतराव नाईक समितीच्या शिफरशीनुसार तयार करण्यात आली. महाराष्ट्रातील पंचायतराज यंत्रणा त्रिस्तरीय आहे. आणि पूर्ण विकासाची जबाबदारी पंचायत राजवर सोपविण्यातली आहे. प्रत्येक स्तराची स्वतंत्र रचना असून शासकीय प्रतिनिधीबरोबर लोकप्रतिनिधींची नियुक्त करण्यात आली आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीने या

यंत्रणेला अधिक अधिकार बहाल करण्यात येवून ग्रामस्तरावर पंचायत राज यंत्रणा अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न झाला आहे. १९९२ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायत राजने नवीन रुप धारण केले आहे.

## १.८ सूचना

महाराष्ट्रातील लोकशाहीचे विकेंद्रीकरण ह्या विषयाच्या अदिक अभ्यासासाठी आपण प्रत्यक्ष ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद ह्यासारख्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना भेट द्यावी. तसेच ग्रामपंचायतीच्या ग्रामसभांना भेटी देवून प्रत्यक्ष ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेच्या कामकाजाविषयी माहिती मिळवता येईल. ह्याचबरोबर संदर्भ ग्रंथ सूचीत दिलेल्या पुस्तकांचे वाचन आपण केल्यास नक्कीच आपण ह्या पंचायत राज संदर्भात इतंभूत माहिती मिळवाल.

## १.९ स्वाध्याय

१) प्राचीन पंचायत राज विषयी माहिती द्या.
२) बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशी सांगा.
३) महाराष्ट्रातील पंचायत राज यंत्रणा स्पष्ट करा.
४) गावपातळीवरील ग्रामसभेच्या कामकाजाविषयी माहिती द्या.
५) टिपा लिहा.
   अ) वैदिक काळातील ग्रामपंचायती.
   ब) मौर्य काळातील ग्रामपंचायती.
   क) ब्रिटीशकालीन ग्रामपंचायती.
   ड) ग्रामपंचायत.
   इ) पंचायत समिती.
   फ) जिल्हापरिषद.

## संदर्भ सूची

१) पंचायत राज, निवृत्त प्रपाठक, डॉ. वा.भा.पाटील.
२) पंचायत राज, डॉ.मा.गो.माळी, आशा प्रकाशन, कोल्हापूर.
३) संस्करण, के. सागर पब्लिकेशन्स् पुणे.
४) भारतीय लोकशाही गणराज्य, प्राचार्य - डॉ. पी.डी.देवरे.
५) पंचायत राज आणि सामुहिक विकास, डॉ. श.गो. देवगांवकर.
६) ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक - ३., दत्तत्रेय हरी चौधरी, अशोक दत्तत्रेय चौधरी, राजेश अशोक चौधरी लॉ पब्लिशर्स, ३२ वी आवृत्ती २०१३.
७) जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१, चौधरी लॉ पब्लिशर्स, अकरावी आवृत्ती.
८) महाराष्ट्राचे शासन व राजकारण, रविकिरण साने, निलिमा साने.

❖❖❖❖

# घटक -२

## महसूल प्रशासन

- डॉ. क्लेमेन्टाईन ज्यु. रिबेलो

**पाठाची रचना :**

२.० पाठाची उद्दिष्टे
२.१ प्रस्तावना
२.२ ऐतिहासिक पार्श्वभूमी
२.३ जमिन महसूल
२.४ महसूलाचे घटक
२.५ महसूल प्रशासनाची व्याप्ती
२.६ महसूल प्रशासनाचा उद्देश
२.७ महसूल प्रशासन
२.८ महाराष्ट्रातील महसूल अधिकारी व त्यांची कार्ये
२.९ सारांश
२.१० मार्गदर्शक सूचना
२.११ स्वाध्याय
२.१२ संदर्भसूची

## २.० उदिष्ट्ये

- महसूल प्रशासनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
- महसूल प्रशासनाची व्याप्ती समजून घेणे.
- महसूल प्रशासनाची रचना व कार्ये अभ्यासणे.

## २.१ प्रस्तावना

भारतामध्ये अतिप्राचीन काळापासून महसूल पद्धती अस्तित्वात होती. वेगवेगळ्या कालखंडात त्या महसूल पद्धतीमध्ये बदल होत गेले. आजही महसूल म्हणजे राजस्व. ह्यावरच संपूर्ण भारताच्या विकासाचे स्वप्न पूर्ण होतांना आपण पाहतो. आणि पुढेही असेच राहणार आहे.

munotes.in

भारताने अनेक राजवटी पाहिल्या आहेत. त्यामुळे महसूल प्रशासनाचा अभ्यास ह्या पाठात आपण पाहणार आहोत.

## २.२ ऐतिहासिक पार्श्वभूमी

माणूस रानटी अवस्थेतून बाहेर पडला. जंगलात गुहेत राहणे त्याने सोडून दिले. शिकार करण्याच्या जोडीने त्याने गुरे पाळणे तसेच शेती करण्यास सुरुवात केली. पुढे अस्थिर स्वरुपाची असलेली शेती स्थिर होवू लागली. मानवी टोळ्या स्थायिक झाल्या. झोपडे, घरे बांधून लोक एकत्र राहू लागली. स्थायिक झालेल्या टोळ्यांमध्ये संघर्ष सुरु झाले. पराभूत झालेल्या टोळ्यांच्या लोकांना जिंकलेली टोळी गुलाम बनवू लागली. यातूनच राजसत्तेचा उदय झाला. राजे लोकांची लहान लहान राज्ये निर्माण झाली. राज्य चालविण्यासाठी राज्यातील लोकांच्या उत्पन्नातील काही हिस्सा घेण्यात येवू लागला. म्हणजेच महसूल गोळा करण्यास सुरुवात झाली. हा महसूल ठरविणे व तो वसुल करणे यासाठी महसूल प्रशासनाचा उदय झाला. सर्व जमीन राज्याच्या मालकीची हे तत्त्व राजसत्तेने प्रस्थापित केले. 'राजा' हा ईश्वराचा अवतार भाग जमीन भोगवटदाराकडे राजा देवू शकतो. हे तत्त्व प्रस्थापित झाले. त्यातूनच जितका जास्त भाग राजा भूधारकाकडे ठेवील तितका तो राजा अधिक दयाळू, राज्य सत्तेच्या उदयापासून अस्तित्वात आले आणि ते फार प्राचीन आहे. सुरुवातीला ओबड-धोबड असलेले महसूल प्रशासन काळाच्या ओघात बदल होवून त्यात उत्क्रांती होत गेली.

राजसत्ता जशी स्थिर होवू लागल्या, तशा महसूल प्रशासनात खूप सुधारणा झाल्या. माणुसकीचे दर्शन होऊ लागले. भूधारकांकडून त्यांच्या उत्पन्नापैकी कमीतकमी हिस्सा घेणाऱ्या, ओला किंवा कोरडा दुष्काळ पडल्यास वसुलीत सूट देणाऱ्या, भूधारकांना त्यांचे उत्पादन वाढवण्यास पाण्याची सोय करणाऱ्या, तळी खोदणाऱ्या राजसत्ता लोकप्रिय झाल्या. ज्या राजसत्ता स्थिरावल्या, भरभराटीला आल्या तेथील महसूल प्रशासन साहजीकच सुधारले ते अधिक मानवी झाले असे इतिहास सांगतो. महसूल प्रशासनात क्रांती करणारे नवनवीन प्रयोग करुन ते अधिक लोकप्रिय करणाऱ्या राजवटींनी आपला ठसा जनमाणसांवर कायमचा कोरला आहे.

भूधारकांकडून त्यांच्या उत्पन्नाचा $\frac{1}{2}, \frac{1}{3}, \frac{1}{4}, \frac{1}{5}$ हिस्सा जुलूम जबरदस्तीने जेव्हा वसूल करण्यात येत होता, तेव्हा विजयनगरच्या हिंदू राजाचा विद्वान प्रधान विद्याधरण्यस्वामी यांनी पुढाकार घेवून प्रजेच्या एकूण उत्पन्नाच्या एक अष्टमांश उत्पन्न घेण्याची प्रथा विजयनगरच्या प्रजाहितदक्ष राज्यात रुढ झाली. याबाबतचे त्यांचे वचन अजूनही महसूल प्रशासकांना मार्गदर्शक आहे. "जो राजा उत्पन्नाच्या एक अष्टमांशपेक्षा जास्त महसूल प्रजेकडून घेईल तो या जगात दुर्जन ठरेल. आणि मृत्यूनंतर नरकामध्ये त्यास आगित टाकले जाईल."

मौर्यकालीन, गुप्तकालीन राजस्व पद्धतीचे वर्णनात आपल्याला प्रजेच्या हिताच्या दृष्टीने महसूल गोळा केल्याचे संदर्भ सापडतात.

दिल्लीला मोगल सत्ता स्थिरावली अकबर बादशहाने अनेक विद्वान गुणीजनांना आश्रय दिला. त्याचा मंत्री राजा तोडरमल यांनी जमीन मोजून त्या जमीनीतून मागील २० वर्षात

मिळालेल्या उत्पन्नाची सरासरी काढून त्याआधारे जमीन महसूलाची आकारणी करण्याची "झब्ता" ही पद्धती अंमलात आणली या पद्धतीमुळे प्रजेला न्याय मिळाला.

विजापूरचा प्रधान मलिक अंबरने राजा आणि प्रजा यामधील मध्यस्त नाहिसे करणाऱ्या रयतवारी पद्धतीची मुर्हुतमेढ रोवली. छत्रपती शिवाजीचे गुरु दादजी कोंडदेव यांनीही रयतवारी पद्धती शहाजी राज्याच्या पुणे जहाँगीरीमध्ये सुरु केली. शिवाजीने पुढे आपल्या राज्यात रयतवारी पद्धतीचा आग्रह धरुन अवलंब केला. परिणामी ब्रिटीश साम्राज्य सत्तेला देखील जुन्या मुंबई प्रांतात रयतवारी पद्धत चालू ठेवणारा महसूल कायदा करावा लागला. तेव्हा महसूल प्रशासनाला उज्वल अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे हे आम्ही लक्षात ठेवले पाहिजे. वरील ऐतिहासिक पार्श्वभूमी थोडक्यात दिली आहे.

## २.३ जमिन महसूल

जमीन महसूल हा महसूल आकारणीतील सर्वात मोठा घटक आहे. जमीन महसूल आकारण्यासाठी जिल्ह्यातील यंत्रणेचा जिल्हाधिकारी प्रमुख असतो. जमीन महसूल प्रशासनाच्या आकलनासाठी जमिनीच्या विविध पद्धतीची माहिती असणे फार महत्त्वाचे आहे. जमीन महसूल म्हणजे जमीनीवर लावण्यात येणारा कर होय. पण व्यवहारात हा जमीन महसूल जमीनीमधून निघालेल्या पिकांवर लावण्यात येतो. मोगल साम्राजात जमीन महसूल म्हणून पिकवलेल्या धान्याचा काही भाग घेतला जात असे. खरीप व रब्बी पीक वेगवेगळ्या प्रकारचे असल्यामुळे वेगवेगळे जमीन महसूल आकारले जात असे.

ब्रिटीश राजवटीमध्ये जमीन मोजणे, जमीनीचे क्षेत्रफळ ठरविणे, जमिनीचा शेतसारा ठरविणे आणि यासर्व माहितीची कागदपत्रात नोंद करणे यांची आवश्यकता भासू लागली. ब्रिटीशांच्या काळात सुरुवातीला देशात निरनिराळ्या भागात नोंदी ठेवण्याच्या निरनिराळ्या पद्धती अस्तित्वात होत्या. या निरनिराळ्या पद्धतीमुळे गोंधळ होऊ नये आणि कागदपत्रांच्या स्वरुपात एकवाक्यता यावी यासाठी काही ब्रिटीश अधिकाऱ्यांनी प्रयत्न केले.

जमीन धारण करणे आणि शेतसारा भरणे व सर्व गोष्टींची पद्धतशीर नोंद ठेवणे यासाठी नियमावली किंवा जमीन महसूल संहिता तयार करण्याचे अनेक प्रयत्न झाले. १९२९ च्या सुमारास एफ.जी. हर्टनेल ॲडरसन या ब्रिटीश अधिकाऱ्याने एक जमीन महसूल संहिता तयार केली. खेडेगावासंबंधीची सर्व प्रकारची माहिती पद्धतशीरपणे गोळा करुन त्याची व्यवस्थित नोंद करण्यासाठी निरनिराळ्या प्रकारचे गाव नमुने तयार केले. या गाव नमुन्यांना एकपासुन वीसपर्यंत निरनिराळे क्रमांक दिले आहेत. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात जमीनीच्या नोंदी जमीन महसूलाची पद्धत सारखीच दिसून येते.

## २.४ महसूलाचे घटक

जमीन महसूल जमा करणाऱ्या अधिकाऱ्याला विविध राज्यात विविध नावाने ओळखले जाते. महसूल अधिकारी सर्वसाधारणपणे जिल्हापातळीवर IAS (Indian Adminisration Service) दर्जाचा असतो, तालुकापातळीवर तहसीलदार आणि त्याला मदत करण्यासाठी

नायब तहसिलदार असतो, गावपातळीवर तलाठी हा प्रशासकीय अधिकारी सरकारी पैसे जमा करणे व जमीनीचे तपशील अद्यावत ठेवण्याचे कार्य करतो.

महसूल प्रशासनातील जलसिंचन विभागाकडे शेतीसाठी पाणी देण्याची जबाबदारी असते. त्या प्रमाणात शेतीसाठी पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. त्या आधारावर कर आकारण्यात येत असतो. कर आकारण्याची जबाबदारी जलसिंचन अधिकाऱ्यांची असते. जलसिंचन विभागातर्फे वसुलीचे तक्ते जिल्हाधिकारी व तहसीलदार यांना पाठविण्यात येतात. हे कर वसूल करुन देण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यावर असते. नायब तहसिलदार काही वेळा विशेष अधिकाऱ्याची नेमणूक करुन शेतकऱ्याकडून जमीन महसूलाबरोबर हा कर वसूल करण्यात येतो.

महसूल प्रशासनाचा उत्पन्न कर हा महत्त्वाचा घटक आहे. उत्पन्न कर (आयकर) विभागाचे अधिकारी कर आकारत असतात. उत्पन्न कर (आयकर) विभागाचा संबंध केंद्र विभागाशी असतो. त्यामुळे हा विभाग संबंधितांकडून स्वतः कर गोळा करीत असतो. शेती उत्पन्नावरील कर हा एक महसूल प्रशासनाचा घटक आहे. शेती उत्पन्नावरील कर नुकतेच सुरु करण्यात आले आहे. ज्याविभागात मोठे शेतकरी असतात. त्याचाच संबंध या कराशी येत असतो. शेती उत्पन्न कराची आकारणी झाल्यानंतर हे कर जमीन महसूलाबरोबर जमा करण्यात येते.

महसूल प्रशासनाचा विक्रीकर हा सुद्धा एक भाग आहे. या विभागाचे जे अधिकार असतात. ते कर आकारण्याचे कार्य करीत असतात. आकारलेले कर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत जमा करण्यात येते. न्यायालयीन कर व अबकरी कर हा महसूल प्रशासनाचा महत्त्वपूर्ण घटक आहे. न्यायालयीन कर तालुका आणि जिल्हा सत्र न्यायालयात होणाऱ्या सर्व व्यवहारांवर न्यायालयीन शुल्क आकारले जाते तर अबकरी कर विविध वस्तुंवर आकारले जाते. यात प्रामुख्याने दारु, विषारी औषधे, पेट्रोलियम पदार्थ इत्यादींचा समावेश होतो. हे कर वसूल करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक अधिकारी असतो. त्यास जिल्हा अबकरी अधिकारी म्हणतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) महसूल प्रशासनाचे घटक सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

munotes.in

## २.५ महसूल प्रशासनाची व्याप्ती

भारताच्या विकासाच्या दृष्टीने महसूल विभाग फारच महत्त्वाचा आहे. ह्यासाठी महसूल प्रशासन महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत असते. महसूल प्रशासनामध्ये वेगवेगळे विभाग आहेत. त्यातील प्रमुख खालील प्रमाणे -

१) महसूल वसुली
२) जमीन मोजणी
३) खजीना
४) जमीन व्यवहाराची नोंदणी

### १) महसूल वसुली :

साधारणतः महसूल वसुली विभाग हेच महसूल प्रशासन म्हणून ओळखले जाते. कारण हा विभाग प्रत्येक गावांपासून ते राज्याच्या राजधानीपर्यंत राज्यभर पसरलेला आहे. या विभागातील कर्मचाऱ्यांच्या गावातील प्रत्येक भूधारकांशी संबंध येतो. जनतेशी जीवंत संबंध असणारा हा विभाग आहे. कारण या विभागाकडे विविध प्रकारची कामे सोपविली आहेत. सर्व प्रकारच्या निवडणूका लोकसंख्या गणना, अन्नधान्य, रॉकेल, साखर इत्यादी जिवनावश्यक वस्तूंच्या वितरणाची व्यवस्था आहे. सार्वजनिक वितरण विभाग तालुका पातळीवर ह्या जिवनावश्यक वस्तू वितरणाची जबाबदारी पार पाडते.

### २) जमीन मोजणी :

जमीन मोजणी विभागाचे काम जमीन मोजणीचे कागदपत्र, जमीनीचे नकाशे, गावाचे नकाशे तयार करणे आणि ते सुरक्षित ठेवणे, भूधारकांनी मागणी केल्यास जमीन मोजून देणे, पोटहिस्सा मोजणी करणे, आकारफोड पत्रक तयार करणे, शासनाने ठरविल्यास मोठ्या गावांची / शहरांची मोजणी करणे, प्रत्येक भूखंडाचा नकाशा तयार करणे, प्रत्येक भूखडांचा नकाशा तयार करणे, भूमापन तालुका व जिल्हा निरिक्षक भूमी अभिलेखा कक्ष हे या विभागातील लोकांच्या संबंधात येणारे अधिकारी आहेत.

### ३) खजीना :

जमीन महसूल हे राज्याचे मुख्य उत्पन्न स्वातंत्र्यपूर्व कालखंडात आणि स्वातंत्र्यानंतरही बराच काळ होते. मात्र आता तशी परिस्थिती राहीली नाही. ब्रिटीश राजवटीत व नंतरही सरकारी पैशाचा व्यवहार बँकाकडे सुपुर्त करीपर्यंत पैशाच्या व्यवहारासह सर्व कामकाज तालुका स्तरावर तहसिल कार्यालयाचा भाग म्हणून कार्य करणाऱ्या सब ट्रेझरीकडून आणि जिल्हापातळीवर जिल्हाधिकारी कार्यालयाचा एक भाग असलेल्या जिल्हा ट्रेझरी मार्फत चालविण्यात येत असे. महसूल खात्याचे अधिकारी सब ट्रेझरीत आणि जिल्हा ट्रेझरीत नेमले जात असत. फायनांन्स खात्याच्या निर्णयानुसार सब ट्रेझरी व जिल्हा ट्रेझरीचा कारभार आता स्वतंत्रपणे चालू आहे. सरकारी पैशाचा व्यवहार बँकामार्फत चलनांद्वारे होत असल्यामुळे आता फक्त व्यवहाराच्या नोंदी ट्रेझरी मार्फत केल्या जातात. महसूल खात्यामार्फत जमा होणाऱ्या व खर्ची पडणाऱ्या रक्कमांचा व्यवहार देखील सब ट्रेझरी व जिल्हा ट्रेझरीमध्ये नोंदवावाच लागतो.

**४) जमीन व्यवहाराची नोंदणी :**

जमीनीचे विशेषतः खाजगी जमीनीची विक्री, भाडेपट्टा, दान, बक्षिस वगैरे मार्गांनी हस्तांतरीत होतात. ही हस्तांतराने मालमत्ता हस्तांतरण कायदा. भारतीय नोंदणी कायद्याच्या तरतुदीनुसार नोंदवावी लागतात. हे जमिनीचे दस्ताऐवज नोंदण्यासाठी नोंदणी फी व जमिनीच्या किंमतीच्या प्रमाणात स्टॅम्प फी वसुल केली जाते. शासनाचे दस्तऐवज नोंदणी हे उत्पन्नाचे एक साधन आहे. दुय्यम नोंदणी अधिकारी साधारणतः प्रत्येक मोठ्या तालुक्याला असतात व जिल्ह्याला नोंदणी अधिकारी असतात.

प्रत्यक्षात पाहता ह्या व्यवहाराचा आवाका मोठा आहे. ह्याठिकाणी थोडक्यात अभ्यासणासाठी दिला आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) महसूल प्रशासनाची व्याप्ती सांगा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## २.६ महसूल प्रशासनाचा उद्देश

महसूल प्रशासनाला प्रामुख्याने खालील उद्देश साध्य करावयाचे आहेत.

- राज्यातील सर्वच्या सर्व जमीनीचा (शेती + बिनशेती) कर वर्षाच्या वर्षाला पूर्णपणे वसुल करणे.
- गाव, तहसिल, जिल्हा पातळीवरील जमीन महसूल, जमीन हक्क नोंद जमीन आणि तद्नुषंगिक आवश्यक असलेली आकडेवारी बाबत जमीन महसूल संहिता व तद्नुषंगिक नियमाप्रमाणे ठरवून दिलेल्या नमुन्यात कागदपत्रे तयार करणे आणि ते अद्यावत ठेवणे.
- जमिन महसूल संहिता, त्याखालील नियम, मामलेदार कोर्ट ॲक्ट, भूमी संपादन कायदा, विविध जमीन सुधारणा कायदे इत्यादी नुसार प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन कायद्याची अंमलबजावणी करणे.
- जमीनीबाबत निर्माण झालेले वाद-दावे यामध्ये निर्णय देणे व त्या निर्णयाची अंमलबजावणी करणे.
- जमिनीच्या हद्दी, निशाण्या ठराविक कालावधीत पहाणी करुन भूधारकांकडून सुस्थितीत ठेवून घेणे, नवीन तयार झालेले पोटहिस्से मोजून त्याचे नकाशे तयार करणे, जेव्हा जेव्हा आवश्यकता निर्माण होईल तेव्हा तेव्हा आकार फोड पत्रके, कमी जास्त पत्रके तयार करणे,

जेणेकरुन जमीनीबाबतचे वाद एक तर निर्माणच होणार नाहीत किंवा निदान कमी होतील त्यासाठी योग्य ती खबरदारी घेणे.

– राज्य सरकार जी जी कामे त्या व्यतिरिक्त वेळोवेळी सोपविल ती कार्यक्षमतेने पार पाडणे.

थोडक्यात महसूल खात्याचा गाव पातळीपासून राज्य पातळी पर्यंतचा सर्व कारभार सुरळीतपणे आणि र्काक्षमतेने पार पाडतानाच राज्यसरकारने वेळोवेळी सोपविलेली विविध प्रकारची कामेही तत्परतेने पुर्णत्वास नेणे, तसेच शासनाचे समाजातील कान आणि डोळे बनून राज्यातील जनजीवन सुस्थीर, शांततामय व प्रगतीपथावर राखण्यास सदैव दक्ष राहणे.

**आपली प्रगती तपासा :**

१) महसूल प्रशासनाचा उद्देश सांगा.

## २.७ महसूल प्रशासन


महसूल प्रशासन जणु राज्य शासनाचा पाठीचा कणा आहे. महसूल प्रशासनाकडे महसूल वसुलीचे अती महत्त्वाचे काम आहे. जमीनीचे व्यवस्थापन त्यांच्याकडे आहे. शांतता सुव्यवस्था ठेवणे. ह्याची महत्त्वाची कामगिरी हे खाते बजावते. राज्यातील प्रत्येक गावच्या प्रत्येक भूधारकांपर्यंत हे खाते पोहोचलेले आहे. यामुळे या प्रशासनाचा जनसंपर्क खुपच व्यापक आहे. सरकारी जमीनी मंजूर करणे, भाडेपट्ट्याने देणे, बीनशेती परवानगी देणे ही महत्त्वाची कामे महसूल प्रशासनाला करावी लागतात. विविध प्रकारची गुंतागुंतीची कामे महसूल प्रशासनाला पार पाडावी लागतात.

### २.७.१ महसूल प्रशासनाची यंत्रणा :

जमीन आणि जमीन महसूल हे राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली येणारे विषय असल्यामुळे प्रत्येक राज्यात महसूल प्रशासन यंत्रणा तयार करण्यात आली आहे. महसूल प्रशासन यंत्रणेत महसूलविषयक निर्णय घेण्याचा अधिकार राज्यस्तरावरील यंत्रणेला असला तरी प्रत्यक्ष महसूल निर्धारण आणि महसूलाची वसुली ही जबाबदारी क्षेत्रीय यंत्रणा पार पडते. पण राज्यस्तरापासून गावस्तरापर्यंत महसूल विभागाची रचना खालीलप्रमाणे सांगता येईल.

munotes.in

### २.७.२ महसूल प्रशासनाची रचना :




महाराष्ट्रामध्ये पुढीलप्रमाणे ६ महसूल विभाग आहेत.

१) विदर्भ - अमरावती विभागात अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम जिल्हांचा समावेश होतो.

२) मराठवाडा - औरंगाबाद, जालना, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली ह्या जिल्हांचा समावेश होतो.

३) खानदेश आणि उत्तर महाराष्ट्र - अहमदनगर, धुळे, जळगाव, नंदुरबार, नाशिक ह्या जिल्हांचा समावेश होतो.

४) कोकण - बृहन्मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ह्या जिल्ह्यांचा समावेश होतो.

५) पश्चिम महाराष्ट्र विभाग - कोल्हापूर, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर ह्या जिल्ह्यांचा समावेश होतो.

६) विदर्भ - नागपूर विभाग ह्यामध्ये भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा जिल्ह्याचा समावेश होतो.

## २.८ महाराष्ट्रातील महसूल अधिकारी व त्यांची कार्ये

### २.८.१ विभागीय आयुक्त :

महाराष्ट्रामध्ये सहा महसुली विभाग आहेत. या सहा विभागाकरीता सहा विभागीय आयुक्त नेमलेले आहेत. एखाद्या विभागात आयुक्तांना सहाय्य करण्यासाठी एक अपर आयुक्त व योग्य वाटेल तेथे सहाय्यक आयुक्त नेमले जातात. एका आयुक्ताकडे दोन किंवा अधिक विभागाचे प्रशासन देण्यात येते. त्यांच्या विभागातील जमीन महसुलाशी संबंधित सर्व बाबतीत अधिकार त्या त्या आयुक्तांकडे सोपविले आहेत. विकासाची गती वाढावी जमीनीच्या व इतर कार्यालयीन कामकाजामध्ये सुधारणा व्हावी या दृष्टीकोनातून विभागीय आयुक्तांची नेमणुक केली आहे. विभागीय आयुक्तांची कार्ये पुढीलप्रमाणे -

१) वर्षातून एकदा कमीत कमी २ महसूल कार्यालयांची तपासणी करणे व त्याबद्दलच्या अहवाल शासनाकडे पाठविणे.

२) ट्रेझरी कार्यालयाची तपासणी करणे.

munotes.in

३) सर्व जिल्हा परिषदांची तपासणी वर्षातून एकदा व ९ पंचायत समित्यांची तपासणी वर्षातून एकदा करणे.

४) कलम २४७ अन्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाविरुद्ध केलेले अपिल ऐकून घेणे.

५) जिल्ह्याच्या महसुलाबाबत वार्षिक अहवाल राज्य शासनाला पाठविणे.

### २.८.२ जिल्हाधिकारी :

मोगल साम्राज्यामध्ये करोरी फौजदार हा जिल्हाधिकाऱ्यांसारखाच अधिकारी होता. ब्रिटीश काळात ईस्ट इंडिया कंपनीने महसूलाचे काम डिस्ट्रिक्ट कलेक्टरकडे सोपविले व १८७२ साली कलेक्टर हे पद निर्माण केले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात न्याय विभाग कार्यकारी विभागापासून स्वतंत्र झाल्याने जिल्हाधिकाऱ्यास जिल्ह्याच्या सामान्य प्रशासनाचे काम करावे लागते. महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हाधिकारी नेमण्याचा अधिकार शासनाला आहे. साधारणतः आय.ए.एस. (IAS) परिक्षा उत्तिर्ण झालेली व्यक्ती जिल्हाधिकारी म्हणून नेमली जाते.

**जिल्हाधिकाऱ्याची कार्ये -**

१) जमीन महसूल जमा करणे

२) शासनाच्या मालमत्तेचे देखरेख करणे.

३) भूमि अभिलेख व्यवस्थित ठेवणे.

४) शेतीच्या जमीनीचा बिगर शेतीसाठी वापर करण्यास परवानगी देणे.

५) जिल्हा दंडाधिकारी म्हणून काम करणे.

तसेच महसूल प्रशासक म्हणूनही महसूल प्रशासनाशी संबंधित असलेली विविध कार्ये जिल्हाधिकारी या नात्याने पार पाडित असतो. जमिन महसूल अधिनियम १९६६ अन्वये सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे ह्यामध्ये जमीन महसूल ठरविणे, तो गोळा करणे, त्यांची नोंद करणे, जमीनी मालकीची व त्यातील बदलांची नोंद अद्यावत करणे, शेतीसंबंधी कर गोळा करणे, त्याची नोंद करणे, शेती संबंधीच्या कायद्याची अंमलबजावणी करणे, आपत्कालीन योजनांची अंमलबजावणी करणे, पुरवठा व पुर्नवसन यासारख्या जबाबदाऱ्या पार पाडणे, पिकांची आणेवारी करणे, अबकरी कर वसुल करणे, शासकीय मालमत्तेवर देखरेख ठेवणे यासारखी विविध कार्ये जिल्हाधिकाऱ्याला पार पाडावी लागतात.

**जिल्हा दंडाधिकारी :**

सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राखणे हे जिल्हाधिकाऱ्याचे कार्य आहे. महसुली दाव्यासंबंधी न्यायदान करणे, पोलीस खात्याने पुरविलेल्या माहितीच्या आधारे दंगल अशांतता या काळात समाजविघातक व्यक्तींचा बंदोबस्त करणे, तुरुंग प्रशासन, पोलीस ठाणे यांचे निरिक्षण, नागरी दक्षता समित्यांचे कार्य, कैद्यांची श्रेणी, शिक्षेत सूट, विदेशी नागरीकांचे परवानगे, वास्तव्य व जातीचे दाखले, बाल सुधार गृहाचे व्यवस्थापन, अपघात व कामगारांची नुकसान भरपाई, उत्सवासाठी परवानगी, विविध कायद्यातंर्गत परवाने देणे, प्रेस कायद्याची अंमलबजावणी, वृक्षरक्षण कायद्याची अंमलबजावणी, भाडे नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी इत्यादी कार्ये जिल्हा दंडाधिकारी या नात्याने पार पाडावी लागतात.

munotes.in

**जिल्हा प्रशासकीय अधिकारी :**

जिल्हा प्रशासनातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे, आस्थापना ह्यावर नियंत्रण व निरिक्षण, कोषागराची जबाबदारी, स्थानिक स्वराज्य संस्थावर देखरेख, विविध स्थानीय समित्यांचे गठण, वार्षिक अंदाजपत्रक बनविणे, शासकीय इमारतीची देखभाल व त्यासाठी आर्थिक तरतूद, जिल्हाचा प्रशासकीय अहवाल, सरकारी विश्राम गृहाची व्यवस्था, लोकनियुक्त मंत्री व महत्त्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्याची व्यवस्था, शैक्षणिक शिष्यवृत्ती आणि कर्ज यांचे व्यवस्थापन, शासकीय अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था, शासकीय उद्देशांची पुर्तता, विविध खात्यांच्या जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांच्या कामाचा समन्वय, जनतक्रारींचे निराकरण ह्यासारखी कार्ये जिल्ह्याचा प्रशासकीय अधिकारी ह्या नात्याने जिल्हाधिकाऱ्याला पार पाडावी लागतात.

**शासनाचा जिल्हा प्रतिनिधी :**

लोकसभा आणि विधानसभा यांच्या निवडणुकींच्या वेळी जिल्हाधिकारी निवडणुक अधिकारी असतो. तसेच जिल्हा जनगणना अधिकारी असतो, गॅझेट तयार करणे, ऐतिहासिक ठिकाणे व स्मारके यांवर देखरेख ठेवणे, राष्ट्रीय बचत योजना, सैनिक कल्याण निधी, नावीक कल्याण निधी यांची व्यवस्था, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी ह्या राष्ट्रीय कार्यक्रमाची आखणी कर्मचारी कल्याण, कुटुंब कल्याण, साक्षरता अभियान, सर्व शिक्षण अभियान इत्यादी बाबत इष्टांग गाठण्यासाठी प्रयत्न करणे, लोकप्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नासंबंधी खात्याला जिल्ह्याची माहिती व आकडेवारी कळविणे ह्यासारखी कामे जिल्हाधिकाऱ्याला पार पाडावी लागतात.

जिल्हाधिकाऱ्याच्या कामाचे स्वरुप व व्याप्ती लक्षात घेता आजही जिल्हाधिकाऱ्याला जिल्हा प्रशासनाचा केंद्रबिंदू मानले जाते.

**२.८.३ उपविभागीय अधिकारी :**

जिल्ह्याच्या नैसर्गिक आणि भौगोलिक रचनेनुसार अनेक उपविभाग पाडण्यात येतात. अशा उपविभागाच्या प्रमुख अधिकाऱ्याला उपविभागीय अधिकारी म्हणतात. केंद्रीय लोकसेवा आयोग किंवा भारतीय प्रशासकीय सेवा परिक्षा पास झालेले किंवा महाराष्ट्र लोकसेवा परिक्षा पास झालेल्या उमेदवाराला प्रशासनाचा अनुभव देण्यासाठी हे पद फार उपयुक्त ठरते. जिल्हाधिकाऱ्याप्रमाणेच उपविभागीय अधिकारी हा आपल्या उपविभागाचा प्रमुख प्रशासक असतो. सरकारतर्फे बोलणारा, महसूलाच्याबाबत जिल्हा अधिकारी आणि तहसीलदार यांच्यामध्ये समन्वय प्रस्थापित करणारा कायदा आणि सुव्यवस्था याची आपल्या उपविभागात जबाबदारी सांभाळणारा अधिकारी म्हणून ओळखला जातो.

**उपविभागीय अधिकाऱ्याची कार्ये :**

१) आपल्या उपविभागातील कनिष्ठ दर्जाच्या महसूल अधिकाऱ्यांवर देखरेख ठेवणे, त्यांचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना पाठविणे.

२) सरकारच्या आदेशाची योग्य ती अंमलबजावणी आपल्या उपविभागात करणे, त्यासाठी कनिष्ठ अधिकाऱ्यांना आदेश देणे.

३) वेळ प्रसंगी दौरे काढून प्रशासकीय माहिती गोळा करणे आणि जिल्हाधिकाऱ्यांना सादर करणे.

४) लोकांच्या तक्रारी सोडविणे त्यासंबंधी अपिलास मान्यता देणे आणि निर्णय देणे.

५) आपल्या उपविभागात शांतता आणि सुव्यवस्थेला धक्का पोहचणार नाही अशी खबरदारी घेणे

६) दुष्काळ प्रसंगी आपल्या उपविभागातील लोकांना महसूलाबाबत सूट द्यावी अशी शिफारस करणे.

७) करमणुक कर वसुली, गौण खनिज कर वसुली, रास्त धान्य दुकान तपासणी, महसूल वसुली इत्यादीचे पर्यवेक्षण करणे.

८) शासनाच्या विविध स्तरावरील अधिकाऱ्यांमध्ये योग्य समन्वय साधणे, उपविभागीय दंडाधिकारी म्हणून भूमिका बजाविणे.

९) भाडे नियंत्रण कायदा, महाराष्ट्र जमीन महसूल कायदा, इत्यादीमध्ये अभिप्रेत असलेली न्यायालय भूमिका बजाविणे.

१०) विधानसभा मतदार संघाकरिता उपविभागीय अधिकारी हा निर्वाचन अधिकारी व लोकसभा मतदार संघाकरिता सहाय्यक निर्वाचन अधिकारी म्हणून भूमिका बजाविणे.

### २.८.४ तहसिलदार :

महाराष्ट्र जमीन महसूल कायदा १९६६ कलम ६ अन्वये प्रतयेक तालुक्यास एक तहसीलदार किंवा अधिक नायब तहसीलदार अप्पर तहसीलदार नेमण्याचे अधिकार राज्य शासनास आहेत. तालुक्याचा महसुली कारभार पाहण्याच्या दृष्टीने महसूल संहितेच्या कलम ७(२) नुसार राज्य शासन तहसिलदाराची नियुक्ती करतो, तसेच तहसिलदाराचा मदतीसाठी नायब तहसिलदार किंवा अप्पर तहसिलदार यांची नेमणूक शासन करु शकते.

**तहसिलदाराची कार्ये :**

१) तालुकांर्गत जमीन महसूलासंबंधी सर्व कार्ये पार पाडणे.

२) आपल्या क्षेत्रातर्गत राज्य शासनाने निर्देशीत केल्याप्रमाणे जमीन महसूलाची आकारणी करणे व त्याची वसुली करणे.

३) पिकांची आणेवारी / पैसेवारी ठरविण्यासाठी मंडळ निरिक्षक व तलाठ्यांचे सहाय्य घेणे.

४) मंडळ अधिकारी व मंडळ निरिक्षक यांना योग्य ते मार्गदर्शन करुन पुढील कार्य पार पाडणे. त्यांना योग्य ते निर्देश देवून माहिती मागविणे. निरिक्षकास आदेश देवून प्रत्येक गावाची वेळोवेळी तपासणी करावयास सांगणे.

५) त्यांच्या मंडळातील प्रत्येक गावाच्या भूमी अभिलेखांवर देखरेख ठेवणे.

६) एखाद्या गावातील लोकांची व पिकांची परिस्थिती जाणून घेणे.

७) ठराविक मुदतीत तालुक्याच्या सांख्यिकी वितरणाचे संकलन करण्यासाठी सूचना देणे.

८) नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले असेल तर त्यासंबंधी चौकशी करुन पिकांच्या नुकसानीसंबंधी कच्चा अहवाल तयार करण्यास मंडळ निरिक्षकास सांगणे.

munotes.in

मंडळ निरिक्षकाने नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांच्या नुकसानीसंबंधी पाठविलेल्या अहवालावर विचार करुन शासनाच्या नियमांना अधीन राहून योग्य ती नुकसान भरपाई शेतकऱ्यांना देणे.

९) एखाद्या गावास धरण फूटून अथवा इतर कारणांमुळे मानवी व वित्तीय हानी होण्याचा संभव आहे. अशी माहिती मिळाल्यास त्या ठिकाणी भेट देवून योग्य खबरदारीचे उपाय योजणे.

१०) जमिनीच्या तुकड्यांवरुन एखादा वाद निर्माण झाल्यास भूमापन अधिकाऱ्यांने जमिनीचे मोजणी करुन योग्य निर्णय देणे. परंतु पक्षकाराने त्याची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केली असेल तर त्या संबंधित जमिनीचा अधिकार ज्यांचा आहे त्यास मिळवून देण्यासाठी अतिक्रमण करण्यास जमिनीचा ताबा सोडण्याचे आदेश देणे.

११) तालुक्यात नैसर्गिक आपत्ती आढळल्यास त्याचा अहवाल त्वरित जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे. तालुक्यात पिकांच्या आणेवारीसंबंधी माहिती गोळा करणे ती जिल्हाधिकाऱ्यांना कळविणे. जिल्हाधिकाऱ्यांने सुचित केलेली कार्ये आपल्या क्षेत्रात पार पाडणे.

१२) तहसील कार्यालयीन कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणे व त्यांच्यावर देखरेख ठेवणे. कोतवालाची तात्पुरत्या कालावधींसाठी नेमणुक करुन त्यांच्या रजेसंबंधी कार्यवाही करणे.

१३) तालुका स्तरांवरुन रास्त धान्य दुकानांद्वारे धान्याचे वितरण करणे, रास्त धान्य दुकानांवर योग्य ते नियंत्रण ठेवणे. आपल्या कार्यक्षेत्रात जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार होत असेल तर त्यासंबंधी योग्य ते कडक उपाय योजणे.

१४) निवडणुकासंबंधी तालुका स्तरावरील प्रमुख म्हणून सर्व कार्ये पार पाडणे. पंचायत समितीच्या पहिल्या सभेत सभापती व उपसभापती यांची निवड होताना त्या सभेचे अध्यक्षस्थान भुषविणे.

१५) गावच्या अधिकार अभिलेखातील नोंदी दुरुस्त करण्यासाठी तलाठ्यांना आदेश देणे. शेतीच्या कामासाठी सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे. जमीन महसूलाची कार्ये करताना अधिकृत व्यक्तीला ठराविक दिवशी ठराविक वेळी उपस्थित राहण्यासाठी समन्स पाठविणे, प्रंसगी पकड वॉरंट काढणे किंवा आदेश न पाळणाऱ्या व्यक्तीला रु. ५० पर्यंत दंड करणे.

१६) गावकऱ्यांना त्यांच्या स्वत:च्या उपयोगासाठी गौण खनिजे काढण्यासाठी व त्यांचा वापर करण्यासाठी परवानगी देणे.

१७) शहरी व ग्रामीण कामासाठी शेत जमिनीची बिगर शेतजमीन म्हणून तात्पुरती घोषणा करणे.

१८) तालुक्याच्या वार्षिक आमसभेचा पदसिद्ध सचिव म्हणून काम पाहणे, तालुका दंडाधिकारी म्हणून कर्तव्य बजावणे.

**२.८.५ मंडळ अधिकारी :**

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार काही खेड्यांचे मिळून एक महसूल मंडळ (रेव्हीन्यू सर्कल) तयार होते. या मंडळाचा अभिलेख महसूल अधिकारी मंडळ निरिक्षक असतो. एका तालुक्यात एकापेक्षा अधिक महसूली मंडळ असतात. आणि ते नायब तहसीलदार यांच्या अधीन असतात. मंडळ अधिकाऱ्यांचा त्यांच्या मंडळातील सर्व तलाठ्यांवर अधिकार असतो. त्यांचे हुकुम तलाठ्याने पाळायचे असतात. मंडळ निरिक्षकांना विशिष्ट कर्तव्याशी किंवा कार्याशी संबंधित असलेल्या नियमांमध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीचे पालन त्यांना करणे आवश्यक आहे.

**मंडळ अधिकाऱ्यांची कार्ये :**

१) सर्व तलाठ्यांना त्यांच्या कामाचे व कर्तव्याचे प्रशिक्षण देणे.

२) एखादा तलाठी नियम किंवा आदेश पाळत असेल तर त्याला वेळोवेळी समज देणे, सूचना देणे.

३) सर्व तलाठी आपल्या कार्यालयात कायम वास्तव्य करत असल्याचे पाहणे व अनियमित कार्यालयात असलेल्या तलाठ्यांना समज देणे.

४) तलाठी आपल्या कर्तव्यपालनात निष्काळजीपणा दाखवितात किंवा इतर कारणांमुळे कर्तव्याचे योग्य रितीने पालन करीत नाहीत असे मंडळ अधिकाऱ्याला वाटल्यास अशा तलाठ्यांची नावे वरिष्ठांना कळविणे.

५) तालुका अभिलेख कक्षामध्ये अधिलिखित करण्यासाठी अग्रेषित करणे. तलाठ्याने आपले सर्व अभिलेख अग्रेषित केले असल्याची खात्री करुन घेण्यासाठी दफ्तराची तपासणी करणे.

६) मंडळ अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातील तलाठ्यांच्या कार्याची तपासणी व पर्यवेक्षण करणे.

७) आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक गावाची संपूर्ण तपासणी करणे, तलाठ्याने ठेवलेल्या संपूर्ण गाव नमुन्याची तपासणी करणे. तलाठी जमीन महसूल व जमीन महसुलाचे हिशेब योग्य रितीने व अचूक ठेवतो का नाही याची खात्री करुन घेणे.

८) जमीन महसूल म्हणून वसुली योग्य असलेल्या रकमा गोळा करण्यावर लक्ष ठेवणे.

९) जमिनीच्या सर्व तुकड्यांची फेरफार नोंदवहीत योग्य रितीने नोंद घेण्यात आली असल्याची व संबंधित व्यक्तींना नोटीस दिल्याची खात्री करणे.

१०) तालुका कार्यालयाला जेव्हा विशेषरित्या निर्देशीत करण्यात येईल तेव्हा जिल्हा निरिक्षक यांना हंगाम व पीक प्रतिवृत्तांच्या संकलनाच्या कामी सहाय्य करणे.

### २.८.६ तलाठी :

ग्रामीण महसूल प्रशासन व्यवस्थेतील गाव पातळीवरील महत्त्वाचा घटक म्हणजे तलाठी होय. महाराष्ट्रामध्ये प्रत्येक लहान अशा ग्रामीण भागासाठी एक तलाठी जिल्हाधिकाऱ्यांतर्फे नेमला जातो. तलाठी हा महसूल खात्याचा वर्ग ३ चा कर्मचारी असून त्यांच्यावर सर्कल ऑफिसर व त्यानंतर तहसीलदार नियंत्रण ठेवतो. महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ कलम ७(३) अन्वये प्रत्येक समाजाकरिता एक किंवा अधिक तलाठी नेमण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहे. त्यानुसार तलाठ्याची नेमणुक केली जाते.

१) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अन्वये वरिष्ठ महसूल अधिकारी सोपवितील अशी कामे व कर्तव्य पार पाडणे.

२) जमीन महसूल वसूल करणे, जमीन महसूल थकबाकीची, जमिनीच्या अधिकार पत्रांची नोंद ठेवणे.

३) जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार लेखांची नोंद करणे व त्याचे रजिस्टर तयार करणे.

४) आपद्ग्रस्तांना मदत करण्यासंबंधीची माहिती तहसिलदारांना कळविणे. माहितीचा अहवाल तहसिलदारांना पाठविणे.

munotes.in

५) निराधार कुटुंबाचे सर्वेक्षण करुन सानुग्रह अनुदान वाटपासाठी तहसिलदारांना मदत करणे.

६) वाटप करण्यात आलेल्या आर्थिक मदतीचा विनियोग योग्य होतो किंवा नाही ते तहसिलदारांना कळविणे.

७) गावातील साथीच्या रोगांची माहिती तहसिलदार व नजीकच्या आरोग्य केंद्र अधिकाऱ्यांना कळविणे.

८) आवश्यकतेनुसार आपद्ग्रस्तांना त्वरित पर्यायी व सुरक्षित अशा स्थळी हलविणे.

९) निवडणुक यंत्रणेतील घटक या नात्याने निवडणुक संदर्भात सोपविलेली कामे पार पाडणे.

१०) जमिनीच्या नोंदीचे उतारे देणे.

### २.८.७ कोतवाल :

गावामध्ये २४ तास सरकारी कामे करणारा नोकर म्हणजे कोतवाल. कोतवालाच्या कामाचा ठराविक वेळ नसून २४ तास आवश्यकतेनुसार केव्हाही काम करावे लागते. प्रामुख्याने तलाठी यांना मदत करण्यासाठी सन १९५८ पासून कोतवालाची नेमणूक केली जाते. कोतवालास तलाठी यांच्याशिवाय पोलीस पाटलाच्या कार्यात मदत करावी लागते. ग्रामीण भागात कोतवालास "जागल्या" असेही म्हणतात.

**पात्रता :** किमान १८ व कमाल ४० वर्षे वय पूर्ण करणाऱ्या शारीरिक दृष्ट्या सक्षम व वागणूक चांगली असलेल्या आणि रुपये १००/- तारण रक्कम व जामीन देणाऱ्या व्यक्तीची कोतवाल म्हणून नेमणूक केली जाते. तसेच कोतवालाने संबंधित गावातच राहणे बंधनकारक आहे.

**नेमणूक :** गावाच्या लोकसंख्येनुसार कोतवालाची संख्या असते.

| **लोकसंख्या** | **कोतवाल संख्या** |
|---|---|
| १००० | १ |
| १००१ - ३००० | २ |
| ३००० पेक्षा जास्त | ३ |

कोतवालाची नेमणुक करण्याचा अधिकार तहसीलदारांना देण्यात आला आहे.

**मानधन :** कोतवालाचे मानधन ठरविण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. सन २००३ च्या बदलानुसार कोतवालांना दरमहा रु. २०००/- मानधन दिले जाते.

### कोतवालाचे कार्य :

१) गावकऱ्यांना आवश्यक तेव्हा चावडी / सजा येथे बोलविणे.

२) सरकारी सूचना, आदेश गावात दवंडी पिटून सांगणे.

३) तलाठी कार्यालय, चावडी स्वच्छ करणे.

४) पोलीस पाटलास गुन्ह्याबाबत माहिती देणे, तसेच पोलीस पाटलाच्या रखवालीत असलेल्या कैद्यांवर पहारा ठेवणे.

५) जन्म, मृत्यू, विवाह इ. बाबत ग्रामसेवकांना कळविणे.

६) गावाचे दप्तर, वरिष्ठ कार्यालयास नेणे व आणणे तसेच सरकारी पत्र व्यवहार पोहोचविणे.

७) गावात गस्त घालणे.

८) गावातील चोरी दुर्घटना इ. माहिती पोलीस पाटलास देणे.

९) तलाठी, पोलीसपाटील व त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांना त्यांच्या कामात मदत करणे इ. बाबींचा समावेश कोतवालाच्या कार्यामध्ये होतो.

वरील महसूल पातळ्या व त्या पातळ्यांवर कार्य करणारे कार्यवाहक ह्यांची माहिती आपण थोडक्यात समजून घेतली आहे.

## २.९ सारांश

महसूल प्रशासनाला ग्रामीण भागात अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्राचीन काळापासून महसूल यंत्रणेत सुधारणात्मक बदल होत गेले. ब्रिटीशांच्या काळात महसूल प्रशासनामध्ये नोंदीचा रिपोर्ट तयार करणे व ते नीट ठेवणे चालू झाले. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर या पद्धतीत थोडा बदल करुन महसूल संहिता तयार केली. राज्यपातळीपासून गाव पातळीपर्यंत महसूल यंत्रणा तयार करुन त्याचे अधिकारी कर्तव्य व कार्ये ठरवून देण्यात आली.

## २.१० मार्गदर्शक सूचना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो, महसूल प्रशासनासंबंधी अधिक सखोल अभ्यास करावयाचा झाल्यास संदर्भ ग्रंथामध्ये सांगितलेल्या पुस्तकांचे जरुर वाचन करावे तसेच तलाठी कार्यालय, तहसिलदार कार्यालय व जिल्हाधिकाऱ्याचे कार्यालय ह्या ठिकाणी भेट देवून विविध विभागांविषयी जरुर माहिती मिळवावी.

## २.११ स्वाध्याय

१) महसूल प्रशासनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगा.

२) महसूल प्रशासनाची व्याप्ती सांगा.

३) महाराष्ट्रातील महसूल प्रशासनाचे कार्य व कार्यवाहक ह्यावर सविस्तर भाष्य करा.

४) टीपा लिहा.

   अ) महसूल प्रशासनाचा उद्देश

   ब) महाराष्ट्रातील महसूल प्रशासनाची रचना

   क) जिल्हाधिकाऱ्याची विविध कार्ये

   ड) कोतवाल

munotes.in

## २.१२ संदर्भसूची

१) मोगलकालीन महसूल पद्धती, एन्.ए. सिद्दीकी, अनुवाद : डॉ. प्र. ल. सासवडकर, डायमंड पब्लिकेशन्स्, पुणे, प्रथम आवृत्ती २००६

२) मौर्योत्तर व गुप्तकालीन राजस्वपद्धती, डॉ. डी. एन्. झा, अनुवाद : डॉ. गो. ब. देगलूस्कर, डायमंड पब्लिकेशन्स्, २००५

३) तलाठी तथा मंडळ अधिकाऱ्यांची कार्ये, कर्तव्ये व कार्यपद्धती, ॲन्ड राम शेलकर.

४) ग्रामीण प्रशासन शासन व राजकारण, स्वानंद गोखले, प्रशांत गोखले.

५) सामान्य माणूस कायदा आणि न्याय, न्या. सुरेश वसंत नाईक.

६) जमीन मोजणी, ॲन्ड गोविंद सगर, संकलन के.एन. घोडके, प्रतिक प्रकाशन, पेण-रायगड, २०१७

❖❖❖❖

munotes.in

# घटक -३

## ग्रामीण अर्थव्यवस्था

**- डॉ. दिलीप शं. पाटील**

**पाठाची रचना :**

३.० पाठाची उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ ग्रामीण अर्थव्यवस्थेची संकल्पना

३.३ ग्रामीण अर्थव्यवस्थेची व्याप्ती

३.४ ग्रामीण अर्थव्यवस्थेचे स्वरुप

३.५ ग्रामीण अर्थव्यवस्थेचे बदलती पद्धती

३.६ शेतीची संकल्पना

३.७ ग्रामीण विकासातील शेतीची भूमिका

३.८ भूधारणा आकृतीबंध

३.९ सारांश

३.१० स्वाध्याय

३.११ संदर्भसूची

## ३.० उदिष्ट्चे

- ग्रामीण अर्थव्यवस्थेची संकल्पना अभ्यासणे.
- ग्रामीण अर्थव्यवस्थेचे स्वरुप आणि बदलती पद्धती अभ्यासणे.
- भूधारणा आकृतीबंध अभ्यासणे.

## ३.१ प्रस्तावना

कोणत्याही समाजव्यवस्थेत अर्थव्यवस्थेला महत्त्वाचे स्थान असते. त्यामूळे कोणत्याही समाजातील अर्थव्यवस्थेचा अभ्यास केल्याशिवाय त्या समाज व्यवस्थेचे नीटसे आकलन होऊ शकत नाही. आर्थिक उत्पादन ही कुठल्याही मानवी समुहाची आवश्यक अशी क्रिया आहे. याच मानवी समुहावर दुरगामी परिणाम होत असतात आणि त्याच दृष्टीने ग्रामीण समाजव्यवस्थेचे स्वरुप समजावून घेण्यासाठी ग्रामीण समाजाच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

munotes.in

जगातील अत्यंत पुरातन व्यवसाय म्हणून शेतीकडे पाहले जाते. अनादी काळापासून शेतीही उदरनिर्वाहाचे साधन म्हणून केली जाते. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी ६६% लोकसंख्या ही खेड्यात राहते. त्या लोकसंख्येचा मुख्य व्यवसाय शेती आहे. त्यामुळे भारत देश का कृषी प्रधान देश म्हणून ओळखला जातो. देशामध्ये औद्योगीकरणाला चालना देण्याचा प्रयत्न १९५१ ते २००१ या कालावधीमध्ये करण्यात आला. या प्रयत्नाना काही अंशी यश ही आले. असे असले तरी, भारताची अर्थव्यवस्था मात्र कृषी प्रधानच राहिली. खेड्यात राहणाऱ्या लोकसंख्येपैकी ७२ टक्के लोकसंख्या ही प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या शेती व्यवसायावर अवलंबुन आहे. दैनंदिन गरजा भागविण्यासाठी आवश्यक असलेले अन्नधान्य आणि भाजीपाला, फळे, शेतीतून उपलब्ध होत असतात. अर्थव्यवस्थेमध्ये असणाऱ्या उद्योगात कच्च्या मालाचा पुरवठा ही शेतीतुनच केला जातो. देशामध्ये असलेल्या एकूण श्रमशक्ती पैकी ६५ टक्के श्रमशक्तीला शेती व्यवसायातून रोजगार उपलब्ध होत असतो. ग्रामीण भारतामध्ये राहत असलेल्या लोकसंख्येचे उपजिवीकेची प्रमुख साधन शेती हेच आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा मोठा आहे.

सरकारचे कृषी विकासाचे धोरण प्रामुख्याने अन्न उत्पादनात स्वयंपूर्णता व स्वावलंबन प्राप्त करण्याच्या अनुषगांने आखले गेले आहे. त्यानुसार बरीच प्रगती झाली आहे. कृषी क्षेत्रात मोठे संरचनात्मक बदल झाले आहेत. मात्र आजही कमी उत्पादकता, भांडवल, निर्मितीचा कमी दर, मान्सुनवरील अवलंबुन, सिंचनाचे कमी प्रमाण, यांत्रिकीकरणाचे अल्प प्रयत्न, कृषी वित्तीय कमतरता यासारखे प्रश्न शेती व्यवसायासमोर आहेत.

## ३.२ ग्रामीण अर्थव्यवस्थेची संकल्पना

प्राचीन भारतीय खेडी आर्थिक दृष्टीने स्वयंपूर्ण होती. दळणवळणाच्या साधनांच्या अभावाने खेडी ही इतर जगापासून पुर्णपणे तुटलेली होती. त्यामुळे आर्थिक स्वयंपूर्णता ही काळाची गरज होती. म्हणून खेड्यातील लोकांच्या निर्वाह विषयक गरजा पूर्ण करण्यासाठी खेड्यांनी स्वतंत्र अशी आर्थिक यंत्रणा उभी केली होती. शेती हा मुख्य व्यवसाय असल्याने या आर्थिक यंत्रणेचे केंद्र शेती हेच होते. ग्रामीण आर्थिक व्यवस्थेत बलूता पद्धत महत्त्वाची होती. ही पद्धती कृषीप्रधान अर्थव्यवस्थेत अनुकुल होती. परंतु आजच्या बदलत्या यांत्रिक युगात ही पद्धती उपयुक्त नाही.

मानवाला निर्वाहासाठी मुलभूत गरजा भागविणे आवश्यक असल्यामुळे मानवाला आर्थिक क्रिया कराव्या लागतात. म्हणूनच आर्थिक क्रियांचे मानवी जीवनातील स्थान महत्त्वपूर्ण आहे. समाजाप्रमाणे अर्थव्यवस्थेचे स्वरुपही बदलत असते. भारतीय ग्रामीण समाजाचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. हा व्यवसाय इतर व्यवसायांपेक्षा वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. शेती हाच प्रमुख व्यवसाय असल्यामुळे ग्रामीण जीवनावर या आर्थिक क्रियेचा प्रभाव पडला आहे. शेती व्यवसायाचा संबंध हा निसर्गाशी येतो. शेतीतील उत्पादनाचे रुपांतर औद्योगिक उत्पादनात रुपांतर हे कारखानदारी मुळे शक्य होते.

ग्रामीण भागात लोकसंख्येचे प्रमाण वाढत असल्यामुळे शेतजमिनीवरील भार वाढत आहे व दरडोई उत्पन्न कमी होत आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा हा शेती आहे. ग्रामीण जनतेचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती असलेले दिसुन येते.

मानवाच्या अमर्यादित गरजा आहेत. या गरजांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असणारी साधने मात्र मर्यादित असल्याचे आढळते. आपल्या अमर्यादित गरजांची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध असलेल्या मर्यादित साधनांचा पुरेपूर उपयोग करुन घेण्याची मानवाची धडपड या अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे “अर्थशास्त्र” होय. प्रा. रॉबीन्सच्या या व्याख्येप्रमाणे अर्थशास्त्रात मानवाच्या गरजांचा तसेच त्या गरजांच्या पूर्ततेसाठी वापरण्यात येणाऱ्या सर्वत्र साधनांचा अभ्यास अर्थशास्त्रात अपेक्षित आहे व त्या अनुषंगाने निर्माण होणारे प्रश्न व ते सोडविण्यासाठी केलेली उपाययोजना अथवा संशोधन यांचा देखील अर्थशास्त्रात समावेश होतो.

एखाद्या विभाग, प्रदेश अथवा देशातील उपलब्ध साधनसामग्री आणि तेथील रहिवासी लोकांच्या गरजांचा सामुदायिक विचार अर्थव्यवस्थेत अभिप्रेत असतो. त्या विभागातील उपलब्ध नैसर्गिक संपत्ती व तिचा पुरेपुर उपयोग करुन घेण्यासाठी करण्यात येणारे विविध व्यवसाय शेती, उद्योग व त्यांच्या आनुषंगिक प्रश्न व समस्याच्या संदर्भात निर्माण होणाऱ्या इतर बाबींचा विचार करुन निर्माण केलेली व्यवस्था म्हणजे अर्थव्यवस्था होय.

ग्रामीण अर्थव्यवस्था म्हणजे अशी अर्थव्यवस्था ज्यात ग्रामीण भागातील उपलब्ध आणि ग्रामीण भागातील जनतेच्या गरजांची व्यवस्थित सांगड घालण्यात आली असून त्याद्वारे ग्रामीण भागातील जनतेचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला आहे. भारतात ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय व उपजिविकेच्या तसेच राष्ट्रीय उत्पन्नाचे एकमेव साधन शेती असल्यामूळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विचार म्हणजे शेती व शेतीच्या आनुषंगिक उद्योग व समस्याचा विचार ठरतो. म्हणूनच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा अभ्यास म्हणजे शेती व शेतीविषयक समस्या, पशुसंवर्धन व त्यापासुन मिळणारे उत्पादन, लघू व कुटीरउद्योग, ग्रामीण व्यापार व पतपुरवठा, बाजारपेठ विषयक प्रश्न व इतर ग्रामीण प्रश्नांचा ज्या व्यवस्थेत विचारपूर्वक समावेश करण्यात आला आहे ती व्यवस्था म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्था होय.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

१) ग्रामीण अर्थव्यवस्थेची संकल्पना स्पष्ट करा.

## ३.३ ग्रामीण अर्थव्यवस्थेची व्याप्ती

ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या वरिल व्याख्येवरुन या अर्थव्यवस्थेची व्याप्ती लक्षात येऊ शकेल. शेती हा ग्रामीण भागातील एकमेव व अत्यंत महत्त्वाचा व्यवसाय असल्यामुळे त्याचा व शेतीशी संबंधित असणाऱ्या सर्वच बाबींचा त्यात समावेश होतो. शेतजमीन व तिचे प्रकार,

जमिनीविषयीचे प्रश्न, जमीनधारणा पद्धती, जमीनीचा आकार, नैसर्गिक परिस्थिती, जलसिंचन, बियाणे, खते, शेतीची अवजारे व शेतीच्या पद्धती, शेती उत्पादकतेचे इतर प्रश्न भांडवल पुरवठा, बँका, बाजारपेठा, सहकारी शेती व सहकारी बाजारपेठा, शेतमजुर व त्यांच्या समस्या, वनसंवर्धन, वनउत्पादने, पशुसंवर्धन व त्यापासून मिळणारे उत्पादने, पशुसंवर्धन व त्याची बाजारपेठ, लघू व कुटीरोद्योग, ग्रामीण विद्यूतीकरण, शैक्षणिक विकास, सोयी व प्रशिक्षण व्यवस्था, आरोग्य इ. बाबीचा ग्रामीण अर्थव्यवस्थेत समावेश होणे ओघाने आवश्यक ठरते. ग्रामीण जीवनमानावर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे परिणाम करणाऱ्या सर्व घटकांचा विचार केल्याशिवाय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आराखडा पूर्णच होऊ शकत नाही.

## ३.४ ग्रामीण अर्थव्यवस्थेचे स्वरुप

देशाच्या आर्थिक नियोजनात शहरी भागाच्या विकासास मिळालेले अवास्तव महत्त्व आणि ग्रामीण भागाच्या विकासाकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष लक्षात घेता असे लक्षात येते की, ग्रामीण आणि औद्योगिक विकासाची योग्य सांगड घालण्यात नियोजनकारांना अपयश प्राप्त झाले आहे. विकासाबाबतची अस्थिरता व असमतोलपणा हा याचाच परिणाम आहे. विकासाच्या मुलभूत घटकांची उपलब्धता देखील ग्रामीण जनतेचे अज्ञान व निरक्षरता, रस्ते बांधणीमधील अपयशामुळे विकासापासून वंचित राहिलेली गावे, रुढी, परंपरा, अंधश्रद्धा यामध्ये गुरफटलेली समाजव्यवस्था, जातीव्यवस्था, धर्म यामधून निर्माण झालेली दुकली, भीषण पाणी टंचाई, गरिबी व दारिद्र्य यामूळे अनेक कुटुंबे विकासापासून वंचित आहेत.

ग्रामीण अर्थव्यवस्थेत या सर्व बाबींचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे. म्हणून ग्रामीण अर्थव्यवस्थेचे स्वरुप विस्तृत आहे. त्यामध्ये खालील मार्गदर्शक तत्त्वांचा विचार होणे आवश्यक आहे.

**मार्गदर्शक तत्त्वे :**

१) ग्रामीण साधनसामग्री, भौगोलिक व नैसर्गिक परिस्थिती व जमीनीची पाहणी करुन कृषी विकासाचे धोरण ठरविणे.

२) उपलब्ध विद्युत शक्तीचा पुरेपुर उपयोग करणे.

३) कृषी बाजारपेठांचा विस्तार करणे. त्यासाठी वाहतुक व्यवस्था, साठवणूक व्यवस्था विकसित करणे.

४) ग्रामीण भागात पुरेशा वैद्यकिय सोयी उपलब्ध करणे.

५) ग्रामीण औद्योगिकरणाला चालना देणे.

६) ग्रामीण विकास कार्यक्रमांची प्रभावीरित्या अंमलबजावणी करणे.

७) पर्यावरणाचा ऱ्हास न करता विकासाला चालना देणे.

८) विकास विषयक धोरणाचे पूर्नमुल्यांकन करुन त्यात आधूनिक संकल्पनांचा समावेश करणे.

वरील मार्गदर्शक तत्त्वाचा विचार करुन प्रत्येक भागात काही बदल करणे आवश्यक ठरेल. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था विकसित होण्यास हातभार लागेल.

munotes.in

## ३.५ ग्रामीण अर्थव्यवस्थेचे बदलती पद्धती

**कृषी क्षेत्रासाठी वापरण्यात आलेले डावपेज :**

कृषी उत्पादन व ग्रामीण रोजगारात वाढ घडवून आणण्यासाठी विविध विकास कार्यक्रम राबविण्यात आले.

समुदाय विकास कार्यक्रम, कृषी विस्तार सेवा, सिंचन सूविधा, खाते, किटकनाशके, कृषी यंत्रे, संकरीत बियाणे इ. आदानांचा विस्तार करण्यात आला. जमिनीवरील लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी नियोजन आयोगाने ग्रामीण विकासाच्या डावपेजाच्या अवलंब केला. उदा. ग्रामीण भागात कृषी आधारित उद्योग व हस्तकला उद्योगाची स्थापना, ग्रामीण वाहतूक व दळणवळणास प्रोत्साहन, कृषी क्षेत्राकडून उद्योग व सेवा क्षेत्राकडे लोकांना वळविण्यास प्रोत्साहन इ. तसेच ग्रामीण भागात समानता व न्याय प्रस्थापित करण्यासाठी नियोजन आयोगाने भु-सुधारणांवर भर दिला. त्यामध्ये मध्यस्थाचे उच्चाटन, कुळांचे संरक्षण व अतिरिक्त जमीनीचे वाटप भूमीहीनांमध्ये करणे इ. धोरणात्मक निर्णयांचा समावेश होतो.

भारतीय ग्रामीण जनतेचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. त्यामुळे कृषी व्यवसायावर लक्ष केंद्रीत करण्यात आले. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा शेती व्यवसाय आहे. त्यामूळे पंचवार्षिक योजनांमध्ये देखील कृषी व्यवसायांना महत्त्व देण्यात आले. काळानूसार शेती व्यवसायाचे स्वरुप बदलत चालले आहे. निर्वाह शेतीचे रुपांतर व्यापारी शेतीमध्ये होऊ लागले. शेतीचे आधूनिकीकरण होऊ लागले. हरितक्रांती, धवलक्रांती, सोनेरी क्रांती, निलक्रांती मूळे कृषी क्षेत्रात आमुलाग्र परिवर्तन झाले.

भारतीय अर्थव्यवस्था ही मिश्र अर्थव्यवस्था आहे. आधूनिक काळात कृषी क्षेत्राबरोबरच सेवाक्षेत्राचे महत्त्वाचे योगदान आहे. कृषी क्षेत्राचा निर्यातीमधील हिस्सा हा कमी होत चाललेली दिसुन येतो. जागतिकीकरणाचा शेती व्यवसायावर परिणाम होत आहे. त्यामूळे भारतीय शेती व शेतकरी यांना परकीय स्पर्धकांशी स्पर्धा करावी लागत आहे.

आधूनिक काळात ग्रामीण अर्थव्यवस्था बदलत गेलेली दिसून येते. शेतकरी अन्नधान्याचे उत्पादन घेण्याबरोबरच ऊस तेलबिया, ज्यूट व कापूस इ. व्यापारी पिके घेऊ लागला आहे. जागतिकीकरणाचा फायदा घेण्यासाठी भाजी, फळे मसाल्याचे पदार्थ यांचे देखील उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेऊ लागला आहे. मुल्यवपाती, एकस्व या गोष्टींना शेतकरी सामोरा जात आहे.

### ३.५.१ बीगरशेती म्हणून जमीनीचा वापर :

सध्या ग्रामीण भागात व नीम शहरी भागात घरे बांधण्यासाठी जमिनीची विक्री केली जाते. पावसावर अवलंबून असणारी लहरी शेती विकून पैसे मिळविणे लोक पसंत करु लागले आहेत. त्यामूळे लागवडी खालील क्षेत्रात घट होताना दिसते.

शेतजमिनी विशेष आर्थिक क्षेत्र, विमानतळ यासाठी मोठ्या प्रमाणात संपादित केली जाते. तसेच कंपनी शेती पद्धतीमध्ये देखील वाढ होत असलेली दिसुन येते. जैवतंत्रज्ञानाचा कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वापर होऊ लागला आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेचे स्वरुप बदल चालले आहे. त्याद्वारे कृषी विकास जलदगतिने होणे आवश्यक आहे. शेती विकासात येणाऱ्या अडचणी दूर करुन कृषी विकासाला वेग देणे महत्त्वाचे ठरेल. ग्रामीण औद्योगिकरणाला वेग येणे ही काळाची गरज आहे. लहान शेतकरी, भूमीहीन, शेतमजुर यांची आर्थिक स्थिती ग्रामीण औद्योगिकरणाने बदलू शकते. लघुउद्योगधंदे आणि जोडधंदे यांच्यामुळे अर्थव्यवस्थेला बळकटी प्राप्त होऊ लागली आहे. या उद्योगधंद्यामध्ये किफायतशीर गुंतवणूक करुन विकासाला गती देता येऊ शकते.

प्राचीन ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सध्याची अर्थव्यवस्था यात फरक आहे. आधूनिक काळात कृषी क्षेत्र, उद्योग क्षेत्र, सेवा क्षेत्र, पुरक व्यवसाय इत्यादी घटकांमुळे अर्थव्यवस्थेत परिवर्तन होत असलेले दिसून येते.

### ३.५.२ शेती व्यवसाय आणि आर्थिक विकास :

शेती व्यवसायाचा विकास झाला की अन्नधान्य उत्पादनात वाढ होते. कृषी क्षेत्र व बिगर कृषी क्षेत्रातील लोकांच्या अन्नधान्याची गरज शेतीतून मागविण्यात येते. तसेच उद्योग धंद्यासाठी आवश्यक असणारा कच्चा माल हा देखील कृषी क्षेत्रातुनच उपलब्ध होतो.

शेती विकासामुळे कच्च्या मालाचा पुरवठा वाढून औद्योगिक विकासाला चालना मिळते. भारतातील शेती व्यवसायाची भरभराट झाल्यास भारतातील बहुसंख्य लोकांचे राहणीमान उंचावण्यास मदत होईल. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढल्यास त्यांना कारखानदारी वस्तु अधिक संख्येने खरेदी करता येणे शक्य होईल व त्यामुळे भारतातील औद्योगिक विकासाला आणखी चालना मिळेल.

शेतीव्यवसायाच्या विकासामुळे शेतीमालाची परकिय देशांकडे केली जाणारी निर्यात वाढेल. निर्यातीमधील वाढीमुळे भारताला परकिय चलन मिळेल. भारतात जी यंत्रसामग्री तयार होऊ शकत नाही किंवा ज्या सुट्ट्या भागांचे आणि रसायनासारख्या औद्योगिक कच्च्या मालाचे भारतात उत्पादन होऊ शकत नाही अशी यंत्रसामग्री, यंत्रांचे सुटे भाग, औद्योगिक कच्चा माल त्या परकिय चलनाच्या सहाय्याने आयात करता येणे शक्य होईल व त्यामुळे भारताच्या औद्योगिक विकासाचा व पर्यायाने आर्थिक विकासाचा वेग वाढण्यास मदत होईल.

अशा रितीने भारतातील शेती क्षेत्राच्या विकासाचा भारतातील औद्योगिक विकासाशी म्हणजेच आर्थिक विकासाशी निकटचा संबंध आहे. त्यामुळे कृषी विकास हा महत्त्वपूर्ण आहे.

## ३.६ शेतीची संकल्पना

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतातील बहुसंख्य लोकसंख्येचा मुख्य व्यवसाय शेती व शेती संबंधित व्यवसाय हेच आहेत. भारतीय शेती ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१) भारतामध्ये असलेल्या धारणक्षेत्राच्या स्वरुपामुळे भारतीय शेतीचे संघटन हे दोषमुक्त असलेले आढळते.

२) इतर व्यवसाय व शेती व्यवसाय यांची तुलना केली असता त्यातून होणाऱ्या विनियोगाचा दर हा शेती व्यवसायात फारच कमी असलेला दिसतो.

३) देशाच्या एकूण लोकसंख्येचा विचार केला असता बहुसंख्य लोकसंख्या शेती व्यवसायावर अवलंबून असल्यामुळे शेती व्यवसायावर लोकसंख्येचा ताण जास्त आहे.

४) जगातील देशाच्या कृषी उत्पादनाशी, भारतीय शेती क्षेत्राच्या उत्पादनाशी तुलना केली असता ती फारच कमी असल्याचे आढळते.

५) भारतीय शेती ही हंगामी स्वरुपाची असल्यामुळे या क्षेत्रात अर्थबेकारी तसेच छुपी बेकारी मोठ्या प्रमाणात आहे.

६) भारतीय कृषी ही पारंपारिक पद्धतीने केली जात असल्याने शेतीमध्ये उत्पन्न वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या घटकांचे प्रमाण कमी आहे.

७) भारतीय कृषीमध्ये जमीन कसल्याच्या पद्धती एकसारख्या असल्यामुळे व सतत कृषीसाठी शेतजमिनीचा वापर होत असल्यामुळे व सतत कृषीसाठी शेतजमिनीचा वापर होत असल्यामुळे कृषी जमीन ही निकस झाली आहे.

८) भारतीय कृषी ही निसर्गामध्ये पडणाऱ्या पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने निसर्गाच्या अनुकूलतेचा व प्रतिकूलतेचा परिणाम या व्यवसायावर प्रभावीपणे होतो. त्यामुळे निसर्गावरील अवलंबित्व हे कृषीचे वैशिष्ट्य बनले आहे.

९) भारतीय कृषीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पडीत भूमी. एकूण उपलब्ध असलेल्या शेत जमिनीपैकी बहुसंख्य जमीन ही पडित ठेवली जाते. अशा पडीत जमिनीचा शेती विकासासाठी वापर करणे शक्य आहे. अलीकडील पंचवार्षिक योजना काळात थोड्या प्रमाणात त्याचा वापर होऊ लागला आहे.

१०) भारतीय कृषी ही लहान लहान तुकड्यामध्ये विखुरलेली आहे. कारण शेत जमिनीचे तुकडीकरण होण्यासाठी विविध कारणे कारणीभूत आहेत. उदा. शेतकऱ्यांचा अशिक्षितपणा, त्यांच्या मनोवृत्ती, भारतामध्ये असलेले वारसा हक्कासारखे कायदे, अस्तित्वात असलेल्या कायद्याची अयोग्य अंमलबजावणी इ.

११) भारतीय शेतीमध्ये कसत असलेले शेतकरी हे बहुसंख्येने आर्थिक स्थिती हलाखीची असलेले आहेत. तसेच हे अशिक्षितही आहेत.

१२) कृषी उत्पादनाचा फायदा हा भारतीय शेती कसणाऱ्या शेतकऱ्यांना न होता शेतमाल उत्पादनाची विक्री करणाऱ्या कच्च्या व पक्क्या उत्पादकांना शक्य होतो.

१३) भारतीय कृषी विपणन व्यवस्था ही योग्य नसल्यामुळे तिच्यामध्ये असंख्य मध्यस्थांचे प्रमाण जास्त आहे. त्याचा परिणाम शेतमाल विक्री व्यवस्था ही सदोष निर्माण होण्यामध्ये झालेला आहे.

१४) भारतीय कृषी क्षेत्रामध्ये अन्नधान्याच्या पिकांचे उत्पादन घेण्याचे प्रमाण जास्त आहे. व्यापारी पिके फारच कमी घेतली जातात. त्यामुळे उद्योगांसाठीच्या कच्च्या मालाच्या उपलब्धतेची कमतरता निर्माण होते.

१५) भारतीय कृषी पद्धतीमध्ये आजही परंपरागत पद्धतीचा वापर केला जातो. अलीकडील काळात अत्यल्प प्रमाणात वैज्ञानिक पद्धतीचा वापर करणे सुरु झाले आहे.

### ३.६.१ कृषीचे प्रकार :

भारतामध्ये असलेल्या निरनिराळ्या प्रदेशांमधील परिस्थितीस अनुसरुन शेती व्यवसाय केला जातो. हा व्यवसाय करण्याच्या विविध पद्धती अस्तित्वात आहेत. त्याचे वर्गीकरण करण्यासाठी विविध आधारांचा वापर करणे गरजेचे आहे. त्यानुसार शेतीचे प्रकार पुढीलप्रमाणे.

**१) आकारानुसार :**

शेतीमध्ये जमीन कसण्यासाठी किंवा पिकांची लागवड करण्यासाठी घेतलेल्या क्षेत्राचा आकार केवढा मोठा आहे. त्यावरुन जे प्रकार पडतात ते पुढीलप्रमाणे.

अ) छोट्या प्रमाणावरील शेती (Small Farming)
ब) मध्यम प्रमाणावरील शेती (Medium Farming)
क) मोठ्या प्रमाणावरील शेती (Large Farming)

वेगवेगळ्या ठिकाणच्या परिस्थितीनुसार छोटे, मध्यम, मोठे आकारही बदलू शकतात.

**२) उत्पादनांच्या किंमतीनुसार :**

शेतीमध्ये केल्या जाणाऱ्या पिकांच्या किंमतीनुसारही शेतीचे प्रकार निर्माण होतात. त्यांची विभागणी दोन विभागांत करता येते.

**अ) विशेषीकृत शेती (Specialised Farming) :**

शेतीमधून मिळणारे उत्पन्न हे विशिष्ट अशा एकाच प्रकारच्या शेती पिकापासून मिळत असते. तेव्हा त्या शेतीला विशेषीकृत शेती असे म्हणतात.

**ब) सामान्य शेती :**

शेतीमधून मिळणारे उत्पन्न हे एकाच विशिष्ट पिकापासुन न मिळता विविध प्रकारच्या पिकापासून मिळते, त्यावेळी त्यास सामान्य शेती असे म्हणतात.

**३) व्यवसायाच्या स्वरुपानुसार :**

शेती व्यवसाय करत असताना त्यामध्ये होणारे उत्पादन हे कशासाठी किंवा त्याचा उपयोग कोणत्या कारणासाठी केला जाणार आहे याच्यावरुनही शेतीचे प्रकार पडतात. त्याची विभागणी दोन प्रकारांमध्ये केली जाते.

**अ) निवार्ह शेती :**

जेव्हा शेती हा व्यवसाय उदरनिर्वाहाचे साधन म्हणून केले जाते, तेव्हा त्या शेतीमधून निर्माण झालेले उत्पादन हे कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी वापरले जाते, त्यावेळी अशा प्रकारास निर्वाह शेती असे म्हटले जाते.

**ब) व्यापारी शेती (Commercial Farming) :**

या शेती प्रकारामध्ये केले जाणारे शेती उत्पादन हे प्रामुख्याने बाजारामध्ये विक्रीसाठी केले जाते. या शेती प्रकाराकडे व्यापारी दृष्टिकोनातून पाहून नफा मिळविणे हा मुख्य हेतू असतो.

### ४) संघटना प्रकारानुसार :

शेती व्यवसाय हा मोठा पसारा असलेला व्यवसाय आहे. या व्यवसायामध्ये वापरल्या जाणाऱ्या संघटन पद्धतीच्या आधाराने ६ प्रकार निर्माण होतात. ते पुढीलप्रमाणे -

### अ) वैयक्तिक शेती (Individual Farming) :

या प्रकारच्या शेती प्रकारामध्ये शेती वैयक्तिक स्वरुपात कसली जाते. शेतकरी शेतीची सर्व प्रकारची कामे स्वतः आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या सहकार्याने करीत असतो. तसेच शेतीसाठी लागणाऱ्या साधनांचा वापर आपल्या कुटूंबाकडूनच करीत असतो, अशा प्रकारे केल्या जाणाऱ्या शेतीला वैयक्तिक शेती असे म्हणतात.

### ब) एकत्रित शेती (Joint Farming) :

या प्रकारच्या शेती प्रकारामध्ये शेती उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या उत्पादन घटकाचे उदा. भूमी, श्रम, भांडवल या घटकांचे समप्रमाणात एकत्रीकरण केले जाते व त्या प्रमाणात उत्पादनाचे विभाजन करण्यात येते. अशाप्रकारे केल्या जाणाऱ्या शेती प्रकाराला एकत्रित शेती असे म्हटले जाते.

### क) सहकारी शेती (Co-operative Farming) :

या प्रकारच्या शेती प्रकारामध्ये अनेक शेतकरी शेती कसण्यासाठी एकत्र येत असतात व सहकाराने शेती करतात. सहकारी तत्वाचा वापर हा शेती प्रकारामध्ये केला जातो. शेतीमध्ये निर्माण होणारे उत्पादन हे शेतकऱ्यांना त्यांनी केलेल्या सहकार्याच्या स्वरुपात विभागून दिले जाते, अशा प्रकारच्या शेती प्रकारास सहकारी शेती असे म्हणतात.

### ड) प्रमंडळ शेती (Corporate Farming) :

या प्रकारच्या शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर भांडवल या घटकांचा वापर केला जातो. शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. या शेती प्रकारामध्ये अनेक श्रमिक पगार मिळविण्यासाठी काम करतात. त्यांच्याकडून काम करुन घेण्यासाठी प्रभावी व्यवस्थापकाची नेमणूक केलेली असते. या प्रकारामध्ये भांडवल गुंतविणाऱ्या हिस्सेदाराचा प्रमुख उद्देश हा जास्तीत जास्त नफा मिळविणे हाच असतो.

### इ) सरकारी शेती (State Farming) :

या शेती प्रकारामध्ये मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतविलेले असते. यामध्ये प्रामुख्याने सरकारकडून भांडवल गुंतविले जाते. या प्रकारामध्ये भांडवलप्रधान स्वरुपाची शेती केली जाते. यामध्ये जमीनीची मालकी सरकारची असते. शेती व्यवस्थापनही सरकारचे असते. सरकारी व्यवस्थापनाच्या देखरेखीखाली पगारी कामगार काम करतात.

### फ) सामूहिक शेती (Collective Farming) :

या प्रकारच्या शेतीमध्ये शेतकरी आपला शेत जमिनीवरील हक्क सोडून देतात आणि सर्व मिळून पिकाची लागवड संयुक्तरीत्या करतात. शेतीमध्ये वापरली जाणारी सर्व साधने ही त्यांच्या सर्वांच्या मालकीची असतात. शेतकऱ्यांनी केलेल्या शेतीतील श्रमाच्या प्रमाणात त्यांना उत्पन्नातील वाटा मिळत असतो.

**५) भूमी धारणेनुसार :**

शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या भूमी या घटकांच्या उपलब्धतेनुसार दोन प्रकार तयार होतात ते पुढीलप्रमाणे.

**अ) कूळ शेती (Share Cropping) :**

या प्रकारामध्ये शेती करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या भूमीची उपलब्धता जमीनदाराकडून केली जाते. त्याने जमीन कसण्यास उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्याला खंड दिला जातो. एकूण मिळणाऱ्या उत्पन्नांपैकी खंड वजा जाता उरणारे उत्पन्न कसणाऱ्या शेतकऱ्याचे उत्पन्न असते.

**ब) मालक कास्तकारी (Peasent Properietorship) :**

या प्रकारच्या शेतीमध्ये शेती करण्यास आवश्यक असणारी जमीन सरकारकडून उपलब्ध करुन घेतली जाते. त्याबद्दल सरकाराला खंड दिला जातो. खंड देण्याच्या किंवा व्यवहारामध्ये इतर मध्यस्थ कुणीही नसतात. तसेच कसण्यासाठी दिलेली जमीन हे परंपरागत अशा स्वरुपात असते, तसेच ती हस्तांतरणीयही असू शकते.

**६) श्रमाच्या स्वरुपानुसार :**

शेतीमध्ये अनेक प्रकारची कामे करावी लागतात. त्यासाठी लागणारे श्रम त्याच्या उपलब्धतेनुसार शेतीची दोन प्रकार पडतात ते पुढीलप्रमाणे.

**१) कुटुंब शेती (Family Farming) :**

शेती कसत असताना शेतीमध्ये अनेक प्रकारची कामे करावी लागतात. त्यासाठी शेतकरी आपल्या कुटुंबामध्ये असलेल्या व्यक्तीच्या सहकार्याने ही श्रमाची कामे पूर्ण करीत असेल, तर त्याला कुटुंब शेती असे म्हणतात.

**२) मजूर शेती :**

या प्रकारच्या शेती प्रकारामध्ये शेतीमधील कामे ही पगारी मजुरांच्या सहकार्याने करुन घेतली जातात. त्यांना केलेल्या कामाचा मोबदला म्हणून त्यांना मजूरी दिली जाते.

वरील शेती प्रकार अत्यंत काटेकोरपणे करणे शक्य नाही. कारण शेती व्यवसायाचे स्वरुप अत्यंत गुंतागुंतीचे आहे. वेगवेगळ्या आधारावर वेळेचे प्रकार हे काही प्रमाणात एकमेकांशी साम्य दाखवू शकतात. काटेकोर विभागणी करणे शेतीक्षेत्राविषयी अत्यंत कठीण काम आहे.

## ३.७ ग्रामीण विकासातील शेतीची भूमिका

महात्मा गांधी यांनी असे म्हटले होते की, शेती ही भारतीय लोकांचे उपजीविकेचे साधन आहे. शेती करणारी लोकसंख्या खेड्यात राहते. खेड्याचा विकास करावयाचा असेल तर शेती विकासास प्राधान्य दिले पाहिजे. तसेच शेतीपूरक व शेतीवर आधारित उद्योगांचा विचार केला पाहिजे.

देशाचा आर्थिक विकास हा शेती व्यवसायावर अवलंबून आहे. शेती हा अर्थव्यवस्थेचा पाया आहे. राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा ४३ टक्के एवढा आहे. आर्थिक विकासामध्ये कृषी महत्त्वाची भूमिका निभावत असते. जसजसा आधुनिक विकास होत जातो. तसतसे शेतीवरील अवलंबत्व कमी होते. औद्योगिक विकासासाठी आवश्यक असलेला कच्चा माल शेती क्षेत्रातून पुरविला जातो. देशामध्ये वाढणारी लोकसंख्या त्या लोकसंख्येच्या अन्नधान्याचा प्रश्न, अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्न, उद्योगासाठी कच्च्या मालाची उपलब्धता रोजगारांमध्ये वाढ करण्याची महत्त्वाची भूमिका शेती निभावत असते.

शेती व्यवसाय अर्थव्यवस्थेतील मूलभूत क्षेत्र म्हणून विल्सन बार्कर, बारझोडीसारखे विचारवंत मानतात. तर जे.एस. डेव्सिस या विचारवंताला शेती क्षेत्राला मूलभूत क्षेत्र मानणे योग्य वाटत नाही, कारण अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये अनेक घटक भूमिका निभावत असतात असे मत ते मांडतात.

ब्राट, टॉलीसारखे विचारवंत मात्र लोकांचा विचार करताना दिसत नाहीत. अर्थव्यवस्थेमध्ये विविध क्षेत्रे, घटक परस्पर पूरक असतात. त्यामुळे कोणतेही एक क्षेत्र किंवा घटक याचे महत्त्व जास्त राहत नाही. शेतीच्या विकासामुळे इतर उद्योग विकसित होतात. हे विकसित उद्योगही शेती विकासाला मदत करीत असतात.

शेती क्षेत्र अर्थव्यवस्थेमध्ये विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका पार पाडते ते पुढीलप्रमाणे -

**१) बहुसंख्य लोकांच्या उपजीविकेचे साधन :**

भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ७० टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या उदरनिर्वाहासाठी शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. १९५१ मध्ये कृषी क्षेत्रावर एकूण लोकसंख्येच्या ७३.१ टक्के लोकसंख्या अवलंबून होती. तर २००१ मध्ये अवलंबित लोकसंख्येचे प्रमाण ६७ टक्के एवढे कमी झाले. २०११ च्या जनगणनेनुसार हे प्रमाण अंदाजे ५९ टक्के इतके आहे. बहुसंख्य लोकसंख्या ही शेती क्षेत्रावर उपजीविकेचे साधन म्हणून अवलंबून आहे. त्यामुळे शेतीचा विकास होणे आवश्यक आहे. शेतीचे प्रमाण कमी झाले तर बहुसंख्य लोकांच्या उत्पन्नाचे साधन नष्ट होईल.

**२) राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा :**

भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये शेती क्षेत्र महत्त्वाची भूमिका निभावताना दिसते. एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील २० टक्के वाटा हा कृषी क्षेत्राचा आहे. कृषी क्षेत्रासारख्या प्राथमिक क्षेत्रामध्ये एकूण लोकसंख्येपैकी ५९ टक्के लोकसंख्या कार्यरत आहे. १३ टक्के लोकसंख्या दुय्यम क्षेत्रामध्ये म्हणजेच उद्योग क्षेत्रामध्ये गुंतलेली आहे. तर तृतीय क्षेत्र म्हणजे सेवा क्षेत्रामध्ये २८ टक्के लोकसंख्या कार्यरत आहे.

**३) आर्थिक स्थिरता :**

जगातील विकसित व विकसनशील देश यांच्यातील आर्थिक विषमता ही कृषीवर असणाऱ्या प्रमाणात वाढ झाल्याने वाढते, असे मत व्यक्त केले जाते. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी बहुसंख्य लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते. या बहुसंख्येने ग्रामीण भागात

राहणाऱ्या लोकसंख्येचा उदरनिर्वाहाचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. आणि या शेती व्यवसायाने ग्रामीण भागातील लोकांना शेती, शेती आधारित व शेतीपूरक व्यवसायातून रोजगार उपलब्ध करुन दिला असल्यामुळे बहुसंख्य ग्रामीण लोकसंख्येला आर्थिक स्थिरता प्राप्त झाली आहे.

**४) राजकीय आणि सामाजिक दृष्ट्या महत्त्व :**

भारतामध्ये शेतीक्षेत्राचा विचार करताना राजकीय आणि सामाजिक दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे. स्वतःच्या वैयक्तिक फायद्यासाठी कोणते पीक घ्यावे व ते कोठे विकावे हा शेतकऱ्याचा वैयक्तिक प्रश्न जरी असला तरी, शेती विकासासाठी सरकार वेगवेगळ्या योजना जाहीर करीत असते. ही राजकीय बाब जरी असली तरी या योजनांचा परिणाम समाजावरती होत असतो. याचा विचार करुन सामाजिक दृष्टिकोनाचाही विचार करावा लागतो. भारतीय शेतकऱ्याच्या दृष्टीने शेती हा त्याचा भावनिक प्रश्न आहे. शेती सरकारला उत्पन्न प्राप्त करुन देणारा प्रमुख स्त्रोत आहे. या दोन्ही गोष्टींमध्ये समन्वय साधण्याच्या दृष्टिने प्रयत्न करावे लागतात.

**५) पाळीव प्राण्यासाठी चारा :**

देशातील जनतेला अन्नधान्याचा साठा पुरविण्यासाठी शेतीमध्ये वेगवेगळी अन्नधान्ये, कडधान्ये, घेतली जातात. यातून उत्पादित होणाऱ्या मुख्य उत्पादनाचा वापर लोकसंख्येचा अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्यासाठी केला जातो. तर उपउत्पादने म्हणजे चारा, पेंडा, वगैरेंचा वापर पशूंच्या अन्नाचा प्रश्न सोडविण्यासाठी केला जातो. भारतासारख्या सर्वाधिक पशुधन असलेल्या देशामध्ये पशूंच्या चाऱ्याचा फार मोठा प्रश्न निर्माण होतो. त्याची पूर्तता करण्यासाठी कृषीची भूमिका महत्त्वाची आहे.

**६) सरकारच्या उत्पन्नाचे साधन :**

देशाचे उत्पन्नाचे साधन म्हणून कृषी क्षेत्र महत्त्वाची भूमिका निभावते. कृषी क्षेत्रावर देशाच्या उत्पन्नामध्ये महत्त्वाची भूमिका निभावणारे द्वितीय व तृतीयक्षेत्रही अवलंबून आहेत. शेतीवर लावण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या करांतून देशाला उत्पन्न मिळत असते. सरकारच्या उत्पन्नांचे खात्रीचे क्षेत्र म्हणून शेती क्षेत्राकडे पाहिले जाते. उदा. जमिन महसुल, सिंचन आकार, तंबाखूवरील अबकारी कर इ. करांतून राज्य सरकारला उत्पन्न मिळते.

**७) औद्योगिक प्रगतीला हातभार :**

देशाच्या औद्योगिक प्रगतीमध्ये उद्योगाची भूमिका महत्त्वाची असते. या उद्योगाच्या प्रगतीसाठी शेतीमध्ये उत्पादित होणाऱ्या मालाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा शेतीमध्ये निर्माण होणारा माल. उदा. कापूस, ऊस, भूईमूग, करडई, सुर्यफूल, गहू, तांदूळ, बाजरी व इतर अनेकांचा वापर कच्चा माल म्हणून केला जातो. देशामध्ये या व इतर कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग अवलंबून आहेत. कृषी क्षेत्रातून सातत्याने होणाऱ्या कच्च्या मालाच्या पुरवठ्यामुळे हे उद्योग हंगामी चालू न राहता वर्षभर पूर्णक्षमतेने उत्पादनाचे कार्य करीत असतात.

**८) व्यापारातील महत्त्व :**

अंतर्गत व्यापार व बाह्यव्यापार असे व्यापाराचे दोन प्रकार पडतात. देशापर्यंत चालणाऱ्या व्यापारामध्ये कृषीक्षेत्रामध्ये निर्माण होणाऱ्या शेतमालाची महत्त्वाची भूमिका आहे. या

व्यापारामध्ये देशातील लोकसंख्या फार मोठ्या प्रमाणात गुंतलेली आहे. शेतीक्षेत्रामध्ये उत्पादित झालेला शेतमाल उपभोक्ता ग्राहकापर्यंत पोहोचविणे तसेच उत्पादक शेतकऱ्याच्या मालाला योग्य ग्राहक, योग्य किंमत मिळवून देणे, घाऊक किरकोळ व्यापारी, फिरते व्यापारी, सहकारी ग्राहक, भांडारे वितरण संस्था, प्रक्रिया करणारे इ. अनेक प्रकारामध्ये गुंतलेली असते. या सर्वांचे उपजीविकेचे साधन कृषी शेतमाल आहे.

बाह्य व्यापारामध्ये दुसऱ्या देशांशी होणाऱ्या व्यापाराचा समावेश होतो. या व्यापारामध्ये जगातील देशामध्ये अन्नधान्य तसेच इतर कृषी उत्पादनाची मोठ्या प्रमाणावर निर्यात होते. उदा. साखर, कापूस, द्राक्ष, कांदा, मोसंबी, संत्री, आंबा, केळी, गुलाबाची फुले इ. शेतमाल उत्पादनाची निर्यात केल्यामुळे परकीय चलन प्राप्त होते.

### ९) लोकांसाठी अन्नधान्याचा पुरवठा :

देशातील सर्व लोकसंख्येला अन्नधान्यासाठी शेतीमध्ये उत्पादित होणाऱ्या शेतमालावर अवलंबून राहावे लागत आहे. भारतीय लोकसंख्येच्या अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी अन्नधान्य कडधान्याची लागवड केली जाते. त्यामध्ये तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, तूर, एरंडी, हरभरा, मूग, भाजीपाला, फळे, फुले यांचा समावेश होतो. देशामध्ये झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या अन्नधान्याचा प्रश्न शेती क्षेत्रातूनच सोडविला जातो. वाढत जाणाऱ्या लोकसंख्येच्या अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्यासाठी पुन्हा हरित क्रांती होण्याची गरज आहे.

### १०) वाहतूक दळणवळण साधनांच्या सोयींचा विकास :

शेती क्षेत्राच्या विकासासाठी वाहतूक दळणवळणाच्या साधनांचा विकास होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शेतमालाची ने आण करण्यासाठी तसेच बाजारपेठांमध्ये झालेल्या शेतमालाच्या आवक जावक विषयाची माहिती शेतकऱ्यांना माहित झाली पाहिजे. तसेच शेतकऱ्यांच्या शेतमालाला मिळालेल्या बाजारभावाची माहिती होणे गरजेचे आहे. त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पादन प्रेरणेवर होत असतो. या साठी दळणवळण सोयी आवश्यक ठरतात. या सर्वांचा परिणाम शेतमाल उत्पादनामध्ये वाढ होण्यात होईल.

वाहतुकीच्या साधनांचा व शेतीचा विकास हा शेतमाल विक्रीच्या अनुषंगाने झालेला दिसतो. नागपूरची संत्री, पंजाबमधील गहू, द्राक्षे देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचतात. वाहतुकीच्या साधनांच्या उपलब्धतेमुळेच हे शक्य झाले आहे.

### १) शेती व्यवसाय व परराष्ट्रीय व्यापार :

भारताच्या परराष्ट्रीय व्यापारात कृषी क्षेत्राचा मोलाचा वाटा आहे. तेलबिया, तंबाखू, चहा, कॉफी, काजुगर, मसाल्याचे पदार्थ यासारख्या वस्तुची निर्यात मोठ्या प्रमाणात होते. स्थुलमानाने असे म्हणता येईल की, प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या भारताच्या एकूण निर्यातीत शेतमालाच्या निर्यातीचे प्रमाण जवळपास ५० टक्के आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) शेतीचे ग्रामीण विकासातील महत्त्व सांगा.

## ३.८ भूधारणा आकृतीबंध

**प्रस्तावना :**

भारतीय शेतीची उत्पादकता ही कमी आहे. त्याला अनेक कारणे कारणीभूत आहेत. विकासाचा विचार करत असताना कृषीक्षेत्रात उत्पादनाची वाढ होणे अपेक्षित आहे. कृषी उत्पादनात वाढ होणे हा घटक सामाजिक आर्थिक व मानसिक परिस्थितीशी संबंधित आहे. तांत्रिक बाबींचा फायदा घेण्यासाठी जमीन कसरण्याची मानसिक परिस्थिती अनुकूल आहे काय त्याला प्रत्यक्ष फायदा किती मिळणार या गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे. जमीन कसणाऱ्या शेतकऱ्याच्या मनात त्याने केलेल्या कष्टाचा फायदा त्याला मिळणार आहे. असा विश्वास निर्माण झाल्याशिवाय त्याला जमीन कसण्यास प्रेरणा मिळणार नाही.

भारतातील भूधारणा पद्धतीचे स्वरुप हे शेती विकासावर विपरित परिणाम करणारे आहे. शेतीच्या विकासासाठी या भूधारणा पद्धतीचा तपशीलवार अभ्यास होणे गरजेचे आहे. प्रत्यक्ष जमीन कुळाच्या मालकीची आहे. कुळाला करारावर जमीन कसण्यास दिली आहे याचा विचार भूधारणापद्धतीत होतो.

भारतीय भूसंपत्तीची विभागणी, वितरण विषम स्वरुपाचे आहे. ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. ग्रामीण भागात असलेली वर्गरचना ही जमिनीच्या मालकीवरती अवलंबून आहे. ग्रामीण भारतात मोठे भूधारक शेतकरी (जमीनदार) मध्यम शेतकरी, छोटे शेतकरी व भूमिहीन शेतकरी असे वर्ग दिसून येतात. या वर्गामध्ये भूसंपत्तीचे वितरण विषम स्वरुपाचे आहे. हे भूसंपत्तीचे वितरण भूधारणा पद्धतीशी निगडित आहे.

भूसंपत्तीचे हे विषम वितरण दूर करण्यासाठी किंवा आर्थिक विषमता कमी करण्यासाठी जे प्रयत्न स्वातंत्र्योत्तर कालखंडात करण्यात आले. त्या प्रयत्नांना पाहिजे त्या प्रमाणात यश आले नाही.

**भारतातील भूधारणा पद्धती :**

पुरातन काळापासून भारतात भूधारणेच्या विविध पद्धती अस्तित्वात होत्या. त्या पुढीलप्रमाणे.

**१) जमीनदारी पद्धती :**

ब्रिटिश कालखंडामध्ये सन १७९३ मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड कॉर्न वॉलीस याने अनुपस्थित जमीनदारांचा परोपजीवी वर्ग निर्माण करणारी ही पद्धती भारतात अमलात आणली. ब्रिटिश सरकारला राज्यकारभार चालविण्यासाठी आवश्यक असलेला महसूल वसूल करणे हा या पद्धतीमागील उद्देश होता. महसूल कायमस्वरुपी मिळण्याची रचना असल्यामुळे ब्रिटिश सरकारने नेमलेल्या मध्यस्थांनी याचा फायदा उठविला आणि ग्रामीण भागातील जमीन कसणाऱ्यांचे शोषण करण्यास सुरुवात केली. ब्रिटिश सरकारला आपली सत्ता टिकविण्यासाठी आवश्यक असणारा गट निर्माण करणे गरजेचे ठरल्यावर त्यांनी या मध्यस्थ गटातूनच नेमलेल्या महसूल वसुल करणाऱ्या मध्यस्थांना जमिनीचे मालक बनविले. यातून जमीनदार निर्माण झाले.

जमीनदाराकडून होणाऱ्या शोषणाबाबत ब्रिटिश सरकारला स्वारस्य नव्हते. जमीन कसणारे व सरकार यामध्ये निश्चित संख्या नसल्यामुळे मध्यस्थांची संख्या साखळी वाढत जात असे व जमीन कसरणाऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत असे.

जमीनदारी पद्धतीमध्ये दोन व्यवस्था अस्तित्वात होत्या.

**अ) स्थायी व्यवस्था :**

या पद्धतीमध्ये जमीनदाराने सरकारचा भरावयाचा शेतसारा हा निश्चित केलेला असे. जमीनदाराने निश्चित केलेला शेतसारा सरकार दरबारी भरणा केल्यावर त्याला त्या बदल्यात भरलेल्या रकमेच्या साधारणतः ९ टक्के एवढा वाटा कमिशन म्हणून मिळत असे. ही पद्धत बंगाल, बिहार, ओरिसा या राज्यांमध्ये अस्तित्वात होती.

**ब) अस्थायी व्यवस्था :**

या पद्धतीमध्ये सरकारकडून शेतसारा २० ते ४० वर्षाच्या कालावधीसाठी ठरविला जात असे. ४० वर्षाच्या कालावधी हा दीर्घकाळ असल्यामुळे या पद्धतीचे नाव जरी अस्थायी व्यवस्था असे असले तरी ती व्यवस्था स्थायी स्वरुपाची होऊन जात असे. ही पद्धत उत्तर प्रदेश, पंजाब, मध्य प्रदेश या राज्यांमध्ये अस्तित्वात होती.

जमीनदारी पद्धतीत स्वतः जमीनदार हे जमीन कसत नसत. स्वतःकडील जमीन जमीनदार खंडकऱ्यांना किंवा कुळांना कसण्यात देत असत. जमीन कसल्याबद्दल खंडकऱ्याने जमीनदाराला किंवा मालकाचा हक्क किंवा वाटा पिकांच्या रुपात द्यावा लागत असे. जमीनदाराला खंडकऱ्याने किंवा कुळाने खंड घातलाच पाहिजे अशी सक्ती असे. यातून जमीनदारावर्गाची मग्रुरी वाळून खंडकरी कुळांचे शोषण होऊ लागले.

जमीनदारी पद्धतीमध्ये जमीनदार हा मध्यस्थाची भूमिका बजावतो. या पद्धतीमध्ये तीन तीन संबंध निर्माण होतात. तर देण्याघेण्याचे दोन व्यवहार होत. कूळ मालक सरकार हे तीन हितसंबंध व दोन व्यवहार म्हणजे कूळ किंवा खंडकरी जमीनदाराला खंड देत असे व जमीनदार त्याच्याकडे असलेल्या जमिनीचा शेतसारा सरकार दरबारी भरत असे.

**२) महलवारी पद्धती :**

महलवारी पद्धतीमध्ये गावामध्ये असलेल्या सर्व सुपीक लागवडी योग्य व पडीक जमीन गावाच्या संयुक्त मालकीची असे. महल म्हणजे गाव. गावाच्या मालकीची जमीन म्हणून महलवारी

पद्धती असे नामाभिधान झाले. या पद्धतीमध्ये गावाच्या मालकी हक्कामुळे सरकार दरबारी शेतसारा करण्याची जबाबदारी संपूर्ण गावाची असे. गावाने सरकार दरबारी भरावयाचा शेतसारा हा संपूर्ण गावास ३० ते ४० वर्षांसाठी ठरवून दिलेला असे. या कालावधीत नंतर तो बदलला जात असे. सरकारने ठरवून दिलेला शेतसारा गावाने संयुक्तपणे भरणे गरजेचे असल्यामुळे त्या गावातील जागा गावातील लोकांना भाड्याने दिली जात असे व कसण्यासाठी दिलेल्या जागेच्या प्रमाणात शेतसारा वसूल केला जात असे. हा शेतसारा वसूल करणे व सरकार दरबारी भरणे यासाठी गावाने लबरदाराची नेमणूक केलेली असे. ही व्यक्ती गावातीलच असे. या कामासाठी लबरदाराला भागी किंवा कमिशन म्हणून पंचोत्रा किंवा ५ टक्के रक्कम गावाकडून दिली जात असे.

ही पद्धत मुस्लीम राजवटीमध्ये सर्वप्रथम आग्रा, औंध, पंजाब राज्यात सुरु करण्यात आली. पंजाब व इतर प्रदेश राज्यात या पद्धतीमध्ये थोड्याफार प्रमाणात फरक होता. तो म्हणजे या पद्धतीमध्ये जमीन कसण्यासाठी गावातील व्यक्तीस दिली जात असे. तो स्वतःची जमीन कसत असे आणि त्या जमिनीमध्ये कुळाला जमीन कसण्यास परवानगी असे.

### ३) रयतवारी पद्धती :

रयतवारी पद्धतीमध्ये रयत हा जमिनीचा अधिकृत मालक असतो. असे असले तरी जमिनीचा अंतिम मालक सरकार असते. सरकारकडून रयताला ही जमीन कसण्यासाठी दिली जाते. या बदल्यात त्याला विशिष्ट रक्कम सरकारला द्यावी लागते. त्याला शेतसारा असे म्हणतात. रयताची जमिनीवरील मालकी जर रयताने शेतसारा भरत नाही तर संपुष्टात येते. जोपर्यंत सरकारला शेतसारा नियमितपणे करत असेल तर जमिनीचा वापर हस्तांतरण किंवा विक्री करण्याचा रयताला अधिकार असतो.

वरवर पाहता रयतवारी पद्धतीत कुळपद्धती दिसत नाही मात्र या पद्धतीत रयत आपली जमीन कुळांना खंडाने कसण्यासाठी देतो. या कुळांना कोणतेही खास अधिकार नसतात. रयताने ज्या कराराने अटी निश्चित केल्या आहेत. त्यानुसार कुळाने शेती करायची असते. मात्र या पद्धतीत अनुपस्थित जमीनदाराचे तत्त्व निदर्शनास येते.

या पद्धतीत दोन हितसंबंध निर्माण होतात. मात्र व्यवहार एकच होतो. सरकार व रयत हे दोन हितसंबंध. रयत सरकारला शेतसारा भरतो. हा एक व्यवहार होतो. सरकारने जर शेतसारा वाढवला, तर तो शेतसारा सरकारला विकास कार्यासाठी वापरता येतो. शेतसारा वाढला नाही. तर शेतसारा सोडून उरलेला वाटा रयताच्या हाती राहतो. या पद्धतीत तात्पुरता धारा स्वरुपात शेतसारा गोळा केला जातो.

रयतवारी पद्धती ही हिंदू राजवटीपासून अस्तित्वात आली. ही पद्धती १७९२ मध्ये मद्रास प्रांतात प्रथमतः अस्तित्वात आली नंतर मुंबई, बडोदा, मध्य भारत प्रांतात प्रचलित होती.

## ३.९ सारांश

भारत हा कृषीप्रधान देश आहे. देशाची अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. शेती व्यवसाय हा व्यवसाय म्हणून केला जात नाही तर ग्रामीण लोकसंख्येच्या उदरनिर्वाहाचे ते प्रमुख

साधन आहे. भारताची अर्थव्यवस्था पहिल्यापासून कृषी आधारित आहे. ७० टक्के लोकसंख्या ही कृषी व संलग्न क्षेत्रात गुंतलेली होती. आज हे प्रमाण कमी झाले असले तरीही बरेच उच्च आहे. त्यामुळे शेती विकास आजदेखील महत्त्वाचा ठरतो. त्यासाठी नवीन उपाययोजना आवश्यक ठरतात. जमिन धारणेच्या स्वरुपामध्ये बदल घडून आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या मनात शेतीविषयी आस्था व प्रेम निर्माण होऊन ते पुन्हा या व्यवसायाकडे आकर्षित होणे आवश्यक आहे. अन्यथा शेतजमिनीची विक्री बिगरशेती उपक्रमासाठी शेतकरी करतील त्यामुळे विकासप्रकल्प उभे राहतील मात्र कृषी क्षेत्रासमोर आव्हाने उभी राहतील.

## ३.१० स्वाध्याय

१) ग्रामीण अर्थव्यवस्थेची संकल्पना स्पष्ट करा.
२) ग्रामीण अर्थव्यवस्थेचे स्वरुप व व्याप्ती सांगा.
३) भारतीय शेती व्यवसाय वैशिष्ट्यपूर्ण आहे. चर्चा करा.
४) कृषीचे विविध प्रकार सांगा.
५) भूधारणा आकृतीबंध सांगा.

## ३.११ संदर्भसूची

१) र.पु. कुरुलकर - महाराष्ट्राची अर्थव्यवस्था विद्या प्रकाशन, नागपुर
२) स.श्री. मु देसाई, निर्मला भालेराव - भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे
३) राजन कोलांबे - भारतीय अर्थव्यवस्था, भागीरथ प्रकाशन, पुणे
४) गुरुनाथ नाडगाडे - ग्रामीण समाजशास्त्र कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे

❖❖❖❖

munotes.in

# घटक -४

## ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचे घटक

- डॉ. दिलीप शं. पाटील

**पाठाची रचना :**

४.० पाठाची उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ शेतमजूर व्याख्या - समस्या - उपाय

४.३ ग्रामीण विकासात नैसर्गिक साधन - सामुग्रीचे महत्त्व

४.४ शेती संलग्न व्यवसायाचे ग्रामीण विकासातील महत्त्व

४.५ समारोप

४.६ मार्गदर्शक सूचना

४.७ स्वाध्याय

४.८ संदर्भसूची

### ४.० उदिष्ट्ये

- शेतमजुरांच्या समस्या आणि त्यासाठी आखण्यात आलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करणे.
- ग्रामीण विकासात नैसर्गिक साधनसंपत्तीचे महत्त्व अभ्यासणे.
- शेती संलग्न व्यवसायाचे ग्रामीण विकासातील महत्त्व अभ्यासणे.

### ४.१ प्रस्तावना

भारत हा कृषीप्रधान / मी म्हणेन शेतीप्रधान देश आहे. शेतीच्या एकूण क्षेत्रफळाचा विचार केल्यास भारतात एकूण लागवडी खालील क्षेत्र ३०५ दशलक्ष हेक्टर असून लागवडीखालील क्षेत्रफळ १४२ दशलक्ष हेक्टर आहे. एकूण लागवड योग्य क्षेत्रफळापैकी ६८ दशलक्ष हेक्टर जमीन ही वनजमीन आहे. शेतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे कार्य हे शेतकरी करीत असतो. ज्यावेळी शेती क्षेत्र मोठे असेल शेतकरी किंवा त्याचे कुटुंबिय हे संपूर्ण शेतीमध्ये कार्य करणे शक्य होत नाही त्यावेळी इतर श्रमिकांची मदत घेतली जाते. त्या बदल्यात त्यांना मोबदला दिला जातो. ग्रामीण भागात ६८.८% आजही लोकसंख्या आहे. अर्थात मुख्य व्यवसाय ग्रामीण भागात कृषी / शेती आहे. त्यामुळे शेतात राबणाऱ्या इतर श्रमिकांची संख्या मोठी आहे. अर्थशास्त्रीय दृष्टीने ही महत्त्वाची बाब आहे. म्हणून शेतमजुरांचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

munotes.in

## ४.२ शेतमजूर व्याख्या - समस्या - उपाय

**शेतमजुरांच्या व्याख्या** -

'निरनिराळ्या शेतकी कार्यासाठी ज्यांची श्रमशक्ती कायमची किंवा तात्पुरत्या काळापुरती मजुरीवर कामासाठी घेतली जाते अशा व्यक्तींचा वर्ग म्हणजे "शेतमजुरांचा वर्ग" होय.'

**डॉ. गंगाधर कायंदे - पाटील** -

"ज्या व्यक्ती शेतीमध्ये वर्षभर मजुरीने काम करण्यासाठी तयार असतात आणि प्राप्त होणाऱ्या मजुरीद्वारे कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, काम नसल्यामुळे वेळप्रसंगी बेरोजगार राहावे लागते अशा व्यक्तीला शेतमजुर म्हणतात."

शेतमजुरांच्या स्वतःच्या मालकीची काही जमीन असू शकते किंवा शेतमजूर भूमीहीन असू शकतात. वस्तुतः फार थोड्या शेतमजुरांजवळ स्वतःच्या मालकीची जमीन असते. पण ज्या शेतमजुरांजवळ जमीन असते असे शेतमजूर त्या जमिनीतून त्यांच्या चरितार्थाला पुरेसे उत्पन्न मिळू शकत नाही. म्हणून अन्य जमीनमालकाच्या शेतावर काम करुन आपला चरितार्थ चालवतात.

### ४.२.१ शेतमजुरांची वैशिष्ट्ये :

शेतमजुरांच्या वरील व्याख्येवरुन शेतमजुरांची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतील.

१) शेतमजूर हे शेतीवर मजूर म्हणून काम करतात.

२) शेतावर मजूर म्हणून काम करताना शेतमजुरांना निश्चित दराने मजुरी प्राप्त होते.

३) शेतमजुरांना प्राप्त होणारी मजुरी ही शेतमजुर आणि त्यांच्या कुटुंबाचा निर्वाह करण्यासाठी उपयुक्त ठरते.

४) शेतमजुरांना वर्षभर शेतावर काम उपलब्ध होईलच हे सांगता येत नाही. काही दिवस त्यांना बेरोजगार म्हणून राहावे लागते.

५) शेतमजूरांना प्राप्त होणारी मजुरी दर हा कामाचे स्वरुप आणि कालावधीच्या तुलनेत कमी असतो. शेतमजूर हे शेतीसोबत शेतीपूरक व्यवसायामध्ये कार्य करतात. शेतमजूर हे निरक्षर आणि अज्ञानी असतात.

६) शेतमजुरांची कोणतीही संघटना आढळून येत नाही. देशातील वेगवेगळ्या खेड्यांमध्ये हे शेतमजूर विखुरलेले दिसतात.

७) पुरुष व स्त्री शेतमजुरांच्या मजुरीत तफावत केलेली दिसते.

८) शेतमजुरांचे एकून उत्पन्न कमी राहत असल्याने त्यांचा सामाजिक दर्जा व जीवनाविषयक दर्जा हा नियम / कनिष्ठ दर्जाचा दिसून येतो.

९) शेतमजूरांमध्ये बहुतांशी प्रमाणात कर्जबाजारीपणा आढळून येतो.

### ४.२.२ शेतमजुरांची मागणी आणि पुरवठा :

ब्रिटिशांची राजवट भारतात स्थापित होण्यापूर्वी ग्रामीण आणि कुटीर उद्योग ग्रामीण भागातील शेतमजुरांना व इतर व्यक्तींना रोजगार उपलब्ध करुन देत होते. १८ अलुतेदार व बारा

बलुतेदार पद्धतीमध्ये ग्रामीण भागात काही प्रमाणात स्वायत्तता व स्वयंपूर्णता आढळून येत होती. शेतमजुरांची मागणी व पुरवठा विचारात घेताना शेतमजुरांना मागणी ही जमीनदार व मोठे तसेच सधन शेतकऱ्याकडून केली जात होती. कुटुंबातील सदस्यांचे श्रम शेतीतील कार्य करताना कमी पडत असल्यास बाहेरील श्रमिकांची शेतमजुरांची मदत घेतली जाते. शेतमजुर ही अकुशल स्वरुपाचे असतात. शेतमजुरांना निर्धारीत केलेली मजुरी दिली जाते. शेती हंगामात शेतमजुरांना मोठ्या प्रमाणात मागणी असते. हंगामाच्या काळात मागणी मोठ्या प्रमाणात असल्याने मजुरीचा दरही वाढलेला दिसतो. रब्बी पिकाच्या वेळेस मागणी व पुरवठा हा श्रमिकांबाबत सारखाच असल्याने मजुरीत फरक पडत नाही. पिकांचा हंगाम संपल्यावर शेतमजुरांना फारशी मागणी उरत नाही. अशा वेळेस शेतमजूर एखाद्या शेतकऱ्यांकडे सालाने म्हणजे वर्षभरासाठी काम करत असतो. त्याला 'सालदार' असेही म्हणतात. ग्रामीण भागात शेतमजुरांना रोजगाराच्या संधी नियमित नसल्याने ग्रामीण भागात शेतमजुरांना रोजगाराच्या संधी नियमित नसल्याने ग्रामीण भागातील शेतमजूर हे शहरी भागात स्थलातंरीत होतात.

बऱ्याचवेळी शेतकरी म्हणतात की, ग्रामीण भागात शेतमजूर नाहीत. पण कायम रोजगार व योग्य मजुरी नसल्यानेच शेतमजूर शहराकडे स्थलांतर करतात.

### ४.२.३ शेतमजुरांचे प्रकार :

शेतमजुरांचे दोन गटात वर्गीकरण केले जाते.

१) प्रासंगिक शेतमजुर

२) कायम स्वरुपाचे शेतमजूर

प्रासंगिक शेतमजुर हे रोजगाराची कायम शाश्वती नसल्याने त्यांना सतत कामासाठी फिरावे लागते. एखाद्या शेतकऱ्याने त्यांना दिलेले काम हे तात्पुरत्या स्वरुपाचे असते.

कायम स्वरुपाचे शेतमजूर गटातील शेतमजूर हे कोणत्यातरी जमीनदाराशी संलग्न असतात. ह्या गटातील शेतमजूर जवळजवळ गुलामांच्या स्थितीत आहेत. शेतमजूर आपल्या मालकासाठी काम करतात आणि त्यांना बहुधा पैशाच्या स्वरुपात मोबदला मिळत नसून तो खाद्य / जेवण व वस्तूच्या रुपाने दिला जातो. जमीनमालक ज्यावेळी आपल्या जमीनीची विक्री करतो त्यावेळी आपोआप शेतमजुरांचेही हस्तांतर होते. कधीकधी नाममात्र मोबदला हा शेतमजुरांना मिळतो. अशा शेतमजुरांची स्थिती दयनियच असते. बहुतेक हरीजन, गिरीजन व इतर मागास जमातीतील शेतमजूर या गटात मोडतात.

भारतातील शेतमजुराचे वर्गीकरण साधारणतः पुढील चार गटात केले जाते.

१) जे भूमीहीन शेतमजूर काही जमीनदारांशी कायमचे बांधले गेलेले असतात असे भूमीहीन शेतमजूर.

२) जे भूमीहीन शेतमजूर व्यक्तीगत रितीने स्वतंत्र असतात आणि जेव्हा एखादा जमीनमालक कामावर घेतो तेव्हा ते त्यांच्या जमिनीवर काम करतात अशा प्रकारचे भूमीहीन शेतमजूर.

३) ज्या शेतमजुरांजवळ स्वतःच्या मालकीची थोडी जमीन असते पण त्या जमीनीपासून मिळणारे उत्पन्न उपजीविकेसाठी पुरेसे नसते, असे शेतमजूर अन्य शेतमालाच्या जमिनीवर काम करतात असे शेतमजूर.

४) ज्यांच्याजवळ किफायतशीर जमीन असते. पण ज्यांच्या कुटुंबातील एक किंवा अनेक व्यक्ती जमीनमालकाच्या शेतांवर काम करीत असतात असे शेतमजूर.

वर उल्लेखलेल्या चार गटांपैकी दुसऱ्या व तिसऱ्या गटातील शेतमजुरांची संख्या बरीच मोठी आहे. पहिल्या तीन गटांपैकी शेतमजुरांच्या संख्येमानाने चौथ्या गटातील शेतमजुरांची संख्या बरीच कमी आहे. पहिल्या तीन गटातील शेतमजुरांची स्थिती अतिशय शोचनिय व गंभीर स्वरुपाची आहे.

औद्योगिक क्षेत्रातील मजुरांपेक्षा शेतमजुरांची स्थिती त्यांना मिळणाऱ्या मिळकतीच्या तफावतीमुळे फारच वाईट आहे.

**शेतमजुरांच्या हलाखीची कारणे :**

शेतमजुरांच्या हलाखीची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) अज्ञान व निरक्षरता :**

शेतावर काम करणारे शेतमजूर हे बहुतांशी अज्ञानी व निरक्षर असतात. शिक्षणाच्या संधी उपलब्ध असतानाही त्यांना निट शिक्षणाचा लाभ घेता येत नाही. अज्ञान व निरक्षरता यामुळे कायदेशिर हक्काची माहिती नसल्याचे दिसते. पर्यायाने गावातील जमीनदार, सावकार, श्रीमंत-सधन शेतकरी त्यांच्या अज्ञान व निरक्षरपणाचा लाभ उठवितात.

**२) अर्धबेरोजगारी व बेरोजगारी :**

शेतीमध्ये काम करणाऱ्या मजुरांना पूर्ण वर्षभर रोजगार उपलब्ध होत नाही. शेती हंगामापुरताच रोजगार मिळत असल्याने इतर वेळी त्यांना बेरोजगार रहावे लागते. किंवा इतरत्र जावू काम शोधावे लागते. इतर व्यवसायामध्येही सहजासहजी मजुरी प्राप्त होत नाही. त्यामुळे जणु सक्तीनेच त्यांना बेरोजगार रहावे लागते.

**३) शेतमजुरीचा दर कमी :**

शेतकऱ्याच्या शेतावर काम करणारा शेतमजूर हा सकाळी साधारणतः ८ ते संध्याकाळी ६-७ वाजेपर्यंत काम करीत असतो. कामाच्या कालावधीनुसार त्याला मिळणारी मजुरी ही अत्यंत अल्प म्हणजे ५०/- रुपये इतकी असते. निमशहरी भागात हा दर २००/- रु. इतका आहे. मजुरीचा दर अल्प असल्याने शेतकऱ्याचा सामाजिक दर्जा निम्म असल्याने / कनिष्ठ असल्याचे आढळून येते.

**४) कुटुंबातील सदस्य संख्या :**

शेतमजुरांच्या कुटुंबातील सदस्य संख्येचा विचार करता दोनपेक्षा अधिक मुलांना जन्म दिलेला दिसतो. मनोरजंनाची साधने उपलब्ध नसल्याने पत्नीला मनोरंजनाचे साधन मानले जाते. पर्यायाने आर्थिक उत्पन्नाचा विचार न करता मुलांचा जन्माने कुटुंब सदस्य संख्या वाढलेली दिसते. तसेच ग्रामीण भागात लहान वयात लग्न होतात. विवाह व प्रजोत्पादनाचा दिर्घ कालावधी ह्यामध्ये दिर्घकाळ असतो. जन्माला येणाऱ्या मुलांच्या उदरनिर्वाहासाठी आणि उत्पन्नाचे साधन शोधण्यासाठी शेतमजुरास बराच त्रास होतो. कुटुंब सदस्यांच्या मानाने तुटपुंजे उत्पन्नामुळे शेतमजुरांची सामाजिक कनिष्ठ व आर्थिक स्थिती दयनीय असल्याचे आढळुन येते.

### ५) जमीन मालकाचा विरोध :

शेतमजूर शिक्षणाअभावी तसेच अज्ञानी व निरक्षरपणामुळे त्यांच्या दयनिय स्थितीचा शेतकरी हा फायदा उठवित असतो. शेतमजुरांच्या हिताच्या दृष्टीने विचार केला जात नाही. मजुरी वाढवली तर शेतीतून मिळणाऱ्या एकूण उत्पन्नावर परिणाम होवून एकूण उत्पन्न कमी होईल ही भिती जमीन मालकास असते. यासाठी मजुरी वाढवली जात नाही.

### ६) सरकारची उदासिन प्रवृत्ती :

स्वातंत्र्यपूर्व काळापासून शेतमजुराची स्थिती दयनिय आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शेतमजुरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी अनेक कायदे करण्यात आले. परंतु कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यास शासन मागे पडले. सरकार मध्ये सक्रिय असणाऱ्याच लोकांकडे जमीनीचे मोठे क्षेत्रफळ आहे. त्यामुळे सरकारमध्ये सामिल असणाऱ्याच ह्या लोकप्रतिनिधींची उदासिनता मोठी असलेली दिसते. त्यामुळेच हे कारण शेतमजुरांची आर्थिक व सामाजिक स्थिती निकृष्ट असण्यास कारणीभूत ठरली आहे.

### ७) शेतमजुरांच्या संघटनेचा अभाव :

शेतमजूर अजूनही मोठ्या प्रमाणात संघटित नाहीत. आधीच असलेले अज्ञान, निरक्षरपणामुळे सरकारने अनेक कायदे केले तरी ते त्यांच्यापर्यंत पोहचत नाहीत. पोहचले तरी प्रथम प्रश्न कुटुंबातील सदस्यांच्या उदरनिर्वाहाचा असतो. त्यातच भर म्हणून बारमाही रोजगार शेतीत उपलब्ध नसतो. आणि म्हणूनच शेतमजूर हा एकाकी जीवन जगणारा संकुचित प्रवृत्तीचा समजला जातो. एकीच्या बळाचे किंवा सहकाराचे तत्व त्यांना समजले तरी वळत नसल्याने समाजाकडून त्यांची उपेक्षा केली जाते.

### ८) शेतमजुरांचा कर्जबाजारीपणा :

वर्षभर शेतामध्ये मजुरी न मिळाल्यामुळे दैनंदिन गरजा भागविण्यासाठी तसेच कुटुंबातील इतर समस्या (आजारपण, मरण, श्राद्ध, लग्न वगैरे) सोडविण्यासाठी पैशाची गरज भासत असते. शेतकऱ्याकडून कर्ज काढण्याशिवाय शेतमजुराला पर्याय नसतो. कर्ज परतफेड न करता आल्यामुळे शेतमजुरांचा कर्जबाजारीपणा वाढत गेलेला दिसून येतो.

### ९) शेतमजुरांची भटकी प्रवृत्ती :

भारतात वेगवेगळ्या जाती-जमातीचे लोक वास्तव्य करीत असतात. ह्यामध्ये भटक्या व विमुक्ती जाती-जमाती असा प्रवर्ग आहे. ज्याठिकाणी रोजगार उपलब्ध होईल त्याठिकाणी ही मंडळी जावून वास्तव करीत असते. त्यामुळे सतत स्थलांतर झालेले दिसते. ह्याचमुळे आर्थिक ओढाताण होते. उदा. लोहार समाज, वंजारी समाज व बंजारा समाज इ.

### १०) ग्रामीण उद्योगांचा ऱ्हास :

ब्रिटिश काळात मोठ्या प्रमाणात ग्रामीण उद्योगाचा ऱ्हास झाला. ग्रामीण भागातील उद्योग व कुटीरोद्यांगाचा ह्या काळात मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला. बेरोजगारीचे प्रमाण वाढले. त्यामुळे शेतमजुरांची स्थिती दयनिय झाली.

### ११) सामाजिक प्रतिष्ठेचा अभाव :

शेतमजुरांचे अज्ञान, दारिद्र्य आणि निरक्षरता व अल्प मजुरी दर ह्यामुळे शेतमजुरांची सामाजिक प्रतिष्ठा कमी झालेली आढळून येते. शेतमजुर घेतलेल्या पैशाची परतफेड करण्याची फारशी शाश्वती नसल्यामुळे आर्थिक मदतही त्यांना फारशी मिळत नाही. समाजात त्यांना मिळणारी वागणुकही अत्यंत वाईट असते.

### १२) मजुरीचा दर भिन्न :

शेतमजुराच्या कुटुंबातील सर्वच सदस्य शेतावर काम करतात. शक्यतो पुरुष अधिक कष्टाची कामे करतात. महिला व मुले हे कमी श्रमाची कामे करतात. ह्यामुळे प्रत्येकाला मिळणारी मजुरीही भिन्न स्वरुपाची असते. त्यामुळे शेतमजुरांची स्थिती खालावलेली दिसून येते.

### ४.२.५ शेतमुजरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना :

शेतावर काम करणाऱ्या शेतमजुरांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारणे अत्यंत महत्त्वाचे आहे. वेळोवेळी सरकारने ह्यासाठी उपाय केले आहेत. शेतमजुरांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाय सुचविता येतील.

### १) किमान मजुरी कायदा :

केंद्र सरकारने १९४८ मध्ये किमान मजुरी कायदा मंजूर केला. ह्या कायद्यांतर्गत राज्य सरकारला तीन वर्षाच्या आत किमान मजुरी कायदा मंजूर करण्याबाबत आदेश दिले. त्यानंतरही प्रयत्न करुन सुद्धा ग्रामीण भागात प्रत्यक्ष कायद्यातील तरतुदींचे पालन होत नसल्याचे आढळून येते. हा कायदा प्रभावीपणे राबविला पाहिजे. तरच शेतमजुरांची हालाकीची स्थिती सुधारण्यास मदत होईल.

### २) शेतमजुरांचे कामाचे तास निश्चित करणे :

औद्योगिक क्षेत्रात कामाचे तास कायद्याने मर्याधित केले आहेत. ठरलेल्या तासाव्यतिरिक्त काम अधिक झाल्यास त्याचा मोबदला दिला जातो. शेतमजुरांच्या बाबत मात्र असे होत नाही. आणि म्हणूनच शेतमजुरांचे कामाबाबत तास निश्चित करुन दिले पाहिजेत.

### ३) कुटिरोद्योगांचा विकास :

ग्रामीण भागात शेतमजुरांना पुर्ण रोजगार उपलब्ध होत नसल्याने त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी व त्यांना पूर्ण वेळ रोजगार मिळवून देण्यासाठी ग्रामीण भागात लघु व कुटीर उद्योग स्थापन करणे आवश्यक आहे. सरकारने ग्रामीण भागात लघु आणि कुटीर उद्योगास चालना दिली पाहिजे.

### ४) आर्थिक मदत :

ग्रामीण भागात शेतमजुरांना रस्ते बांधणे, तलाव खोदणे, तलावाची दुरुस्ती करणे इ. कामे उपलब्ध करुन देवून त्यांना आर्थिक मदत होईल या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. वेगळ्या शब्दात शेतमजुरांना बेरोजगार कालावधीमध्ये सरकारी कामामध्ये समाविष्ट करुन घेतल्यास त्यांचा जीवननिर्वाह सुव्यवस्थित होईल म्हणून ही शिफारस महत्त्वपूर्ण आहे.

munotes.in

### ५) रोजगार हमी योजना :

काम करण्याची इच्छा असलेल्या परंतु काम उपलब्ध नसलेल्या शेतमजुरांना किमान मजुरी दराने काम देण्याची हमी सरकारने रोजगार हमी योजनेद्वारे दिली आहे. देशात अनेक राज्यात ही रोजगार हमी योजना सुरु आहे. त्यामुळे शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीत बदल होण्यास मदत झाली आहे. परंतु हे प्रमाण अधिक केल्यास मोठ्या प्रमाणात शेतमजुरांना सामावून घेवून शेतमजुरांची स्थिती सुधारण्यास मदत होईल.

### ६) शेतमजुरांचा जीवनबीमा :

शेतमजुरांवर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील सदस्य संसख्या मोठी असते. एखाद्या कटू प्रंसगी शेतमजुरांची वाताहात होऊ नये म्हणून शेतमजुरांच्या जीवनाचा बीमा काढण्यात यावा, जेणकरुन कटू प्रसंगी शेतमजुराच्या कुटुंबाला ह्या पैशातून आधार मिळू शकेल.

### ७) प्रक्रिया उद्योगांचा विकास :

शेतमजुरांची स्थिती सुधारण्यासाठी ग्रामीण भागात तयार होणाऱ्या बहुतांशी शेतमालावर प्रक्रिया करण्यासाठीचे उद्योगांना प्रोत्साहन दिल्यास सतत शेतमाल शेतकरी आपल्या शेतातून घेवू शकतो. त्यामुळे शेतमजुरांना वर्षभर रोजगाराची संधी उपलब्ध होण्यास मदत होईल आणि शेतमजुरांची आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा झालेली दिसेल.

### ८) तांत्रिक शिक्षण :

मोठ्या प्रमाणात शेतमजुर हा अज्ञानी व निरक्षर आहे हे जरी खरे असले तरी त्याला जमेल अशा स्वरुपाचे शेतीत लागणारे किंवा प्रक्रिया केंद्रास लागणारे तंत्र शिक्षण वा प्रशिक्षण त्याला मिळवून दिल्यास अंग मेहनतीपेक्षा असलेल्या मजुरीच्या मानाने त्याला अधिक मजुरी नक्कीच मिळेल आणि त्याची आर्थिक व पर्यायाने सामाजिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

### ९) शेतमजूर संघटना :

शेतमजुरांचे हितसंबंध हे जमीन मालकाच्या विरोधातच आहे अशी भावना जमीन मालकांची आहे. त्यामुळे मजुरीचे दर वाढवून दिले जात नाहीत. तसेच शेतमजुरांच्या संघटना नाहीत. ते संघटित होण्याचा प्रयत्नही करीत नाही. कारण प्रत्येकाला आपल्या कुटुंबाची चिंता असते. असंघटितपणामुळे त्यांना न्याय हक्क प्राप्त होत नाहीत. शेतकऱ्यांना त्यांच्या न्याय हक्कासाठी शेतमजुर संघटना स्थापन होणे आवश्यक आहे.

### १०) शेतीमध्ये सुधारणा :

शेतमजुरांना रोजगार शेतीतून मिळतो. ग्रामीण भागात पुरेशा सोयी अभावी हंगामी स्वरुपाची शेती केली जाते. शेतीसाठी विशेषतः पाण्याची नितांत गरज आहे. पाणी आणि इतर संसाधने शेतीसाठी उपलब्ध करुन दिल्यास खरीप, रब्बी व उन्हाळी अशा सर्व हंगामात शेती करता येऊ शकेल. सर्व हंगामात म्हणजे वर्षभर शेतीत काम मिळाल्याने शेतकऱ्यांबरोबरच शेतमजुरांचीही स्थिती सुधारण्यास मदत होईल.

### ११) भूदान चळवळ :

आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीच्या माध्यमातून ४२.७ लक्ष एकर जमीन मिळाली. ही चळवळ गैरसरकारी होती. अशा मिळालेल्या जमीनी ह्या शेतमजुरांना देण्यात आल्या. ह्यातून शेतमजुरांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली.

**१२) बचतीची सवय :**

मिळणाऱ्या तुटपुंज्या मजुरीतून काही हिस्सा शेतमजुरांनी बाजुला ठेवून बचत केल्यास अडचणीच्या वेळी त्याला त्याचा लाभ धेता येवू शकेल.

**१३) बचत गटांची स्थापना :**

आहे त्या स्थितीतून बाहेर पडावे आणि चांगले जीवन जगावे ही प्रत्येकाची इच्छा असते. त्यामुळे मिळणाऱ्या पैशाचे निट नियोजन करुन बचत गटामार्फत पुरुष व स्त्रिया एकत्र येऊन विशिष्ट रक्कम बचत करु शकतात. अशी जमलेली रक्कम अडचणींच्या वेळी उपयोगाची ठरु शकते. तसेच शेतमजुर संघटित होवून अनेक स्वत:मध्ये सुधारणा करु शकतात. कुटुंबातील स्त्रीया ह्या गटाच्या माध्यमातून एखादा छोटा उद्योग सुरु करुन पैसा मिळवू शकतात. ह्यामुळे महिला सबलीकरण, आरोग्य मुलांचे शिक्षण, सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थैर्य मोठ्या प्रमाणात प्राप्त होण्यास मदत होते. हे अनेक यशस्वी बचत गटांच्या कार्याने दाखवून दिले आहे. म्हणून बचत गट स्थापन करुन ते यशस्वीपणे सुरु ठेवणे हा स्तुत्य उपक्रम हलाखीची स्थिती सुधारण्यास नक्कीच आहे. दारिद्र्य निमुर्लनाचे व रोजगार निर्मितीचे बचत गट हे नक्कीच माध्यम आहे.

**१४) शेतमजुरांच्या सहकारी संस्था :**

बचत गटाच्या साहाय्याने स्थिती सुधारण्यास नक्कीच मदत होते. पण केवळ तेथेच न थांबता सहकारी तत्त्वांवर शेतमजुरांनी परस्परांना मदत करण्यासाठी बिकट आर्थिक स्थितीवर मात करण्यासाठी, मुलांचे उच्च शिक्षणातून भवितव्य उज्वल करण्यासाठी, मोठ्या आजारांना सामोरे जाण्यासाठी, नवीन होतकरु तरुणांना उद्योगाशील बनवण्यास पैशाची / गुंतवणूकीची सोय उपलब्ध करुन देण्यासाठी सहकारी तत्वांवर एकत्र येवून सहकारी संस्थांची स्थापना करणे आवश्यक आहे. सहकारी संस्था जणु अभिजन वर्ग तयार करण्याची केंद्रे असतात. सहकारी संस्थांचे कामकाज हे लोकशाही पद्धतीने होत असते. दर पाच वर्षांनी निवडणूका होत असतात. नेतृत्वगुण विकसीत होण्यास ह्यामुळे मदत होते. तसेच दूरदृष्टीचा विकास होवून अनेक वर्षासाठीचे नियोजन करण्याची क्षमता प्राप्त होते. अनेक सुप्त गुणांचा विकास होतो. संस्थेच्या माध्यमातून चांगले नेतृत्व तयार झाले तर राजकारणात प्रवेशही होतो. अशावेळी शेतमजुरांची स्थिती सुधारण्यासाठी अनेक प्रकारची प्रभावी कार्य नक्कीच करता येवू शकतात. म्हणून शेतमजुरांच्या सहकारी संस्थांची स्थापना व विकास महत्त्वाचा आहे.

**४.२.६ सारांश :**

महात्मा गांधीनी सांगितले आहे, 'खेडे देशाचा आत्मा-आहे. आत्म्याचा विकास करा म्हणजे देशाचा विकास होईल. खेड्याकडे चला'. मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात असलेला शेतमजुर त्यांच्या हलाखीच्या स्थितीत आहे. माणूस म्हणून आपण, शासन व शेतकरी मालक ह्यांनी प्रयत्न केल्यास नक्कीच शेतमजुरांची स्थिती सुधारु शकते. त्यांचा आर्थिक, सामाजिक विकास होण्यास मदत होईल. आणि खऱ्या अर्थाने देशाचा विकासास हातभार लागेल ह्यात शंकाच नाही.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

१) शेतमजूर म्हणजे काय ? त्यांच्या स्थितीवर भाष्य करा.

## ४.३ ग्रामीण विकासात नैसर्गिक साधन - सामुग्रीचे महत्त्व

मानवाने आपला विकास साध्य करीत असताना नेहमीच नैसर्गिक साधन-संपत्तीचा वापर केला आहे. कोणत्याही देशाचा विकास हा त्यांच्या देशात उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक साधन-संपत्तीवरच अवलंबून असतो. नैसर्गिक साधन संपत्तीला नैसर्गिक साधनधन किंवा नैसर्गिक संसाधने असेही संबोधण्यात येते. अशा ह्या नैसर्गिक संसाधनाद्वारे संशोधन, तंत्रज्ञान व श्रम ह्यांचा वापर करुन मानवाने आपल्या राहणीमानात बदल घडवून आणला आहे. नैसर्गिक साधनसामुग्री मध्ये शेतजमीन, नद्या, पर्वत, जंगले, खाणी, समुद्र, सरोवर, ऊन, निवारा, पाऊस, सुर्यप्रकाश इ. घटकांचा समावेश होतो. ही सर्व संपत्ती निसर्गदत्त आहे. ह्यामध्ये काही संपत्ती साठा स्वरुपाची असते. आणि तिचा अधिकाधिक वापर केल्यास ती संपते. उदा. खाणी. काही संपत्तीत मानव सुधारणा करु शकतो. उदा. जंगले आणि पाणी, शेतजमीन मात्र मर्यादित स्वरुपाची आहे. ही सर्व साधनसंपत्ती आर्थिक विकास व मानवी जीवनास महत्त्वपूर्ण झाली आहे.

### ४.३.१ नैसर्गिक साधन संपत्तीची संकल्पना :

नैसर्गिक साधन संपत्तीच्या विविध विचारवंतांनी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे.

१) **जिन्सबर्ग** - "मानवी क्रियांच्या क्षेत्रात निसर्गाने मुक्तपणे प्रदान केलेले भौतिक आविष्कार म्हणजे साधनसंपदा होय."


२) **पी. ई. मॅकनाह** - "निसर्गदत्त व मानवास उपयुक्त असे घटक म्हणजे नैसर्गिक साधनसंपदा होय."

३) **एस्.ए. मालक** - "नैसर्गिक साधन संपदाचा सर्वसाधारण विचारांची व्याख्या करणे अतिशय सोपे आहे. स्वतः मनुष्य व तो उपयोगात आणणारे जगातील सर्व घटक म्हणजे नैसर्गिक साधनसंपदा होय."

नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येसाठी, औद्योगिकीकरणासाठी, आर्थिकदृष्ट्या बलवान होण्यासाठी राष्ट्रा-राष्ट्रामध्ये होणाऱ्या या स्पर्धासाठी मोठ्या प्रमाणात होत आहे.

नैसर्गिक साधनसंपत्तीच्या घटकांची शक्यता व दर्जा टिकवणे तसेच इतर काही घटकांच्या उपलब्धतेचे प्रमाण स्थिर ठेवणे हे जगासमोरील मोठे आव्हान निर्माण झालेले आहेत.

**नैसर्गिक साधनसामुग्रीची आपणांस पुढीलप्रमाणे विभागणी करता येईल.**




नैसर्गिक साधनसंपत्तीचे दोन विभागात विभागणी होते.

**१) पुनर्नविकरणीय साधनसंपत्ती :**

यामध्ये होणारी साधनसंपत्ती म्हणजे वनस्पती, प्राणी, हवा व पाणी वगैरे

**२) अपुनर्नविकरणीय साधनसंपत्ती :**

त्यामध्ये अजून दोन उपविभाग पडतात.

**अ) वापर करता येण्याजोगी साधनसंपत्ती :**

ह्यामध्ये खनिज धातूंचा समावेश होतो. ते नैसर्गिक स्वरुपात सापडतात. त्याचा वापर केला तर त्यांचे अस्तित्व नष्ट होत नाही. तर त्यांच्या आकार व रुपात बदल करुन वापर करता येतो.

**ब) पुर्नवापर करता न येणारी साधनसंपत्ती :**

या साधनसंपत्तीमध्ये खनिज तेलांचा समावेश होतो. खनिज तेलांची निर्मिती होण्यासाठी कित्येक वर्षे लागत असतात. ती पुन्हा पुन्हा तयार होत नसतात. त्यामुळे त्यांचा वापर मर्यादित स्वरुपात करणे अत्यावश्यक असते.

मानवाने अश्व युगापासून नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर उद्योगधंदे व तंत्रज्ञान वाढीसाठी करण्यास सुरुवात केली. यासाठी त्याने निसर्गामध्ये उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर केला. या विकास प्रक्रियेलाच दुसऱ्या शब्दात मानवाच्या जीवनमानाचा दर्जा उंचावते असे म्हणता येईल. मानवाच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्याच्या प्रक्रियेत वनस्पतींचे महत्त्वाचे योगदान आहे.

**४.३.२ ग्रामीण विकासात नैसर्गिक साधनसंपत्तीचे महत्त्व :**

ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील दुर्बल घटक म्हणजे छोटे शेतकरी, भूमीहीन शेतमजूर, ग्रामीण कारागीर यांच्या विकासावर भर देवून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे म्हणजे ग्रामीण विकास अशी व्याख्या रॉबर्ट मॅकनामरा यांनी केली आहे.

munotes.in

डॉ. स्वामीनाथन यांच्या मते, "ग्रामीण भागातील गरीब व अकुशल कामगारांचे कुशल कामगारांत रुपांतर करणे म्हणजे ग्रामीण विकास होय."

ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील दुर्बल घटकांचा नैसर्गिक साधनसामुग्रीच्या सहाय्याने आर्थिक, सामाजिक, राजकिय, शैक्षणिक, आरोग्यात्मक व सांस्कृतिक बाबतीत गुणात्मक वाढ घडवून आणणे. ह्यासाठी योग्य नियोजन नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वापराबाबत करणे महत्त्वाचे आहे. तरच विकासाचे इच्छित ध्येय गाठण्यास मदत होईल.

विकासासाठी साधनसामुग्रीचा वापर करीत असताना त्या संपत्तीचा तपशीलवार वापर करणे महत्त्वाचे आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचे घटक आणि त्यांचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) भौगोलिक विभाग :**

भौगोलिक दृष्टीने विचार करता भारताचे चार विभाग पडतात.

**अ) उत्तर भारताचा डोंगराळ प्रदेश :**

यामध्ये हिमालयीन पर्वतीय प्रदेशाचा समावेश होतो. उत्तरेकडील पामीरच्या पठारापासून पूर्वेकडच्या आसामच्या सरहद्दीपर्यंत हा भाग समाविष्ट आहे. ह्यामध्ये काश्मिर, कुलू यासारखी सृष्टी सौंदर्य पाहावयास मिळते. मांऊट एव्हरेस्ट, कांचनगंगा, मांऊट गॉडविन ऑस्टिन, धवलगिरी सारखी उंतुग शिखरे, गंगा, सिंधू, ब्रह्मपुत्रा यासारख्या महानद्यांच्या उगमातून हा प्रदेश सुपीक झाला आहे.

**ब) गंगा-सिंधू सखल प्रदेश :**

गंगा, ब्रह्मपूत्रा व सिंधू नद्यांचा हा भाग हिमालयाच्या पायथ्यापासून थेट दख्खनच्या पठारापर्यंत पसरलेला आहे. ह्या भागातून इतरही अनेक नद्या वाहत असून हा भाग सुपिक आहे. ह्या भागात नैसर्गिक संपत्तीची देणगीही खूप आहे. भारतातील ४०% लोकसंख्या याच भागात राहात असून भारतीय अर्थव्यवस्थेत या भागाला विशेष महत्त्व आहे.

**क) दक्षिणेचे पठार :**

दक्षिण भारतातील त्रिकोणी आकाराचे पठार असून विंध्य आणि सातपुडा पर्वतामुळे गंगा सिंधूच्या सखल भागापासून अलग झालेला हा भूभाग आहे. कृष्णा, कावेरी, नर्मदा, तापी, गोदावरी, ह्या काठचा हा भाग सुपीक आहे. वनसंपत्ती व खनिजसंपत्ती हे ह्या पठाराचे खास वैशिष्ट्य असून काही भागात घनदाट जंगले पसरली आहेत.

**ड) समुद्रतटीय प्रदेश :**

समुद्र लगतचा प्रदेश आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. गोवा, मुंबई, कोचीन, कालीकत मद्रास, विशाखापट्टम, ह्यासारखी बंदरे विदेशी व्यापारात महत्त्वपूर्ण ठरली आहेत.

munotes.in

## २) पाऊस - पाणी :

भारतामध्ये मान्सून वाऱ्यापासून पाऊस पडतो. भारताची बहुतांशी शेती ह्या पावसावर अवलंबून आहे. ४५% राष्ट्रीय उत्पन्न कृषी मधून येते. मात्र मान्सूनच्या लहरीपणाचा परिणाम नेहमीच ह्या उत्पन्नावर झालेला दिसतो. म्हणून मान्सूनला भारतात भाग्यविधाता म्हणतात. वर्षाकाठी ३५ ते ४० इंच सरासरी पाऊस भारतात पडतो पण विभिन्न भागात ह्याचे प्रमाण अलग-अलग आहे.

पावसाळ्यात पडणाऱ्या पाण्याचा साठा करावा लागतो. पाणी हे विकास कार्यात व मानवी दैनंदिन जीवनात अनन्य साधारण भूमिका बजावत असते. आणि म्हणून पाणी अडवणे, जिरवणे, पाण्याचे समान वाटप करणे ह्यासाठी योग्य तऱ्हेने जल व्यवस्थापन महत्त्वाचे ठरते.

निसर्गचक्रानुसार पडणाऱ्या पावसाचे तसेच उन्हाळ्यात हिमालयीन बर्फ साठ्यातून मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध होते. देशात औद्योगिकीकरण, झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, नगदी पिकांचे वाढते प्रमाण, शहरीकरण, शेती पुरक व्यवसाय तसेच इतर कारणांसाठीही पाण्याची निंतात गरज आहे. जलव्यवस्थापनासाठी कोट्यावधी रुपयांच्या योजना तयार करण्यात आल्या असल्या तरी पाणीटंचाई ही फार मोठी समस्या आहे. ह्यावर मात करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन भौगोलिक रचनेनुसार पावसात पडणारे पाणी अडवून तसेच नदीजोड प्रकल्पासारख्या प्रकल्पांना सहाय्य केल्यास निश्चित पाण्याची समस्या सोडवून ग्रामीण भागात शेती व शेतीपुरक व्यवसायाचा विकास होवून मोठ्या प्रमाणात अपेक्षित विकास साध्य होण्यास मदत होईल.

## ३) जमीन :

कृषी प्रधान देशात शेतजमीन ही निसर्गाची फार मोठी व महत्त्वाची देणगी आहे. देशाचे भवितव्य तसेच बहुतांश आर्थिक विकास शेतीवरच निर्भर असतो. शेतजमीनीचे स्वरुप, प्रकार, उत्पादकता भौगोलिक स्थान ह्या गोष्टी महत्त्वपूर्ण आहेत. गाळाची जमीन, काळी जमीन, तांबडी जमीन, लॅटराईट किंवा मुरुमाडी जमीन असे साधारणतः जमीनीचे प्रकार सांगता येतील. क्षेत्रफळाचा विचार करता जगामध्ये भारताचा सातवा क्रमांक लागतो. भारतीय भूमीचे क्षेत्रफळ ३२.८८ कोटी हेक्टर आहे. तथापि ३०.४६ कोटी हेक्टर जमीनीचे प्रत्यक्ष मोजमाप करण्यात आले आहे. उपलब्ध जमिनीच्या ४५.५% जमिनीचा वापर शेतमालाच्या लागवडीसाठी होतो. पावसाळ्यात शेती करण्याचे प्रमाण भारतात जास्त आढळते. दुहेरी पिके पाण्या अभावी घेता येत नसल्यामुळे शेतमालाची उत्पादकता परिणामी उत्पन्न कमी आहे.

भूमी हा दुर्मिळ घटक असल्याने जमिनीचा पर्याप्त वापर होण्यासाठी योग्य नियोजन व व्यवस्थापनाची गरज आहे. शेतीसाठी भूमी अत्यंत महत्त्वपूर्ण घटक आहे. शेतीबरोबरच प्रक्रिया उद्योग, औद्योगिकीकरण, इतर व्यवसायांसाठी भूमीचे वा जमिनीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

## ४) खनिज संपत्ती :

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये खनिज संपत्तीला अत्यंत महत्त्व असते. देशाचा औद्योगिक विकास हा त्या देशाच्या खनिज संपत्तीवर अवलंबून असतो.

भारतीय नियोजन मंडळाने खनिजांचे वर्गीकरण तीन भागात केले आहे.

munotes.in

**१) विपुल प्रमाणात उपलब्ध खनिजे :**

कोळसा, लोखंड, अभ्रक, मॅगनीज, मॅगनेसाइट, थोरियम, बॉक्साइट अशा खनिजांची निर्यात होत असते.

**२) पुरेशी किंवा पर्याप्त खनिजे :**

चिनीमाती, मीठ, क्रोमाईट, जिप्स्म्, बेरियम, डोलोमाईट ही खनिजे पुरेशी उपलब्ध आहेत. मात्र ह्यांची निर्यात शक्य नाही.

**३) अपुरी किंवा अपर्याप्त खनिजे :**

तांबे, गंधक, अल्यमिनियम, शिसे, ग्रेफाईट, निकल, सोने, चांदी, फॉस्फेटस व पेट्रोलियम ही खनिजे देशाच्या गरजेच्या मानाने कमी उपलब्ध आहेत.

**खनिज द्रव्ये :**

खनिज द्रव्यांचे त्यांच्या उपयुक्ततेवरुन दोन प्रकार पडतात. शक्ती खनिज द्रव्ये व औद्योगिक खनिज द्रव्ये. शक्ती खनिज द्रव्ये कारखाने चालविण्यासाठी तर औद्योगिक खनिजे ही उद्योगधंद्यात कच्चा माल म्हणून वापरली जातात.

**१) शक्ती खनिज द्रव्ये :**

कोळसा, लिग्नाईट, पेट्रोलियम, नैसर्गिक वायू यांचा शक्ती खनिजद्रव्यात समावेश होतो.

**२) औद्योगिक खनिजे :**

लोखंड, मॅगनीज, अभ्रक, बॉक्साईट, तांबे, क्रोमाईट, जिप्स्म ह्यांचा औद्योगिक खनिज द्रव्यात समावेश होतो.

**५) ऊर्जा संपत्ती :**

विकासाच्या प्रक्रियेमध्ये ऊर्जेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेती, वाहतूक, औद्योगिकीकरण, अन्न शिजवणे, घरगुती वापरासाठी, औद्योगिक वापरासाठी ऊर्जेची गरज असते. आपल्या देशात ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी वापरली जाणारी साधने ही पांरपरिक ऊर्जा साधने आहेत. त्यामध्ये लाकूड, कोळसा, शेण, रॉकेल, डिझेल, पेट्रोल यांचा समावेश होतो. ह्या साधनांचा वापर मोठ्या प्रमाणात ऊर्जा निर्मितीसाठीक होत असल्यामुळे पर्यावरणाचे प्रश्न निर्माण झाले आहेत.

ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात जनावरांचे शेण, मुत्र, शेतीतील घस्टके, काडीकचरा, मानवी मलमुत्र ह्यांचा वापर बायोगॅस निर्मितीसाठी होवू लागला आहे. बायोगॅसमधून मिळणाऱ्या स्लरीचा उपयोग सेंद्रीय खत म्हणून होवू शकतो. ह्यामुळे जमीनीचा पोत सुधारण्यास मदत होते.

खनिज तेलाचा वापर शक्ती द्रव्य ऊर्जा निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात होत आहे. पाण्यापासून मिळणारी वीजशक्तीला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. अणुशक्तीचा वापर शांततामय कार्य व विकास कार्यासाठी होत आहे.

munotes.in

**सूर्यशक्ती** - सूर्य हा शक्तीचा एक प्रचंड साठा आहे. सूर्यापासून मिळणाऱ्या ऊर्जेचा वापर वेगवेगळ्या उद्योग धंद्यात होवू शकतो हे आता सिद्ध झाले आहे. घरगुती वापरासाठी आणि उद्योगासाठी आपण सूर्यशक्ती (Solar Energy) चा सहज वापर करु शकतो. यामध्ये भारताने पश्चिम जर्मनीचे सहकार्य घेतले आहे. तामीळनाडू मध्ये १० किलोवॅट शक्तीनिर्मितीची क्षमता असलेले एक सूर्यशक्ती निर्माण करणारी केंद्रे स्थापन करुन ग्रामीण भागाला शक्ती पुरवठा ऊर्जापुरवठा करावा अशी योजना आहे.

### ६) वनसंपत्ती - जंगल संपत्ती :

जंगल ही देशाची फार मोठी नैसर्गिक संपत्ती आहे. जंगलाचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असे फायदे असतात. मोठ्या प्रमाणात प्राणवायुची निर्मिती तर होत असते. पण त्याचबरोबर जंगलातून इमारतीसाठी लाकूड, जळावू लाकूड इतर औद्योगिक क्षेत्रात उपयोगात येणारे लाकूडही मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. मऊ लाकडाचा वापर पेट्या बनविण्यासाठी होत असतो. शिवाय लाख, राळ, टर्पेटाईन, उपयुक्त तेल, औषधी वनस्पती, डिंक, मध, ह्यासारख्या बाबी जंगलातून उपलब्ध होतात. सीमावर्ती भागात शत्रूपासून संरक्षणासाठी जंगलाचा मोठ्या प्रमाणात उपयोग होतो. भारतीय संघराज्यात सध्या सुमारे ६.७ कोटी हेक्टर क्षेत्रफळात जंगले असून एकूण भूप्रदेशाचा केवळ २३% भूभाग हा जंगलव्याप्त असणे आवश्यक आहे. भारतीय जंगलामधून ४००० प्रकारचे लाकूड उपलब्ध होते. विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात जंगलांचा ऱ्हास होत असला तरी सर्वांनी आपली जंगल विषयक जबाबदारी स्विकारुन त्याचे योग्य संवर्धन करणे गरजेचे आहे. जंगले ही निसर्गाचा बहुमुल्य देणगी असून त्यावर भारत सरकारची मालकी आहे आणि नियंत्रणही आहे. ही स्तुत्य बाब नक्कीच आहे.

### ७) पशुसंपत्ती, पक्षी संपत्ती :

पशु व पक्षी संपत्तीचे देशामध्ये महत्त्व नक्कीच आहे. वनात राहणारी जंगली जनावरांचा व पशुंचा निसर्ग समतोलात महत्त्वाचा सहभाग आहे.

तर मानवी जिवनात दैनंदिन उपयोगात येणाऱ्या पशुंपासून मानवास आर्थिक नफा प्राप्त होतो. ग्रामीण भागात गाई, बैल, म्हैस, रेडे, बकऱ्या ह्यांचा उपयोग अर्थजनासाठी होत असतो. ह्या जनावरांपासून मिळणाऱ्या मलमुत्राचा वापर शेतीसाठी सेंद्रिय खत म्हणून जमिनीचा पोत सुधारण्यासाठी केला जातो. तर दुधाचा व्यवसाय म्हणून केला जातो. दुग्धजन्य पदार्थ निर्मितीपासून रोजगार निर्मिती होत असते.

पक्षीपालनात कुक्कुटपालनाचा मोठ्या प्रमाणात समावेश होतो. मांस व अंडी ह्यांचा मोठा व्यवसाय निर्माण झाला आहे. दारिद्र्याचा व बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्याचा मोठा प्रयत्न ह्या व्यवसायातून ग्रामीण भागात होत आहे. शेतीपुरक व्यवसायामध्ये ह्याचे महत्त्व आहे.

### ८) सागरी संपत्ती :

सागरामधून मासे, मोती, मिठ, प्रवाळे ह्यासारख्या संपत्तीचा स्त्रोत सापडतो. माशापासून प्रथीनयुक्त अन्नाची उपलब्धता होते. समुद्रकिनारी मिठ तयार करण्याचे व्यवसाय आहेत. समुद्रातील मासेमारीमुळे व मिठ तयार करण्याच्या व्यवसायातून स्त्री-पुरुषांना मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली आहे. मोती मिळवण्याचा व्यवसाय आणि त्यातून मिळणारे उत्पन्न ह्याच्या किंमतीविषयी तर सांगणेच नको. आजही मोठी मागणी मोत्यास आहे. त्यांची किंमती मोठी आहे. विविध प्रवाळे त्यांचा वापर औषधे व सौंदर्य प्रसाधानात केला जात असतो. भारतास

munotes.in

तिन्ही बाजूने समुद्र किनारा लाभला आहे. पूर्वेकडे बंगालचा उपसागर, दक्षिणेकडे प्रशांत महासागर, पश्चिमेकडे अरबी समुद्र. ह्या तिन्ही किनाऱ्यावरील लोकांच्या रोजगार निर्मितीचे साधन हे सागरी मासेमारी आहेत.

**९) हवामान :**

हा एक अंत्यत प्रभावशाली घटक आहे. ह्या घटकावर नियंत्रण आपणास शक्यच नाही. मात्र हवामानविषयक माहिती करुन घेवून त्याचा वापर शेती क्षेत्रास करुन घेता येतो. भारताच्या संदर्भात विचार करतात वेगवेगळ्या भागात वेगवेगळे हवामान आढळते. त्या त्या भागात वाढणारी वृक्षे त्यापासून मिळणारी फळे, फुले, पाने ह्याचा अभ्यास करुन योग्य मार्गदर्शन व नियोजनाद्वारे ग्रामीण भागातील लोकांना आपल्या उत्पादनात नक्कीच भर घातला येवू शकते. शेतकऱ्याला आपल्या शेतात योग्य नियोजनाद्वारे शेतीतून अधिकाधिक उत्पादन घेवून एकूण उत्पन्नात भर घालण्यास मदत होईल. म्हणूनच हवामान हा महत्त्वाचा घटक आहे.

**१०) मनुष्यबळ :**

मनुष्यबळ ही सुद्धा नैसर्गिक संपत्ती आहे. मानवी बुद्धी व श्रमाद्वारे उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर विज्ञान व तंत्रज्ञानाच्या साहाय्याने करता येतो. म्हणूनच मानवी बुद्धी व श्रम यांना योग्य दिशेने नेण्यासाठी सरकारकडून अनेक प्रयत्न केले जात आहे. अगदी शिशु जन्माआधीपासून तर योग्य शिक्षण, प्रशिक्षणद्वारे त्या बालकास योग्य दिशेला नेण्यास सकारात्मक विकास प्रवृत्त करण्याचा देशाच्या विकासासाठी निसर्गाच्या संरक्षणासाठी प्रयत्नपूर्वक - जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातो. निसर्गाच्या सहकार्याने असमतोल होवू न देता जर विकासाची प्रक्रिया मानवाने स्विकारल्यास मानव जातीचे नक्कीच कल्याण होत असते.

**४.३.३ सारांश :**

आपल्या देशात शेतजमीन, खनिजद्रव्ये, सूर्यशक्ती, जंगले, ऊन, वारा, पाऊस, नद्या, पर्वत, समुद्र, जलसंपत्ती इत्यादीबाबत विविधता व विपुलता आहे. देश नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध आहे. परंतु देशातील लोक मात्र गरीब आहेत. कारण त्यांचे दरडोई उत्पन्न कमी आहे. अशा श्रीमंत देशात लोक गरीब का असा प्रश्न नक्कीच पडतो. आपल्या देशात नैसर्गिक संसाधनाचा अवापर, अपुरावापर, गैरवापर होत आहे. त्यामुळे विकास प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. देशात जलशक्ती व सूर्यशक्ती मोठा प्रमाणात उपलब्ध आहे. जमीनीचे क्षेत्रही मोठे आहे. योग्य मार्गदर्शन व नियोजनबद्ध विकास साध्य झाल्यास मानवी बुद्धीचा योग्य वापर झाल्यास ग्रामीण भागात उपलब्ध नैसर्गिक साधन सामुग्रीद्वारे अनेक घटकात नक्कीच गुणात्मक वाढ घडून येईल ह्यात मुळीच शंका नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१) ग्रामीण विकासात नैसर्गिक साधनसंपत्तीचे महत्त्व सांगा.

## ४.४ शेती संलग्न व्यवसायाचे ग्रामीण विकासातील महत्त्व

### ४.४.१ प्रस्तावना :

भारत हा शेतीप्रधान देश आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्याचा प्रयत्न झाला तरीही भारत हा अमेरिका, इग्लंड, इस्त्रायल, फ्रान्स, जपान, जर्मनी या देशांप्रमाणे उद्योगप्रधान होवू शकला नाही. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ ७०% लोकसंख्या आजही खेड्यात राहते. ह्यामधील बहुसंख्य लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. शेती ह्या मध्ये कृषी-जमीन कसून उत्पादन घेणे ह्यावर भर जास्त दिला जातो. भारतातील ७२% भूधारक अत्यल्प, अल्प व सिमान्त भूधारक आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून केली जाणारी शेती ही उदारनिर्वाह स्वरुपाची असते. पावसाळ्यात पडणाऱ्या पावसावर मोठ्या प्रमाणात शेती केली जाते. दुबार पिके इतर वेळी पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याने केली जात नाही. त्यामुळे बरोजगार रहावे लागते. ह्यातून मार्ग काढण्यासाठी जमीन कसत असताना पुरक व्यवसाय करण्यावर फारसा भर दिला जात नाही. मात्र अशा शेतीपुरक व्यवसायावर भर दिल्यास रोजगाराचा प्रश्न सुटून कुटुंबाचा आर्थिक दर्जा सुधारण्यास नक्कीच मदत होते.

### ४.४.२ शेतीपुरक व्यवसाय :

शेतकरी जमीन कसून आपले कृषी उत्पादन घेत असतो. त्याचबरोबर कुक्कुटपालन, पशुपालन, फळांचे उत्पादन, दुग्ध उत्पादन, रेशीम उत्पादन, मधुमक्षिका पालन, मत्स्य व्यवसाय, प्रक्रिया करणे ह्यासारखे उद्योग अतिअल्प प्रमाणात कुटुंबाच्या केवळ गरजा भागतील इतक्यास स्वरुपात करीत असतो. त्यामुळे त्याला मिळणारे एकूण उत्पन्न अतिअल्प असते. परिणामी दरडोई उत्पन्नही कमी येते. शेतकऱ्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

जमीन कसत असतानाच त्याने पशुपालन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, मधुमक्षिका पालन, मत्स्य व्यवसाय, फलोत्पादन, रेशीम किडे संगोपन, प्रक्रिया करणे ह्यासारख्या बाबी स्वतंत्र व्यवसाय म्हणून स्विकारल्यास नक्कीच शेतकऱ्याचा फायदा होईल. ह्यातील काही घटक पुढीलप्रमाणे थोडक्यात सांगता येतील.

#### १) फलोद्यान :

आपणास माहित आहे की, फळांचे मानवी आहारात महत्त्वपूर्ण स्थान आहे. फल आहारामुळे मानवी शरिरात नैसर्गिक रोग प्रतिकारक शक्ती निर्माण होते. फळझाडांची लागवड, फुलझाडांची लागवड, भाजीपाला लागवड, शोभिवंत झाडे, रोपवाटिका संगोपन अशा अनेक उपशाखांचा यात समावेश होतो. शेतकऱ्याने आर्थिक विकास साधत असताना पारंपारिक शेती बदल करुन नवीन फळझाडांची लागवड केल्यास आणि झाडे फळावर येईपर्यंत आंतरपिके घेतल्यास नक्कीच शेतकऱ्याच्या उत्पादनात बदल घडून येईल. पडिक जमीनीचा योग्य वापर करण्यास मदत होवू शकेल. जमीन, हवामान यांचा अभ्यास करुन त्या परिसरात येणारी फळझाडे निवडून योग्य व्यवस्थापनाद्वारे योग्य झाडांच्या जातीचा वापर केल्यास शेतकऱ्याच्या आर्थिक स्थितीत बदल घडून येण्यास मदत होईल, उत्पादन खर्च आंतर पिकांमुळे कमी तर होईल पण पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होईल.

**२) मधुमक्षिका पालन :**

कृषी शेती व फळशेती करीत असताना मधमाशांच्या पेट्या शेतात ठेवल्यास मध मोठ्या प्रमाणात मिळू शकतो. सातेरी जातीच्या मधमाशांचे पालन बंद पेटीतून शक्य झाले आहे. मधमाशिमुळे परागीभवन होण्यास मदत होते. आपणांस माहित आहे की, मधाचा पूर्वीपासून औषध म्हणून उपयोग केला जात आहे. मधाचा भावही बाजारात जास्त आहे. परागीभवनामुळे शेती उत्पादनात वाढ तर होतेच पण त्याचबरोबर मधाचे उत्पादनही शेतकऱ्यास प्राप्त होते. अर्थात शेतकऱ्याच्या उत्पादनात व उत्पन्नात भर पडते.

**३) पशुपालन :**

शेती करताना शेतकरी श्रमासाठी नर पशुंचा वापर करतात. बैल, रेडे ह्यांचा श्रमासाठी वापर होतो. तर दुधासाठी मादी पशुंचा वापर होतो. हयामध्ये गाय, म्हैस ह्यांचा प्रामुख्याने समावेश होतो. साधारणतः एक व्यक्ती दहा जनावरांचे पालन करु शकते. गाय व म्हशीपासून मिळालेल्या दुध उत्पादनातून नक्कीच शेतकऱ्याच्या उत्पादनात भर पडते.

शेळ्या-मेंढ्या पालनातून दुध व मांस मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. शेळ्या मेंढयाच्या दुधाला जास्त मागणी नसल्यामुळे मांसासाठीच जास्त ह्याचे पालन केले जाते. योग्य व्यवस्थापनाने बंदिस्त जागेत शेळ्या मेंढ्यापालन व्यवसायिक तत्वावर केल्यास शेतकऱ्यास नक्कीच फायदा मिळतो. घरातील वयस्क माणसं, लहान मुलंही ह्यांची देखभाल सहज करु शकतात.

गाय, म्हैस, बैल, रेडा, शेळ्या व मेंढ्या ह्यांच्या मलमुत्रापासून सेंद्रीय खत निर्मिती व बायोगॅस निर्मिती होत असते. त्यामुळे इंधन खर्चात बचत होवून मानवी आरोग्याच्या दृष्टीने सेंद्रिय शेती जमिनीचा पोत सुधारल्यामुळे फलदायी ठरत आहे.

**४) पक्षीपालन :**

पक्षीपालनात कुक्कुटपालन, बदक पालन, इमू पालनाचा समावेश होतो. मात्र कोंबडीच्या मांस व अंडी ह्यास जास्त मागणी भारतात आहे. त्यामुळे व्यावसायिक तत्वावर मांस व अंडी मिळण्यासाठी कुक्कुटपालन व्यवसाय शेती करत असताना शेतकऱ्यास नक्कीच फलदायी ठरणारा आहे. ग्रामीण भागातील तरुण योग्य प्रशिक्षणाद्वारे स्वंतत्र व्यवसाय म्हणून पसंती देताना दिसत आहे. शहरी भागात हा व्यवसाय अशक्य असल्याने ग्रामीण भागात कुक्कुटपालन व्यवसाय सुशिक्षित तरुणास वरदान ठरत आहे. कारण शहरात अंडी व मांस ह्यास मोठी मागणी आहे.

**५) मत्स्य व्यवसाय :**

शेती करताना पाण्याची नितांत गरज असते. शेतकरी बारमाही शेती करताना पाणी साठवून ठेवण्यासाठी विहीरी, तलाव खोदत असतो. तसेच काही ठिकाणी धरण, सरोवर ह्यातील पाण्याचाही आधार घेवून गोड्या पाण्यातील मासेमारी शेतकरी करु शकतो. मांशापासून मोठ्या प्रमाणात प्रथिने मिळतात. माशांची अंडी जलसाठ्यात सोडून शेतकरी शेती करीत असताना माशांचे उत्पादनही घेत असेल तर नक्कीच त्याच्या उत्पादनात भर पडते.

**६) रेशीम किडे संगोपन :**

रेशीम उद्योग हा शेती व्यवसायाला मदत करणारा, तसेच शेतीत जोड व्यवसाय म्हणून महत्त्वाचा व्यवसाय आहे. रेशीम उद्योगात चीन देशाचे योगदान मोठे आहे. भारतामध्ये तुतीच्या पानावर वाढणारी बॉम्बीस मोरी (मल्बेरी सिल्कवर्म) ही जात प्रामुख्याने रेशीम कोष मिळवण्यासाठी पाळली जाते.

चंद्रिका नावाच्या ट्रेवरती या रेशिम किड्यांचे संगोपन केले जाते. अंडी, अळी व कोष ह्या अवस्थेमधून ह्यांचे संगोपन केले जाते. कोष तयार झाल्यावर ते उकळत्या पाण्यात टाकून त्यातील किडा मारला जातो. आणि पुर्ण कोष मिळविले जातात. रेशिम उद्योगात कापड निर्मितीसाठी ह्याचा वापर केला जातो. रेशीम किडे संगोपन करताना तुतीच्या झाडांची लागवड शेतकरी आपल्या शेतात करतो. तुतीची कोवळी पाने किडींना खाद्य म्हणून दिले जाते. तुतींच्या झाडांची लागवड शेतकरी पडीक जमीनीवर करीत असतो. पर्यावरणाचे संतुलन राखण्यास त्यामुळे मदत होतेच तसेच शेतकऱ्यालाही ह्या व्यवसायापासून चांगले आर्थिक उत्पादन मिळते. कुटुंबातील स्त्रीया हा व्यवसाय सहज करु शकतात.

**७) प्रक्रिया उद्योग :**

ग्रामीण भागातील महिला पावसाळ्याआधी त्यांच्या परिसरात उपलब्ध असणाऱ्या फळांवर प्रक्रिया करुन पावसाळ्यात खाण्यालायक उत्पादने भरुन ठेवतात. उदा. आंब्यापासून लोणचे, मुरंबे, पल्प, पन्ह, आंमचूर पावडर, आंबावडी, फणसापासून फणसपोळी, रानमेव्यापासून लोणची, अर्क, धान्यापासून शेवया, पापड वगैरे. हे फक्त घरगुती वापरासाठीच असते. मात्र ह्याच गोष्टी मोठ्या प्रमाणात उत्पादित केल्यास शेतकऱ्याच्या शेतात तयार होणाऱ्या मालाला मागणी वाढून शेतकऱ्याचे उत्पादन वाढण्यास मदत होईल.

तसेच दुग्धजन्य पदार्थ, इतर फळभाज्या, फळे, पालेभाज्या ह्यावरील प्रक्रिया उद्योग सुरु झाल्यास शेतकऱ्याच्या शेतमालाला तर मागणी वाढेलच पण गावातील अकुशल कामगारांना स्थानिक पातळीवर रोजगार प्राप्ती होण्यास मदत होईल.

अगदी थोडक्यात शेतीपुरक व्यवसायाबद्दल आपण माहिती मिळविली. शेतीपुरक व्यवसायाचे ग्रामीण विकासातील महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**४.४.३ शेती पुरक व्यवसायाचे ग्रामीण विकासातील महत्त्व :**

आजही बहुसंख्य जनता खेड्यात राहते. शेतकरी, कारागीर, भूमीहीन शेतमजूर इतर कामगार यांचा ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात समावेश होतो. शेतीपुरक व्यवसायांचा ह्या घटकांना नेमका काय फायदा होवू शकतो ते पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१) सर्व घटकांस उद्योग संधी :**

ग्रामीण भागात राहणारे शेतकरी, अत्यल्प, अल्पभूधारक, भूमीहीन शेतमजूर, कारागीर, विविध व्यापार उद्दिम करणारे या सर्वांना शेती सलग्न व्यवसायातून व्यवसाय संधी प्राप्त होण्यास मदत होते.

**२) अकुशल कामगारांस संधी :**

कृषी संलग्न व्यवसायाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांचा नफा. अशा कृषी सलग्न व्यवसायातून वर्षभर रोजगार निर्मिती होते. ह्या व्यवसायासाठी विविध कार्यासाठी, हमालीसाठी तसेच हरकाम्या म्हणून सहाय्यक मदतनीस म्हणून अकुशल कामगारांनाही रोजगार संधी उपलब्ध होण्यास मदत झाली आहे.

**३) शेतजमीनीचा पुरेपुर वापर :**

शेतकऱ्यांची संपूर्ण मालकीची जमीन सुपीक असतेच असे नाही. जमिनीच्या स्वरुपावरुनच शेतजमीनीतून विविध पिके घेतली जातात. निकृष्ट प्रतीच्या जमिनीतून शेतकरी पक्षीपालन पशुपालन, मत्स्य व्यवसाय, वनशेती यासारख्या उत्पादनाचा विचार करुन उपयोगात आणत आहे. ग्रीन हाऊस बांधून हायटेक ॲग्रीकल्चरचे प्रयोग करीत आहे.

**४) श्रम कौशल्याचा पर्याप्त वापर :**

ग्रामीण भागात काही कुटुंबे अजूनही आपला वडिलोपार्जीत व्यवसाय मोठ्या कुशलतेने करीत आहेत. लहानपणापासून विशिष्ट व्यवसायाचे शिक्षण त्यांना मिळत असल्यामुळे त्या व्यवसायात ते निपुण व कौशल्य प्राप्त करतात. त्यांना असणाऱ्या कौशल्याचा वापर ते कल्पकतेने इतर व्यवसाय मदत म्हणून करुन देऊ शकतात. उदा. ग्रीन हाऊस, बांधणे, प्रक्रिया उद्योगास सहाय्य वगैरे.

**५) नवीन तंत्रज्ञानाचा स्विकार :**

शेती सलग्न व्यवसायात व्यवसायातील दृष्टीकोन असल्यामुळे फायद्याचा विचार केला जातो. यासाठी नवीन पीक पद्धती, जनावरांची आधुनिक पैदास पद्धती, जैविक तंत्रज्ञान, यंत्रज्ञान, प्रक्रिया केंद्र, पोष्टीक आहार निर्मिती यासारख्या नवीन व्यवसाय व तंत्राचा निश्चित वापर वाढत आहे. ग्रामीण भागाचा विचार करता ही नक्कीच चांगली बाब आहे.

**६) बाजारपेठांचा विकास :**

बाजारात अनेक प्रकारची कार्ये होत असतात. उत्पादक शेतकऱ्यापासून अंतिम ग्राहकांपर्यंत शेतमाल जाईपर्यंत बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात मनुष्य बळाची विविध कार्यासाठी गरज लागते. तसेच मालास चांगला भाव मिळतो म्हणून उत्पादकही उत्साहाने मोठ्या प्रमाणात माल विक्रीसाठी आणतो. विक्रीत मोठ्या प्रमाणात वाढ त्यामुळे होते. त्यामुळे विविध प्रकारच्या बाजारपेठांचा विकास होण्यास मदत होते.

**७) शेतकी शिक्षणात रस :**

नवीन आधुनिक पद्धतीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. शेतीमध्ये अधिक नफा मिळवण्याच्या दृष्टीने शेतकी महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्याचे तसेच विविध शेतकी प्रशिक्षण शिबिरात सहभागी होणाऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. उदा. इमूपालन, कुक्कुटपालन, ग्रीन हाऊस मधील शेती, मत्स्यशेतीचे मार्गदर्शन.

munotes.in

**८) स्थानिक कच्च्या मालावर प्रक्रिया :**

गावाकडे उत्पादित होणाऱ्या शेतमालावर स्थानिक पातळीवरच प्रक्रिया करण्याचे प्रमाण वाढत आहे. वाहतुक, साठवणूक यासाठी होणाऱ्या खर्चात त्यामुळे मोठी बचत होऊ शकते. स्थानिक पातळीवर कमी रोजंदारित मजूरही उपलब्ध होतात. छोट्या प्रमाणावर चालणाऱ्या प्रक्रिया उद्योगांमध्ये स्थानिक पातळीवरच उपलब्ध झाल्यामुळे उत्पादक व प्रक्रिया उद्योग दोघांचाही फायदा होतो.

**९) नवनवीन प्रकल्प वाढीवर भर :**

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात शेतीचे महत्त्व आहे. भारतीय उद्योगात तर शेतीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. ग्रामीण भागात तयार होणारी विविध गळीताची पिके यापासून विविध प्रकारच्या तेलबियांपासून तेल प्रकल्प, केळी, बटाटे यांच्यावर प्रक्रिया करुन वेफर वा तत्सम पदार्थ तयार करण्याचे प्रकल्प, चिकू, आंबा, यांवर प्रक्रिया करुन विविध उत्पादने घेण्यासाठीचे प्रकल्प, जाम, जेली, चॉकलेट, चिक्की यासारखे प्रकल्प, आंळबी उत्पादन प्रकल्प, पपईपासून टुटी-फ्रूटी तयार करणारे प्रकल्प वगैरे उदाहरणे देता येतील. यासारख्या प्रकल्पावर भर दिल्यामुळे नवीन उद्योजकांचा वर्ग निर्माण होण्यास मदत होत आहे.

**१०) ग्रामीण औद्योगिकीकरणास वाव :**

ऊस ह्या शेतमालापासून साखर, विनेगर, गुळ, गुरांची वैरण, पेपर तयार करण्याचे कारखाने, जैविक इंधन, द्राक्षापासून वाईन, कापसापासून कापड, दुधापासून दुग्धजन्य घटक, खराब धान्य विशेषतः ज्वारी, बाजरीपासून पेय (बियर) गळिताच्या पिकांपासून विविध तेल उत्पादने, लोकरापासून लोकरी वस्त्र निर्मिती, रेशीम किडे संगोपनापासून रेशीम वस्त्र उद्योग, खत निर्मिती, शेतीसाठी लागणाऱ्या साधनसामुग्रीची निर्मिती करणारे कारखाने, कांदा, बटाटे, गहू, टॉमेटो, तांदुळ इतर शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग, जंगल उत्पादनापासून विविध वस्तू तयार करणारे कारखाने, कॉफी, चहा ह्यावर प्रक्रिया करणारे उद्योग इ. यामुळे ग्रामीण भागात औद्योगिकरणास निश्चित बाब आहे.

**११) स्थलांतरास आळा :**

ग्रामीण भागात रोजगार निर्मिती झाल्याने ग्रामीण भागातून शहरी भागात होणारे स्थलांतर मोठ्या प्रमाणात कमी झाले. कुशल अकुशल कामगारांना स्थानिक पातळीवरच रोजगार संधी प्राप्त झाली आहे.

**१२) महिला सक्षमीकरणास मदत :**

कमी श्रमाच्या कार्यात महिलांचा सहभाग मोठा असतो. स्थानिक पातळीवरील विविध कार्यात महिलांना सहभागी करुन घेतल्याने महिलांना रोजगार प्राप्ती होते. त्यामुळे महिलांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होते. निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग त्यामुळे वाढतो. आरोग्य, मुलांचे शिक्षण, इतर कौटुंबिक अन्यायकारक गोष्टींबाबत महिलांचा विचार करण्याची पात्रता वाढत आहे. बचतीची सवय मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

**१३) सामाजिक व राजकीय दृष्टीने महत्त्व :**

भारतीय शेती ही शेतकऱ्याच्या दृष्टीने त्यांचा भावनीक प्रश्न आहे. कोणती शेती करावी, कुठे किती प्रमाणात करावी कुठे विक्री करावी हा वैयक्तिक शेतकऱ्यांचा प्रश्न असला तरी सामाजिक दृष्टीकोन विचारात घेवून सरकारकडून वेगवेगळ्या प्रकारची धोरणे राबविली जातात. त्या धोरणांचा सामाजिक क्षेत्रावर परिणामकारक प्रभाव पडतो. सरकारच्या दृष्टीने राष्ट्रीय उत्पन्न प्राप्त करुन देणारा शेती हा एक स्त्रोत आहे. त्यादृष्टीने विचार करता शेती सलग्न व्यवसाय हे शेतीसंदर्भात समन्वयाचे कार्य करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.

**१४) उत्पादनात वाढ :**

जमीन कसून केवळ कृषीतून मिळणाऱ्या उत्पादनाचा विचार होतो. शेती सलग्न व्यवसायात विविध घटकांचा विचार केला जातो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार प्राप्ती होते. परिणाम उत्पन्नात भर पडण्यास मदत होते.

**१५) इतर सहाय्यक बाबींचा विकास :**

फायद्यासाठी शेती हे शेती सलग्न व्यवसाय करताना तत्व असते. शेतीमध्ये विविध संसाधनाची गरज लागते. भांडवलाची गरज असते. ती संस्थात्मक स्त्रोताकडून भागविण्याचा प्रयत्न असतो. त्यामुळे बँका व सहकारी संस्थांचा उदय व विकास होण्यास मदत होते.

उत्पादित शेतमाल हा बाजारात पोहचवण्यास वा प्रक्रिया केंद्रात पोहचवण्यास दळणवळण व वाहतुक सोयींचा लाभ घ्यावा लागतो. त्यामुळे ह्याची घटकांचा विकास होतो.

हंगामात मोठ्या प्रमाणात उत्पादित होणारा माल बिगर हंगामात उपलब्ध होण्यासाठी मालाच्या स्वरुपानुसार साठवणुक गृहाची गरज लागते. साठवणुक गृहामुळे किंमत स्थैर्य निर्माण होते.

**१६) खऱ्या अर्थाने ग्रामीण विकासास मदत :**

हळूहळू का होईना शेती सलग्न व्यवसाय ग्रामीण भागात रुढ होत आहेत. ह्याचा लाभ ग्रामीण भागातील सर्व विविध वर्गांना होत आहे. ह्याचा सर्वांनी लाभ करुन घेतल्यास खऱ्या अर्थाने ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत होईल.

**४.४.४ सारांश :**

शेतीसंलग्न व्यवसाय ग्रामीण विकासामध्ये तसेच शेतीच्या विकासात खऱ्या अर्थाने परिणामकारक महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. ग्रामीण भागात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, आरोग्यात्मक, शैक्षणिक विकास घडवून आणण्याच्या कामी प्रत्यक्ष - अप्रत्यक्षपणे महत्त्वाची कामगिरी बजावत आहे. ह्यामुळे ग्रामीण भागात महत्त्वपूर्ण स्थित्यंतरे वेगाने घडून येण्यास मदत झाली आहे. देशाच्या दृष्टीने ही अभिमानाची बाब आहे.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

१) शेती संलग्न व्यवसायाचे ग्रामीण विकासातील महत्त्व सांगा.

## ४.५ समारोप

भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्य साधारण महत्त्व आहे. शेती क्षेत्राचा विचार करता शेती संलग्न व्यवसायही तितकेच महत्त्वाचे आहेत. त्याचबरोबर ह्या ठिकाणी लागणारा शेतमजूरही तितकाच महत्त्वपूर्ण घटक आहे. खऱ्या अर्थाने शेती करुन शेतकऱ्याला आपले एकूण शेती उत्पादन परिणामी एकूण उत्पादन वाढविता येवू शकते. बारमाही शेतीतून रोजगार उपलब्ध झाल्याने ग्रामीण भागातील इतर गरीब दुर्बल घटकांना त्याचा निश्चित लाभ मिळून देशाच्या तळागाळातील प्रगती साधण्यास मदत मिळेल. तळागाळातील लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्यासही मोलाची मदत होईल.

## ४.६ मार्गदर्शक सूचना

ह्या पाठाचा अभ्यास करीत असताना विविध ग्रामीण भागातील प्रक्रिया केंद्रांना शक्य असल्यास भेटी द्याव्यात तसेच संदर्भसूचीत सांगितलेल्या पुस्तकांचे जरुर वाचन करावे.

## ४.७ स्वाध्याय

१) शेतमजूर म्हणजे काय ते सांगून शेतमजुरांचे प्रकार सांगा.

२) शेतमजुरांची वैशिष्ट्ये सांगा.

३) नैसर्गिक साधन संपत्तीची संकल्पना सांगा.

४) ग्रामीण विकासात नैसर्गिक साधन-संपत्तीचे महत्त्व विशद करा.

५) शेतीपुरक व्यवसायाचे ग्रामीण विकासातील महत्त्व सांगा.

६) शेतमजुरांच्या हलाखीची कारणे सांगा.

७) शेतमजुरांची हलाखीची स्थिती सुधारण्यासाठी उपाय सुचवा.

## ४.८ संदर्भसूची


१) भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरण अर्थशास्त्र, डॉ. जी. एन्. झामरे, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपुर

२) शेतीचे अर्थशास्त्र, डॉ. गंगाधर कांयदे - पाटील, चैतन्य पब्लिकेशन्स्, नाशिक - १३

३) दुग्ध व्यवसाय व पशुसंवर्धन - डॉ. प्रकाश देशपांडे, साकेत प्रकाशन.

४) भारतातील ग्रामीण औद्योगिकीकरण - यशवंत पंडीतराव

५) Handbook of Agriculture - ICAR - New Delhi.

६) भारतीय अर्थशास्त्र - डॉ. जी.एन्. झामरे, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

७) भारतीय अर्थव्यवस्था, प्रा. डॉ. वसुधा पुरोहित - खांदेवाले, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

८) भारतीय अर्थव्यवस्था, डॉ. सुखदेव संदारे, एज्युकेशनल पब्लिशर्स.

९) कृषी अर्थशास्त्र आणि भारतातील शेतीव्यवसाय, डॉ. स.श्री. मु. देसाई, सौ. डॉ. निर्मल भालेराव, निराली प्रकाशन.

१०) Indian Economy, Mishra, Puri, Himalaya Publication


❖❖❖❖

munotes.in

# घटक -५

## ग्रामीण पायाभूत संरचना

- डॉ. दिलीप शं. पाटील

**पाठाची रचना :**

५.१ पाठाची उद्दिष्टे
५.२ प्रस्तावना
५.३ ग्रामीण संरचनेची संकल्पना
५.४ ग्रामीण विकासातील ग्रामीण संरचनेची भूमिका
५.५ वाहतूक व दळणवळण
५.६ पिण्याचे पाणी आणि स्वच्छता
५.७ विद्युतीकरण
५.८ सारांश
५.९ स्वाध्याय
५.१० संदर्भसूची

### ५.१ उदिष्ट्ये

- ग्रामीण पायाभूत संरचनेची संकल्पना स्पष्ट करणे.
- ग्रामीण संरचनेची ग्रामीण विकासातील भूमिका स्पष्ट करणे.
- ग्रामीण विकासातील वाहतूक व दळणवळण साधनांचे महत्त्व समजून घेणे.
- जलसाधनसंपत्तीचे व स्वच्छतेचे महत्त्व अभ्यासणे.
- विद्युतीकरणाचे महत्त्व तसेच ग्रामीण भागातील विद्युतीकरणाच्या समस्या अभ्यासणे.

### ५.२ प्रस्तावना

ग्रामीण भागाचा विकास साध्य करण्यासाठी विकासाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी ग्रामीण संरचना अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ग्रामीण भागाचा विकास झाला तरच खऱ्या अर्थाने राज्याचा आणि देशाचाही विकास होऊ शकतो. ग्रामीण भागाचा विकास हा तेथील उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांवर अर्थात तेथील पायाभूत संरचनेवर अवलंबून असतो.


munotes.in

मनुष्य साधनसंपत्तीचा विकास तेथील शिक्षण व आरोग्य सुविधांवर अवलंबून असतो तर कृषी व ग्रामोद्योगाच्या विकासासाठी ऊर्जा व जलसिंचन आवश्यक असते. वाहतूक व दळणवळणाच्या साधनांमुळे खेडी बाजारपेठांशी जोडली जातात. माहिती, तंत्रज्ञान व विज्ञानातील प्रगती शेती उद्योगांच्या विकासाला चालना देणारी ठरते. या सर्व सुविधांना अर्थव्यवस्थेचा आधारभूत संरचना असे म्हणतात. विकासाच्या दृष्टीकोनातून या संरचना अत्यंत आवश्यक असून ग्रामीण संरचनेतील गुंतवणूक ही काळाची गरज आहे.

## ५.३ ग्रामीण संरचनेची संकल्पना

ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी ग्रामीण संरचनेची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असून आर्थिक पातळी उंचावण्यासाठी आवश्यक असणारी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याचे कार्य ग्रामीण पायाभूत संरचना करेल. ग्रामीण संरचना सामाजिक विकासासाठी महत्त्वपूर्ण असून मूलभूत संरचना ह्या समाजाचे भांडवल असतात.

ग्रामीण पायाभूत संकल्पना पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.




ग्रामीण पायाभूत सुविधा ही अत्यंत लवचिक संकल्पना असल्यामुळे त्याची निश्चित स्वरुपाची व्याख्या करणे कठीण आहे.

उत्पादन प्रक्रियांना अप्रत्यक्षपणे सहाय्यभूत ठरणाऱ्या विविध सामाजिक भांडवलाला आधारभूत संरचना असे म्हणतात.

पॉल, रोसेनस्टोन, रेश्नर, नर्क्स यांना सामाजिक व आर्थिक संरचनेचे वर्णन सामाजिकदृष्ट्या उपयुक्त अशा उपक्रमात करण्यात आलेली गुंतवणूक असे केले आहे.

## ५.४ ग्रामीण विकासातील ग्रामीण संरचनेची भूमिका

शेती, उद्योग, व्यापार, पर्यटन व संपर्क यांच्या विकासासाठी व त्यातील सुखसोयी वाढविण्यासाठी विकसनशील अर्थव्यवस्थेला काही सामाजिक व आर्थिक स्वरुपाच्या संस्था व रचना सार्वजनिक पातळीवर उभाराव्या लागतात. अशा संस्था व रचनांना सामाजिक, आर्थिक

munotes.in

परिसेवा किंवा पायाभूत संरचना म्हणतात, या पायाभूत सुविधांचा पुरेसा विकास केल्याशिवाय इतर क्षेत्रांत गुंतवणूक, उत्पादन व रोजगार निर्माण होत नाही. ग्रामीण संरचनेमुळे पुढीलप्रमाणे ग्रामीण जीवनात बदल दिसून येतात.

**१) ग्रामीण जीवनात बदल :**

ग्रामीण भागाचा विकास हा तेथील उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांवर अर्थात तेथील पायाभूत संरचनेवर अवलंबून असतो. मनुष्य साधनसंपत्तीच्या विकासासाठी शिक्षण, आरोग्य, पिण्याचे शुद्ध पाणी इ. घटक महत्त्वपूर्ण असतात. शैक्षणिक विकासामुळे कौशल्यप्राप्त श्रमशक्ती उपलब्ध होईल. तसेच उद्योग व्यवसायांत वाढ होऊन दारिद्र्याची समस्या कमी होईल. शेतीच्या आधुनिकीकरणातून उत्पादनात वाढ होईल. रस्ते बांधणीमुळे वाहतुकीची साधने उपलब्ध होतील. दळणवळणाच्या साधनांमुळे शेतकरी बाजारपेठेशी संपर्क साधु शकेल. या सर्व सुविधांमुळे राहणीमानाचा दर्जा उंचावून ग्रामीण मागासलेपणा कमी होईल. साहजिकच ग्रामीण जीवनात चांगले बदल दिसून येतात.

**२) मानवी साधनसामग्रीचा विकास :**

शिक्षण, प्रशिक्षण, आरोग्य, पाणी इ. सोयी लोकांना पुरेशा प्रमाणात उपलब्ध असतील, दर्जेदार असतील तर लोकांमधील ज्ञान, कौशल्य व कार्यक्षमता वाढीस लागते. त्यामुळे उद्योग-व्यवसायात वाढ होऊन दारिद्र्याची समस्या कमी होते. आरोग्य सुविधांमुळे, पिण्याच्या शुद्ध पाण्यामुळे श्रमशक्ती सुदृढ व आरोग्य संपन्न राहील.

**३) शेती क्षेत्रातील प्रगती साध्य करण्यासाठी :**

ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये शेती क्षेत्राचे महत्त्वाचे स्थान असून शेतीचे आधुनिकीकरण करण्यासाठी ग्रामीण संरचना आवश्यक आहे. शेती विकासासाठी जलसिंचन यामध्ये ठिंबक सिंचन, तुषार सिंचन यासारख्या सुविधांमुळे कृषी उत्पन्नात वाढ झालेली असून येते. वीज पुरवठ्यामुळे विद्युत पंपाचा वापर करता येते. शेतमाल विक्रीसाठी, मालाला योग्य किंमत प्राप्त होण्याकरिता बाजारपेठा, वाहतूक व दळणवळण साधनांची आवश्यकता असते. त्यामुळे कृषीक्षेत्राची प्रगती साधता येते.

**४) रोजगार निर्मितीस चालना :**

आर्थिक विकासासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर होणे आवश्यक असते. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या विकासासाठी मानवी साधनसामग्रीही महत्त्वाची असते. शेती, उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी कार्यक्षम व दर्जेदार मनुष्यबळाची आवश्यकता असते. मानवी साधनसामग्रीच्या विकासासाठी दर्जेदार शैक्षणिक सुविधा, वैद्यकिय सुविधा, पाणीपुरवठा सुविधा, पोषण आहाराची आवश्यकता असते. याबरोबरच वीज, वाहतूक, दळणवळण, बाजारपेठा, वित्तीय सेवा इ. मुळे ग्रामीण भागात शेतीबरोबरच उद्योग व्यवसायातही वाढ होऊ शकते. शेतमालावर आधारित प्रक्रिया उद्योग स्थापन झाल्यास ग्रामीण भागातही औद्योगिकरणास चालना मिळेल. साहजिकच स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होऊन बेकारीची समस्या सुटू शकेल.

**५) आर्थिक पातळी उंचावण्यास मदत :**

कृषी उत्पादनात वाढ झाल्यामुळे तसेच ग्रामीण औद्योगिकरणाला चालना मिळाल्यामुळे आर्थिक विकास होण्यास मदत होईल. शेती क्षेत्र व उद्योग क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध

munotes.in

होतील. साहजिकच ग्रामीण जनतेच्या उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक पातळी उंचावण्यास मदत होईल. जनतेच्या उत्पन्नात वाढ झाल्यामुळे दारिद्र्यातही घट दिसून येईल.

**६) उत्पादन घटकांच्या गतिशीलतेमध्ये वाढ :**

ग्रामीण भागात जर संरचनेचे योग्यप्रकारे विकसन झाले असेल तर विविध प्रदेश वाहतूक साधनांनी व प्रसार माध्यमांनी जोडले जाऊ शकतात. यामुळे बाजार विषयक, उत्पादनविषयक माहिती, विचारांची देवाण घेवाण जलद गतीने होईल. शेती व उद्योग क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने वाहतूक व्यवस्था फार महत्त्वाची असून कार्यक्षम व किफायतशीर वाहतूक व्यवस्थेमुळे शेती व उद्योगधंद्याच्या प्रगतीला हातभार लागतो. रोजगार, भांडवल इ. घटकांची माहिती उपलब्ध झाल्यामुळे श्रम भांडवल यांच्या गतीशीलतेत वाढ दिसून येईल.

**७) सामाजिक व सांस्कृतिक विकासात वाढ :**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेवर देशातील सामाजिक परिस्थितीचा प्रभाव दिसून येतो. सामाजिक परंपरा, विचार प्रवाह, सामाजिक रचना यांचा प्रभाव उद्योग व्यवसायावर पडत असतो. जुनीप्रथा, धर्माचा प्रभाव, अंधश्रद्धा व अज्ञान अशा गोष्टी ज्या समाजात आहेत तो समाज विकासाच्या बाबतीत मागे राहतो. पायाभूत संरचनेमुळे वाहतूक व दळणवळणांच्या सुविधांमध्ये विकास होतो. यामुळे आचारविचारांची देवाणघेवाण, संस्कृतीचे आदानप्रदान शक्य होते. विविध प्रदेशातील संस्कृती, चालीरिती, उत्पादन पद्धती यांची माहिती मिळते.

सांस्कृतिक वातावरण जर चांगले असेल तर विकासाची प्रक्रिया वेग घेते.

वरील प्रमाणे खेडेगाव ते देशाचा विकास हा तेथील उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांवर अवलंबून असतो. ग्रामीण भागाचा विकास झाला. तरच खऱ्या अर्थाने राज्याचा आणि देशाचा विकास होईल, परंतु आजही खेडेगावात पुरेशा पायाभूत सुविधा उपलब्ध नाहीत. परिणामी ग्रामीण भागाच्या विकासाची गती मंद असलेली दिसून येते. राज्याच्या प्रगतीमध्ये विद्युत ऊर्जेला अनन्यसाधारण महत्त्व असतानाही आजही ग्रामीण भागातील नागरिकांना मात्र विजेच्या संकटाचा सामना करावा लागतो. जलसिंचनाचा फायदाही ठराविक शेतकऱ्यांनाच होत असून सामान्य शेतकरी लाभापासून वंचित राहिलेले दिसून येतात.

## ५.५ वाहतूक व दळणवळण

**प्रस्तावना :**

ग्रामीण भागाच्या विकासासाठी वाहतूक, दळणवळण, पाणीपुरवठा अशा विविध पायाभूत सुविधांची आवश्यकता असते. वाहतूक व्यवस्थेच्या अभावामुळे आर्थिक विकासालाही मर्यादा येतात. शेती, उद्योग, व्यापार अशा क्षेत्रांच्या दृष्टीने वाहतूक व दळणवळण सुविधा महत्त्वपूर्ण ठरतात. प्रवाशांची वाहतूक, कच्च्या-पक्क्या मालाची ने-आण, व्यापार व कारखानदारीच्या विकासासाठी वाहतूक व्यवस्था आवश्यक असते, वाहतूक साधनांबरोबरच विकासासाठी संपर्क साधने देखील महत्त्वपूर्ण आहेत. संपर्क साधनांमुळे माहितीची देवाणघेवाण होते. दळणवळणाच्या साधनांमुळे बाह्य जगाशी प्रत्यक्ष संपर्क प्रस्थापित होऊ शकतो. तसेच प्रचलित घडामोडींची माहिती उपलब्ध होते.

वाहतूक व दळणवळणाच्या क्षेत्रातील प्रगतीमुळे अर्थव्यवहाराला गती मिळते आणि त्यातून आर्थिक विकासाच्या प्रक्रियेलाही गती मिळते. वाहतूकीमुळे बाजारपेठांचाही विस्तार होत असून आर्थिक विकासाला चालना मिळते.

**वाहतूक - संकल्पना :**


वाहतूक म्हणजेच एका स्थानापासून दुसऱ्या स्थानाप्रत माणसे व माल हलविण्याची क्रिया किंवा कृती होय. माणसांना इष्ट त्या स्थळी जाण्याची गरज वा इच्छा असल्यास त्यास्थळी पाठविणे वा नेणे तसेच त्यांना आवश्यकता वा गरज भासणाऱ्या वस्तूंची वा मालाची पोच वा पाठवणी करणे ह्या गोष्टी वाहतूकीमुळे शक्य होतात. वाहतूकीविना व्यापार शक्य नाही. व्यापाराशिवाय गावे वा शहरे बसणे शक्य नाही. परंपरेने गावे व नगरे (शहरे ही सांस्कृतिक केंद्रेच समजण्यात येतात. म्हणूनच एक प्रकारे वाहतूक ही संस्कृतीची माता वा जननीच मानावयास हवी.

विविध देश वा राष्ट्रांचा इतिहास पाहिला असता असे आढळून येते की, वाहतुकीची प्रगती सतत मंद व अत्यंत अवघड अशीच होत आली आहे. प्रागैतिकहासिक काळापासून लोक मुख्यतः पायीच प्रवास करीत. ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणाकडे माल आपला पाठीवरुन, डोक्यावरुन अथवा जमिनीवरुन ओढत वा ढकलत नेत असत. इ.स.पू. ५००० वर्षाच्या सुमारास, लोक ओझी वाहून नेण्याकरता प्राण्यांचा वापर करु लागले. इ.स.पू. ३००० वर्षाच्या सुमारास, चार चाकांची गाडी तसेच शिडांची गलबते यांचा शोध लागला.

इंजिनामुळे गतिमान झालेल्या वाहनांचा शोध सतराव्या शतकाच्या जवळजवळ शेवटी व अठराव्या शतकाच्या प्रारंभीच्या दशकात लागल्याचे आढळते. हा विकास म्हणजे वाहतूक क्षेत्रातील क्रांतीचा आरंभ टप्पा असून सद्यस्थितीत जेट विमानाने माणसांना जवळजवळ ध्वनीच्या वेगाने अथवा त्याहूनही अधिक वेगाने एका ठिकाणाहून अन्य ठिकाणी जाता येते.

**वाहतूकीचे प्रकार**

| जमिन | जल | वायू |
|---|---|---|
| रस्ते, लोहमार्ग | जलमार्ग | हवाई मार्ग |
| मोटारगाड्या, आगगाड्या, ट्रक | जहाजे, आगबोटी | विमाने |



**१) रस्ते वाहतूक :**

स्थानिक पातळीवर जलद, स्वस्त, नियमित अशा प्रवासी व मालवाहतूकीसाठी रस्ते व मोटार वाहतूक महत्त्वपूर्ण ठरते. शेतीच्या संदर्भात रस्ते वाहतूक अति महत्त्वाची ठरते. लष्करी सामर्थ्य व तयारीसाठीही रस्ते वाहतूक अतिमहत्त्वाची असते. ग्रामीण विकासामध्येही रस्ते महत्त्वपूर्ण असून रस्ते ग्रामीण भागात आतपर्यंत जातात. तसेच दुर्गम प्रदेशात देखील रस्ते बांधता येतात. रस्त्यांच्या सहाय्याने लहान खेडी एकमेकांस जोडली जातात. शेतमाल, भाजीपाला, दूध अशा मालाची वाहतूक मोटारीतून करता येते.

भारतीय रस्त्याचे वर्गीकरण राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, ग्रामीण रस्ते असे केले जाते. राष्ट्रीय महामार्ग मोठ्या शहरांना जोडतात. प्रत्येक राज्यांतर्गत राज्यमार्ग, जिल्हा व ग्रामीण रस्ते येतात. भारतातील रस्ते प्रवासी वाहतुकीचे बहुतेक सर्व राज्यांतून राष्ट्रीयीकरण झाले आहे. त्यासाठी राज्य परिवहन महामंडळाची स्थापना झाली आहे. रस्ते वाहतुकीच्या बाबतीत केंद्र सरकार व राज्यसरकारच्या पातळीवर उत्पादन शुल्क, मोटार स्पिरीट टॅक्स, मोटार व्हेईकल टॅक्स असे विविध कर गोळा केले जातात. या करांच्या काही भांगातूनच जागतिक बँकेच्या मदतीच्या जोरावर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व तशाच इतर काही रस्ते विकास संस्था अशा व्यवस्था निर्माण करण्यात आल्या आहेत.

भूपृष्ठीय वा जमिनीवरील वाहतूक ही सर्वाधिक स्वरुपात केली जाणारी वाहतूक मानली जाते. भूपृष्ठ वाहतुकीमध्ये मोटारगाड्या, बसगाड्या, मोटारसायकली, नळमार्ग, बर्फावरील घसरगाड्या, आगगाड्या (रेल्वे) तसेच ट्रक यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

मोटारगाड्या, बसगाड्या व मालवाहतूक गाड्या (ट्रक) ही प्रामुख्याने रस्त्यावरुन धावणारी वाहने होत. ज्या भागात रस्त्यांचे चांगले जाळे पसरलेले असते, त्या प्रदेशात या वाहनांमुळे अनेक प्रकारच्या वाहतूक सुविधा पुरविल्या जाणे शक्य होते. लोकांना सोयीस्कर वेळेत व अतिजलद मार्गाने मोटार गाड्यामधून प्रवास करता येतो. बस गाड्यांच्यायोगे शहरामधील तसेच शहरांच्या अनेक भागांमधून प्रवाशांना प्रवास करणे शक्य व सोयीचे होते. अनेक लोक आपल्या घरांतून कामाच्या जागीच पुन्हा घरी मोटार सायकली तसेच स्कूटर वा जलद वाहनांद्वारे प्रवास करतात.

महाराष्ट्रात २०११-१२ अखेर सर्व प्रकारचे मिळून २,४२,९११ कि.मी. लांबीचे रस्ते आहे.

तक्ता क्र. १ महाराष्ट्रातल्या रस्त्याची विभागवार लांबी (२०११-१२) (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदेच्या अखत्यारित असलेल्या)

| विभाग | लांबी किमी |
|---|---|
| कोकण | २६,१५९ |
| पश्चिम महाराष्ट्र | ५४,०१० |
| खानदेश व उत्तर महाराष्ट्र | ४७,२६४ |
| मराठवाडा | ५३,७३७ |
| विदर्भ | ६१,७१९ |
| एकूण | २,४२,९१९ |

munotes.in

**२) लोहमार्ग :**

वाहतूकीच्या मार्गामधील लोहमार्ग हा महत्त्वपूर्ण मार्ग आहे. कच्चे खनिज, खनिज तेल, खाद्यतेल, शेतमाल अशा विविध प्रकारच्या अवजड माल वाहतूकीस व प्रवासी वाहतूकीच्या दृष्टीने लोहमार्ग अतिशय उपयुक्त आहेत. रस्त्यापेक्षा रुळांवरुन जाणारी वाहतूक ही अधिक सुरक्षित, जलद आणि विश्वासार्ह असते. आज महाराष्ट्रातल्या मोठ्या शहरांना जोडणारे रेल्वे मार्ग उपलब्ध असले तरी ग्रामीण भागाच्या अंतर्गत तसेच अतिदुर्गम भागात लोहमार्गच नाहीत. गेल्या अनेक वर्षामध्ये महाराष्ट्रातील दुर्गम गावे, नव्याने वाढलेली शहरे, औद्योगिक वसाहती पर्यंत रेल्वेसुविधा अजूनही पोहोचलेली नाहीत.

राज्यात पुरेसे लोहमार्ग, रेल्वेगाड्या अजूनही उपलब्ध केले गेले नसल्यामुळे रस्त्यांवरची माल व प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. जी खर्चिक सुद्धा आहे व प्रदूषणात भार घालणारी देखील आहे.

महाराष्ट्रातील जी व्यापारी केंद्रे लोहमार्गांनी जोडली गेली आहेत त्या केंद्राना मात्र लोहमार्गाचा चांगला उपयोग झालेला दिसून येतो. कोकण रेल्वेमुळे बराचसा भाग लोहमार्गांशी जोडला गेल्यामुळे आंबा, फणस, काजू, नारळ यांची विक्री तसेच मत्स्य व्यवसाय, फलोद्योग, भाजीपाला इ. व्यवसायाचा विकास झालेला दिसून येतो. लोहमार्गामुळे रोजगार निर्मितीही झालेली दिसून येते.

**३) जलवाहतूक :**

जलवाहतूकीचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात.

१) अंतर्गत जलवाहतूक
२) किनाऱ्याची किंवा सागरी वाहतूक

जलवाहतूक ही सर्व वाहतूकीत स्वस्त असून या प्रकारात मार्ग बांधणीचा खर्च येत नाही. मालाची चढ-उतार करण्यासाठी मात्र बंदराची निर्मिती करावी लागते. स्वातंत्र्यापूर्वी भारतात फक्त सिंदीया स्टीम नेव्हीगेशन कंपनी ही एक जहाज वाहतूक कंपनी होती. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारताकडे फक्त ४२ जहाजे होती. भारताला ४,२०० किलोमीटरची किनारपट्टी लाभली असून महाराष्ट्रालाही सुमारे ७५० कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. तरीही जलवाहतूकीचे प्रमाण आणि चांगली बंदरे कमी होत चालली आहेत. कोकणपट्टीत पूर्वी स्वस्त आणि मस्त अशी जलप्रवासासाठी मुंबई ते गोवा, रत्नागिरी तसेच अलिबाग, मुरुड, रेवस, उरण येथे प्रवासी जलवाहतूकीचे प्रमाण मोठे होते. मात्र येथे सुधारणा न झाल्यामुळे जलवाहतुकीचे प्रमाण कमी होत चालले आहे.

सागरी जहाज वाहतुकीचे लष्करी महत्त्वही मोठे असते. जलवाहतूक ही इतर वाहतुकींच्या तुलनेने मंद गतीने होत असून पावसाळी व प्रतिकूल हवामानाचा परिणाम हा वाहतूकीवर होत असतो. वादळासारख्या नैसर्गिक आपत्तींना जलवाहतूकीस तोंड द्यावे लागते. वाहतुकीच्या इतर प्रकारांशी तुलना केल्यास जलवाहतुकीचे काही विशेष फायदेही आहेत. जलमार्गावरुन वाहने चालवण्यास रेल्वे व मोटार-वाहतुकीप्रमाणे मोठ्या प्रमाणात प्रेरक शक्तीची गरज भासत नाही व वाहनाच्या वजनाच्या कितीतरी पट वजनाचा माल वाहनातून दूरवर कमी

खर्चात नेता येतो. जलवाहतुकीमुळे बऱ्याच दूरदूरच्या देशांशी संपर्क ठेवून दळणवळण वाढविता येते व त्यामुळे आर्थिक व्यवहारांचे क्षेत्र बरेच व्यापक बनते.

वरील वाहतूक प्रकारांवरुन लक्षात येते की, ग्रामीण भागाचा आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणण्याकरिता वाहतूक साधने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. वाहतूक सुविधा योग्यप्रकारे उपलब्ध करुन दिल्यास ग्रामीण विकासास चालनाच मिळेल.

**दळणवळण व्यवस्था / संदेशवहन, प्रसारमाध्यमे :**


**संकल्पना :**

संदेशवहन ही संदेशाच्या देवाण-घेवाणीसाठी वापरली जाणारी संज्ञा आहे. आधुनिक संदेशवहन साधनांमुळे देशातील तसेच जगातील कोणत्याही ठिकाणी अल्पावधीत संपर्क साधणे शक्य होते. जगाच्या एखाद्या भागात घडणारी घटना काही क्षणांतच दूरचित्रवाणीच्या माध्यमातून अनेकांपर्यंत पोहचते. आधुनिक संदेशवहनाच्या सोयीद्वारे लिखित संभाषित तसेच दृश्यस्वरुपातील विचारांची देवाणघेवाण होते.

संदेशवहन म्हणजेच माहिती, संदेश व ज्ञान यांची आदानप्रदान होते. सद्यस्थितीतील कृत्रिम उपग्रहांद्वारेही संदेशवहन होत असल्यामुळे या क्षेत्रात क्रांती घडून आली आहे. संदेशवहनामुळे ग्रामीण विकासालाही चालना मिळाली आहे.

दोन किंवा अधिक स्थानांदरम्यान ताराद्वारे किंवा बिनतारी उपकरणाद्वारे ध्वनी, विद्युत चुंबकीय अथवा प्रकाशीय तरंगामार्फत माहिती, ज्ञान अथवा जाणीव प्रेषित या स्थलांतरित करण्याच्या क्रियेला मुख्यत्वे विज्ञानात संदेशवहन म्हणतात.

सर्वसामान्य भाषेत सांगायचे झाल्यास संदेशवहन ही घटनांची शृंखला आहे आणि संदेश हा या शृंखलेतील अर्थपूर्ण दुवा आहे.




**१) टपाल सेवा (पोस्टल व्यवस्था) :**

ब्रिटिशांच्या काळात सुरु झालेली पोस्टल व्यवस्था १९५०-५१ च्या दरम्यान देशभर पसरलेली होती. हे संदेशवहनाचे प्रभावी साधन असून भारतीय टपालसेवा ही भारतातील मध्यवर्ती सरकारच्या टपाल खात्यामार्फत इंडिया पोस्ट या ब्रँडनावाने चालविली जाते. देशभर पसरलेल्या एक लाख ५५ हजार ३३३ टपाल कार्यालयामार्फत चालणारा इंडिया पोस्टचा

munotes.in

(विकिपिडया) कारभार हे जगातील सर्वात मोठे जाळे होय. या खात्यामार्फत पत्रे, मासिक नियमितपणे ग्रामपंचायत कार्यालय, तसेच घरोघरी पोहचतात.

देशाच्या दूरवरच्या आणि पोचायला अत्यंत अवघड भागातही पसरलेल्या या टपालसेवेच्या जाळ्यामार्फत अल्पबचत व इतर वित्तीय सेवाही चालविल्या जातात. सध्या भारत सरकारचे उद्दिष्ट आहे की, प्रत्येक खेड्याच्या किमान ३ किलोमीटर अंतराच्या आत पोस्ट कार्यालय असावे. ५०० पेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या प्रत्येक खेड्यात पोस्ट पेटी असावी.

सद्यस्थितीत टपाल वाहतूक पृष्ठभागावरुन व हवाई मार्गाने होत असून पृष्ठभागावरील वाहतुकीसाठी लोहमार्ग, रस्ते, उंट, घोडे, सायकली, जहाजे या वाहतूक माध्यमांचा उपयोग करुन घेण्यात येतो. देशातील प्रमुख शहरे हवाई वाहतुकीने जोडली असल्याने त्याठिकाणीही प्रत्यक्ष हवाई डाकसेवा चालू असते. पोस्टल खात्याने अलिकडेच संगणकीकरण, मेट्रोचॅनेल लिंकिंग सर्व्हिस (६ मोठी शहरे), राजधानी चॅनेल लिंकिंग सर्व्हिस (सर्व राज्याच्या राजधानीशी दिल्ली जोडणे), स्पीटपोस्ट सेवा, पोस्टल लाईफ इन्शुरन्स, पोस्टल बचत सेवा या मार्गाने सेवा क्षेत्रात मुसंडी मारली आहे.

### २) तार विभाग :

संबंध जगातील सरकारी क्षेत्रातील लोकोपयोगी सेवा उद्योगांपैकी सर्वात जुन्या संस्थांमध्ये भारतीय तार विभागाचा समावेश करण्यात येतो. कलकत्ता ते बंदर असा भारतीय पहिला तारमार्ग १८५१ मध्ये सुरु करण्यात आला. ३१ मार्च १९८१ रोजी संबंध देशात मिळून ३४,०९६ तारघरे कार्यरत होती. जुलै २०१३ रोजी तारसेवा बंद झाली.

### ३) दूरध्वनी :

दूरध्वनी अथवा दूरभाषा (इंग्रजी टेलिफोन) ही दोन एकमेकांपासून दूर असलेल्या ठिकाणांमध्ये संवादद्वारा संपर्क साधणारी यंत्रणा आहे. या यंत्रणेचा सर्वांत प्राथमिक स्वरुपाचा शोध अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल याने इ.स. १८७६ मध्ये लावला. यानंतर इ.स. १८८२ मध्ये भारतातील टेलिफोनचे आगमन झाले. फोनची सुविधा ही रस्ते, वीज यासारखीच एक पायाभूत सुविधा असून उद्योगासाठी आवश्यक बाब आहे.

संदेशवहनामध्ये दूरध्वनी हे महत्त्वपूर्ण साधन मानले जात असून या साधनांद्वारे दुर्गम भाग देखील बाह्य जगाशी जोडला जातो. भारतात दूरसंदेशवहनामध्ये फार मोठी प्रगती झाली आहे. आधुनिक काळात मोबाईल (भ्रमणध्वनी) मुळे संपर्क साधणे सहज शक्य झाले आहे. ही सेवा स्वस्तात उपलब्ध होत असल्यामुळे संपूर्ण देशभरात कमी पैशांमध्ये व्यक्ती संपर्क साधू शकते. या साधनाचा फायदा सर्व वर्गाला झाला असून बाजारपेठेची माहिती त्यांना घरबसल्या उपलब्ध होत आहे.

### सार्वजनिक संदेशवहन साधने :

सार्वजनिक संदेशवहन साधनांद्वारे एकाच वेळी अनेक लोकांशी संपर्क साधणे शक्य होत असून आकाशवाणी, दूरदर्शन, उपग्रह तसेच वृत्तपत्र आणि मासिक यांचा यामध्ये समावेश होतो. समाजामध्ये सार्वजनिक संपर्क साधनांना अनन्यसाधारण महत्त्व असून धंदा, व्यापार विकास, प्रशासकीय सेवांचा विस्तार या सर्वांसाठी कार्यक्षम संपर्क यंत्रणा आवश्यक असते.

सद्यस्थितीत संपर्क यंत्रणेमध्ये नवनवीन माध्यमे उपलब्ध झाली असून त्यामुळे आर्थिक व्यवहार, प्रशासकीय सेवा, शिक्षण, करमणूक या क्षेत्रामध्ये क्रांती झाली असून वेगवेगळी माहिती दृतगतीने मिळविणे, ती माहिती साठवून तिचे वर्गीकरण करणे, त्या माहितीवर प्रक्रिया करणे, ती योग्य ठिकाणी ताबडतोब पोहोचवणे आता शक्य झाले असून त्यामुळे लोक जवळ येण्यास मदत झाली आहे. देशाचे संरक्षण, कायदा, सुव्यवस्था, शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योगधंदा अशा सर्व बाबतीमध्ये प्रगतीचे टप्पे केवळ संपर्क माध्यमांच्या विकासामुळे गाठले गेले आहेत.

जागतिक व राष्ट्रीय स्तरावरील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय घडामोडी, विकास कार्यक्रम जनतेपर्यंत पोहोचविणे, त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेणे हे सार्वजनिक संदेशवहनाद्वारे शक्य होत आहे.

**१) आकाशवाणी :**

आकाशवाणी हे जनसंपर्काचे प्रभावी साधन असून करमणूकीचे कार्यक्रम, वृत्तप्रसार, आरोग्य कुटुंब कल्याण इ. प्रसार, शेतकऱ्यांना मार्गदर्शन, हवामान, बाजारभाव यांची दैनंदिन माहिती, शिक्षण व प्रौढ शिक्षण यांच्या प्रसारासाठी आकाशवाणी हे माध्यम महत्त्वपूर्ण आहे.

ही सेवा उपलब्ध करुन देणे केंद्र सरकारच्या माहिती व नभोवाणी मंत्रालयाच्या अखत्यारित येत असते. तरी घटक राज्यांमधील केंद्राना कार्यक्रमांच्या निवडीस काही प्रमाणात स्वातंत्र्य देण्यात आले आहे. प्रादेशिक भाषामधील कार्यक्रमावर भर देऊन जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जातो.

आकाशवाणीवरील प्रक्षेपणाचा सुमारे ३८% वेळ संगीतासाठी असतो. तसेच उपशास्त्रीय, सुगमसिने लोकसंगीत, वाद्यवृंद जनसामान्यापर्यंत पोहोचण्यास आकाशवाणीचे माध्यम कारणीभूत ठरले आहे. याशिवाय नभोनाट्य, वृत्तनिवेदन, चालू घडामोडींवरील चर्चा, संथगतीतील बातम्या, संसद समालोचन, विज्ञानचर्चा, पुस्तक परिक्षण, कामगार, लहान मुले, विद्यार्थी, युवक, महिला, सैनिक, ग्रामीण जनता व शेतकरी वर्ग यासाठी विशेष कार्यक्रम आकाशवाणीवर असतात. देशातील लोकांसाठी २३ भाषा व ३५ आदिवासी उपभाषा यांमधून वृत्तनिवेदन केले जाते. विविध भारतीचे करमणूक कार्यक्रम मुंबई केंद्रावरुन प्रसारित होऊन राज्यात पुणे व नागपूर येथून पुनःक्षेपित होतात. १ नोव्हेंबर १९६७ रोजी मुंबई केंद्रावर व्यापार विभाग प्रथमच सुरु झाला असून त्यावर जाहिराती आणि प्रायोजित कार्यक्रम सादर केले जातात. तांत्रिक प्रगतीमुळे एफ.एम. आकाशवाणीचे मनोरंजन, शिक्षण व आरोग्य कार्यक्रम अधिक चांगल्याप्रकारे पोहोचले आहेत.

**२) दूरदर्शन :**

संदेशवहनाचे दृकश्राव्य साधन म्हणजे दूरदर्शन होय. मुंबईमध्ये २ ऑक्टोबर १९७२ रोजी दूरदर्शन केंद्र सुरु झाले. सध्या राज्यामध्ये मुंबई, नागपूर, येथून कार्यक्रमाचे प्रसारण व पुणे सोलापुर, नाशिक, औरंगाबाद, अहमदनगर, कोल्हापूर, सातारा, अमरावती येथून कार्यक्रमाचे पुनःक्षेपण होते. राज्यातील शहरी व ग्रामीण अशा दोन्ही लोकसंख्येला दूरदर्शनचा फायदा मिळतो.

दूरदर्शन हे जाहिरातीचे कार्यक्रम, युवादर्शन, कामगार विश्व, संगीत, चर्चा, प्रात्यक्षिके, सिनेमा नाटक, मुलाखती, खेळाचे सामने अशा तऱ्हेने दृश्य व श्राव्य माध्यमांद्वारे लोकांपर्यंत पोहोचते. नभोवाणी व दूरदर्शन यांचा समाजावर परिणाम निश्चितपणे होत असतो. समाजशिक्षण, प्रौढांसाठी कार्यक्रम, नागरिकांची कर्तव्ये, सामाजिक सुरक्षितता, सार्वजनिक आरोग्य, संगणक शिक्षण, प्रदूषण, योगाशिक्षण, विज्ञानकला, छंद, कुटुंब कल्याण, वृत्तसेवा, बधिरासांठी वृत्तसेवा, गुंतवणूकीसाठी सल्ला अशा विविध विषयांतून या माध्यमाने लोकसंपर्क साधला आहे. शालेय दुरवाणी व विद्यापीठ अनुदान आयोगासाठी केलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांचाही राज्यातील जनतेस लाभ मिळतो.

दिल्लीमध्ये १९५९ साली कार्यक्रमाद्वारे लोकशिक्षणाचे काम दूरदर्शनने प्रभावीपणे केल्याची नोंद अनेक जाणकारांनी दिली आहे. क्रिकेट, फुटबॉल, बॅडमिंटन, टेनिस, हॉकीचे सामने, क्रिडा स्पर्धा यांचा आस्वाद, दृश्य व श्रवण माध्यमातून होणे ही आधुनिक युगातील विशेष उपलब्धी आहे. शिक्षण प्रसार, करमणुकीची गरज व वाढते राहणीमान यामुळे दुरदर्शन या माध्यमाच्या अत्यंत जलद प्रसार होईल व पुढील काही वर्षे नभोवाणी व दूरदर्शनच्या वापरातील महाराष्ट्राची आघाडी कायम राहील. दूरदर्शनवरील कार्यक्रम दर्जेदार असल्याने राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यास मदत होते. चालू घडामोडीचे ज्ञान व माहिती बातम्यांमुळे लोकांना जलदगतीने मिळते. साक्षरता प्रसार व शेतीचे आधुनिकीकरण होऊन ग्रामीण विकासाला चालना मिळते. संपूर्ण जगही दूरदर्शनमुळे जवळ आलेले दिसून येते.

### ३) उपग्रह संदेशवहन :

उपग्रहाद्वारे संदेशवहन हा संदेशवहन तंत्रज्ञानातील महत्त्वाचा टप्पा आहे. बाहेरील देशांशी, दूरवाणी, टेलेक्स, रेडिओ, फोटो, आंतरराष्ट्रीय दूरदर्शन, रेडिओ कार्यक्रमांची देवाण-घेवाण या सेवा उपग्रहांमार्फत दिल्या जातात. त्यासाठी देशात दोन ठिकाणी डेहराडून (उ.प्रदेश येथे) व महाराष्ट्रात आर्वी येते (ता. जुन्नर) केंद्रे उभारण्यात आली आहेत. आर्वी येथील कृत्रिम उपग्रह केंद्र जगातील सर्वात मोठे असून त्यामुळे देशांतर्गत परदेशी बोटी, विमाने यामधील संदेशवहन सुलभ होते. हिंदी महासागरावर भूस्थितर केल्या गेलेल्या इंटरसॅट या उपग्रहामार्फत १५० देशांशी सध्या सपर्क साधला जातो. या साधनांमुळे हवामानविषयक माहिती उपलब्ध होते. तसेच कोणत्याही प्रदेशातील शेतजमीन, खनिज संपत्ती, वन व जलसंपत्तीची माहिती मिळविता येते.

### ४) संगणक :

मानवाच्या आचार-विचारांमध्ये क्रांतिकारक परिवर्तन संगणकामुळे झाले आहे. संगणक हे आज विविध क्षेत्रामध्ये विविध प्रकारच्या व्यक्ती समुहाद्वारे आणि विविध कार्यासाठी वापरले जाणारे यंत्र आहे. संगणकामध्ये संख्यात्मक व गुणात्मक माहिती संकलित करुन आवश्यकतेनुसार विविध ठिकाणी पोहोचविली जाते. कृषी व्यवसाय व उद्योग व्यवसाय, संशोधन, शिक्षण यामध्ये संगणकाचा वापर होतो. आधुनिक शेतकरी संगणक व इंटरनेटद्वारे आवश्यक ती माहिती संकलित करुन कृषी व्यवसाय व कृषी पूरक व्यवसायात बदल घडवून आणू लागले आहेत.

आज प्रत्येक क्षेत्रात संगणकाचा वापर केला जात असून संगणकामध्ये प्रचंड प्रमाणात माहिती संग्रहित करुन ठेवता येते व या संग्रहित करुन ठेवलेल्या माहितीमधून एखादी माहिती

आपल्याला पाहिजे असेल तर लगेच संगणक आपल्यासमोर ठेवता, उद्योगधंदे, व्यापार, बँक, कॉलसेंटर, शेअर मार्केट, हॉस्पिटल, शाळा, महाविद्यालये, टिकिट रिझर्वेशन इ. खूप क्षेत्रात संगणकाचा उपयोग होतो.

**५) इंटरनेट :**

१९६९ मध्ये अमेरिकेने अनुदान दिलेल्या एका प्रोजेक्टरने इंटरनॅशनल संगणक नेटवर्क विकसित केले. जगातील छोट्या नेटवर्कला जोडणारे नेटवर्क म्हणजे इंटरनेट होय. १९९२ मध्ये स्लिझलंड येथे सेंटर फॉर उरोपिन न्यूक्लिअर रिसर्च मधून वेब अर्था वर्ल्ड वेब आपल्या पर्यंत पोहचले. ह्याच पूर्वी इंटरनेट म्हणजे ग्राफिक्स, एनीमेशन, ध्वनी, व्हिडीओ इंटरफेस नसलेले माध्यम होते. वेबमुळे ह्या सर्व गोष्टी नेटवर पहाणे शक्य झाले आहे. आणि इंटरनेट २१ व्या शतकातील एकमेकांच्या संपर्काच प्रभावी साधन बनले आहे. इंटरनेटद्वारे केली जाणारी एक लोकप्रिय बाब म्हणजे तुम्ही ईमेलच्याद्वारे कुठल्याही जगातील व्यक्तिशी संपर्क साधू शकता. आवडीच्या विषयावर चर्चा करण्यासाठी भाग घेवू शकतो. इतकेच नाही तर स्वतःच वेब पेज म्हणजेच वेब साईट बनवू शकतो.

इंटरनेटच्या माध्यमातून आपण शॉपिंगही करु शकतो किंवा एखादी वस्तू विकूही शकतो. बाजारात आलेल्या नवीन वस्तूंची माहिती नेटमुळे आपल्याला बघायला मिळते. इलेक्ट्रॉनिक्स कार्ड किंवा डेबिटकार्ड वापरुन आपण ती वस्तू खरेदीही करु शकतो. एखाद्या विषयावर माहिती शोधणे इंटरनेटमुळे शक्य झाले असून जगातील कुठल्याही वस्तूची अथवा गोष्टीची माहिती हवी असल्यास ती माहिती आपणास इंटरनेटमुळे मिळू शकते. शिवाय इ-बुक मुळे कुठल्याही ग्रंथालयाची बुक्स, पुस्तके आपणास नेटवर फ्री मध्ये वाचावयास मिळतात. शिवाय ऑनलाईन न्यूजही वाचायला किंवा व्हिडीओद्वारे बघायला मिळतात. इंटरनेटवर माहितीचा खजिनाही भरपूर असून संगीत, चित्रपट, मासिक तसे आता ऑनलाईन चित्रपटही आपण नेटवर पाहू शकतो. सध्या ऑनलाईन गेम्सही नेटवर उपलब्ध आहेत.

**६) वृत्तपत्रे व मासिके :**

वृत्रपत्रातून जनमत तयार होत असल्यामुळे जनमत प्रभावी ठेवण्याचे व प्रचाराचे उत्तम साधन वृत्तपत्र मानले जाते. वृत्तपत्रांच्या माध्यमातून सरकारी धोरणाचा प्रचार व प्रसार केला जात असून सरकारी क्षेत्रातील उपक्रम, राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्या प्रचारयंत्रणेत सुसूत्रता राखण्याचे काम या विभागामार्फंत केले जाते. लोकशाहीचा आधारस्तंभ वृत्तपत्र असून याद्वारे दैनंदिन घडामोडीबरोबरच आरोग्य, कृषी, शिक्षण, कला, क्रिडा, कुटुंबकल्याण यांचे महत्त्व, त्यांच्या बद्दलची माहिती मिळते. सर्व लोकांपर्यंत संपर्क साधण्याचा हा प्रभावी मार्ग असून महाराष्ट्रात मराठीबरोबरच बहुतेक सर्व राष्ट्रीय भाषांमध्ये, उपभाषांमध्ये व अनेक विदेशी भाषांमध्ये नियतकालिके, वृत्तपत्रे प्रसारित होतात.

नियतकालिकांच्या प्रसाराच्या बाबतीत देशात उत्तर प्रदेशाचा क्रम पहिला, दिल्लीचा दुसरा व महाराष्ट्राचा क्रम तिसरा लागतो. टपाल सुविधेमुळे ग्रामपंचायतीमध्ये शेतकरी, कृषी उद्योगसंवादिनी, पंचायतभारती यासारखी मासिके पोचतात, शेतीचे आधुनिकीकरण, पिकांची लागवड, फेरपालट, पूरक व्यवसायाचे महत्त्व, उद्योग व्यवसायाची माहिती, बाजारपेठांविषयी माहिती, सहजासहजी मासिकांमधून उपलब्ध होते. या व्यतिरिक्त पंचायत संस्थांचे अधिकार,

पदाधिकारी व सदस्यांची भूमिका, महिलांचा सक्रिय सहभाग, ग्रामसभेचे अधिकार यासारखी महत्त्वपूर्ण माहिती पंचायत भारतीय यासारख्या मासिकातून उपलब्ध होते.

**७) चित्रपट :**

देशातील चित्रपट व्यवसाय, मुंबई, कलकत्ता व मद्रास येथे असून राज्यात या व्यवसायात कोट्यावधी रुपयांची उलाढाल होते. कार्टून, बालपट, अनुबोधपट यांच्या सहाय्याने या माध्यमाचा उपयोग होतो. चित्रपटाद्वारे करमणूकी बरोबरच प्रबोधनही केले जाते. पुणे येथे फिल्म व टेलिव्हिजन इन्स्टिटय़ूट आहे तेथे अभिनय संकलन, छायाचित्रण, ध्वनीमुद्रण यांचे पदविका शिक्षण दिले जाते.

**८) नाटक, किर्तन, लोककला :**


नाटक, किर्तन, लोककलांद्वारे माहितीचा प्रसार, लोकशिक्षण व करमणूक अशी तीनही उद्दिष्टे साध्य होतात. किर्तन, नाटकाद्वारे कुटुंबकल्याण, आरोग्य, शिक्षणाचे महत्त्व याचा प्रसार यशस्वीपणे करता येतो. जनजागृती करता येते. लोककलांद्वारे संस्कृतीची जोपासना करता येते.

## ५.६ पिण्याचे पाणी आणि स्वच्छता

**प्रस्तावना :**

पाण्याविना पृथ्वीवर मानवी जीवनाची कल्पनाही करता येत नसून पाण्याला जीवन असे दिलेले नाव सार्थच आहे. सर्व सजीवांचे जीवनच पाण्यावर अवलंबून असून मानवाची पाण्याची गरज मानवी जातीच्या उत्क्रांतीपासूनच आहे. मानवी शरीरालाच नव्हे तर मानवी उत्क्रांतीसाठी, भरभराटीसाठी व प्रगतीसाठी पाणी आवश्यकच आहे. भारतासारख्या कृषिप्रधान देशाच्या दृष्टीनेही जलसाधन सामग्री अतिशय महत्त्वाची आहे.

munotes.in




## १) शेतीसाठी पाणीपुरवठा :

शेतीसाठी पाणीपुरवठा महत्त्वाचा असून शेतीची उत्पादकता जास्त राहण्यासाठी शेतीला योग्य प्रमाणात पाणीपुरवठा होणे आवश्यक आहे.

## २) पिण्याचे पाणी :

शरीरातील पाण्याचे प्रमाण १०% हून कमी झाले तर कोणताच सजीव जिंवत राहू शकत नाही. मानवी शरीर अन्नाशिवाय काही आठवडे जिवंत राहू शकतो पण पाण्याशिवाय ७ दिवसांपेक्षा जास्त दिवस तो जगूच शकत नाही. पाणी ही माणसाची मुलभूत गरज आहे. मनुष्याला फक्त पिण्यासाठीच नव्हे तर आंघोळीसाठी, मलमूत्र विसर्जनावेळी, कपडे धुण्यासाठी, भांडी धुण्यासाठी म्हणजेच अनेक नित्योपयोगी गोष्टींसाठी पाणी आवश्यक असते.

## ३) उद्योगांना पाणीपुरवठा :

उद्योगानाही उत्पादन कार्यात पाण्याची आवश्यकता असून अनेक उत्पादन धारकात पाणी हा महत्त्वपूर्ण घटक असते. काही ठिकाणी स्वच्छता राखण्यासाठी व उद्योगाच्या परिसरात बागाविकसित करण्यासाठी पाणीपुरवठा आवश्यक असतो.

## ४) विद्युतनिर्मिती :

भारतात अनेक मोठी धोरणे बांधलेली असून यातून शेतीला पाणीपुरवठा तर होतोच शिवाय धरणातील पाणीसाठ्याचा उपयोग विद्युतनिर्मितीसाठीही केला जातो.

**५) मत्स्यपालन :**


सागर किनाऱ्यावर मासेमारी हा महत्त्वाचा व्यवसाय चालत असून त्याचबरोबर इतरत्रही पाणीसाठा करुन मत्स्य व्यवसाय केला जातो.

**६) वाहतुकीसाठी उपयोग :**

जलसाधनसामग्रीचा उपयोग अंतर्गत व किनारी वाहतुकीसाठी होतो. भारतात ५,२०० किमी लांबीचे नदीमार्ग उपलब्ध असून गंगा, ब्रह्मपुत्रा, गोदावरी, कृष्णा, नर्मदा वगैरे नद्यांमधून जलवाहतूक चालते. तर भारताला ५,७०० किमी लांबीची किनारपट्टी लाभली आहे. भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार मोठ्याप्रमाणावर सागरमार्गे चालतो.

अश्याप्रकारे जलसाधनसामग्री मानवी जीवनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असून दिवसेंदिवस वाढती लोकसंख्या, मोठ्याप्रमाणात औद्योगिकीकरण, जंगलतोड, जलप्रदूषण, कमी पाऊस, जलस्त्रोत, उपलब्ध जलसाठ्यांचा गैरवापर यांच्यामुळे पाण्याची टंचाई जाणवत आहे व हा गंभीर प्रश्न बनला आहे. पाणी टंचाई हा प्रश्न मनुष्यच सोडवू शकतो. जर प्रत्येक व्यक्ती पाण्याचे महत्त्व समजून त्याचा सांभाळून उपयोग करेल तर मग कधीही पाण्याची कमतरता भासणार नाही.

**पाण्याचे स्त्रोत / पाणी उपलब्ध करुन देणारी साधने :**




पावसाच्या पाण्याव्यतिरिक्त वरील साधनांद्वारे पाणी उपलब्ध होते.

**पाण्याची स्वच्छता :**

नद्या, विहिरी, ओढे, तळी इ. पासून आपल्याला पाणी मिळते. परंतु हे पाणी पिण्यास योग्य असतेच असे नाही. जमिनीवरील पाण्यात अनेक सुक्ष्म जीवजंतू व शरीराला घातक अशी रसायने मिसळलेली असतात. नदीकाठी, विहीरीजवळ काही ठिकाणी जनावरे धुणे, कपडे धुणे, भांडी घासणे इ. कामे केली जातात. शिवाय त्यामध्ये पालापाचोळा, धूळ वगैरे पडतच असते. त्यामुळे पाणी वारंवार दूषित होत असते. अशा पाण्यामुळे अतिसार, पटकी, विषमज्वर, कावीळ यासारखे घातक आजार होऊ शकतात. अनेकांना माहिती नसत की वरवर स्वच्छता दिसणाऱ्या पाण्यामध्ये सुद्धा नुसत्या डोळ्यांना न दिसणारे अनेक जंतू असू शकतात. म्हणूनच पाणी वापरण्यापूर्वी पिण्यायोग्य म्हणजेच शुद्ध करुन घेणे अत्यंत गरजेचे आहे. ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची स्थिती गंभीर आहे. अनेक गावांमध्ये वाड्यांमध्ये जनतेला शुद्ध पाणी मिळतच नाही.

**पिण्याच्या पाण्याची स्वच्छता राखण्याचे उपाय :**

१) पिण्याचे पाणी आणण्यासाठी नेहमी स्वच्छ भांडी वापरावी, भांडी दररोज साफ करावीत, पाणी भरताना चारपदरी फडक्याने गाळून घ्यावी.

२) भांडी भरल्यावर त्यावर झाकण ठेवावे.

३) भांड्यातले पाणी पिताना पाण्यामध्ये अस्वच्छ हात बुडवले तर पाण्यात जंतू मिसळतात व वाढतात. म्हणूनच भांड्यातून पाणी काढण्यासाठी लांब दांड्यांचे भांडे वापरावे. पाणी पिण्यासाठी स्वच्छ पेला, तांब्या वापरावा.

४) साथीच्या दिवसांत पाणी उकळून प्यावे, पाणी कमीतकमी २० मिनिटे उकळून प्यावे म्हणजे त्यातील रोगजंतू मरतात.

५) पाण्याच्या भांड्यामध्ये सुकलेल्या शेवग्यांच्या शेंगाच्या बिया टाकल्यास रोगजंतू त्याला चिकटून त्या बिया तळाशी बसतात.

६) शक्यतो हातपंपाचे पाणी, पायऱ्या नसलेल्या विहिरीचे पाणी पिण्यासाठी वापरावे किंवा सार्वजनिक विहिरीत टी.सी.एल. टाकून ते पाणी पिण्यासाठी वापरावे. परंतु तिथे दररोज घाण होणार नाही याची काळजी घ्यावी.

७) आपण ज्यावेळी सार्वजनिक ठिकाणी जातो अशावेळी शक्यतो पाणी पिण्याचे टाळावे. कारण लग्न, धार्मिक समारंभ, शाळा, कॉलेज, यात्रा मेळावे, अशा ठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाहिजे तेवढी काळजी घेतली जात नाही.

८) शक्य असेल तेव्हा पाणी शुद्ध करण्यासाठी क्लोरीनयुक्त गोळ्यांचा वापर करावा.

९) दररोज उकळून पाणी पिणे शक्य होत नसेल तर किमान आजारी माणसाला उकळून गार केलेले पाणी पिण्यास द्यावे.

१०) उन्हाळ्यात पाण्याची टंचाई भासते, अशावेळी मिळेल त्या ठिकाणावरुन लोक पाणी पिण्यासाठी आणतात. त्यामुळे ते पाणी पिण्यास योग्य असतेच असे नाही. त्यामुळे त्याची खात्री करावी.

११) घरगुती पाणी पिण्यासाठी टाकीचा वापर होत असेल तर ती स्वच्छ धुतलेली पाहिजे. त्यावर झाकण ठेवलेले पाहिजे.

१२) सार्वजनिक ठिकाणच्या टाकीची व्यवस्था ठेवण्यासाठी ग्रामपंचायत किंवा कर्मचारी वर्ग यांनी दक्षता घेतली पाहिजे. ती आठवड्यातून एकदातरी साफ केलीच पाहिजे.

१३) नळाद्वारे पाणी पुरवठा होत असेल तर पाईप लाईन कुठे फुटलेली आहे किंवा नादुरुस्त झाली आहे का ते पाहून लगेच दुरुस्त करुन घेतली पाहिजे म्हणजे पाण्यामध्ये घाण मिसळणार नाही.

**व्यक्तिगत व सार्वजनिक स्वच्छता :**

आपले आरोग्य निरोगी राहण्यासाठी स्वच्छ व शुद्ध पाण्याबरोबर व्यक्तिगत व परिसर स्वच्छता देखील महत्त्वपूर्ण आहे. आपल्याला होणारे अनेक रोग हे व्यक्तिगत स्वच्छता न केल्यामुळे निर्माण होतात. परजीवी जंतू, कृमी, खरुज, कोड, दात किडणे, अतिसार, हगवण इ.

विकार व्यक्तिगत स्वच्छता न पाळल्याने होतात. स्वच्छतेचं पालन केल्याने सर्व रोग टाळता येऊ शकतात.

**व्यक्तिगत स्वच्छता पुढीलप्रमाणे करता येईल.**

१) दिवसातून दोन वेळा नियमितपणे दात घासणे कोणताही खाद्यपदार्थ खाल्यावर स्वच्छ पाण्याने चुळ मारणे व स्वच्छ पाण्याने साबण लावून आंघोळ करणे.

२) शौच व मूत्र विसर्जनानंतर, संबंधित अवयव स्वच्छ पाण्याने धुवावेत व ते नेहमी स्वच्छ ठेवावेत. तसेच आपले हातही साबणाने धुवावेत.

३) एकमेकांचे कपडे न वापरता स्वच्छ व धुतलेले कपडे वापरावेत.

४) पिण्याचे पाणी स्वच्छ असावे, उकळून, गरम करुन वापरावे, पिण्याच्या पाण्याची भांडी दररोज साफ करावी.

५) आपण काम करत असताना, अनेक रोगकारक जंतू नखांच्या फटीत आणि त्वचेवर राहतात. म्हणून प्रत्येक काम केल्यानंतर आणि विशेषतः स्वयंपाक करण्यापूर्वी आणि जेवण करण्यापूर्वी स्वच्छ पाण्याने हात धुतल्याने अनेक रोग टाळता येतात.

६) स्वच्छ व ताजे अन्न खावे.

७) भाज्या वापरण्यापूर्वी स्वच्छ पाण्याने धुवाव्यात.

८) घर स्वच्छ ठेवावे.

वरील प्रमाणे व्यक्तिगत स्वच्छतेबरोबरच सार्वजनिक स्वच्छतेसाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करता येतील.

आरोग्यसंपन्न किंवा निरोगी पर्यावरणीय परिस्थिती निर्माण करण्याची कृती किंवा प्रक्रिया म्हणजे सार्वजनिक स्वच्छता आहे. सार्वजनिक स्वच्छता हे सार्वजनिक आरोग्याचे एक महत्त्वाचे अंग असून सार्वजनिक स्वच्छतेत व्यक्तिगत स्वच्छताही अंतर्भूत असते. कारण व्यक्तिगत स्वच्छतेमुळे समाजाचे रोगांपासून रक्षण करण्याच्या कामाला मदत होते. पुढीलप्रमाणे सार्वजनिक स्वच्छता राखता येईल.

**१) सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावणे :**

घरातील स्नानगृह, स्वच्छतागृह, पाळीव जनावरांचे गोठे, कारखान्यांतून बाहेर पडणारे सांडपाणी, शेतीवाडी, उपहारगृहे, कार्यालयीन इमारती मधून येणारे सांडपाणी, तसेच पाऊस पडल्यावर रस्त्याच्या कडेला असलेल्या गटारांतून किंवा नळांमधून वाहणारे पाणी यामध्ये अनेक घातक रसायने किंवा टाकाऊ पदार्थ असतात. अशा सांडपाण्यामुळे आजूबाजूचा परिसर, वातावरण दूषित झाल्यावर त्याचा दुष्परिणाम आरोग्यावर होतो. डासांचे प्रमाण वाढून मलेरिया, डेंग्यूसारखे आजार होतात. तसेच हे दूषित पाणी समुद्रात किंवा जलाशयात सोडल्यास ते पाणीही दूषित होते. काहीवेळा अशा दूषित पाण्यामुळे जलचर प्राणी व वनस्पती मरतात. तसेच पाणीही पिण्याच्या दृष्टीने असुरक्षित होऊन पिण्यायोग्य राहत नाही. एवढेच नव्हे तर असे पाणी पोहणे, मासेमारी व इतर मनोरजंनाच्या दृष्टीनेही निरुपयोगी ठरते.

त्यासाठी या सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावणे गरजेचे असून ग्रामीण भागात अशा सांडपाण्याची संस्करणाची सोय नसते. अशा ठिकाणी प्रतिकूंड (सेप्टिक टँक) प्रणालीद्वारे घरगुती सांडपाण्याची विल्हेवाट लावता येते. या प्रणालीत सर्व प्रकारचे सांडपाणी भूमिगत व जलाभेदय टाकीत म्हणजेच पूतिकुंडात सोडतात. तेथे सांडपाण्यावर सूक्ष्मजीवांची क्रिया होते व सांडपाण्यातील बहुतेक घनपदार्थाचे अपघटन होते. त्यातून उत्सर्जित होणारे वायू बाहेर पडतात किंवा निचऱ्याच्या नळात जातात. नंतर द्रव व वायू टाकीच्या माध्यावरील निर्गमन मार्गावाटे बाहेर पडतात. टाकीचा निर्गमन मार्ग सामान्यपणे जमिनीपासून सु. ६० सें.मी. उंचीवर असतो. अपघटन न झालेले घन पदार्थ टाकीत खाली असतात. शेवटी ते तेथून काढून त्याची सुरक्षितपणे विल्हेवाट लावतात.

### २) मलमूत्र विसर्जन :

मलमूत्र विसर्जनासाठी शौचालयाचा वापर करणे गरजेचे असून "हांगणदारी मुक्त गावाची संकल्पना प्रभावीपणे राबविल्यास सार्वजनिक स्वच्छता राखण्यास मदत होईल. तसेच जनावरांच्या विष्ठेपासून गोबरगॅस, खते तयार करण्यासाठी जनावरांची विष्ठा साठवून त्यावर योग्य प्रक्रिया करणे आवश्यक आहे."

### ३) टाकाऊ पदार्थाची विल्हेवाट :

परिसर स्वच्छतेसाठी केरकचरा हा कचराकुंडीत टाकणे गरजेचे असून ह्या केरकचऱ्याचेही योग्यप्रकारे वर्गीकरण करणे आवश्यक आहे. यामध्ये ओला कचरा, सुका कचरा तसेच प्लॅस्टीक इ. घटक वेगवेगळे केल्यास त्या कचऱ्याचा योग्य वापर करता येतो. ओल्या कचऱ्यापासून खत तयार करता येत असून तसेच प्लॅस्टीक कचऱ्यावर प्रक्रिया करुन त्यापासून टिकाऊ रस्ता बनवता येऊ शकतो याचेच उदाहरण म्हणजे सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील वेंगुर्ले नगरपरिषदेमार्फत असे रस्ते बनविण्यात आलेले आहेत.

परिसर स्वच्छतेसाठी शासनाने "ग्रामस्वछता अभियान" राबविले असून त्यामुळे ग्रामीण जनतेला स्वच्छतेचे महत्त्व पटू लागले आहे.

### ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती :

ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती ही मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ४९ नुसार बनलेली प्रकल्पातील प्रमुख समिती आहे. प्रकल्पाची आखणी, नियोजन, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती करणेची जबाबदारी पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची आहे. तसेच या समितीचे नवीन नामकरण ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती असे आहे. या समितीच्या कार्यकक्षेत ग्रामपंचायत हद्दीतील सर्व गावे, वाडे वस्त्या येतील.

### समितीची रचना :

- सदर समितीची निवड ग्रामसभेमधून केली जाईल.
- या समितीमध्ये किमान १२ सदस्य, जास्तीत जास्त २४ सदस्य असतील.
- त्यातील किमान १/३ सदस्य ग्रामपंचायत सदस्यांतून निवडलेले असतील.
- या समितीत ५०% महिला सदस्यांचा समावेश असेल.

- गावपातळीवरील महिला मंडळ, युवा मंडळ, भजनी मंडळ, महिला बचत गट सहकारी संस्था इ. प्रतिनिधी असतील.
- प्रत्येक वॉर्ड किंवा वस्तीतील किमान १ प्रतिनिधी सदस्य म्हणून असेल.
- ३०% मागासवर्गीय असतील.
- ग्रामस्तरीय शासकीय / जि.प. / ग्रा. पं./ कर्मचाऱ्यांची आमंत्रित व सहकारी सदस्य म्हणून निवड करता येईल, पण त्यांना मतदानाचा अधिकार नसेल.
- पाणी अशुद्ध असल्याने शुद्धीकरणासाठी कार्यवाही करणे.

**ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या जबाबदाऱ्या / कर्तव्ये :**

१) ग्रामीण पाणीपुरवठा योजनांचे व्यवस्थापन, देखभाल, दुरुस्ती.

२) गावाच्या पाणीपुरवठा योजनेची अंमलबजावणी करणे.

३) पाणी शुद्धीकरणासाठी उपाययोजना करणे व दक्ष राहणे.

४) ग्रामपंचायत हद्दीतील परिसर स्वच्छता करणे, विहिरीचा गाळ उपसणे, सार्वजनिक विहिरीच्या परिसरात कपडे, भांडी, धुण्यास मनाई करणे.

५) कुटुंब कल्याण व पोषण कार्यक्रम

६) गावातील सुशिक्षित व काम करण्यास उत्सुक असणाऱ्या व्यक्तींची ग्रामपाणीपुरवठा कर्मचारी म्हणून नेमणूक करण्याची शिफारस ग्रामपंचायतीकडे करणे.

७) विधन विहिरीवर बसविण्यात आलेल्या हातपंपाची दक्षता घेणे त्याला प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतीस मार्गदर्शन करणे.

८) नळपाणीपुरवठा योजनेची दक्षता घेण्यासाठी ग्रामपंचायतीस मार्गदर्शन करणे त्याच्या कामाचे पर्यवेक्षण करणे.

९) पाण्याचे नमुने महिन्याच्या १५ तारखेस व ३० तारकेस नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्राकडे तपासणीसाठी पाठविणे.

**ग्रामीण पाणीपुरवठा कर्मचारी कर्तव्ये पुढीलप्रमाणे :**

१) गावातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या उदशवाची नोंद ठेवणे.

२) गावातील नळपाणीपुरवठा असल्यास पाणी वेळेवर सोडणे व सर्व वाड्या, वस्त्यांना पुरेशा प्रमाणात पाणी मिळेल याची खात्री करणे.

३) नळपाणीपुरवठा यंत्रणेतील किरकोळ बिघाड दुरुस्त करणे, पाण्याची दररोज ओ.टी. चाचणी घेणे, निष्कर्ष नोंदवहीत लिहिणे.

४) गावात पाणीपुरवठा विहिरी व हातपंपाद्वारे होत असल्यास पाणी शद्धीकरणासाठी टी.सी. एल. पावडर योग्य प्रमाणात टाकणे.

५) पाणीपट्टी वसुलीत ग्रामसेवकास मदत करणे.

**कुटुंब कल्याण व पोषण कार्यक्रमांतर्गत समाविष्ठ असलेले विषय :**

ग्रामआरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती कुटुंब कल्याण व पोषण कार्यक्रमाअंतर्गत पुढील विषय हाताळताना दिसून येते.

१) ठरलेल्या दिवशी ग्रामभेट.

२) गावातील ० ते ५ वर्षाखालील सर्व बालकांचे लसीकरण करणे.

३) समाजातील मुलीचे स्थान उंचावण्यासाठी चर्चा घडवून आणणे व उपाय सुचविणे. उदा. मुलींना शाळेत पाठविणे, १८ वर्षानंतर विवाह करणे इ.

४) जननी सुरक्षा योजना व सावित्रीबाई कल्याण योजनेचा लाभ मिळण्यासाठी पाठपुरावा करणे.

५) कुटुंब कल्याण कार्यक्रमामध्ये पुरुषांचा सहभाग वाढविणे.

६) कुपोषित बालकांना सकस आहार, आरोग्य सुविधा ई. उपाययोजनांवर चर्चा करणे.

**महाराष्ट्र शासनाने पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात घेतलेले महत्त्वपूर्ण निर्णय :**

ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांतर्गत शासनाने पाणीपुरवठा विषयक धोरणात दिनांक २७ जुलै २००० च्या शासन निर्णयाप्रमाणे ग्रामीण भागातील लोकसहभागावर आधारित, मागणी आधारित पाणीपुरवठा धोरण अवलंबिले आहे. २००१-१० पासून केंद्र शासनाने ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सुरु केला.

१) तसेच पाणीपुरवठा कार्यक्रम परिणामकारकरित्या राबविण्यासाठी व कार्यक्रमांमध्ये समन्वय साधण्यासाठी मंत्रालयीन पातळीवर "पाणीपुरवठा व स्वच्छता" हा स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात आला आहे.

२) ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमांतर्गत पाण्याच्या वापराचे दरडोई प्रमाण प्रतिदिन ४० लिटर्स एवढे आहे.

३) जिल्हा स्तरावर स्वतंत्र पाणीपुरवठा विभाग व उपविभागाची स्थापना.

४) पंधरा वर्षाची गरज विचारात घेऊन ग्रामीण पाणीपुरवठा योजना तयार करणे.

५) लाभार्थ्यांना योजनेच्या भांडवली खर्चाच्या दहा टक्के हिस्सा लोकवर्गणी म्हणून भरणे व देखभाल दुरुस्तीच्या शंभर टक्के खर्च लाभार्थ्याने करणे.

६) पाणी योजना आखणी व अंमलबजावणीमध्ये स्त्रिया व लोकांचा प्रत्यक्ष सहभाग घेणे.

७) योजना अंमलबजावणीसाठी ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची स्थापना करण्यात आली.

**मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम (MRDWP) :**

राज्यातील ग्रामीण भागातील दीर्घकालीन गरजांचा व आरोग्याचा विचार करुन ग्रामीण जनतेस पुरेसे व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता "मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम" या नावाखाली एक सर्वसमावेशक कार्यक्रम राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली

munotes.in

आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राज्यभरात सन २०१६ ते २०१९-२० या चार वर्षासाठी राबविण्यात येणार आहे.

**कार्यक्रमाची उद्दिष्टे :**

१) राज्यातील ग्रामीण जनतेस पुरेसे व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्द करुन देणे.

२) राज्यातील ग्रामीण भागात (गावे / पडव्या / वस्त्या) पाणीपुरवठा योजना राबविणे.

**कार्यक्रमाची व्याप्ती :**

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या धर्तीवर राबविण्यात येत असलेल्या "मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम" हा राज्यातील सर्व ग्रामीण भागास लागू राहील. नव्याने निर्माण होत असलेला अथवा निर्माण झालेल्या नगर पंचायती / नगरपालिका / नागरीक क्षेत्रासाठी हा कार्यक्रम लागू राहणार नाही.

**कार्यक्रमाचे वर्गीकरण :**

१) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत हाती घ्यावयाच्या नवीन योजना.

२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमा अंतर्गत बंद असलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन.

३) प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती.

**पाणी पुरवठा योजने अंतर्गत खालील पाणीपुरवठा योजना हाती घेता येतात.**

१) साधी विहीर

२) अस्तित्वातील विहीरींचे रुंदीकरण व खोलीकरण

३) विंघन विहीर (हातपंप)

४) लघुनळ पाणीपुरवठा योजना

५) शिवकालीन पाणी साठवण योजना

६) अस्तित्वातील योजनेची दुरुस्ती

७) योजना विस्तारीकरण

८) नवीन योजना

९) दुहेरी पंपावर आधारित योजना

वरीलपैकी कोणतीही योजना आपल्या गावासाठी राबवायची झाल्यास आपल्या तालुक्यातील उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग व गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांचेशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

munotes.in

**तांत्रिक मान्यता देण्याची कार्यपद्धती :**

योजनांच्या गावकृती आराखड्यास व अंदाजपत्रकास ग्रामसभेचा ठराव पारित झाल्यावर सक्षम प्राधिकरणांनी आधि तांत्रिक व नंतर प्रशासकीय मान्यता घ्यावी योजनांना तांत्रिक मंजुरीचे अधिकार पुढीलप्रमाणे -

१) रक्कम रु. ५०,००० लाखापर्यंत योजना - कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद

२) रक्कम रु. ५०,००० लाख ते रु. २.५ कोटीपर्यंत किंमतीच्या योजना - विभागीय अधिक्षक अभियंता

३) रक्कम रु. २.५ ते ५.०० कोटीपर्यंत योजना - मुख्य अभियंता, राज्य पाणीपुरवठा व स्वच्छता संस्था

४) रक्कम रु. ५ कोटीवरील योजना - सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सद्यस्थितीत अपुऱ्या, अनियमित पावसामुळे ग्रामीण भागात योग्य प्रमाणावर पाणी टंचाईची समस्या निर्माण होताना दिसून येते. अशावेळी शासन तातडीच्या पाणीपुरवठा योजना हाती घेते. ग्रामीण भागातील पाणी टंचाईची समस्या सोडविण्यासाठी व ग्रामीण जनतेला शुद्ध पाणी मिळण्याकरिता शासकीय पातळीवर महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेले दिसून येत असून शासनाची आताची भुमिका सहाय्यकर्ताची असून ग्रामपंचायतीना जास्तीत जास्त अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

## ५.७ विद्युतीकरण

ऊर्जा म्हणजे जीवन. जीवनक्रम अव्याहल चालू ठेवण्याचे कार्य ऊर्जा करते. मनुष्यप्राणी आणि वनस्पती यांचे पोषणासाठी तसेच उष्णता व प्रकाश निर्माण करण्यासाठी व यंत्रे चालविण्यासाठी ऊर्जेची गरज असते. ऊर्जा अर्थात विजेचे महत्त्व अनन्यसाधारण असून देशाच्या प्रगतीसाठी ऊर्जेची अत्यंत आवश्यकता आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीने ऊर्जा साधनसामग्रीचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. कोळसा, तेल नैसर्गिक वायू, जळाऊ लाकुड, पाणी, हवा, सुर्यप्रकाश अशा अनेक गोष्टींपासून आपल्याला ऊर्जा मिळते.



**ऊर्जेची / विजेची उपलब्धता व वापर :** भारतात अनेक स्त्रोतापासून ऊर्जा मिळत असून या विजेचा वापर प्रामुख्याने दोन प्रकारात करता येतो.


**१) व्यापारी क्षेत्र :**

ज्या ऊर्जेची निर्मिती व्यापारी तत्त्वावर केली जाते ती व्यापारी ऊर्जा होय. व्यापारी ऊर्जेच्या सर्वात जास्त वापर उद्योगधंद्यामध्ये होत असून त्या खालोखाल वाहतूकीचा क्रम लागतो. शेती क्षेत्रात मात्र हा वापर कमी दिसून येतो. कोळसा, तेल, वीज ही व्यापारी ऊर्जेची महत्त्वाची उदाहरणे असून भारतात दगडीकोळश्यापासून विद्युत निर्मितीचे प्रमाण सर्वात जास्त आहे. उद्योगधंद्यात कोळसा आणि वीज याचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असून वाहतूक क्षेत्रात तेलाचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो.

**२) बिगर व्यापारी क्षेत्र :**


दैंनदिन व्यवहारात प्रकाशासाठी अन्न शिजविण्यासाठी, पाणी तापविण्यासाठी अशा घरगुती कारणासाठी विजेचा वापर म्हणजेच बिगर व्यापारी क्षेत्रात केला जातो. जळाऊ लाकूड, जनावरांचे शेण, शेतीतील कचरा हे बिगर व्यापारी ऊर्जेचे क्षेत्र आहेत.

**१) राज्यात विविध क्षेत्रात होणारा विजेचा वापर**




वरील आलेखामध्ये १९८०-८१ व २०११-१२ दोन वर्षात विविध ग्राहकांनी किती वीज वापरली याची तुलना केली आहे. गेल्या तीन दशकामध्ये शेती, घरगुती आणि व्यावसायिक वर्गाचा वीज वापर वाढला असून औद्योगिक वर्गाचा वीज वापर मात्र कमी झालेला दिसून येतो.

**२) इंधन प्रकारांचा वीज निर्मितीतील वाटा**




वरील आलेखामध्ये वीज निर्मिती करणाच्या क्षेत्रांची टक्केवारी दिली असून यात सगळ्यात मोठा वाटा कोळशावर केलेल्या वीज निर्मितीचा आहे.

munotes.in

**ग्रामीण विद्युतीकरणाची गरज :**

ग्रामीण विद्युतीकरणाची गरज पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) ग्रामीण औद्योगिकरणास चालना :**

औद्योगिकरणास गती मिळण्याच्या दृष्टीने विजेचे महत्त्व मोठे आहे. उत्पादन प्रक्रियेसाठी विजेची आवश्यकता असून उत्पादनप्रक्रियेत कच्च्या मालाचे पक्क्या मालात रुपांतर करण्यासाठी कोणत्या ना कोणत्या ऊर्जेची आवश्यकता असते. ग्रामीण भागात विज पुरवठा झाल्यास शेतीवर आधारित लहान मोठे उद्योग करता येतील. त्यामुळे ग्रामीण तरुणांच्या उद्योजक कौशल्याचा वापर करता येईल. स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध झाल्यामुळे स्थलांतराचे प्रमाण कमी होईल.

**२) कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी :**

विजेच्या वापरामुळे विजेच्या घटकाच्या उत्पादकतेत वाढ घडून येते. विहीरीवरील विद्युत पंपामुळे शेतीला पाणीपुरवठा मिळून शेती विकासास मदत होते. ग्रामीण विद्युतीकरणामुळे विजेवर चालणाऱ्या उपकरणांचा वापर करणे शक्य होईल. शेतकऱ्यांच्या वेळेची व श्रमाची बचत होऊन कृषी उत्पादनात वाढ घडून येईल.

**३) वाहतूक व्यवस्थेची प्रगती :**

वाहतूकीसाठी ऊर्जेची गरज असते. वाहतुकीमुळे अर्थव्यवस्थेला गतिमानता प्राप्त होते. कच्च्या / पक्क्या मालाची वाहतूक करता येते. बाजारांचा, बाजारपेठांचा विस्तार होतो.

**४) ग्रामीण जनतेच्या राहणीमानात सुधारणा करण्यासाठी :**

भारतातील बहुतांशी समाज ग्रामीण भागात वास्तव्य करतो. ग्रामीण भागातील लोकांचा सामाजिक आर्थिक विकास घडून येण्यासाठी विद्युत महत्त्वाची आहे. या लोकांना वीज उपलब्ध झाली तर शहरातील लोकांप्रमाणे विजेवर चालणाऱ्या उपकरणांचा यंत्राचा वापर करुन उत्पादनात वाढ घडवून आणतील. उत्पादनात वाढ झाल्यामुळे उत्पन्न वाढेल व लोकांचा राहणीमानाचा दर्जा सुधारेल. साहजिकच ग्रामीण विकासाला चालना मिळेल.

**५) परंपरागत व्यापारी ऊर्जेचा अपव्यय थांबविण्यासाठी :**

ग्रामीण भागात वीजपुरवठा योग्यप्रकारे झाल्यास परंपरागत बिगर व्यापारी ऊर्जा स्त्रोतांचा अपव्यय थांबून पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होईल. ग्रामीण भागात ज्वलनासाठी अन्य पर्याय उपलब्ध नसल्यामुळे लाकूड मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. त्यासाठी जंगलतोड केली जाते त्याचा विपरीत परिणाम पर्यावरणावर होतो तसेच सरपणासाठी शेणाचा वापर जास्त केला जात असल्यामुळे शेणाचा खत म्हणून वापर करण्यात मर्यादा येतात. साहजिकच पर्यावरण संतुलन राखण्यासाठी ग्रामीण भागात विद्युतीकरणाची गरज दिसून येते.

तसेच ग्रामीण विद्यतीकरणामुळे ग्रामीण उद्योगाचा विकासही साधला जाईल. तसेच उत्पादनवाढीला चालना मिळून शेती, वाहतूक व दळणवळण वगैरेंच्या प्रगतीला मदतच होईल व ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासास चालना मिळेल.

**ग्रामीण भागातील विद्युतीकरणाच्या समस्या :**

**१) गरजेच्या मानाने कमी उपलब्धता :**

ग्रामीण भागात अजूनही काही गावांमध्ये, वाडी, वस्ती, घरांमध्ये वीजजोडणी केलेली दिसून येत नाही. तसेच गरजेच्या मानाने व्यापारी ऊर्जेचा पुरवठाही कमी असलेला दिसून येतो.

**२) नूतनीकरण करता येणाऱ्या ऊर्जेचा कमी विकास :**

ग्रामीण भागात अजूनही नूतनीकरण करता येतील अशा ऊर्जेच्या व्यापारी स्त्रोतांची (उदा. सौरऊर्जा) फारशी प्रगती झालेली नाही. त्यामुळे नूतनीकरण करता येणार नाही अशी तळे, कोळसा या स्त्रोतांवरच जास्त अवलंबून राहावे लागते.

**३) वीज वापराबाबत ग्रामीण व शहरी भागातील फरक :**

शहरी भागांपेक्षा ग्रामीण भागामध्ये वीजेची कमतरता जास्त भासत असून ग्रामीण भागातील ऊर्जेच्या वापराचे प्रमाण शहरी भागापेक्षा कमी आढळते. तसेच व्यापारी ऊर्जेची कमी उपलब्धता व बिगर-व्यापारी ऊर्जा साधनांची कमतरता यामुळे ग्रामीण भागास ऊर्जेची उपलब्धता कमी राहते.

**४) आवश्यकतेपेक्षा जास्त वापर :**

उत्पादनाची उपकरणे, यंत्रे ही कालबाह्य, जुनाट झालेली असतील तर अशी यंत्रे चालविण्यासाठी आवश्यकतेपेक्षा अधिक ऊर्जेची आवश्यकता भासते.

**५) वितरणातील अडचणी :**

ग्रामीण भागात विजेचा पुरवठा होत असताना किंवा वितरण होत असताना मोठ्या प्रमाणावर ऊर्जा वाया जाते. विद्युत यंत्रणेतील बिघाड, विद्युत कपात, वारंवार विद्युत पुरवठा बंद असणे इ. विजपुरवठ्यातील समस्या गंभीर असून साहजिकच याचा परिणाम ग्रामीण जीवनावर होतो.

**६) अकार्यक्षम प्रकल्प :**

वेगवेगळ्या प्रकल्पांमधून ऊर्जेची निर्मिती होत असताना असे ऊर्जानिर्मिती करणारे प्रकल्प कार्यक्षमतेने चालवलेले दिसून येत नाही. त्यामुळे ऊर्जा निर्मितीच्या खर्चातही वाढ होते.

**ग्रामीण भागातील विद्युतीकरण :**

भारत हा खेडीप्रधान देश असल्यामुळे ग्रामीण विकासाला महत्त्वाचे स्थान आहे. ग्रामीण भागाच्या विकासाकरिता ग्रामीण विद्युतीकरणाची आवश्यकता असून पारंपारिक इंधनाला पर्याय म्हणून तसेच औद्योगिकरणाला चालना देण्यासाठी ग्रामीण विद्युतीकरण आवश्यक आहे. ग्रामीण विद्युतीकरणास २० कलमी कार्यक्रमात महत्त्व देण्यास आले असून १९६९ मध्ये ग्रामीण विद्युतीकरणास चालना देण्यासाठी ग्रामीण विद्युत मंडळाची स्थापना करण्यात आली.

ग्रामीण विद्युतीकरणामध्ये गावांचे विद्युतीकरण व कृषीपंप संचाना वीजपुरवठा करणे हे दोन घटक महत्त्वपूर्ण आहे. ग्रामीण विद्युतीकरणामध्ये वस्त्यांचे विद्युतीकरण, ग्रामीण औद्योगिक जोडण्या, घरगुती जोडण्या, रस्त्यांवरील दिव्यांचा विद्युत पुरवठा या उद्दिष्टांचा समावेश आहे.

munotes.in

विजनिर्मितीमधील सर्वात स्वस्त निर्मिती जलविद्युत असून महाराष्ट्रात तारापूर, ट्रॉम्बे, सूर्या, वैतरणा, भिवपुरी, खोपोली, कोयना, उजनी, जायकवाडी, भाटघर अशा अनेक ठिकाणी वीजनिर्मिती केली जात असून सरकारने कुटीर ज्योती, अक्षय प्रकाश योजना, ग्रामीण ऊर्जा कार्यक्रम असे महत्त्वपूर्ण उपक्रम राबविले आहेत. सद्यस्थितीत पवनचक्क्यावरही वीज निर्मिती केली जात असून त्याचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. तसेच सौर ऊर्जेवर चालणारी उपकरणे स्वस्त झाल्यास ग्रामीण जनतेलाही त्याचा अधिक प्रमाणावर वापर करता येईल.

## ५.८ सारांश

या प्रकरणात ग्रामीण पायाभूत संरचना स्पष्ट केली असून ग्रामीण संरचनेचे ग्रामीण विकासातील महत्त्व सांगितले आहे. ग्रामीण संरचनेतील महत्त्वपूर्ण असलेले वाहतूक व दळणवळण साधनाची माहिती सांगितली असून वाहतूक व दळणवळण साधनांचे दोन प्रकार स्पष्ट केले आहेत.

वाहतूक व दळणवळण साधन कशाप्रकारे ग्रामीण विकासास चालना देण्यास मदत करतात ते स्पष्ट केले असून वाहतूक व दळणवळण साधनांचा सविस्तर आढावा घेतला आहे. तसेच जलसाधनसंपत्तीचे महत्त्व स्पष्ट करुन व्यक्तीगत व सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व सांगितले आहे. तसेच पिण्याच्या पाण्या संदर्भात शासनाची भूमिका सांगितली असून ग्रामीण विद्युतीकरणाची गरज स्पष्ट केली असून ग्रामीण भागातील विद्युतीकरणाची समस्या स्पष्ट केली आहे.

## ५.९ स्वाध्याय

१) ग्रामीण संरचनेची संकल्पना स्पष्ट करुन ग्रामीण विकासातील भूमिका सांगा.

२) वाहतूकीचे प्रकार सांगून वाहतूक समस्याचे विवेचन करा.

३) संदेशवहनाचे प्रकार स्पष्ट करा.

४) जलसाधनसंपत्तीचे महत्त्व सांगून व्यक्तीगत व सार्वजनिक स्वच्छता कशी करता येईल ते स्पष्ट करा.

५) पिण्याच्या पाण्या संदर्भात शासनाची भूमिका स्पष्ट करा.

६) ग्रामीण विद्युतीकरणाची गरज स्पष्ट करुन ग्रामीण भागातील विद्युतीकरणाचा समस्या सांगा.

## ५.८ संदर्भसूची

१) डॉ. दिलीप जगताप, डॉ. सुमित्रा पवार, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, अथर्व पब्लिकेशन्स, २०१४.

२) देसाई व भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे.

३) प्रा. डॉ. राजेंद्र रसाळ, भारतीय आर्थिक पर्यावरण, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००२.

४) जोशी व गोसावी, व्यवसायिक पर्यावरण आणि उद्योजकता, सुविचार प्रकाशन, पुणे.

५) प्रभाकर देशमुख, वित्तीय व्यवस्थापन, पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स, नागपूर.

६) प्रा. शशिकांत हरि अट्रावलकर, भारतीय अर्थव्यवस्थेची विकास धोरणे, शेठ प्रकाशन, मुंबई, २००५.

७) प्रा. अशोक डांगे, डॉ. विजय काकडे, जागतिक अर्थव्यवस्था फडके प्रकाशन, कोल्हापुर, १९९९.

८) डॉ. दिलीप शं. पाटील, डॉ. स्मिता भोईर, प्रा. प्रवीण सनये, प्रा. रमेश म्हात्रे, ग्रामीण विकासाची तोंडओळख, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, २०१०.

९) प्रा. चंद्रकांत खंडाभळे, भारतीय समाज रचना आणि परिवर्तन, १९९८.

१०) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम स्वच्छ भारत मिशन माहिती पुस्तिका.

११) इंटरनेट माहिती, टक्केवारी

❖❖❖❖

munotes.in

# घटक -६

## बाजारपेठा आणि वित्तपुरवठा

- प्रा. विवेक शां. चव्हाण

**पाठाची रचना :**

६.१ पाठाची उद्दिष्टे
६.२ प्रस्तावना
६.३ विपणनाची संकल्पना
६.४ शेतमाल बाजारपेठांचे प्रकार
६.५ शेतमाल विपणनाचे महत्त्व
६.६ शेतमाल विपणनातील दोष
६.७ विपणनातील दोष दूर करण्याचे उपाय
६.८ वित्तपुरवठा
६.९ ग्रामीण वित्तपुरवठ्याचे प्रकार
६.१० कृषी वित्तपुरवठ्याची आवश्यकता
६.११ कृषी वित्तपुरवठ्याची समस्या
६.१२ कृषी वित्तपुरवठ्याच्या समस्यांवरील उपाय
६.१३ सारांश
६.१४ स्वाध्याय
६.१५ संदर्भसूची

### ६.१ उदिष्ट्ये

- ग्रामीण विपणनाचा अभ्यास करणे.
- शेतमाल बाजारपेठांचा अभ्यास करणे.
- शेतमाल विपणनाचे महत्त्व अभ्यासणे.
- ग्रामीण वित्तपुरवठ्याचे स्त्रोत अभ्यासणे.
- कृषी वित्तपुरवठ्याची आवश्यकता अभ्यासणे.

## ६.२ प्रस्तावना



भारतीय शेती व्यवसाय हा निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. अतिवृष्टी व दुष्काळ यांचा परिणाम सातत्याने शेती भारतीय शेती अर्थव्यवस्थेवर होत असतो. वादळ, वारा, गारपीट इ. हवामानातील बदल त्याचप्रमाणे पिकांवरील रोग, टोळधाड याशिवाय काही वन्यप्राणांकडून देखील नुकसान होत असते. शेतीतील ही अनिश्चितता कायम राहिल्याने अनेक प्रकारच्या समस्यांना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागते. उत्पादनपुर्व व उत्पादन काळातील धोक्यांबरोबर शेतमाल बाजारपेठांमध्ये गेल्यानंतर देखील किंमतीतील चढ-उतारांमुळे नुकसानीस सामोरे जावे लागते. त्यामुळे ग्रामीण जनतेची आर्थिक स्थिती हलाखीची आहे. त्यातच सरकारच्या विविध धोरणांचा शेतमालाच्या किंमतीवर परिणाम होत असतो. अल्पभूधारक व अत्यल्प भूधारक प्रमाण जास्त असल्यामुळे कर्जबाजारीचे प्रमाण या वर्गात मोठ्या प्रमाणात असलेले दिसून येते. ग्रामीण भागात संस्थात्मक वित्तपुरवठ्याच्या सुविधा असल्या तरी त्या अपुर्ण असलेल्या दिसून येतात. अजुनही ग्रामीण भागातील शेतकरी वर्ग सावकार जमीनदार यांच्या कडून होणाऱ्या वित्तपुरवठ्यावर अवलंबून असलेला दिसून येतो.

ग्रामीण भागात संस्थात्मक वित्तपुरवठ्याद्वारे कमी व्याजदराने कर्ज पुरवठा केला जातो. मात्र कागदपत्रांची पुर्तता ही बाब शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरते. त्यातच शेतकरी उत्पादक कारणापेक्षा अनुत्पादक कारणासाठी कर्जाचा वापर करतो. त्यातून कर्जबाजारीपणा वाढलेला दिसून येतो.

## ६.३ विपणनाची संकल्पना

कोणत्याही व्यवसायाचे यश हे उत्पादनाच्या कार्यक्षम बाजारपेठेवर अवलंबून असते. औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनाप्रमाणेच कृषी उत्पादनासाठी सुसंघटीत व कार्यक्षम बाजारपेठेची आवश्यकता असते. कृषी मालाची विक्री या अर्थाने कृषी विपणन ही संज्ञा वापरली जाते. शेतमालाची विक्री करणे एवढाच त्याचा अर्थ होत नाही. विपणन ही संज्ञा व्यापक आहे. असंख्य शेतात उत्पादीत झालेला माल असंख्य ग्राहकापर्यंत पोहचविण्यासाठी मालाचे, संकलन, प्रमाणीकरण व प्रतवारी, साठवण, वाहतूक प्रक्रिया, पतपुरवठा इ. सेवा चांगल्या रितीने उपलब्ध करुन देणे म्हणजे शेतमाल विक्री होय.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कृषी विकासाला चालना देण्यात आली. हरितक्रांतीमुळे कृषी उत्पादनात वाढ झाल्यामुळे शेतमाल बाजारपेठेमध्ये नेऊन विक्री करण्याची आवश्यकता निर्माण झाली. त्यातून शेतमालाच्या विक्रीसाठी बाजारपेठांची गरज निर्माण झाली.

'विपणन' ही उत्पादीत वस्तू ग्राहकापर्यंत पोहचविण्याची व बदलत्या व्यावसायिक परिस्थितीशी सृजनशीलपणे जुळवून घेण्याची प्रक्रिया आहे. ग्राहकांच्या गरजा जाणून घेण्याचे, वस्तू व सेवा यांच्या पुरवठ्याला योग्य दिशा देण्याचे कार्य विपणनाद्वारे केले जाते.

अर्थशास्त्राच्या भाषेमध्ये बोलावयाचे झाले तर उत्पादीत वस्तू व सेवा यांच्या मध्ये स्थल, काल, मालकी हक्क उपयोगिता निर्माण करण्याची विपणन ही एक प्रक्रिया आहे. ग्राहकांना योग्य वेळी व योग्य ठिकाणी वस्तू व सेवा उपलब्ध करुन देऊन विक्रीद्वारे त्यामध्ये मालकी हक्क उपयोगिता निर्माण करण्याची निगडीत असलेल्या सर्व कार्याचा समावेश होतो.

खालील व्याख्याद्वारे विपणनाचा अर्थ अधिक स्पष्ट होण्यास मदत होईल.

१) "वस्तू आणि सेवांचे हस्तांतरण घडवून आणणाऱ्या व त्यांच्या वाटपाची व्यवस्था उपलब्ध करुन देणाऱ्या सर्व प्रयत्नांचा समावेश विपणनात होतो." - क्लार्क व क्लार्क

२) "विपणन ही एक परस्परांवर परिणाम करणाऱ्या विभिन्न व्यावसायिक क्रियांचा समावेश करणारी प्रक्रिया आहे. तिचा उद्देश, तिचा उद्देश विद्यमान व संभाव्य ग्राहक त्या गरजा भागविण्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तू व सेवा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने योजना आखणे किंमती निर्धारण करणे, विक्री वृद्धी करणे तसेच वस्तू व सेवा यांचे वितरण करणे हा असतो." - विल्यम स्टॅन्टन

३) "गरजा व आवश्यकता यांची पुर्तता होण्यासाठी विनिमय-प्रक्रिया सुलभतेने पार पडावी म्हणून केल्या जाणाऱ्या सर्व मानवी क्रियांचा विपणनामध्ये समावेश होतो." - फिलीप कोटलर

४) "उत्पादनापासून उपभोगापर्यंत वस्तू व सेवा पोहचविण्याच्या क्रियांचा विपणनात समावेश होतो. स्थान, समय, मालकी व उपयोगितेची निर्मिती करण्याचे कार्य करणारे ते अर्थशास्त्राचे एक अंग आहे." - ह्युगे व मिचेल

५) "ग्राहकांच्या क्रयशक्तीचा अंदाज घेऊन विशिष्ट वस्तूच्या मागणीमध्ये त्याचे रुपांतर करण्यासाठी व व्यवसाय संस्थेची आर्थिक किंवा इतर उद्दिष्टये साध्य करण्यासाठी वस्तू व सेवा ग्राहकांपर्यंत नेऊन पोहचविण्याचे विपणन हे एक व्यवस्थापकिय कार्य आहे." - इन्स्टिटयूट ऑफ मार्केटिंग यू के

वरील व्याख्यांद्वारे खालील मुद्यांच्या आधारे विपणनाचा अर्थ अधिक स्पष्ट होईल.

१) विपणनामध्ये वस्तूची खरेदी व विक्री या दोघांचाही समावेश आहे.

२) वर्तमान ग्राहक व संभाव्य ग्राहक यांच्या गरजा भागविणे हा विपणनाचा उद्देश आहे.

३) विपणन ग्राहकांच्या अभिरुची व गरजा लक्षात घेऊन त्यानुसार उत्पादन करण्यास प्रवृत्त करते.

४) विपणनाच्या क्रियेमध्ये ग्राहकांच्या क्रयशक्तीचा अंदाज येतो व त्यानुसार उत्पादन घेण्यासाठी प्रेरणा मिळते.

**कृषी विपणन :**

कृषी मालाची विक्री या अर्थाने कृषी विपणन ही संज्ञा वापरली जाते. परंतू शेतमालाची विक्री एवढा अर्थ यामध्ये अभिप्रेत नाही. विपणन ही संज्ञा व्यापक असलेली दिसून येते. कृषी मालाच्या विक्री बरोबर यात अनेक लहान मोठ्या सेवा व प्रक्रियांचा समावेश होतो. कृषी मालाला चांगला भाव मिळण्यासाठी शेतमाल बाजारापर्यंत पोहचविणे, माल साठविणे, किंमतीबाबत व ग्राहकांच्या गरजांबाबत सर्व अपेक्षित माहिती मिळविणे, शेतमालावर प्रक्रिया, पतपुरवठ्याच्या सोयी इ. अनेक सोयी व सेवा विपणनात अभिप्रेत आहे.

थोडक्यात कृषी विपणन म्हणजे शेतमाल विक्री व्यवस्था होय. असंख्य शेतात पिकलेला शेतमाल असंख्य ग्राहकांपर्यंत पोहचविण्यासाठी केलेल्या क्रिया म्हणजे विपणन व्यवस्था होय.

**कृषी विपणनाचे उद्देश :**

१) शेतमालाचा पुरवठा अखंडपणे, रास्तभावात ग्राहकांना गरजेनुसार उपलब्ध करुन देणे.

२) शेतमालाला योग्य भावाची हमी देणे.

३) शेतकऱ्यांमध्ये उत्पादनवाढीची प्रेरणा जागृत ठेवणे.

४) ग्राहकांचे व शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक शोषण थांबविणे.

५) शेतकऱ्यांनी उत्पादित मालाला बाजारपेठ उपलब्ध करुन देणे.


६) शेतकऱ्यांमध्ये व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण करणे.

शेतकऱ्याच्या उत्पादनाला उत्पादन खर्चावर भाव मिळविण्यासाठी विपणन यंत्रणा कार्यक्षम व प्रभावी असणे आवश्यक असते.

**शेतमाल बाजारपेठेतील विपणन चक्र :**


शेतकऱ्यांच्या उत्पादनाच्या ठिकाणापासून ते ग्राहक / खरेदीदारापर्यंत अनेक प्रकारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष व्यवहार होत असतात. बाजारपेठेत चक्रात मालाचे हस्तांतरण केले जाते ते पुढीलप्रमाणे -

**अ) प्रत्यक्ष व्यवहार**




munotes.in

**ब) अप्रत्यक्ष व्यवहार**




## ६.४ शेतमाल बाजारपेठांचे प्रकार

'बाजारपेठ' म्हणजे अशी यंत्रणा की, जिच्या द्वारे उत्पादक आणि ग्राहक यांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये व्यवहार होण्यासाठी योग्य वातावरण निर्माण केले जाते. वस्तू व सेवा यांची खरेदी-विक्री व त्यासंबंधी असणाऱ्या सर्व क्रिया व व्यवहारांचा समावेश होतो. शेतमाल बाजारपेठांचे प्रकार हे विक्रीच्या स्वरुपावरुन पडलेले दिसून येतात ते पुढीलप्रमाणे -

**१) गावात विक्री :**

आठवडा बाजाराचे अंतर जास्त असेल तर मालाची विक्री गावातच केली जाते. पैशांची तातडीची गरज असल्यास वाहतुक व्यवस्थेचा अभाव असल्यास अथवा शेतकऱ्याने शेतीसाठी काढलेले सावकार अथवा व्यापारी यांच्याकडून काढलेले कर्ज असल्यास त्याच्या कर्जफेडीसाठी गावातच मालाची विक्री केली जाते.

**२) प्राथमिक बाजार :**

शेतमालाचे प्रमाण थोडे जास्त असल्यास शेतमालाची विक्री जवळच्या बाजारात केली जाते. असे गाव पाच ते दहा गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी असते. अशा ठिकाणी शेतमाल एकत्र करणारे प्राथमिक बाजार असतात. या बाजारात गावातील विक्रीपेक्षा शेतमालास अधिक किंमत प्राप्त होते.

**३) घाऊक बाजार :**

या बाजारपेठेमध्ये शेतमालाची मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री घाऊक / मोठ्या स्वरुपात होते. प्राथमिक घाऊक बाजार व दुय्यम घाऊक बाजार हे घाऊक बाजाराचे दोन प्रकार आहेत. प्राथमिक घाऊक बाजारात शेतकरी व्यापारी मालाची खरेदी विक्री करतात. तर दुय्यम बाजारात मालाची विक्री दुसऱ्या व्यापाऱ्यामध्ये म्हणजे हा व्यवहार व्यापारी व्यापाऱ्यांमध्ये होतो. या बाजारात शेतकऱ्यांचा संबंध नसतो.

### ४) मध्यवर्ती घाऊक बाजार :

दुय्यम घाऊक बाजारात खरेदी केलेला माल अंतिम बाजारात व्यापारी वर्षभर किरकोळ स्वरुपात विकतात. ग्राहक आपल्या आवश्यकतेनुसार या बाजारात मालाची खरेदी करतात.

### ५) जत्रा :

धार्मिक प्रसंगी तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी मोठ्या जत्रा भरतात. अशा ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपाच्या बाजारपेठा निर्माण होतात. अन्नधान्य, भाजीपाला, जनावरे, शेतीसंबंधी अवजारे इ. जीवनावश्यक वस्तुंची अशा ठिकाणी मोठ्या स्वरुपात विक्री होते.

शेतमालाला योग्य किंमत मिळावी याकरिता शेतमाल विपणन व्यवस्था कार्यक्षम होणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकरी व ग्राहक यांना न्याय मिळेल व मध्यस्थांचे उच्चाटन होईल ह्यासाठी सरकार व सहकारी यंत्रणा यांनी बाजारपेठ स्थापनेमध्ये पुढाकार घेतला आहे.

### १) सहकारी खरेदी-विक्री संस्था :

शेतमालाला योग्य किंमत मिळावी याकरिता सहकारी खरेदी-विक्री संस्था स्थापन करण्यात आल्या. गावपातळीवर प्राथमिक खरेदी-विक्री संस्था, तालूका किंवा जिल्हा पातळीवर मध्यवर्ती सहकारी खरेदी-विक्री संघ व राज्य पातळीवर राज्य सहकारी खरेदी -विक्री संघ अशी त्रिस्तरीय यंत्रणा स्थापन करण्यात आली.

### २) शासकिय खरेदी - विक्री यंत्रणा :

विशिष्ट हंगामात शेतमाल बाजारात येतो त्यामुळे शेतमाल किंमती घसरुन शेतकऱ्याचे नुकसान होण्याची दाट शक्यता असते. त्यासाठी शेतमालाला आधारभूत किंमत देणे शेतमाल खरेदी करणे, एकाधिकार खरेदी योजनाद्वारे शासनाची खरेदी-विक्री यंत्रणा काम करते.

### ३) कृषी उत्पन्न बाजार समित्या :

या बाजारपेठा राज्य सरकारच्या विशिष्ट कायद्यानुसार स्थापन होतात व कार्य करतात. शेतमालाला योग्य किंमत, शेतमाल विपणन व्यवस्थेच्या सर्व सुविधा शेतकऱ्यांना पुरविल्या जातात. मध्यस्थांचे उच्चाटन होण्याकरिता या बाजारपेठांची स्थापना करण्यात आली आहे.

याशिवाय राज्यातील शेतकऱ्यांना त्यांचा उत्पादनाला योग्य भाव मिळण्यासाठी त्यांची दलाल व मध्यस्थांकडून होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी तसेच ग्राहकांना शेतमाल वाजवी दरात उपलब्ध व्हावा यासाठी शासन विविध मार्गांनी शेतकऱ्यांना मदत करत असते. यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य कृषी प्रधान मंडळाची स्थापना केली आहे.

### शेतमाल बाजारपेठेतील प्रमुख घटक :

बाजारपेठेत असणारे घटक हे बाजारपेठेतील कार्य करीत असतात व बाजारसेवा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करतात. ते वैयक्तिकरित्या स्वतंत्रपणे किंवा भागिदारी, व्यापारी संस्था सहकारी किंवा सरकारी संस्था याद्वारे आपले कार्य पार पाडीत असतात आणि त्याच बरोबर आपल्या अधिकाराची अंमलबजावणी करीत असतात.

### १) स्थानिक खरेदीदार :

स्थानिक खरेदीदार हे स्थानिक शेतकऱ्याकडून शेतमाल खरेदी करतात. ते शेतकरी, जमीनदार, खेड्यातील दुकानकार, फिरते व्यापारी प्रक्रिया उद्योजक सरकारी किंवा सरकारी सोसायट्या यांच्याकडून शेतमालाचा संग्रह करतात. स्थानिक खरेदीदार उत्पादन ते घाऊक विक्री किंवा प्रक्रिया केंद्रापर्यंत पोहोचविण्यासाठी वाहतूकीची व्यवस्था करतात. तसेच शेतकऱ्याच्या बाजारपेठविषयक जबाबदारी कमी करतात. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना कर्जाऊ आर्थिक मदत देखील करतात.

### २) घाऊक व्यापारी :

घाऊक व्यापारी शेतकऱ्यांकडून किंवा स्थानिक खरेदीदारांकडून उत्पादन घेतात आणि किरकोळ व्यापारी, घाऊक व्यापारी, आणि कारखानदारांना विकतात बाजारपेठेतील मोठे धोके त्यांना सहन करावे लागतात.

### ३) अडत्या आणि दलाल :

उत्पादक आणि घाऊक व्यापारी यांचे उत्पादन नेहमी बाजारपेठेत येत असते. परंतु वैयक्तिकरित्या त्याच्यावर लक्ष देऊ शकत नाही. अडत्या लोकांसाठी वस्तू खरेदी करतो आणि विकतो त्याच्या बदल्यात अडत घेतो. तर दलाल अप्रत्यक्षपणे खरेदीदार आणि विक्रेते यांना एकत्र आणण्याचे काम करतो. त्यांना विविध बाजारपेठेतील किंमतीचे, पुरवठ्याचे व लोकांच्या गरजेचे सखोल ज्ञान असते. सल्लागार व मध्यस्थ अशी त्याची भूमिका असून ठराविक दर घेऊन तो आपले कार्य पार पाडत असतो.

### ४) किरकोळ व्यापारी :

किरकोळ व्यापारी हे घाऊक पद्धतीने माल विकणाऱ्यांकडून माल खरेदी करतात आणि ग्राहकांना रोजच्या रोज वस्तू पुरविण्याची काम करतात. साधारण ते प्रतवारी, प्रक्रिया मालाची पुर्नबांधणी करुन ग्राहकाच्या गरजेप्रमाणे विक्री करतात.

### ५) उत्पादक :

बाजारपेठेतील हा महत्त्वाचा घटक आपले उत्पादन खेड्यातच किंवा मोठ्या बाजारात विकतो. तसेच मोठे शेतकरी लहान शेतकऱ्याचे उत्पादन एकत्र करतात आणि घाऊक व्यापाऱ्याला विकतात.

### ६) इतर घटक :

हे प्रत्यक्ष खरेदी-विक्रीचे व्यवहार करित नाहीत. परंतू बाजार प्रक्रियेत आणि बाजारपेठेची कार्यक्षमता वाढविण्यास मोठ्या प्रमाणात सहाय्य करित असतात.

## ६.५ शेतमाल विपणनाचे महत्त्व

शेतमालाला विक्री व्यवस्थेवर शेती क्षेत्राचा विकास अवलंबून असलेला दिसून येतो. कारण योग्य विक्री व्यवस्था, कार्यक्षम कार्यप्रणाली असेल तरच कृषी उत्पादन वाढीस चालना मिळते. त्या दृष्टीकोनातून शेतमाल विपणनाचे महत्त्व आपणास पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### १) शेतमाल उत्पादनास प्रेरणा :

भारतीय शेती निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. शेती व्यवसायात सातत्याने धोके असलेले दिसून येतात. बाजार यंत्रणा जर निकोप असेल तर उत्पादनाला निश्चित किंमतीची हमी असेल तर शेतकरी प्रेरीत होऊन उत्पादन घेतो. हे उत्पादन वाढीसाठी फार उपयुक्त आहे. कारण क्षेत्राच्या विकासासाठी सतत उत्पादनवाढीची प्रेरणा मिळणे आवश्यक असते.

### २) शेतमालाला रास्त किंमत :

शेतमालाची विक्री व्यवस्था योग्य असल्यास शेतमालाला रास्त भाव प्राप्त होतो. आणि शेतमालाला रास्त भाव प्राप्त झाल्यास शेतकरी उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहित होतो. त्यातून औद्योगिक विकासास चालना मिळून रोजगार निर्मिती होते.

### ३) किंमत स्थैर्य :

शेतमालाच्या किंमतीमध्ये स्थैर्य राहण्याकरिता विक्रीव्यवस्था महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. गोदामे, सुधारित साठवणूक सुविधा, त्यामुळे शेतकऱ्याची प्रतीक्षा क्षमता वाढते व शेतमालाच्या किंमतीत चढउतार होत नाही व शेतमालाच्या किंमतीत स्थिरता निर्माण होते.

### ४) विक्रेय वाढाव्यात वाढ :

भारतीय शेती ही उदरनिर्वाहाची शेती म्हणून ओळखली जाते. बिगर शेती क्षेत्रातील लोक, प्रक्रिया उद्योग आणि निर्मातीच्या दृष्टिकोनातून विक्रेयवाढाव्याला फार महत्त्व आहे. शेतमाल विपणन व्यवस्था प्रभावी आणि शेतकऱ्यांच्या हीताच्या दृष्टीकोनातून कार्य करत असेल तर विक्रेय वाढाव्यात वाढ होण्यास मदत होते.

### ५) शेतकऱ्यांच्या राहणीमानात वाढ :

चांगल्या विपणन व्यवस्थेमुळे शेतकऱ्याच्या शेतमालाला योग्य किंमत प्राप्त होते. त्यातून शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत परिणामकारक बदल घडून येतो. त्यातून राहणीमानाचा दर्जा उंचावतो.

### ६) असंघटीत शेतकरी वर्गाचे हित :

शेतकरी वर्ग हा संघटीत नाही तो विखूरलेला आहे. त्यामुळे त्यास अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे असंघटित शेतकऱ्यांचे हित साधण्याच्या दृष्टिकोनातून शेतमाल विपणन व्यवस्थेस महत्त्वाचे स्थान आहे.

## ६.६ शेतमाल विपणनातील दोष

शेतमाल विक्री व्यवस्थेचे लाभ सर्वच शेतकऱ्यांना उपलब्ध होत नाही. कारण ग्रामीण अर्थव्यवस्थेतील बाजारव्यवस्था दोषपुर्ण आहे. त्यामुळे संघटीत व्यावसायिक वर्गाकडून शेतकऱ्याची फसवणूक होते. याला विपणन व्यवस्थेतील दोष कारणीभूत आहेत. ते दोष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

munotes.in

**१) पतपुरवठ्याच्या अपुऱ्या सोयी :**

शेतकऱ्याला उत्पादक तसेच अनुत्पादक कारणासाठी पैशाची आवश्यकता असते. पतपुरवठ्याच्या अपुऱ्या सोयीमुळे सावकार तसेच जमीनदारांकडून कर्ज घेण्याशिवाय पर्याय राहत नाही आणि कर्जाच्या फेडीसाठी मिळेल त्या किंमतीला बाजारात अथवा सावकाराला माल विकावा लागतो. एकाच वेळी बाजारात माल आल्या नंतर मालाच्या किंमती घसरतात परिणाम योग्य किंमत देखील उत्पादनाला मिळत नाही.

**२) वाहतुकीच्या अपुऱ्या सोयी :**

राज्यातील ग्रामीण भागाला जोडणारे रस्ते बारमाई वाहतूक व्यवस्था अद्यापही उपलब्ध नाही. त्यामुळे वाहतूक खर्च वाढतो. नाशंवत माल वेळेत बाजारात पोहचत नाही. त्यामुळे नुकसान होते. वाहतूकीचे दर जास्त असल्याने उपलब्ध वाहतूक व्यवस्था शेतकऱ्याला परवडत नाही. परिणामी मिळेल त्या किंमतीला शेतावरच माल विकावा लागतो.

**३) शेतमाल साठवणूकीच्या अपुऱ्या सोयी :**

साठवणूकीच्या सोयी आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध नाहीत. ज्या आहेत त्या असमाधानकारक व अशास्त्रीय असलेल्या दिसून येतात. त्यामुळे १० ते ३०% शेतमालाची नासाडी होते. त्यामुळे शेतमाल साठवला तरी नुकसानीस सामोरे जावे लागते.

**४) मध्यस्थांचे वर्चस्व :**

शेतमालाच्या विक्री दरम्यान शेतकऱ्यांना अनेक मध्यस्थांना सामोरे जावे लागते. हा वर्ग शेतकऱ्यांचे फार मोठ्या प्रमाणात शोषण करतो. कमी किंमतीला माल विकावा लागतो. फार मोठ्या प्रमाणात मध्यस्थवर्ग नफा कमवून शेतकऱ्याचे शोषण करतात.

**५) गैरव्यवहार :**

शेतमाल विकत घेताना मध्यस्थांकडून अनेक गैरप्रकार केले जातात. वजन मापामध्ये फसवणूक, माहीती गुप्त ठेवणे, कमी किंमत देणे, तुट दाखविणे, देणगी स्विकारणे, इ. मार्गानी शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते.

**६) प्रतवारीचा अभाव :**

भौगोलिक परिस्थितीनुसार शेतमालाची प्रत देखील भिन्न स्वरुपाची असते. उत्पादित केलेल्या शेतमालाचे प्रमाणीकरण आणि प्रतवारी करुन शेतमाल बाजारात विक्रीसाठी आणला तर शेतमालास योग्य किंमत प्राप्त होऊ शकते. मात्र भारतीय शेतकरी प्रतवारी प्रमाणीकरण न करताच बाजारात शेतमाल आणतो. परिणामी चांगल्या मालाला चांगली किंमत प्राप्त होत नाही.

**७) बाजारविषयक माहितीचा अभाव :**

शेतकरी वर्गाला योग्य निर्णय घेण्यासाठी बाजार माहितीची आवश्यक असते. तरच तो विक्री संदर्भात योग्य निर्णय घेऊ शकतो. ही माहिती वृत्तपत्रे, दुरदर्शन, रेडीओ, इंटरनेट इ. माध्यमातून प्रसारित होते. ही साधने शेतकऱ्याजवळ नसतात अथवा त्या वापरण्यावर मर्यादा असतात. त्यामुळे बाजार विषयक माहिती मिळू शकत नाही.

munotes.in

### ८) शेतकऱ्यांच्या असंघटीतपणा :

राज्यातील शेतकरी विखुरलेला आहे. अज्ञानी अशिक्षित असंघटीत आहे. असंघटीतपणामुळे त्यांची सौदाशक्ती कमी राहते. संघटीत व्यापारी, सावकार व दलालांच्या संघटीतपणामुळे शेतकऱ्यांची पिळवणूक केली जाते.

### ९) जागतिक मालाशी स्पर्धा :

जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण स्विकारल्याने राज्यातील जगातील बाजार खुले झाले आहेत. त्यामुळे विविध देशातून राज्यात माल येऊ लागला आहे. ह्या मालाचा दर्जा आणि परवडणारी किंमत असल्यामुळे त्याच्याशी स्पर्धा करावी लागत आहे.

## ६.७ विपणनातील दोष दूर करण्याचे उपाय

शेतमाल विपणन व्यवस्था दोषपुर्ण असल्यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होते व शेतकरी कर्जबाजारी होतो. शेतकऱ्यांचा हा कर्जबाजारीपण दुर करण्यासाठी, शेतमालाला योग्य किंमत प्राप्त होण्यासाठी विपणन व्यवस्थेतील दोष दूर करणे आवश्यक आहे. तरच शेतकऱ्यांच्या समस्या दूर होऊ शकतील. खालील उपायांद्वारे शेतमाल विपणन व्यवस्थेतील दोष दूर करता येतील.

### १) संस्थात्मक विक्री व्यवस्था :

असंघटीत बाजारपेठेतील दोष कमी करण्यासाठी संस्थात्मक बाजारपेठेची व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. शेतमालाला योग्य किंमत प्राप्त होण्यासाठी, मध्यस्थांचे उच्चाटन करण्यासाठी नियंत्रीत बाजारपेठा स्थापन करण्यात आल्या. नियंत्रीत बाजारपेठांमुळे शेतकऱ्यांची फसवणूक न होता त्यांच्या उत्पादनाला योग्य किंमत प्राप्त होऊ शकते.

### २) वाहतूक सुविधांचा विकास :

भारत हा खंडप्राय देश आहे. शेतमालाचे एकत्रिकरण ही महत्त्वाची बाब असलेली दिसून येते. गावातील प्रत्येक रस्ते मुख्य रस्त्याला व रेल्वेमार्गाला जोडल्यास अधिक चांगली वाहतूक व्यवस्था निर्माण होऊ शकते. यासाठी गाव तेथे रस्ता आणि वाहतूक सुविधा आल्यास बाजारपेठेत उत्पादन देणे शेतकऱ्यास शक्य होऊन त्याच्या नफ्यात देखील वाढ होईल. या बाबींच्या कमतरतेमुळे त्याला येईल त्या किंमतीला माल विकावा लागतो. त्यामुळे त्यापासून होणारे नुकसान टाळता येईल.

### ३) समान वजनमापे व परिणाम पद्धतीचा वापर :

पारंपारिक बाजारपेठेत शेतमाल खरेदीसाठी विभिन्न वजनमापे वापरली जात होती. त्यातून त्यांचे आर्थिक शोषण केले जात असे. म्हणून वजनमापांची दशमान पद्धत १९५८ मध्ये स्विकारली. त्यातून वजनमापे व्यवहारात एकवाक्यता आलेली आहे व शेतकऱ्यांची पिळवणूक थांबण्यास मदत मिळाली आहे.

### ४) साठवणूकीच्या सुविधांमध्ये वाढ करणे :

शेतमाल उत्पादनाच्या नासाडीतून शेतकऱ्यांचे नुकसान होत असते. जर मध्यवर्ती ठिकाणी शेतमाल साठवणूकीसाठी गोदामे / कोठार बांधल्यास त्याचा फायदा शेतकऱ्याला होऊ

शकेल. कारण शेतकऱ्याकडे साठवणूकीच्या सुविधा नसल्याने येईल त्या किंमतीला मालाची विक्री करावी लागते. त्यासाठी सहकारी संस्था, राज्य गोदाम महामंडळ, केंद्र गोदाम महामंडळाची साठवणूक गृहे विकसित केली आहेत. त्यांची संख्या वाढल्यास शेतकऱ्याची सौदाशक्ती वाढेल.

### ५) प्रतवारी व प्रमाणीकरण :

शेतमालाची विक्री योग्यता वाढविण्यासाठी शेतमालाचे प्रतवारी व प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. प्रतवारी व प्रमाणीकरणाच्या अभावामुळे व्यापाऱ्यांना शेतमालाची खरेदी केल्यानंतर त्यात भेसळ करता येते. शेतमालाचे प्रमाणीकरण व प्रतवारी न केल्यास त्याला योग्य ग्राहक प्राप्त होत नाही आणि शेतमालास अपेक्षित किंमत प्राप्त होत नाही. प्रमाणीकरणाच्या सुविधा सहज उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यास आपल्या शेतमालाचा दर्जा तपासणे आणि योग्य किंमतीस माल विकणे शक्य होणार आहे.

### ६) मध्यस्थांचे उच्चाटन करणे :

शेतमाल विपणन व्यवस्थेत असलेले सावकार, किरकोळ व्यापारी, अडते, एजंट, दलाल इ. मध्यस्थांचे उच्चाटन होणे आवश्यक आहे. कारण हे प्रत्येक मध्यस्थ आपल्या हितसंबंधाचे रक्षण करतो. शेतकऱ्याचे हीत मात्र साधणे ज्ञान नाही. याकरिता उत्पादक ते उपभोक्ता यातील मध्यस्थांची साखळी कमीत कमी करुन शेतकऱ्यास जास्त नफा मिळवून देता येईल.

### ७) बाजार माहितीचे प्रसारण :

शेतकऱ्यांना शेतमालाच्या विपणन व्यवस्थेतील माहिती, बाजारभाव, आवक-जावक याची माहिती असणे आवश्यक आहे. त्यातून शेतकऱ्याचे बाजारभावाच्या संदर्भातील आकलन वाढेल. कोणते पिक घ्यावे, उत्पादनाला कोणत्या बाजारात काय किंमत आहे. याची सर्व माहिती त्यास मिळाल्यास त्याच्या नफ्याच्या प्रमाणात वाढ होईल त्यासाठी बाजारविषयक माहिती, आकाशवाणी, दुरदर्शन वृत्तपत्रे इ. शेतकऱ्यांपर्यंत पोहचून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक टाळता येऊ शकते.

### ८) सहकारी विपणन व्यवस्थेचा विकास :

शेतमालाच्या बाजारपेठेतील दोष दुर करण्यासाठी सहकारी विपणन व्यवस्था हा उत्तम पर्याय आहे. त्यामुळे उत्पादक व ग्राहक यांच्या थेट संपर्क होऊ शकतो. मध्यस्थांचे उच्चाटन होऊ शकते. सहकारी विपणन व्यवस्थेच्या विकासातून शेतकऱ्याला कर्ज, साठवणूक सुविधा, बियाणे, औजारे, खते इ. आवश्यक बाबी कमी किंमतीत उपलब्ध होऊ शकतात.

### ९) किंमत स्थिरीकरण :

शेतमाल विपणन व्यवस्थेमध्ये किंमत स्थिरीकरणाचा अभाव दिसतो. किमान आधारभूत किंमत ठरविणे, अतिरिक्त शेतमालाची खरेदी / विक्री अन्नधान्य महामंडळाची स्थापना निर्यात विषयक निर्णय, इ. उपाययोजना अमलात आणण्याची आवश्यकता आहे.

**१०) शेतकरी संघटनामध्ये वाढ :**

शेतकरी वर्ग विखुरलेला असल्याने असंघटीत असतो. तर शेतमाल विपणन व्यवस्थेत आढळून येणारे मध्यस्थ व्यापारी, अडते हे संघटीत असतात. त्यामुळे त्यांचे वर्चस्व दिसून येते. जर शेतकरी संघटीत झाले तर शेतकरी अन्यायाचा मुकाबला करु शकतील. त्यासाठी शेतकऱ्यांच्या संघटनेकडे आणि संघटीतपणाकडे लक्ष पुरविणे अत्यंत आवश्यक आहे.

विपणन यांचा अभ्यास करताना विपणन म्हणजे काय? बाजारपेठांचे प्रकार, शेतमाल विपणन व्यवस्थेचे महत्त्व विषद करण्यात आले आहे. ही विपणन व्यवस्था दोषपूर्ण आहे. त्यामुळे शेतकऱ्याला मोठ्या प्रमाणात नुकसानीस सामोरे जावे लागते. शेतकऱ्याला होणारे नुकसान टाळायचे असेल तर विपणन व्यवस्थेतील दोष दूर केल्यास त्याला शेतकऱ्याच्या परिस्थितीत बराच फरक पडू शकेल यासाठी शेतमाल विपणन व्यवस्थेतील दोष दूर करण्यासाठी कोणते उपाय सुचविता येतील याचा आढावा घेण्यात आला आहे.

## ६.८ वित्तपुरवठा

**प्रस्तावना :**

भारतीय अर्थव्यवस्था ही शेती प्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेत अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. प्रा.डी.एस.डेव्हीज यांनी, "शेती हेच क्षेत्र मुलभूत असून या क्षेत्रातुनच इतर क्षेत्रे विकसित झाली आहेत." असे मत व्यक्त केले आहे. कोणत्याही देशाचा विकास हा मागणी प्रमाणे अन्नधान्य निर्मिती न झाल्यास मंदावतो. त्यातून अन्नधान्याची गरज तसेच विदेशी चलन प्राप्त होण्यास मदत होते. तसेच शेती क्षेत्रातून उत्पादित झालेला माल औद्योगिकरणाची दिशा निश्चित करीत असतो. त्यातून देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचे स्थान महत्त्वपूर्ण असल्याचे आढळून येते.

भारतीय शेतीचा विचार केल्यास शेती व्यवसायात अत्यल्प व अल्पभूधारकांचे प्रमाण अधिक असलेले दिसून येते. आर्थिक स्थितीमुळे शेती व्यवसायात भांडवल गुंतवणूक करण्यास ते असमर्थ ठरतात. परिणामी कर्जबाजारीपणाचे प्रमाण त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात असलेले दिसून येते. भारतीय शेतकरी हा कर्जात जन्मतो. कर्जात जगतो व कर्जात मरतो असे विधान भारतीय शेतकऱ्यांच्या संदर्भात केले जाते.

भारतीय कृषी क्षेत्राचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी कृषी वित्तपुरवठा व कृषी बाजारपेठ हे दोन मार्ग प्रभावी ठरु शकतात. प्रामुख्याने भारतीय शेतीला योग्य प्रमाणात भांडवलाचा पुरवठा झाल्यास शेतीक्षेत्राचा सर्वांगीण व संतुलित विकास होण्यास मदत होईल. शेती उत्पादनासाठी आजच्या युगात सुधारित बियाणे, खते, किटकनाशके, अवजारे इ. चा वापर करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता आहे. मात्र हा भांडवलाचा पुरवठा करणारी यंत्रणा सक्षम असलेली दिसत नाही. जर माफक व्याज दराने वेळेवर कर्ज पुरवठा झाल्यास त्याचे चांगले परिणाम दिसून येतील. त्या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना वित्तपुरवठ्याची आवश्यकता असलेली दिसून येते

**वित्तपुरवठ्याची संकल्पना :**

ग्रामीण वित्तपुरवठा म्हणजे ग्रामीण भागातील शेती आणि बिगर शेती उपक्रमांना राष्ट्रीय बँकाकडून केला जाणारा कर्जपुरवठा होय.

ग्रामीण वित्तपुरवठा म्हणजे राष्ट्रीयकृत बँकांकडून ग्रामीण भागातील शेती आणि बिगर शेती उपक्रम यांना मालमत्तेच्या तारणेवर उत्पादन कार्यासाठी केला जाणारा कर्ज पुरवठा होय.

**वित्तपुरवठा :**

वित्तपुरवठा हा नेहमी कर्जदाराची मालमत्ता तारण ठेऊन उत्पादन कार्यासाठी केला जाणारा संस्थात्मक कर्ज पुरवठा होय. वित्त पुरवठ्याच्या बाबतीत साधारण मालमत्तेच्या मुल्याच्या ५०% कर्जपुरवठा केला जातो.

**पतपुरवठा :**

व्यक्तीची म्हणजेच त्या व्यक्तीकडे उपलब्ध असणारी स्थावर व जंगम मालमत्ता होय. या मालमत्तेच्या मुल्यांकनावरुन व्यक्तीची पत ठरते. व्यक्तीची पत विचारात घेवून कर्ज पुरवठा केला जातो.

**ग्रामीण कर्ज पुरवठ्याचे स्वरुप :**

भारतीय शेती व्यवसायाचे स्वरुप लक्षात घेतले असता कृषी क्षेत्रात अल्पभूधारक, अत्यल्पभूधारक, सिमांत भूधारक, ग्रामीण कारागीर यांची संख्या अधिक असलेली दिसून येते. बहुसंख्य शेती ही कोरडवाहू स्वरुपाची असलेली दिसून येते. मान्सुनची अनिश्चितता, दुष्काळजन्य स्थिती यावेळी ग्रामीण कारागीर व शेतमजूर यांची अवस्था वाईट होते. त्यांना शेती बरोबरच उपभोगासाठी कर्जाची आवश्यकता असते. आणि त्यासाठी जमीनदार आणि सावकार हा एकमेव मार्ग त्यांच्याकडे असलेला दिसून येतो. ग्रामीण वित्तपुरवठ्याचे स्वरुप विचारात घेताना शेतकऱ्यांना प्रामुख्याने दोन कारणांसाठी कर्जाची आवश्यकता असते.

अ) उत्पादक कारणासाठी
ब) उपभोग कारणासाठी

उत्पादक कारणासाठी तीन प्रकारची कर्जे दिली जातात. अल्पकालीन, मध्यकालीन, दिर्घकालीन. अल्पकालीन कर्ज हे एक वर्षाच्या मुदतीसाठी शेतकऱ्याला दिले जाते. त्याला पिक कर्ज असे देखील म्हणतात. उत्पादक कारणासाठी १ ते ५ वर्षाच्या मुदतीसाठी जे कर्ज आवश्यक असते. त्याला मध्यम मुदतीचे कर्ज असे म्हणतात. तर दिर्घ मुदतीचे कर्ज ५ ते १५ वर्ष मुदतीसाठी दिले जाते.

ग्रामीण वित्तपुरवठ्याचे स्वरुप विचारात घेताना उत्पादक कारकाप्रमाणे अनुत्पादक कारकासाठी देखील कर्जाची आवश्यकता असते. हे कर्ज धार्मिक, सण समारंभासाठी, वडीलोपार्जित कर्ज नैसर्गिक आपत्ती यामुळे निर्माण होणारी गरज पुर्ण करण्यासाठी आवश्यक असते. कमी धारक क्षेत्र, कुटुंबाचा मोठा आकार, व्यसनाधिनता न्यायालयीन वाद-विवाद, सावकाराकडून होणारे शोषण, ही अनुत्पादक कारणे ग्रामीण वित्तपुरवठ्यासाठी जबाबदार आहेत.

## ६.९ ग्रामीण वित्तपुरवठ्याचे प्रकार

शेती व्यवसाय आणि ग्रामीण भागात कर्जपुरवठ्याचे धोरण ठरवित असताना कर्जाचे ज्याप्रमाणे उत्पादक आणि अनुत्पादक असे वर्गीकरण केले जाते. त्याच प्रमाणे वित्तपुरवठ्याचे प्रकार विचारात घ्यावे लागतात. ग्रामीण वित्तपुरवठ्याचे १) संस्थात्मक वित्तपुरवठा २) बिगर संस्थात्मक असे दोन प्रकार पडतात.

### १) बिगर संस्थात्मक वित्त पुरवठा :

व्यक्तीकडून केल्या जाणाऱ्या कर्ज पुरवठ्याला बिगर संस्थात्मक कर्ज पुरवठा म्हणतात. या कर्ज पुरवठ्यात सावकार जमीनदार, देशी पेढीदार, निधी, चिटफंड्स यांचा समावेश होतो. याच बरोबर मित्र, नातेवाईक, इ. देखील समावेश होतो. या कर्ज पुरवठ्याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) बिगर संस्थात्मक कर्ज पुरवठ्याची हिशेबाची तपासणी सरकारी यंत्रणे मार्फत होत नाही.

२) बिगर संस्थात्मक कर्ज पुरवठा भारतीय बँकींग कक्षे बाहेर काम करणाऱ्या संस्था आणि व्यक्ती कडून केला जातो.

३) या कर्ज पुरवठ्यावर सरकारी नियंत्रण नसते.

४) बिगर संस्थात्मक कर्ज पुरवठा करणाऱ्या सदस्याचे कर्जदाराशी अनौपचारिक व वैयक्तिक स्वरुपाचे संबंध असतात.

५) आर्थिक व्यवहारात गुप्तता पाळली जाते.

६) बिगर संस्थात्मक वित्तपुरवठाकडून तात्काळ कर्ज पुरवठा केला जातो.

७) कर्ज प्राप्तीसाठी फार मोठ्या, किचकट कागदपत्रांची पुर्तता करावी लागत नाही.

८) उत्पादक तसेच अनुत्पादक कारणासाठी देखील कर्ज पुरवठा केला जातो.

### बिगर संस्थात्मक वित्त पुरवठ्याचे स्त्रोत :

या स्त्रोतामध्ये खाजगी सावकार, व्यापारी, अडते, दलाल, नातेवाईक, जमीनदार इ. व्यक्तीचा समावेश होतो. या पुढीलप्रमाणे -

### १) सावकार :

भारताच्या ग्रामीण भागात दोन प्रकारचे सावकार असतात. काही जमीनदार सावकार असतात. तर काही व्यापारी सावकारीचा व्यवसाय करतात. याशिवाय केवळ सावकारी व्यवसाय करणारा वर्ग देखील आढळतो. हा ग्रामीण भागातील वित्तपुरवठ्याच्या स्त्रोत आहे सावकार कर्ज देतो. पण ठेवी स्विकारत नाही. दैनंदिन व तातडीच्या कर्जाची गरज भागविण्यासाठी सावकार कर्ज देतो. पुर्वी शेतीवरील कर्जाचा हिस्सा ७०% इतका होता. आज तो १६.१% इतकी हिस्सा असलेला दिसून येतो. आजही याच्याकडून शेतकरी कर्ज घेताना दिसतो. कारण उत्पादक आणि अनुत्पादक या दोन्ही कारणांसाठी तो कर्ज देतो.

munotes.in

**२) देशी पेढीदार :**

देशी पेढीदार हे आधुनिक बँकेचे देशी स्वरुप होय. या पेढ्या ठेवी स्विकारतात. हुंड्याचे व्यवहार करतात. पैसे कर्जाऊ देतात. कर्ज परताव्याची पावती नियमीतपणे देतात. सुसंघटीत असतात. आधुनिक बँकांशी त्यांचे जवळचे संबंध असतात.

**३) निधी :**

निधी ही आपआपसात कर्जपुरवठा करणारी संस्था असते. भागभांडवल दर महिन्याला गोळा केले जाते. व सभासदांना कर्ज म्हणून वाटले जाते. हे कर्ज तारणकर्ज असते. सावकारापेक्षा कमी व्याजदर आकारला जातो. महाराष्ट्रामध्ये ग्रामीण विकास मंडळामार्फत अशा निधीची उभारणी केली जाते.

**४) चिट्ट फंड्स :**

चिट्ट फंड्स ही ग्रामीण भागातील खाजगी संस्था आहे. याचे सभासदत्व खुले असते. बचत गोळा करणारी व कर्ज पुरवठा करणारी ही एक लवचिक संस्था आहे. उत्तर भारतात असे शेकडो चिट्स फंड्स अस्तित्वात असलेले दिसून येतात.

**५) नातेवाईक :**

अल्प काळाकरिता कर्ज मिळविण्याचा हा मार्ग आहे. दिर्घ काळाकरिता या मार्गाने फारशी कर्जे उपलब्ध होत नाहीत. पण खऱ्या अर्थाने हा कर्जाचा मार्ग नसून अडचणीतून सुटलेला तात्पुरता मार्ग आहे.

**ब) संस्थात्मक वित्तपुरवठा :**

शेतकऱ्यांना, अल्पकालीन, मध्यकालीन व दिर्घकालीन कर्ज पुरवठा पुरेशा प्रमाणात वाजवी व्याजदरात वित्तपुरवठा करणारी संस्था, संस्थात्मक वित्तपुरवठा हा रिझर्व बँक व राज्य किंवा केंद्र सरकारच्या मान्यताप्राप्त संस्थांकडून केला जातो. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची सावकारी कर्ज पद्धतीतुन सुटका करण्यासाठी आणि ग्रामीण कर्जाची गरज मागविणे यासाठी त्यांची निर्मिती केलेली आहे. यांच्यामार्फत होणाऱ्या कर्जाचा व्याजदर हा उद्देशानुसार व स्वरुपानुसार वेगवेगळा असतो. तसेच कर्जाचा विनियोग योग्य पद्धतीने होतो कि नाही यावर देखील लक्ष दिले जाते. या स्त्रोतामध्ये सरकार, सहकारी बँक, व्यापारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, रिझर्व्ह बँक, नाबार्ड, स्टेट बँक ऑफ इंडिया इ. समावेश होतो. संस्थात्मक वित्तपुरवठ्याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहे.

१) संस्थात्मक वित्तपुरवठ्याला सरकारच्या कायद्याच्या कक्षेत राहून काम करावे लागते.

२) संस्थात्मक वित्तपुरवठ्याची तपासणी सरकारी यंत्रणामार्फत केली जाते.

३) या संस्था फक्त बँकींग व्यवसाय करतात.

४) या वित्तीय पुरवठ्यावर सरकारी नियंत्रण असते.

५) ग्राहकांशी फक्त औपचारिक संबंध असतात.

६) कर्ज व्यवहारात, जामीन, व्याजदर, तारण या सर्व औपचारिकता पुर्ण कराव्या लागतात.

७) संस्थात्मक वित्तपुरवठा करणाऱ्या संस्थांचे आर्थिक व्यवहार गोपनिय असतात.

munotes.in

**संस्थात्मक वित्तपुरवठ्याचे स्त्रोत :**

अन्नधान्याचे उत्पादन भारतात फारसे किफायतशीर होत नाही. भारतीय शेतकरी कमी उत्पादकता हे त्यामागील कारण आहे. म्हणून शेतीला कमीत कमी व्याजदरात कर्ज पुरवठा झाला पाहिजे. अनेक कारणांमुळे शेतीला स्वस्त, जलद कर्जपुरवठा होत नाही. त्यामुळे ग्रामीण भागात कर्ज पुरवठ्याबाबत सावकारांचे वर्चस्व असलेले दिसून येते ते कमी करण्यासाठी संस्थात्मक वित्तपुरवठ्याची भूमिका महत्त्वपूर्ण असलेली दिसून येते. संस्थात्मक वित्तपुरवठ्यामध्ये वित्तपुरवठा करणारी स्त्रोते खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१) सरकारी कर्ज :**

सावकारांकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी सरकारने कर्जे देण्याची व्यवस्था केली आहे. शेतकऱ्याला बी, बियाणे, अवजारे, खते, किटकनाशके खरेदीसाठी कर्जे दिली जातात. दुष्काळ परिस्थिती, महापुर अशा आपत्ती जनक स्थितीत कमी व्याजाने नगदी कर्जे दिली जातात. तसेच १८८३ च्या भुसुधार कायद्यानुसार विहीर बांधणे, कुंपण घालणे, बंधारे बांधणे इ. दिर्घ मुदतीची कर्जे दिली जातात.

**२) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया :**

रिझर्व्ह बँक कृषी क्षेत्राला प्रत्यक्ष कर्ज पुरवठा न करता राज्य सहकारी बँकेमार्फत करते. रिझर्व्ह बँकेमार्फत राज्य सरकारच्या हमीच्या आधारे आणि सरकारी रोख्यांच्या हमीच्या आधारे विविध शेतकी प्रक्रियाकरिता अल्पकालीन कर्ज राज्य सहकारी बँकांना दिली जातात. ही कर्जे नेहमीच्या दरापेक्षा दोन टक्के कमी दराने दिली जातात.

**३) स्टेट बँक ऑफ इंडिया :**

स्टेट बँक ऑफ इंडिया व सात सलग्न बँकांनी ग्रामीण भागात कर्ज पुरवठा करण्याबाबत महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. स्टेट बँक शेतकऱ्याला शेती व्यवसायासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर्जे पुरवठा करते.

**४) व्यापारी बँका :**

भारतात बँकांच्या राष्ट्रीयीकरणापासून व्यापारी बँका शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष करीत होत्या. पुढे सरकारने व्यापारी बँकावर सामाजिक नियंत्रणे लादली व एकूण कर्जपुरवठ्याच्या कृषी क्षेत्राला ठराविक हिस्सा देण्यात यावा असे बंधन घातले. ९ जुलै १९६९ मध्ये ज्या व्यापारी बँकांच्या ठेवी ५० कोटीपेक्षा जास्त आहेत. अशा १४ बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. पुढे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अल्प व मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा सुरु झाला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना खते, बीयाणे, किटकनाशके, पंपसेट, ट्रॅक्टर, विहीर, जनावरे खरेदी, जमीन सपाटीकरण इ. कर्ज पुरवठा करतात.

**५) सहकारी बँका :**

ग्रामीण भागातील शेतीला कर्जपुरवठ्यामध्ये सरकारी बँकांची भूमिका महत्त्वपूर्ण मानली जाते. सरकारी बँकामार्फत केला जाणारा पतपुरवठा हा अत्यंत स्वस्त आणि सर्वोत्तम असा असून भारतातील सरकारी बँकांची रचना प्राथमिक सरकारी पत पुरवठा संस्था जिल्हा मध्यवर्ती सरकारी बँक व राज्य सरकारी बँक अशी त्रिस्तरीय असलेली दिसून येते.

munotes.in

### ६) भूविकास बँका :

शेती व्यवसायाला रास्त दराने दिर्घकालीन कर्जपुरवठा करण्यासाठी भूविकास बँकांची स्थापना करण्यात आली आहे. अलीकडे या बँकांना 'कृषी व ग्रामीण विकास बँका' असे संबोधले जाते.

### ७) प्रादेशिक ग्रामीण बँक :

प्रादेशिक ग्रामीण बँका १९७५ मध्ये छोटे व सिमांत शेतकरी, शेतमजुर, ग्रामीण कारागीर आणि इतर अल्प उत्पन्न गटातील लोकांना प्रत्यक्ष वित्त पुरवठा करण्यासाठी स्थापन करण्यात आल्या, वित्तपुरवठा उत्पादन करण्यासाठी दिला जातो.

### ८) राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) :

ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था गतिमान करण्यासाठी व कर्ज पुरवठा व्यवस्थित होण्यासाठी रिझर्व्ह बँकेने व केंद्र सरकारने ५०% समान भांडवल टाकून जुलै १९८२ मध्ये स्थापना केली. नाबार्ड हे शेती विषयक सर्व गोष्टींना कर्जपुरवठा करते.

### ९) अग्रणी बँक योजना :

देशातील आर्थिक विकासात व्यापारी बँकांचा सहभाग मोठा असतो. कर्जपुरवठ्यामध्ये कोणत्या त्रुटी आहेत. त्यात कोणत्या सुधारणा कराव्यात. यासाठी डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षेतेखाली अभ्यास गट नेमला. त्यांनी व्यापारी बँकांनी प्रादेशिक दृष्टीकोन स्विकारावा अशी शिफारस केली. पुढे के.पी. नरीमन यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गट नेमला त्यानुसार देशातील प्रथम ३३८ अग्रणी बँक योजना तयार करण्यात आली. ज्या बँकेला जो जिल्हा दिला असेल त्या जिल्ह्याच्या विकासात असलेला वाव व उपलब्ध साधनसामुग्रीचा विचार करुन कर्जपुरठ्याची योजना तयार करावी असे ठरविण्यात आले.

अशा प्रकारे संस्थात्मक वित्तपुरवठ्याची स्त्रोते असलेली दिसून येतात.

## ६.१० कृषी वित्तपुरवठ्याची आवश्यकता



भारत हा कृषी प्रधान देश आहे. मात्र भारतीय शेतीची उत्पादकता फारच कमी असलेली दिसून येते. आजच्या आधुनिक युगात व शेतीतील नवीन तंत्रज्ञानातून ही उत्पादकता वाढू शकेल मात्र त्याचा अवलंब करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता आहे. शेती क्षेत्राला

वित्तपुरवठा करणाऱ्या विविध स्त्रोताकडून पुरेसा व माफक व्याजदराने कर्ज पुरवठा झाला तर कृषी उत्पादनात आमुलाग्र बदल होऊ शकतो. त्या दृष्टिकोनातून कृषी वित्तपुरवठ्याची आवश्यकता आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१) शेती उत्पादनासाठी :**

शेती उत्पादनाच्या वाढीसाठी शेतकऱ्यांना कृषी वित्त पुरवठ्याची आवश्यकता भासते. शेतीसाठीची गुंतवणूक उदा. बी बियाणे, किटकनाशके, जनावरे खरेदी करणे, यंत्रे, विहीर, जमीन सपाटीकरण इ. कर्जाची आवश्यकता असते.

**२) दैनंदिन जीवनासाठी :**

भारतातील बहुसंख्य शेतकरी हे अल्प, अत्यल्प व सिमांत भूधारक असलेले दिसून येतात. त्यांना शेतीतून मिळणारे उत्पन्न हे फारच कमी मिळते. इतरवेळी काम उपलब्ध असेल तरच मजुरी मिळते. त्यामुळे कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी पैशाची आवश्यकता असते. शेतीचे हंगामाचे स्वरुप, अवर्षण, पूर इ. स्थितीच्या काळात कृषी उत्पादन येत नसल्याने उपभोग कर्ज घ्यावे लागते.

**३) शेती विकासासाठी :**

शेतीचा विकास करण्यासाठी त्यात संस्थात्मक बदल आवश्यक असतात. भारतीय शेती ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे एकच पिक काढले जाते. दुबार, तिबार पिक घ्यावयाचे असेल तर शेतीला बारमाही पाण्याच्या सोयीसाठी, विहीर खणणे, सिंचन सुविधा, पंपसेट, जमीन सपाटीकरणासाठी कर्जाची आवश्यकता असते.

**४) अनुत्पादक कारणांसाठी :**

भारतीय शेतकऱ्याला जसे उत्पादक कारणासाठी पैशाची आवश्यकता असते. तशी अनुत्पादक कारणासाठी देखील पैशाची आवश्यकता असते. याशिवाय धार्मिक कार्ये, लग्ने, बारसे, सोनेचांदी, इ. बाबींवर खर्च केला जातो. हा खर्च प्रामुख्याने खासगी कर्ज घेऊन केला जातो.

**५) आकस्मिक कारणासाठी :**

भारतीय शेती ही पुर्णपणे निसर्गावर अवलंबून असलेली दिसून येते. त्यातच दुष्काळजन्य परिस्थिती, रोगराई, अवर्षण इ. मुळे प्रचंड प्रमाणात नुकसान होते. ते नुकसान भरुन काढण्यासाठी किंवा नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी कर्जाची आवश्यकता असते.

**६) कौटुंबिक गरज भागविण्यासाठी :**

शेतकऱ्यांना घरगुती गरज, औषधोपचार, शिक्षण इ. कौटुंबिक कारणासाठी कर्जाची आवश्यकता असते. त्याच बरोबर वाहतूक साधनांची तसेच शेती उपकरणाच्या दुरुस्तीसाठी शेती कर्जाची आवश्यकता असते.

**७) शेतीतील तांत्रिक बदल :**

भारतातील शेती क्षेत्रातील उत्पादन वाढविण्यासाठी शेतीमध्ये सुधारित बी-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके, तांत्रिक साधने, ठिंबक सिंचन इ. साधनांच्या खरेदीसाठी कर्जाची आवश्यकता असते.

munotes.in

### ८) शेती पुरक व्यवसाय :

ग्रामीण भागात लहान व सिमांत शेतकरी आणि शेतमजुरांना आपले उत्पन्न वाढविण्यासाठी पुरक व्यवसायाची आवश्यकता असते. असे व्यवसाय सुरु करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता असते. उदा. कुक्कूटपालन, मधूमक्षिकापालन, वराह पालन, शेळ्या मेंढी पालन इ.

### ९) पडीक जमीन लागडीसाठी :

भारतातील शेतकऱ्यांकडे मोठ्या स्वरुपात पडीक जमीन असलेली दिसून येते. तीचा वापर उत्पादन प्रक्रियेत करता येऊ शकतो. मात्र त्यासाठी जमीन सपाटीकरण, बांधबांधणी, कुंपण, पाण्याची सुविधा, इ. बदल केल्यास ही जमीन लागवडी खाली येऊ शकते. त्यासाठी भांडवलाची आवश्यकता असते.

अशाप्रकारे विविध प्रकारच्या शेती कारणांसाठी तसेच बिगर कृषी कारणांसाठी ग्रामीण भागात कृषी पतपुरवठ्याची आवश्यकता असलेली दिसून येते.

## ६.११ कृषी वित्तपुरवठ्याची समस्या

भारतीय अर्थव्यवस्थेत स्वातंत्र्योत्तर कालखंडात कृषी विकासासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. अनेक उपाययोजना करण्यात आल्या. संस्थात्मक वित्तपुरवठ्याच्या साधनांनी कृषीक्षेत्रात वित्तपुरवठा केला जात आहे. तरीसुद्धा ग्रामीण वित्तपुरवठ्यात काही समस्या आहेत त्या पुढीलप्रमाणे -

### १) गरजु व्यक्तीकंडे कमी लक्ष :

शेतीसाठी कर्जाची आवश्यकता प्रामुख्याने सिमांत, अल्प, तसेच अत्यल्प भूधारकांना जास्त असते. कारण शेतजमीन धोरण क्षेत्रे फारच कमी असते. त्यामुळे तो दारिद्र्याच्या दृष्ट चक्रात आढळतो. शेतकऱ्याची पत, तारण यासारख्या आधारावर आवश्यक तेवढे कर्ज मिळत नाही. त्यामुळे नाईलाजाने त्याला सावकार, जमीनदार यांच्या शिवाय पर्याय राहत नाही.

### २) अपुरे कर्ज :

शेतकऱ्याला शेती कर्ज योग्य वेळी, योग्य मात्रेत व योग्य अटींवर मिळणे आवश्यक असते. मात्र या बाबतीत संस्थात्मक कर्ज पुरवठा यामध्ये कमी पडतो. त्यामुळे शेतकऱ्यांना सावकाराशिवाय पर्याय राहत नाही. शेतकऱ्याला पुरेसे कर्ज मिळाले नाही तर सावकारी पाशातून आणि दारिद्र्यातूनही बाहेर पडणे शेतकऱ्याला शक्य होणार नाही.

### ३) दिर्घकालीन ग्रामीण वित्तपुरवठ्याची समस्या :

ग्रामीण विकासासाठी दिर्घकालीन वित्तपुरवठा करणाऱ्या सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँकांच्या थकबाकीच्या समस्या अत्यंत गंभीर स्वरुपाच्या आहेत. मध्यवर्ती सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँका विस्तारत आहेत. परंतू वाहन व्यवसाय आणि बँकींग क्षेत्रातील आव्हाने सोडविण्यासाठी मनुष्यबळ नाही.

**४) सहकारी थकबाकींची समस्या :**

सहकारी पतपुरवठा करणाऱ्या संस्थांची थकबाकी सातत्याने वाढत आहे. याची कारणे म्हणजे शेतकऱ्यांची कर्जफेडी बाबतची नकारात्मक मानसिकता, कर्जाचा गैरवापर, चुकीचे कर्ज धोरण, बाह्य घटकांचा हस्तक्षेप, कर्जाबाबत सवलती इ. बाबी कर्जवसुलीत अडथळा करतात.

**५) कर्ज वाटपातील असंतुलन :**

ग्रामीण क्षेत्र, मोठे शेतकरी, छोटे शेतकरी, निरनिराळी राज्ये, राज्यामधील निरनिराळे विभाग या सर्वांची कर्जाची गरज लक्षात घेऊन नंतर संतुलन कायम राहील अशा रितीने कर्जाचे वाटप व्हायला हवे. ज्या क्षेत्राला जास्त गरज असेल, किंवा जे क्षेत्र मागासलेले असेल तेथे कर्जाचे जास्त प्रमाण द्यायला हवे, प्रत्यक्षात मात्र असंतुलन दिसून येते.

**६) पतपुरवठ्याचा आधार :**

शेती क्षेत्राला कर्जपुरवठा करताना पतसंस्थांनी कोणत्या आधारावर करावा हा महत्त्वाचा प्रश्न आहे. सामान्य शेतकऱ्याकडे जमीनी शिवाय इतर संपत्ती नसते. त्यावर जास्त कर्ज मिळत नाही. मात्र जास्त जमीन असणाऱ्या मोठ्या शेतकऱ्यांना मात्र जास्त कर्ज मिळते. म्हणून कर्जाचा आधार जमिन न ठेवता शेतकऱ्याची विकास क्षमता हा ठेवला पाहिजे. कर्ज दिल्यानंतर उत्पादन वाढून विकास होण्याची क्षमता किती आहे याचा अंदाज घेऊन कर्जाचे वाटप व्हायला हवे.

**७) कर्जाचा वापर :**

शेतीला कर्ज दिल्यानंतर त्याचा उपयोग, नेमका शेतीसाठी होतो कि नाही हे समजण्यासाठी प्रभावी नियंत्रण नसणे ही एक समस्या आहे. उत्पादक कार्यासाठी उपभोगासाठी आणि अनुत्पादक कारणासाठी खर्च होते. यापैकी अनुत्पादक रितीने खर्च होणारे कर्ज परतफेडीची क्षमता निर्माण करत नसल्याने त्याचा भार शेतकऱ्यालाच सहन करावा लागतो. त्यामुळे कर्जाचा विनियोग्य योग्य प्रकारे होतो कि नाही यावर नियंत्रण असणे आवश्यक आहे.

वरील प्रकारे कृषी वित्तपुरवठ्यातील समस्या असलेल्या दिसून येतात. त्या दुर केल्याशिवाय कृषी पतपुरवठ्याची पद्धती कार्यक्षम होऊ शकत नाही.

## ६.१२ कृषी वित्तपुरवठ्याच्या समस्यांवरील उपाय

विकसनशील देशाच्या विकासामध्ये ग्रामीण भाग व विशेषतः शेतीच्या विकासाचे स्थान महत्त्वाचे आहे. त्या दृष्टिकोनातून ग्रामीण भागाला व शेती क्षेत्राला कर्जपुरवठा होत आहे. मात्र त्यात अनेक समस्या दिसून येतात. जो पतपुरवठा होतो त्यापासून पुर्ण फायदे मिळणे आवश्यक आहे. नाहीतर त्याचा परिणाम कृषी क्षेत्रावर झालेला दिसून येईल. यादृष्टिकोनातून कृषी वित्तपुरवठाच्या समस्यांवर उपाय योजले तर त्याचे चांगले परिणाम दिसून येतील त्यासाठी खालील उपाय सुचविले आहेत.

**१) वाजवी अटी :**

शेतीला कर्ज देत असताना कर्जासोबत ज्या अटी लागू केल्या जातात त्या अवाजवी नसाव्यात. पतसंस्था शेती शिवाय व्यापार, उद्योग किंवा इतर क्षेत्राला ज्या अटी लागू करीत असतील त्या तुलनेत कृषी पतपुरवठ्याच्या अटी प्रतिकूल नसाव्यात. शेती क्षेत्राला सवलती द्याव्यात. जसे व्याजाचा दर कमी ठेवणे, कर्ज परतफेडी अटी लवचिक ठेवणे इ.

**२) कर्जाबाबत सुरक्षितता :**

कर्ज देताना योग्य हमी घेऊन ते सुरक्षित केलेले असावे. हमी वस्तू स्वरुपातच असावी असे नाही. पण अशी सुरक्षितता असल्याशिवाय कर्जाचा उपयोग कामासाठीच होईल याची खात्री निर्माण होत नाही. मात्र त्यातून कर्जवापरावर नियंत्रण ठेवता येते.

**३) परतफेड क्षमतेचा आधार :**

कर्ज देताना तारण हे बँकेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून योग्य असते. पण गरिब शेतकऱ्याजवळ योग्य तारण असण्याची शक्यता कमी असते. त्यावर तारणावर अवाजवी भर देण्यापेक्षा, कर्ज दिल्यानंतर ते परतफेडीची क्षमता कितपत निर्माण होऊ शकते. याचा विचार व्हायला हवा.

**४) कार्यक्षम व्यवस्थापन :**

बँकेने दिलेल्या कर्जाचा वापर योग्य कारणासाठीच होतो कि नाही हे पाहण्याची जबाबदारी पतपुरवठा रचनेची असते. मात्र याकडे लक्ष देतेवेळी शेतकऱ्याचे हित आणि गरजा या गोष्टींकडे पुरेसे लक्ष दिले जावे.

**५) कर्जाची विविधता :**

कृषी क्षेत्रात शेतकऱ्याला कर्जाची गरज ही वेगवेगळी असते. चालू कामासाठी अल्पमुदतीचे तर कायम सुधारणांसाठी मध्यम व दिर्घ मुदतीचे कर्ज आवश्यक असते. त्यामुळे शेतकऱ्याच्या गरजानुसार वित्तपुरवठा केला जावा.

**६) पुरेसे कर्ज :**

शेतकऱ्याची गरज असेल तेवढी कर्जाची रक्कम असणे आवश्यक आहे. त्यामुळे कामाचे स्वरुप पाहून त्यासाठी आवश्यक इतकी रक्कम जर दिली तर कर्जाचा खरा उपयोग होऊ शकेल.

**७) कर्जाची त्वरीत उपलब्धता :**

शेतकऱ्याला दिले जाणारे कर्ज योग्य वेळेत दिले तर त्यासाठी शेतकऱ्याला फारसा त्रास सहन करावा लागत नाही. त्यातून त्याचा परसंस्थेवरचा विश्वास वाढतो. कर्जाला वेळ लागला तर तो जास्त व्याज असले तरी बिगर संस्थात्मक स्त्रोतांकडे वळतो.

**८) लवचिकता :**

शेतकऱ्याला शेती हंगामाच्या काळातच कर्जाची आवश्यकता जास्त असते. त्यामुळे अशावेळी त्याला कर्जाचा पुरवठा होणे आवश्यक आहे. त्यामुळे पतपुरवठा रचनेमध्ये लवचिकता असायला हवी.

**९) कर्जपरतफेडीच्या योग्य अटी :**

औद्योगिक क्षेत्रात होणारे उत्पादन हे वेळेत होत असते. मात्र ही निश्चितता शेती क्षेत्रात असलेली दिसून येत नाही. त्यामुळे जर उत्पादनात अडचनी आल्या तर त्यांचा सहानुभूतीने विचार होणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकऱ्यावर अनावश्यक ताण न पडता तो कर्जाची परतफेड करु शकेल.

वरील प्रकारचे उपाय कृषी वित्त पुरवठ्यातील समस्या दूर करु शकतात.

## ६.१३ सारांश

विपणन याचा अभ्यास करताना विपणन म्हणजे काय? बाजारपेठांचे प्रकार, शेतमाल विपणन व्यवस्थेतील महत्त्व विषद करण्यात आले आहे. ही विपणन व्यवस्था दोष पुर्ण असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. हे नुकसान टाळण्यासाठी विपणन व्यवस्थेतील दोष दुर केल्यास शेतकऱ्याच्या परिस्थितीत फरक पडू शकेल त्यासाठी हे दोष दुर करण्यासाठी कोणते उपाय सुचविता येतील याचा आढावा घेण्यात आला आहे. ग्रामीण आर्थिक संस्थांचा अभ्यास करताना कर्जाचे प्रकार, कर्जबाजारीपणाची कारणे उपाय याची माहिती देण्यात आली आहे.

## ६.१४ स्वाध्याय

१) शेतमाल विपणन म्हणजे काय ते सांगून बाजारपेठांचे प्रकार सांगा?

२) विपणनाची संकल्पना स्पष्ट करुन कृषी विपणनाचे महत्त्व सांगा.

३) कृषी विपणनातील दोष सांगून ते दूर करण्याचे उपाय सांगा.

४) शेतमाल विपणन व्यवस्थेतील दोष दुर करण्याचे उपाय सुचवा.

५) शेतमाल विपणन व्यवस्थेतील दोष सांगा.

६) वित्तपुरवठ्याची संकल्पना स्पष्ट करुन ग्रामीण वित्तपुरवठ्याचे प्रकार सांगा.

७) कृषी वित्त पुरवठ्याची आवश्यकता स्पष्ट करा.

८) कृषी वित्त पुरवठ्यातील समस्या सांगून त्यावर उपाय योजना सुचवा.

## ६.१५ संदर्भसूची

१) डॉ. कायंदेपाटील गंगाधर, शेतीचे अर्थशास्त्र, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक, २०१५

२) डॉ. सौ. शैला बिराजदार, भारतीय अर्थव्यवस्था, अथर्व पब्लिकेशन, धुळे २०१४

३) डॉ. दिलीप जगताप, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, अथर्व पब्लिकेशन, धुळे २०१४

४) डॉ. विजय पी. नारखेड, कृषी अर्थशास्त्र, अथर्व पब्लिकेशन, धुळे २०१५

munotes.in

५) प्रा. अशोक डांगे, जागतिक अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापुर, १९९९

६) प्रा. शशिकांत अट्रावलकर, भारतीय अर्थव्यवस्थेची विकास धोरणे, शेठ प्रकाशन, मुंबई, २००५.

७) प्रा. अरुण मणेरीकर, कृषी विपणन आणि वित्तपुरवठा, प्राची प्रकाशन, मुंबई, २०००

८) प्रा. एम.एस. लिमण, विपणन आणि वित्त, शेठ प्रकाशन, मुंबई, २००३

९) देसाई, भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे.

१०) डॉ. रामचंद्र निवृत्ती साबळे, कृषी घटक

११) ग्रामीण विपणन आणि वित्तपुरवठा, संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ

१२) डॉ. सुदर्शन खापर्डे, ग्रामपंचायतीचे प्रशासन, विद्या प्रकाशन, नागपुर, २००८

१३) डॉ. दिलीप पाटील, डॉ. स्मिता भोईर, प्रा. प्रविण सनये, प्रा. रमेश म्हात्रे, ग्रामीण विकासाची तोंडओळख, दुर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, २०१०

❖❖❖❖

munotes.in

# घटक -७

## ग्रामीण समुदायाच्या समस्या (भाग १)

- प्रा. विवेक शां. चव्हाण

**पाठाची रचना :**

७.१ पाठाची उद्दिष्टे
७.२ प्रस्तावना
७.३ शिक्षण
७.४ आरोग्य
७.५ दारिद्र्य
७.६ सारांश
७.७ स्वाध्याय
७.८ संदर्भसूची

### ७.१ उदिष्ट्ये

- शिक्षणाच्या समस्या अभ्यासणे व त्यावरील उपाय सुचविणे.
- ग्रामीण आरोग्य समस्यांचा अभ्यास करणे.
- ग्रामीण दारिद्र्याचा अभ्यास करणे.

### ७.२ प्रस्तावना

मनुष्य साधनसंपत्तीचा विकास हा शिक्षण व आरोग्य सुविधांवर अवलंबून असतो. राष्ट्राच्या विकासासाठी शिक्षणाची गरज असून मनुष्य साधनसंपत्ती निरोगी सुशिक्षित, सुजाण, सुसंस्कारित असली तरच राष्ट्राची प्रगती होते. १९९० सालापासून ते आजपर्यंत राबविलेल्या विविध योजना तसेच उपक्रमांमुळे महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण वाढलेले दिसून येते. १९९१ मध्ये महाराष्ट्रातल्या १८ जिल्ह्यांमध्ये महिला साक्षरतेचे प्रमाण ३० ते ५० टक्क्याच्या दरम्यान होते, तर २००१ मध्ये राज्यातल्या २३ जिल्ह्यांमध्ये हेच प्रमाण ५० ते ७० टक्क्यांपर्यंत पोहोचले. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यामधून २००१-२०११ दरम्यान साक्षरतेच्या प्रसारात सरासरी ६५% पुरुष साक्षर असून महिलांचे प्रमाण कमी आहे. राज्यांमध्ये केरळ राज्यात सर्वाधिक म्हणजेच ९६.६५% साक्षर लोकसंख्या असून बिहारमध्ये सर्वात कमी म्हणजे ५६.५३% साक्षर लोकसंख्या होती. आज साक्षरतेची टक्केवारी बऱ्यापैकी वाढली असली तरी

munotes.in

लोकसंख्येतील प्रचंड वाढीमुळे अद्यापही निरक्षरांची संख्या लक्षणीय आहे. त्यातच दारिद्र्य, बेकारी, आरोग्याच्या समस्येमुळे बहुसंख्य मुले आपले प्राथमिक शिक्षण पुर्ण करु शकत नाहीत.

## ७.३ शिक्षण

**शिक्षणाच्या व्याख्या :**



भारतातील आणि पाश्चिमात्य देशांतील अनेक विद्वानांनी, विचारवंतांनी आणि शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षणाच्या व्याख्या केल्या असून त्या पुढीलप्रमाणे -

१) **ऋग्वेद :** माणसाला जो आत्मविश्वासू व निःस्वार्थी बनविते ते शिक्षण होय.

२) **शंकराचार्य :** शिक्षण म्हणजे आत्मसाक्षात्कार

३) **स्वामी विवेकानंद :** शिक्षण म्हणजे माणसातील दैवी शक्तीच्या पूर्णत्वाच्या अविष्कार होय.

४) **महात्मा गांधी :** शिक्षण म्हणजे माणसाच्या शरीर, मन व चैतन्यातील उत्कृष्ठतेची अभिव्यक्ती होय.

५) **श्री. अरविंद घोष :** अंर्तआत्म्याचा विकास करण्यासाठी मदत करणे म्हणजे शिक्षण होय.

६) **प्लोटो :** शरीर व आत्मा यांना त्यांच्या पात्रतेनुसार पूर्णत्वाकडे नेणे म्हणजे शिक्षण होय.

७) **ॲरिस्टॉटल :** शिक्षण म्हणजे सुदृढ शरीरात सुदृढ मन तयार करणे.

८) **स्पेन्सर :** पुर्णत्वाने जगणे म्हणजे शिक्षण होय.

९) **जॉन ड्युई :** जात, लिंग, वर्ग आणि आर्थिक दर्जा लक्षात न घेता मानवी व्यक्तींच्या क्षमतांना मुक्त करणे व त्यांचा विकास करणे म्हणजे शिक्षण होय.

१०) **सॉक्रेटिस :** प्रत्येक माणसाच्या मनात अद्ययावत व वैश्विक विश्वासार्हता असलेल्या कल्पना बाहेर काढणे म्हणजे शिक्षण होय.

munotes.in

**शिक्षणाचा इतिहास :**

शिक्षणाचा इतिहास अभ्यासत आधुनिक असताना प्रामुख्याने प्राचीन व मध्ययुगीन व आधुनिक शिक्षणाचा विचार करणेही आवश्यक आहे. प्राचीन भारतातील शिक्षणाचा अभ्यास करताना यामध्ये वैदिक कालखंड, बौद्धकालीन शिक्षण पद्धती व जैन काळातील शिक्षण या शिक्षण प्रणालीचाही आढावा घेणे आवश्यक आहे.

**वैदिक काळातील शिक्षण :**

या काळात विद्यार्थ्यांना भौतिक व अध्यात्मिक दोन्ही प्रकारचे शिक्षण दिले जात असे. विद्यार्जनासाठी छात्रांना गुरुंच्या आश्रमात जावे लागे यालाच गुरुकुल शिक्षणपद्धती म्हणतात. स्व ची जाणीव करुन देणारे हे शिक्षण होते. याकाळात शिक्षण घ्यायचा अधिकार सर्वांना होता. स्त्रि शिक्षणास परवानगी होती. उत्तर वैदिक काळात मात्र वैश्य, शूद्र आणि स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. वैदिक काळातील शिक्षणाच्या अभ्यासक्रमात शिक्षा, कला, व्याकरण, ज्योतिष, छंद, निरुक्त इ. विषयांचा अंतर्भाव होता. अध्यापन पद्धतीमध्ये मौखिक किंवा तोंडी सुसंवादावर अधिक भर होता. अचूक उच्चारण, पठण, मनन, चिंतन, ध्यानधारणा व ज्ञानप्राप्ती इ. मार्गांनी अध्यापन केले जात असे. गुरुची म्हणजेच शिक्षकांची भूमिका सर्वश्रेष्ठ असून गुरु विनावेतन ज्ञानदानाचे कार्य करित असे. शिष्य आपले शिक्षण पूर्ण झाल्यानंतर गुरुला गुरुदक्षिणा देत असत.

**बौद्ध काळातील शिक्षण :**

बौद्ध काळातील पद्धतीचा कालावधी सर्वसाधारणपणे इ.स. पूर्व ५६७ ते इ.स. पूर्व ४८७ म्हणता येईल. बौद्ध काळातील शिक्षण प्रणालीत शिक्षण मठ किंवा विहारात दिले जात असे. बौद्ध कालीन शिक्षणाची ध्येये पुढीलप्रमाणे होती.

१) निर्वाण प्राप्ती
२) व्यावहारिक, औद्योगिक व तांत्रिक बाबीचे ज्ञान
३) लेखन, वाचन, गणिती कौशल्य शिकविणे
४) बौद्ध धर्म, बौद्ध तत्त्वज्ञान यांचे शिक्षण देणे.

**जैन शिक्षणप्रणाली :**

जैन शिक्षणप्रणालीत शिक्षण हे ज्ञानप्राप्तीचे व आत्मोद्धाराचे प्रभावी साधन होते.

**जैन शिक्षणाची ध्येय्ये पुढीलप्रमाणे :**

१) जैन धर्माचा प्रसार करणे
२) विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे
३) चारित्र्यसंवर्धन करणे
४) आत्मसंयमन करणे
५) स्वावलंबन शिकविणे
६) पुण्य संचयन करुन पापनाश करणे

munotes.in

७) पुर्वग्रहदूषित दृष्टिकोन न ठेवणे

८) सर्वांचे भले चिंतणे

९) अहिंसा तत्त्वाचे पालन करण्यासाठी शिक्षण देणे

**प्राचीन भारतीय शिक्षणपद्धतीतील काही अध्ययन केंद्रे**

१) तक्षशिला

२) नालंदा

३) विक्रमशिला

४) वल्लभी

५) काशी

६) कांची

**भारतातील मध्ययुगीन काळातील शिक्षण :**

मध्ययुगीन भारतीय शिक्षणावर मुस्लीम राजवटीचा मोठा प्रभाव दिसून येतो.

**मध्ययुगीन शिक्षणाची ध्येये :**

१) ज्ञान प्रसार

२) इस्लाम धर्माचा प्रसार

३) नैतिकता वाढविणे

४) भौतिक सुखसमृद्धी साधणे

५) राज्याला स्थैर्य व बळकटी प्राप्त करणे

मध्ययुगीन राजवटीमध्ये शिक्षणाचे दोन स्तर होते. त्यात प्राथमिक स्तरात मक्ता व उच्च स्तरास मदरसा असे म्हणत. शिक्षणाची सुरुवात मुलांवर बिसमिल्ला नावाचा संस्कार झाल्यानंतर होत असे. प्राथमिक शाळेत मुलांना अरबी व पर्शियन भाषा शिकाव्या लागत. अंकगणित, पत्रलेखन, कुराणवाचन व पठण यांचा अभ्यासक्रमात समावेश होतो. मदरसामधून उच्च शिक्षण दिले जात असे.

**आधुनिक काळातील शिक्षण पद्धती :**

आधुनिक काळात भारतात ब्रिटिश, पोर्तुगीज, डच, फ्रेंच यांनी धर्मप्रसाराच्या उद्देशाने शिक्षणप्रसाराचे कार्य हाती घेतले. नंतर ब्रिटीशांनी राज्यकर्त्यांच्या भूमिकेतून भारतीय शिक्षणावर विशेष लक्ष केंद्रित केले. विशेषतः लॉर्ड बेंटिग, लॉर्ड मेकॉले यांनी भारतात पाश्चिमात्य पद्धतीने शिक्षण देण्याचे प्रयत्न केले. भारतीय शिक्षणाच्या विकासात लॉर्ड मेकॉले यांचे योगदान मोठे व वादग्रस्तही आहे. चार्लस वुड, हंटर, सार्जंट इ. ब्रिटीश अधिकाऱ्यांनी भारतीय शिक्षणात सुधारणा करण्याचे वेळोवेळी प्रयत्न केले.

याच काळात भारतातील समाजसुधारक राजा राममोहन रॉय, म. ज्योतीराव फुले, आगरकर यांनी भारतीय शिक्षणात सुधारणा करण्याचे प्रयत्न केले. इ.स. १८८२ मध्ये हंटर आयोगापुढे महात्मा फुले यांनी सादर केलेले निवेदन, भारतात ब्रिटीश शासनाने मोफत

(विनाशुल्क) सक्तीचेच सार्वत्रिक स्वरुपाचे शिक्षण द्यावे म्हणून महात्मा फुले व ना. गोखले यांनी आग्रह धरला. भारतात विनाशुल्क, सक्तीच्या व सार्वत्रिक शिक्षणाचा स्त्री-पुरुष, जातधर्म यांचा विचार न करता पहिला यशस्वी प्रयोग कोल्हापुरचे छत्रपती शाहू महाराज यांनी केला. त्यानंतर बडोद्याचे नरेश महाराजा, सयाजीराव गायकवाड यांनी आपले बडोदा संस्थानात मोफत, सक्तीच्या व सर्वांना शिक्षण देणाऱ्या धोरणाला पाठिंबा देऊन त्या धोरणाची अंमलबजावणी केली.

राष्ट्रपिता म. गांधीनी मुलोद्योगी (वर्धा शिक्षण) योजेनद्वारे सक्तीच्या विनाशुल्क व सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कार केला. त्याचबरोबर मातृभाषेतून शिक्षण व हस्तव्यवसायांच्या माध्यमातून शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना स्वावलंबी, स्वाभिमानी व राष्ट्रप्रेमी बनविण्यावर भर दिला.

**स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षण व्यवस्था :**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यानंतर भारतीय शिक्षणात पुर्नरचना करण्यासाठी शासकीय पातळीवर विविध आयोग व समित्या नेमण्यात आल्या. कारण ग्रामीण जनतेमधील अज्ञान, निरक्षरता, अंधश्रद्धा प्रगतीमध्ये अडसर ठरत होत्या. चांगले नेतृत्व, नागरिकत्व विकसित करण्यासाठी, लोकशाही, समाजवादी जीवनपद्धती निर्माण करण्यासाठी विद्यापीठ शिक्षणाची पुर्नरचना करणे गरजेचे होते. यासाठीच भारत सरकारने ४ नोव्हेंबर १९४८ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली "विद्यापीठ शिक्षण आयोगाची" स्थापना केली. या आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीमुळे स्वातंत्र्योत्तर भारतात उच्च शिक्षणाचा झपाट्याने प्रसार झाला. या आयोगाने विद्यापीठ शिक्षणाची उद्दिष्ट्ये निश्चित करताना प्रामुख्याने नेतृत्व विकास, संस्कृती संक्रमण व संवर्धन, बौद्धिक विकास, अध्यात्मिक व नैतिक विकास, आंतरराष्ट्रीय सद्‌भावनेचा विकास, मूल्यांचा विकास इ. बाबींचा उल्लेख केला असून भारताच्या शैक्षणिक इतिहासात या आयोगाचे योगदान खूपच मोठे आहे.

त्यानंतर १९५२-५३ मध्ये माध्यमिक शिक्षणाची स्थिती सुधारण्यासाठी आणि माध्यमिक शिक्षणाचा सांगोपांग विचार करण्यासाठी भारत सरकारने डॉ. ए.एल. मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली "माध्यमिक शिक्षण आयोगाची" स्थापना केली. स्वातंत्र्योत्तर काळातील माध्यमिक शिक्षणाच्या प्रगतीचे बरेचसे श्रेय माध्यमिक शिक्षण आयोगाला दिले जाते.

त्यानंतर १९६४-६६ साली संपूर्ण शिक्षणाचा एकसंघ विचार करण्यासाठी डॉ. डी.एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली "भारतीय शिक्षण आयोग" अर्थात "कोठारी आयोगाची" नियुक्ती करण्यात आली. कोठारी आयोगाने शिक्षणाच्या प्रत्येक स्तराचा सुक्ष्म अभ्यास करुन त्याचा विकास साधण्यासाठी महत्त्वाच्या शिफारशी केलेल्या आहे.


त्यानंतर भारताचे त्यावेळेचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी ५ जानेवारी १९८५ रोजी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात नवीन सक्षम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण देशाला देण्याचे वचन दिले. त्यासाठी त्यांनी २० ऑगस्ट १९८५ मध्ये "शैक्षणिक आव्हान एक धोरणात्मक यथार्थ दर्शन" हा अहवाल प्रसिद्ध केला. यावर राष्ट्रीय स्तरावर विविध पद्धतीतून विचारमंथन करण्यात आले. राष्ट्रीय विकास परिषद आणि केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाच्या बैठकीतही चर्चा झाली यातूनच १९८६ रोजी "नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण" सादर करण्यात आले. या शैक्षणिक धोरणामध्ये सर्वांना समान संधी व सर्वांसाठी शिक्षणाचा समान आकृतीबंध सुचविण्यात आला

आहे. या शैक्षणिक धोरणामध्ये खडू-फळा मोहिम, नवोदय विद्यालये, विज्ञान शिक्षण, स्त्रियांचे शिक्षण, इ. नाविन्यपूर्ण बाबींचा समावेश केला आहे.

त्यानंतर १९८६ च्या शैक्षणिक धोरणात सुधारणा करण्याच्या दृष्टीने राममूर्ती पुनरावलोकन समिती व जनार्दन रेड्डी समिती यांनी १९९२ साली “सुधारित राष्ट्रीय धोरण” संसदेच्या दोन्ही सभागृहासमोर मांडले. यामध्ये प्रामुख्याने ६ ते १४ वयोगटातील मुला-मुलींना गुणवत्तापुर्ण, मोफत आणि सक्तीचे शिक्षण उपलब्ध करुन देणे, माध्यमिक शाळांमध्ये संगणकीय शिक्षणाची सोय करणे, संपूर्ण साक्षरतेच्या यशस्वीतेसाठी प्राथमिक शिक्षण, अनौपचारिक शिक्षण, प्रौढ शिक्षण, तसेच शिशुसंगोपन, पोषक आहार इ. गोष्टी विचारात घेतल्या गेल्या. राष्ट्रीय स्तरावर इंदीरा गांधी मुक्त विद्यापीठ अधिकाधिक समृद्ध करुन सर्व राज्यामध्ये अशी विद्यापीठे स्थापण्याचा विचार करण्यात आला.

**शिक्षणाचे स्वरुप किंवा प्रकार :**

बालकांचे समाजात कशा प्रकारे शिक्षण होते यावर शिक्षणाचे स्वरुप अवलंबून असते. बालकांचे शिक्षण तीन प्रकारे होत असते.




### १) सहज शिक्षण (Informal Education) :

कोणत्याही जाणीवपूर्वक प्रयत्नाविना स्वयंस्फूर्तपणे घडून येणाऱ्या वर्तनबदलाच्या प्रक्रियेला सहज शिक्षण म्हणतात. ते प्रसंगानुरुप घडत असते.

बालकाचा जन्म झाल्यानंतर विशिष्ट वातावरणात बालकाला अनेक अनुभव येत असतात. या अनुभवातून त्याल कळत नकळत शिक्षण मिळत असते व त्यातून त्याची वाढ व विकास होत असतो. कुटुंबातील आंतरक्रियेमुळे त्याला भाषा येऊ लागते. कुटुंबातील वडीलधाऱ्या माणसांकडून, पाहून किंवा प्रत्यक्ष त्यांच्या बरोबर राहून बालक अनेक बाबी शिकत असते. उदा. उजव्या हाताने जेवणे, पाहुण्याचे स्वागत करणे, थोरा-मोठ्यांचा आदर करणे, विनयशील राहणे इ. व्यक्तीच्या विकासात या वातावरणाचा फार मोठा वाटा असतो.

### २) औपचारिक शिक्षण (Formal Education) :

विशिष्ट यंत्रणेमार्फत, निश्चित ध्येय समोर ठेवून, नियोजनपुर्वक दिल्या जाणाऱ्या शिक्षणाला औपचारिक शिक्षण असे म्हणतात. ते शाळा महाविद्यालये व व्यावसायिक शिक्षण संस्थांमधून दिले जाते. औपचारिक शिक्षणात शिक्षण संस्थांच्या इमारती, फर्निचर, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, ग्रंथालय, क्रिडांगण, प्रयोगशाळा अशा सुविधा असतात. औपचारिक शिक्षण पुर्ण केल्यानंतर परीक्षा घेऊन उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिली जातात. त्याआधारे त्याला नोकरी

मिळू शकते किंवा स्वतंत्र व्यवसाय करता येतो. व्यवहारी जीवनात औपचारिक शिक्षणाला विशेष महत्त्व आहे.

### ३) अनौपचारिक शिक्षण :

आंतरराष्ट्रीय आयोगाने शिक्षणाच्या अहवालात अनौपचारिक शिक्षणाची व्याख्या करताना म्हटले आहे की, "शिकत राहणे म्हणजे अनौपचारिक शिक्षण होय."

ज्या शिक्षणाला वयाची, काळाची, पुर्वीच्या शिक्षणाची कोणतीही पूर्वअट नसते, स्थळा आणि काळाच्या, समाजाच्या गरजेप्रमाणे, विद्यार्थ्यांच्या सवडीप्रमाणे उपयुक्त असे जे शिक्षण दिले जाते त्या शिक्षणाला अनौपचारिक शिक्षण असे म्हणतात. आणि महमंद यांच्या मते औपचारिक शालेय शिक्षणाच्या चौकटीबाहेर संघटित केलेली पद्धतशीर शैक्षणिक कृती म्हणजे अनौपचारिक शिक्षण होय.

शेती व्यवसाय, अपुरा रोजगार, हलाखीची आर्थिक परिस्थिती यामुळे ग्रामीण लोक शिक्षण प्रक्रियेत सहभागी होऊ शकत नाहीत. अशा निरक्षरांना साक्षर करण्याकरिता त्यांना किमान लिहिता वाचता यावे या उद्देशाने अनौपचारिक शिक्षण कार्यक्रम तयार करण्यात आला त्याची माध्यमे पुढीलप्रमाणे -

१) सोयीनुसार प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालविणे
२) ग्रंथालये, युवक, संस्था, महिला मंडळे यांच्या तर्फे अनौपचारिक शिक्षणाचे वर्ग चालविणे
३) नियमितपणे शाळा व महाविद्यालयात जाऊ न शकणाऱ्यासाठी पत्रव्यवहाराद्वारे अनौपचारिक शिक्षणाची सोय करणे.
४) मुक्त विद्यापीठाद्वारे विविध अभ्यास क्रमांची सोय करणे.

### सर्वशिक्षा अभियान :

भारतातील ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण देणारी ही एक बहुव्याप्त योजना असून ही योजना केंद्र शासनाच्या शैक्षणिक कार्यक्रमांपैकी एक आदर्श योजना असून, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण निर्धारित कालावधीत प्राप्त करणे हा तिचा मूळ उद्देश आहे. युनेस्कोने आपल्या घटनेत लिंग, जात, धर्म, आर्थिक सामाजिक स्तर असा कोणताही भेद न करता सर्वांना समान शिक्षण मिळायला हवे, असे नमूद केले आहे.

"महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद" मुंबई या स्वायत्त संस्थेकडे सर्व शिक्षण मोहीम कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. दिनांक १८ जानेवरी २००२ मध्ये शासनाने सर्व शिक्षण मोहिमे अंतर्गत केंद्र सरकारने विहित केलेली उद्दिष्टे राज्यामध्ये पूर्ण करण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम अंमलात आणण्यास मान्यता दिली आहे.

### सर्वशिक्षा अभियानाची उद्दिष्टे :

पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षण हाच उच्च शिक्षणाचा पाया असून २०२० पर्यंत भारताला महासत्ता बनविण्यासाठी प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावणे आवश्यक आहे. ही बाब मान्य करुन १० व्या पंचवार्षिक योजनेत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होण्याकरिता "सर्व शिक्षा

अभियान" कार्यक्रम तयार करण्यात आला. या उपक्रमास इ.स. २००१ मध्ये प्रारित झाला. तेव्हा त्याची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती.

१) सर्व ६ ते १४ वयोगटातील शाळेतील मुलांना अध्यापनाची हमी देणे.
२) इ.स. २००६ पूर्वी सर्व मुले मुली शाळेत, शिक्षण हमी केंद्रात, पर्यायी शाळेत अथवा शाळेत परत आणणाऱ्या व्यवस्थेत दाखल करणे.
३) इ.स. २००७ पूर्वी सर्व मुलामुलींना पाच वर्षाचे प्राथमिक शिक्षण देणे.
४) इ.स. २०१० पूर्वी सर्व मुलामुलींना आठ वर्षाचे प्राथमिक शिक्षण देणे.
५) समाधानकारक, दर्जेदार प्राथमिक शिक्षणावर तसेच जीवनासाठीच्या शिक्षणावर भर देणे.
६) इ.स. २००७ पूर्वी प्राथमिक शिक्षणातील सर्व स्तरांवरील उणिवा दूर करुन जातिनिरपेक्ष व मुलामुलींना समान शिक्षण देणे, तसेच लिंगभेद व समाजाच्या विविध घटकातील दरी इ.स. २००७ पर्यंत भरुन काढणे आणि इ.स. २०१० पर्यंत प्राथमिक शिक्षणाची सर्वांना समान पातळी निर्माण करणे.
७) इ.स. २०१० पर्यंत सर्व मुले मुली शाळा सोडणार नाहीत याची दक्षता घेणे.

**सर्व शिक्षण मोहिमेची व्याप्ती :**

केंद्र शासनाने मोफत व सक्तिच्या शिक्षणाबाबत उचललेले अभिनव पाऊल म्हणून सर्व शिक्षा अभियानाकडे पाहता येईल. बालकांच्या शिक्षणाशी संबंधित असणाऱ्या सर्व घटकांचा विकास घडवून आणण्यासाठी अनेक उपक्रमांचा यात अंतर्भाव केला आहे.

**सर्व शिक्षण मोहिमेचे दोन पैलू आहेत :**

१) सर्व शिक्षण मोहिम हा प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी अनेक कार्यक्रमांच्या एकत्रीकरणाचा आराखडा आहे.
२) प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे. सर्व शिक्षा अभियानामध्ये शिक्षकांची मध्यवर्ती व निर्णय भूमिका महत्त्वपूर्ण मानून त्यांच्या क्षमता विकासावर भर देण्यात आला आहे. शिक्षकांना संदर्भ साहित्य व प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**सर्व शिक्षा अभियानाचा मूळ उद्देश :**

या योजनेचा भारतभर प्रसार करण्याचे केंद्र शासनाचे उद्दिष्ट असून यात मुखत्वे मुली आणि अनूसूचित जाती-जमातीतील मुले यांच्या गरजांवर विशेष भर देण्यात आला. यामध्ये सर्व शिक्षा अभियानांचे उद्देश पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) शिक्षक-पालक, पंचायत राज संस्था यांच्यातील परस्पर सहकार्य वाढविणे.
२) मुलींचे प्राथमिक शिक्षण व अनुसूचित जाती-जमाती व अल्पसंख्यांक मुलींचे शिक्षण यावर भर देणे.
३) बालकेंद्रीत अभ्यासक्रम व उपक्रम राबविणे.
४) शालेय व्यवस्थापनामध्ये स्वयंसेवी संस्था, ग्रामशिक्षण समिती व बचतगटांचा सहभाग घेणे.

munotes.in

सर्व शिक्षा अभियानाकरिता केंद्र व राज्य सरकारकडून निधी उपलब्ध करण्यात आला असून यांच्यात निधीविषयी ५०:५० टक्के अशी विभागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्रात हा कार्यक्रम "सर्व शिक्षण मोहिम" म्हणून ओळखला जात असून सर्व शिक्षण मोहिमेची अंमलबजावणी महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या स्वायत्त शिक्षण संस्थेकडे सोपविण्यात आली असून, ही मोहिम प्रभावीपणे राबविण्यासाठी प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे येथे सर्व शिक्षण मोहिम सनियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सर्व शिक्षा अभियानांतर्गत पर्यायी शिक्षणाच्या विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रातील या अंतर्गत शालेय पोषण आहार, उपस्थिती भत्ता, मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप, प्राथमिक शाळेकरिता ४% साहित्य खर्च, अहिल्याबाई होळकर मोफत प्रवास योजना, अध्ययन अध्यापन साहित्यवाटप, सावित्रीबाई फुले दत्तक योजना, मोफत आरोग्य तपासणी, समाजकल्याण खात्यामार्फत अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती यासारख्या विविध योजनांचा समावेश आहे.

एकूणच सर्व शिक्षा अभियान हा शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा क्रांतिकारक टप्पा आहे. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे समाजातील सर्व घटकांच्या मदतीने आणि सहभागाने शिक्षणाबाबत लोकजागृती करणे अपेक्षित आहे. यामध्ये शिक्षक, महिलामंडळ, ग्रामशिक्षण समिती, युवामंडळ, पालकसंघ, स्वयंसेवी संस्था इत्यादींच्या मदतीने लोकजागृती आणि प्रबोधन यावर विशेष भर देण्यात आला आहे.

भारतातील प्राथमिक शिक्षणाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी क्षमता या अभियानात असून त्याची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास "सारे शिकुया, पुढे जाऊया" हे अभियानाचे घोषवाक्य सार्थ ठरेल.

**वंचित घटकांचे शिक्षण (Education of Disadvantaged) :**

**संकल्पना :**

वंचित या संज्ञेची व्याख्या सर किंग जोसेफ यांनी पुढीलप्रमाणे केली आहे.

"ज्या परिस्थितीमुळे व्यक्तीतील सुप्त सामर्थ्याचा विकास होण्यासाठी अडथळा निर्माण होतो ती अवस्था म्हणजे वंचितावस्था" होय.

दारिद्र्य, व्यक्तिगत दोष, दुर्बलता, नैराश्य असलेली व्यक्ती ही वंचित व्यक्ती असून मानसिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या वंचित असलेल्या लोकांच्या बाबतीत हा प्रयोग वापरला जातो. पाश्चिमात्य प्रगत देशातील समाजात हा वंचित दुर्बल घटक आर्थिक दृष्टीकोनातून माणसाचे समाजातील स्थान ठरवतो. कमी अर्थप्राप्तीमुळे समाजातील याचे स्थान कमी दर्जाचे होते व हे लोक अनेक गोष्टीपासून वंचित होतो. सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक दृष्ट्या दुर्बल असणारा हा घटक दुसऱ्याकडून वर्षानुवर्षे उपेक्षित व दडपला गेला. समाजातील असंख्य सुविधा त्यांना नाकारल्या गेल्या आहेत. अमेरिकेतील निग्रो, श्रीलंकेमधील कामगार वर्ग, भारतामधील अनुसूचित जाती, भटक्या जमाती, आदिवासी, शारीरिकदृष्ट्या व्यंग, अपंगत्व, विकलांग असणारी मुले-मुली, स्थलांतरीतांची मुले, हे सर्व वंचित दुर्बल घटक समजले जातात.

munotes.in

**वंचितांच्या शिक्षणाची गरज :**

भारतातही असा वंचित, दुर्बल व दडपलेला अशिक्षित घटक समाजाचा मोठा भाग आहे. या वर्गातील लोक दोन वेळेची भाकरी कशी मिळेल या विवंचनेने सतत ग्रासलेले असतात. त्यांना मुलींचे शिक्षण व कल्याण कुठून सुचणार अशी असंख्य कुटुंबे व लक्षावधी मुले जर शिक्षणापासून वंचित राहिली तर देश प्रगती साधणे दूरच राहील, समाजाचा एक भाग लुळा बनेल, गतिहीन व चैतन्यहीन बनेल.

भारताची लोकशाही राज्यपद्धती यशस्वी होणार नाही. दारिद्र्य व आर्थिक तणावाने ग्रासलेल्या या समाजाची प्रगती झाल्याशिवाय देशाची उन्नती होणार नाही. ग्रामीण भागात अस्तित्वात असणाऱ्या निरक्षरतेमुळे शिक्षणाबद्दलची अनास्था, दारिद्र्याची समस्या अनिष्ठ रुढी, परंपरा इ. मुळे समाजाचे कल्याण साधता येणार नाही. म्हणूनच या लोकांची प्रगती साधण्यासाठी विविध उपाययोजना, विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले आहेत.

**वंचित लोकांना शिक्षण देण्याची उद्दिष्ट्ये :**

१) वंचित असलेल्या मुला-मुलींना, प्रौढांना समाजातील इतर स्तरातील लोकांबरोबर आणण्यासाठी शिक्षण देणे.

२) प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी १०० टक्के पटनोंदणी, त्यांची उपस्थिती टिकविण्याबरोबरच त्यांना दर्जेदार शिक्षण देणे.

३) विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करुन वंचितांच्या परिस्थितीत सर्वार्थान गुणात्मक प्रगती साधणे.

**वंचित लोकांना शिक्षण देण्याच्या विविध पद्धती :**

**१) आर्थिकदृष्ट्या वंचितांसाठी शिक्षण :**

शासनाने आर्थिकदृष्ट्या शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलांसाठी धोरणात्मक भाग म्हणून खालील सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

१) मोफत शिक्षण

२) शिष्यवृत्ती

३) परिक्षांची फी माफी

४) पुस्तके, वह्या व इतर शैक्षणिक साहित्यासाठी अर्थसहाय्य

५) शाळा, महाविद्यालय, व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था यात राखीव जागा

६) मोफत शालेय गणवेश

७) आवश्यक त्या ठिकाणी मोफत वस्तिगृहे, राहण्याचा व जेवणाचा खर्च माफ

८) मोफत सकस आहार

**२) सामाजिकदृष्ट्या वंचितांसाठी शिक्षण योजना :**

१) सक्तीचे व सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण - भारतीय घटनेने समाजातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व घटकांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व सार्वत्रिक केले आहे.

munotes.in

२) प्रौढ शिक्षण व समाजशिक्षण उपक्रम
३) अनौपचारिक शिक्षण उपक्रम
४) निरंतर शिक्षण उपक्रम
५) समूह संपर्क माध्यमातून शिक्षण
६) संलग्न शिक्षण कार्यक्रम - अमेरिकेने सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या निग्रोंची मुले व अमेरिकन गोरी मुले ह्यांचे शिक्षण एकाच शाळेत आयोजित केले.

त्यासंबंधी अमेरिकन समाजशास्त्रज्ञ कोलमन यांनी या ग्रंथात विवेचन केल आहे व एकात्मतेचा पुरस्कार केला.

भारतामध्येही सरकारी, महानगरपालिका ह्यांच्या शाळांमधून संलग्न कार्यक्रम स्वीकारलेला असून मागास, वन्यजमाती, मागास समूह, मागास जाती, अनुसूचित जाती व जमाती, भटक्या जमाती आणि आर्थिकदृष्ट्या मागास क्षेत्रातील खालचावर्ग, तसेच मध्यमवर्गीय या सर्व स्तरांवरील लोकांची मुले या शाळांमधून एकत्रितपणे शिकतात. यामुळे शिक्षणापासून वंचित असलेल्या व नसलेल्या मुलांमध्ये सुसंवाद होऊन विचारांची देवाणघेवाण व आंतरक्रिया घडून येते.

### ३) बौद्धिकदृष्ट्या वंचित व दुर्बलांसाठी शिक्षण :

शारीरिकदृष्ट्या व्यंग, अपंगत्व, विकलांग असलेल्या मुलांमध्ये बौद्धिक क्षमतेचा अभाव असतो. शिकणाऱ्यांच्या बौद्धिक उणिवांची समस्या लक्षात घेऊन त्यातील कौशल्य क्षेत्रामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने शालेय शिक्षणावर आधारित शासनाने अपंग एकात्म शिक्षण योजना सरु केली असून सामान्यपणे हे शैक्षणिक उपक्रम कार्यक्रम अभ्यासक्रमाच्या संदर्भात असतात. उदा. शुद्ध उच्चारांचे, शुद्ध लेख कौशल्य विकास उपक्रम, वाचन कौशल्य विकास उपक्रम, वर्तनबदल कार्यक्रम इ. यामध्ये समावेश होतो.

### वंचितांच्या शिक्षणासाठी शासनाचे विविध उपक्रम :

भारतामध्ये वंचित मुलांची शैक्षणिक वंचितता दूर करण्यासाठी बरेच प्रयत्न केलेले असून यापैकी काही उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत.

१) आदिवासी मुलांसाठी आश्रमशाळा
२) मुलांचे अध्ययन सुकर होण्यासाठी मुलांना सकाळी सकस आहार देणे
३) मोफत आरोग्य तपासणी व मोफत सेवा
४) लेखन साहित्य व गणवेश वाटप
५) बोलीभाषेतून शैक्षणिक साहित्यनिर्मिती
६) आदिवासी विद्यावेतन
७) मुलींना उपस्थिती भत्ता
८) शिष्यवृत्ती व परिक्षा फी माफ
९) समाजकल्याण खात्यामार्फत अपंग मुला-मुलींना शिष्यवृत्ती
१०) अपंग एकात्मशिक्षण योजना

munotes.in

११) राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत पुरक कार्यक्रम-प्रौढ शिक्षण, अनौपचारिक शिक्षण, आरोग्य शिक्षण, स्वावलंबनाचे शिक्षण इ.

**पर्यायी शिक्षणाच्या योजना :**

सर्व शिक्षा अभियानांतर्गत पर्यायी शिक्षणाच्या विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या असून त्या पुढीलप्रमाणे -

१) वस्तीशाळा

२) महात्मा फुले प्राथमिक शिक्षण हमी योजना

३) महात्मा फुले उच्च माध्यमिक शिक्षण हमी योजना

४) राजीव गांधी संधी शाळा योजना

५) स्थलांतरित कामगारांच्या मुलांसाठी महात्मा फुले शिक्षण हमी योजना

६) सेतुशाळा

७) उपचारात्मकवर्ग

८) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय

**१) वस्तीशाळा :**

प्राथमिक शाळा सुरु करण्यासाठी विहित निकष पूर्ण न करणाऱ्या अनेक वस्त्या, पांडे, तांडे, जेथे प्राथमिक शाळेची आवश्यकता भासते. विशेषतः नद्या, नाले, डोंगराळ भाग, दुर्गमता इ. नैसर्गिक अडचणींमुळे लहान विद्यार्थ्यांना जवळच्या अन्य गावातील किंवा वस्तीवरील शाळेत जाणे अडचणींचे होते. अशावेळी अर्धाकिलोमीटर परिसरात प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध नसेल अशाच ठिकाणी वस्तीशाळा सुरु करता येते. किमान १० मुली किंवा १५ मुले इतकी विद्यार्थी संख्या असल्यास वस्तीशाळा सुरु करता येते. वस्तीशाळा सुरु करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतीने आवश्यक जागा व आवश्यक साहित्य उपलब्ध करुन देणे आवश्यक असते.

**२) महात्मा फुले प्राथमिक शिक्षण हमी योजना :**

वाड्या-वस्त्यांवरच्या ६ ते १४ वयोगटातल्या २० मुलांसाठी १ ली ते ४ थी मधील मध्येच शाळा सोडून दिलेल्या मुलास किमान ४ थी पर्यंतचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी ही योजना तयार करण्यात आली असून गावातील दहावी पास मुलाना किंवा आठवी पास मुलीने ती चालवायची. सरकार वर्षाला फक्त १३००/- रु. देण्याची जबाबदारी घेणार.

**सेतुशाळा :**

६ ते १४ वर्षे वयोगटातील १ ली ते ४ थी मधील प्रदीर्घ काळ शाळेत अनुपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी सुट्टीत ४५ दिवसांचा वर्ग चालविला जातो. विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनाची मोफत सोय केली जाते.

**अपंग एकात्म शिक्षण योजना :**

अंध, मुकबधिर, विकलांग, अध्ययनक्षम, मतिमंद यापैकी एकाच प्रकारच्या अपंगत्व असणाऱ्या किमान ८ विद्यार्थ्यांसाठी एक प्रकारचे अपंगत्व युनिट असते. विद्यार्थ्यांना अपंगत्व उपकरणे, गणवेश, शालेय साहित्य मोफत पुरविले जाते.

**साखरशाळा :**

ऊसतोड कामगार व अन्य हंगामी कामगारांच्या मुला-मुलींसाठी प्राथमिक शिक्षणाची सोय व्हावी या करिता २० ऑक्टोबर १९९६ मध्ये साखर कारखाना परिसरात शाळा सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. नोव्हेंबर ते मे या कालावधीत शाळा कार्यरत राहतात. वस्तिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचा भोजन खर्च कारखाना करते.

**प्रेरणावर्ग :**

शिक्षणासाठी आवश्यक असणारे कौशल्य व कुवत नसणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड निर्माण होऊ नये याकरिता प्रेरणावर्ग चालविले जातात.

**ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाची समस्या :**

भारत हा खेड्यांचा देश असून सुमारे ८०% लोक खेड्यात राहतात. भारतातील शैक्षणिक समस्या म्हणजेच प्रामुख्याने ग्रामीण भागातील शैक्षणिक समस्या असून ह्या समस्या सोडविल्याशिवाय प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करता येणार नाही. प्राथमिक शिक्षण ही शिक्षण प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण अवस्था असून ग्रामीण भागातील अज्ञान, निरक्षरता दूर करुन साक्षरतेचा प्रसार करण्यासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करुन सर्व शिक्षण अभियान राबविण्यात आले. परंतु मागास समाज, अज्ञान, दारिद्र्य यासारख्या समस्यांमुळे अपेक्षित यश प्राप्त होऊ शकले नाही. ग्रामीण भागातील समस्यांचा विचार करता त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) शैक्षणिक गळती
२) शाळेचा परिसर
३) शाळेची इमारत
४) समस्याग्रस्त पालक - पालकांची मानसिकता
५) मुलांची अनुपस्थिती
६) शिक्षकांची शाळाबाह्य कामे
७) एक शिक्षकी शाळा
८) शैक्षणिक साहित्याचा अभाव
९) क्रिंडागण व क्रीडासाहित्याचा अभाव
१०) ग्रंथालयाचा अभाव
११) अयोग्य मूल्यमापनपद्धती
१२) मुलींच्या शिक्षणाबद्दलची उदासिनता
१३) शालेय पोषण आहारातील त्रुटी
१४) शिक्षक बदली
१५) वाहतुकीची गैरसोय
१६) पाण्याची सोय नसणे
१७) स्वच्छतागृहाची बिकट अवस्था

**१) शैक्षणिक गळती :**

विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण शहरी भागापेक्षा ग्रामीण भागामध्ये अधिक असल्याचे दिसून येते. पहिलीत दाखल झालेल्या मुलांपैकी बहुसंख्य मुले हळूहळू शाळेत येईनाशी होतात. या मागची कारणे शोधताना समाजातील आर्थिक स्थितीशी मोठा संबंध दिसून येतो. गरीब परिस्थितीमुळे बरीच मुले अजूनही कामाला जातात. बरीच लहान मुले मुली आपल्या लहान भावंडाना घरी राहून सांभाळतात. यामध्ये मुलींची संख्या मोठी दिसून येते. त्याचबरोबर पालकांच अज्ञान, पालकांची व्यसनाधीनताही विद्यार्थ्यांच्या गळतीस कारणीभूत ठरते. अजूनही काही पालकांना शिक्षणाचे महत्त्व कळलेले दिसून येत नाही.

मुलांच्या गळतीमागे आणखीन एक महत्त्वाचे कारण म्हणजे बोली भाषा आणि प्रमाणित भाषा यातील वेगळेपण असून आपल्याकडे जिल्ह्या जिल्ह्यात बोली भाषा वेगवेगळी असून आणि शाळेमध्ये सगळीकडे प्रमाणित भाषा आहे. त्यामुळे बोली भाषा येणाऱ्या विद्यार्थ्याला प्रमाणित भाषा कळलीच नाही तर अशी मुले शाळेत येत नाहीत. शाळेमध्ये केले जाणारे अध्यापन, निरस, कंटाळवाणे असेल तर विद्यार्थ्यांची गळती दिसून येते. तसेच रोजगारासाठी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबामुळेही गळतीची समस्या निर्माण होते.

**२) शाळेचा परिसर :**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी योग्य वातावरण आवश्यक असते. परंतु अयोग्य जागा, अपुरा परिसर, अस्वच्छ परिसर यामुळे शैक्षणिक वातावरण योग्यप्रकारे निर्माण होऊ शकत नाही. ग्रामीण भागामध्ये आजही काही शाळांकडे योग्य आवारच दिसत नाही. काही ठिकाणी कपांऊडच नसते.

**३) शाळेची इमारत :**

आजही ग्रामीण भागामध्ये काही भागांमध्ये योग्य प्रकारच्या इमारती दिसून येत नाही. काही इमारतींमध्ये वर्ग खोल्यांची कमतरता असते तर काही इमारती मोडकळीस आलेल्या दिसून येतात.

**४) शाळेतील मुलांची अनुपस्थिती :**

अजुनही ग्रामीण भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर सण समारंभाच्या वेळी, यात्रा, लग्नकार्य, उत्सव, शेती इ. कारणांसाठी मुले शाळेत अनुपस्थितीत राहिलेली दिसून येतात. नियमित शाळेत मुले येत नसल्यामुळे त्याची निराशाजनक शैक्षणिक कामगिरी दिसून येते.

**५) शिक्षकांची शाळाबाह्य कामे :**

प्राथमिक शिक्षकांना अनेक शाळा बाह्य कामे सोपविली जातात. उदा. निवडणुक, जनगणना, दारिद्र्य रेषेखालील कुंटुबांचे सर्वेक्षण, स्थलांतरित कुटुंबाचा शोध, शाळाबाह्य मुले शोध इ. कामांचा यामध्ये समावेश असतो. शिक्षकांना ही कामे शालेय कालावधीत करावी लागतात. त्यामुळे शैक्षणिक कार्यात व्यत्यय येऊन विद्यार्थ्यांच्या प्रगतीकडे दुर्लक्ष होते.

**६) एक शिक्षकी शाळा :**

प्राथमिक शाळेमध्ये काही ठिकाणी एका शिक्षकाला चार वर्ग सांभाळावे लागतात. जरी तिथे दोन शिक्षक असले तरी, वर्ग मात्र चार असतात. त्यामुळे साहजिकच बेशिस्त, गोंधळ

munotes.in

निर्माण झालेला दिसून येते. त्यातच ते शिक्षक आहेत तोच मुख्याध्यापक असल्यामुळे शासनाशी पत्रव्यवहार, ऑनलाईन माहिती, गटशाळा, ऑफिस यांच्याकडे कामनिमित्त जावे लागते. त्यामुळेच काही ठिकाणी ग्रामीण भागातील शैक्षणिक दर्जा घसरलेला दिसून येतो.

### ७) शैक्षणिक साहित्याचा अभाव :

अध्यापन प्रभावित मनोरंजानत्मक होण्यासाठी प्रभावी शैक्षणिक साधनांची आवश्यकता असते. अजूनही ग्रामीण भागात अशी साधने उपलब्ध होत नसलेली दिसून येतात. असली तर साधने वापरण्यातील उदासीनता वापरासाठी ज्ञानाचा अभाव, साधने दुरुस्तीची समस्या, वीज कपात, वेळेचा अभाव इ. समस्या आढळतात.

### ८) क्रिंडागण व क्रीडासाहित्याचा अभाव :

बहुसंख्य प्राथमिक शाळेमध्ये क्रिडांगण व क्रीडा साहित्य नसल्यामुळे शाळेंमधून शारीरिक शिक्षण जवळ जवळ बंदच आहे. त्यातच प्रशिक्षित क्रीडा शिक्षकही ग्रामीण भागात अभावानेच आढळतात.

### ९) ग्रंथालयाचा अभाव :

ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेमध्ये एखाद्या शाळेत शंभरेक पुस्तके मिळणे अपवादानेच अशा अवांतर वाचनाची स्थिती ग्रंथालय, वयोगटानुसार ग्रंथ, संदर्भ ग्रंथ या गोष्टी काल्पनीकच वाटतात त्यामुळे सातवी पर्यंतच्या प्राथमिक शाळातील विद्यार्थ्यांची वाचण्याच्या दृष्टीने अक्षरक्षः आबाळ होत आहे.

### १०) अयोग्य मूल्यमापन पद्धती :

प्राथमिक शाळेचा शैक्षणिक दर्जा दिवसेंदिवस खालावत चालला आहे. त्यातील महत्त्वपूर्ण कारण आहे ते म्हणजे अयोग्य मुल्यमापन पद्धती, परिक्षांच न घेणे, परिक्षा न होताच विद्यार्थ्याच्या प्रगतीचे तक्ते भरले जात असल्यामुळे काही ठिकाणी फक्त कागद रंगविण्याचे काम होताना दिसून येते.

### ११) मुलींच्या शिक्षणाबद्दलची उदासिनता :

ग्रामीण भागात अजुनही मुलींच्या शिक्षणाबाबत उदासिनता दिसून यते. "स्त्री म्हणजे चुल आणि मुलं","स्त्री म्हणजे परक्याचे धन","जेवढे जास्त मुलींचे शिक्षण तेवढा अधिक शिकलेला मुलगा हवा", अशा वाईट विचारांचा पगडा अजुनही ग्रामीण भागातील अशिक्षित पालकांवर दिसून येतो. तसेच ग्रामीण भागातील शेतीची कामे, आईला मदत करण्यासाठी मुली शाळेत न जाताना दिसून येतात.

### १२) शालेय पोषण आहारातील त्रुटी :

विद्यार्थ्यांना सकस व पोषक आहार मिळावा म्हणून सर्व शिक्षा अभियानांतर्गत शालेय पोषण आहार सुरु करण्यात आला. परंतु त्यासाठी कमी भत्ता, निकृष्ट धान्य व वाढत जाणारी महागाई यामुळे हा आहार निकषाप्रमाणे देण्यात अडचणी निर्माण होतात.

### १३) शिक्षक बदली :

सर्वसाधारण शिक्षक ग्रामीण भागात राहायला तयार नसतात. नको असलेल्या ठिकाणी बदली झाल्यास शिक्षक त्या शाळेवर हजर होत नाहीत किंवा झालेच तर तात्पुरते हजर होऊन ताबडतोब रजेवर जातात. शिक्षक अनुपस्थितीत राहिल्यामुळे मुलांचे गैरहजेरीचे प्रमाण वाढते, मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होते.

### १४) वाहतुकीची गैरसोय :

अजुनही ग्रामीण भागामध्ये दुर्गम डोंगराळ प्रदेशामध्ये शाळेपासून घराचे अंतर दुर असेल व तेथे जाण्यासाठी असणारा रस्ता जंगलमय भागातून असेल तर तेथे शैक्षणिक उदासिनता जाणवते. तसेच नदी, ओहोळावर जर साकव, पुल नसतील तर पुराच्यावेळी अशा ठिकाणची मुल दोन दोन महिने शाळेपासून वंचित राहतात.

### १५) पाण्याची सोय नसणे :

अजुनही ग्रामीण भागामध्ये पुरेशा प्रमाणात पिण्याचे स्वच्छपाणी उपलब्ध नसलेले दिसून येते. साहजिकच स्वच्छता गृहातही पाणी दिसून येत नाही.

### १६) स्वच्छतागृहाची दुरावस्था :

ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेंमध्ये काही ठिकाणी स्वच्छतागृहे असली तरी, काही स्वच्छतागृहांची दुरावस्था झालेली दिसून येते.

### १७) निष्क्रिय ग्रामशिक्षण समित्या :

शालेय विकासामध्ये ग्रामशिक्षण समित्यांची भुमिका महत्त्वपूर्ण आहे. परंतु प्रत्यक्षात शालेय विकासात यांचा सहभाग काही ठिकाणी अल्प असतो. त्यांच्या सभा नियमित होत नाहीत. सभांना सर्व सभासद उपस्थित नसतात. अशा विविध कारणांमुळे ग्रामशिक्षण समित्यांचे उद्दिष्ट साध्य होवू शकत नाही.

munotes.in

### सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी उपाय योजना :

१) शाळेचा परिसर स्वच्छ असावा, शाळेला व्यवस्थित कुंपण असावे, शाळेच्या भिंती शैक्षणिक तक्त्यांनी भरलेल्या, चित्र काढलेल्या म्हणजेच बोलक्या असाव्यात.

२) ग्रामीण भागातील पालकांचे सर्व प्रथम प्रबोधन करुन त्यांना समस्यामुक्त केले पाहिजे.

३) ग्रामीण भागातील शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन दिले पाहिजे व त्याचा योग्य वापर करणे आवश्यक आहे.

४) प्रत्येक शाळांना क्रिडांगण व खेळाचे साहित्य उपलब्ध करुन दिले पाहिजे.

५) प्राथमिक शाळेतही अवांतर वाचनाची पुस्तके, संदर्भ पुस्तके, वर्तमानपत्रे, साप्ताहिके मासिके उपलब्ध करुन दिली पाहिजेत.

६) विद्यार्थ्यांचे योग्य मुल्यमापन कसे होईल या दृष्टीकोनातून विचार होणे गरजेचे आहे.

७) शिक्षकांची शाळाबाह्य कामे पूर्णपणे बंद करुन ही कामे सुशिक्षित बेरोजगार युवकांकडून करुन घेतल्यास काही प्रमाणात बेकारीची समस्या कमी होईल.

८) मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देवून पालकांना मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे.

९) शालेय पोषण आहारातील त्रुटी दुर करणे.

१०) ग्रामीण भागातील एक शिक्षकी व द्विशिक्षकी शाळांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करणे. प्रत्येक वर्गाला एकतरी शिक्षक असावा या दृष्टीने प्रयत्न करणे.

११) बदलत्या काळानुरुप शिक्षकांना योग्य प्रकारचे प्रशिक्षण देणे, नवीन ज्ञान व तंत्रज्ञानाच्या वापरासाठी सक्षम बनविणे.

१२) ग्रामशिक्षण समित्यांच्या सभासदांची निवड निकषाप्रमाणे करुन त्यांचे सक्षमीकरण करणे.

१३) ग्रामीण भागातील प्रत्येक प्राथमिक शाळेमध्ये पिण्याचे स्वच्छ पाणी, स्वच्छतागृह सोयीची उपलब्धता कशी होईल त्यादृष्टीने प्रयत्न करणे.

## ७.४ आरोग्य

**संकल्पना :**

आरोग्य हा शब्द इंग्रजीतील 'हेल्थ' या शब्दाचे मराठी रुपांतर होय. इंग्रजीतील हेल्थ या शब्द हाइल्थ (Health) या अँग्लो सॅक्सन शब्दापासून बनला आहे. ज्याचा अर्थ इंग्रजीत 'Condition of being safe or sound' असा होतो. मराठीत या संकल्पनेचा अर्थ सुरक्षित व निरोगी स्थिती असा होतो. आरोग्य या संकल्पनेत शरीराच्या, मनाच्या आणि सामाजिक स्वरुपाच्या स्वास्थाचा समावेश होतो.

**आरोग्य व्याख्या :**

**१) WHO - (World Health Organization)**

**जागतिक आरोग्य संघटना :**

आरोग्य म्हणजे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दृष्टीकोनातून सुस्थित अशी अवस्था होय न की रोग वा दुबळेपणा यांचा अभाव होय.

**२) टी. एम. डक :**

यांची सकारात्मक दृष्टिकोनातून केलेली व्याख्या पुढीलप्रमाणे - आरोग्य म्हणजे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक सुस्थित अवस्था होय. तर नकारात्मक दृष्टीकोनातून - आरोग्य म्हणजे रोगाचा अभाव वा आजारीपणाचा अभाव होय.

**३) श्री. श्री. रविशंकर :**

गुरु रविशंकर यांनी आरोग्याची सात पदरी व्याख्या केली असून ती खालीलप्रमाणे -

आरोग्य म्हणजे रोगमुक्त शरीर, कंपरहित श्वासोच्छवास, तणावरहित किंवा तणावमुक्त मन, प्रतिबंध युक्त बुद्धिमत्ता, लट्ठपणामुक्त स्मृती, सर्वसमावेशक आत्मसन्मान आणि दुःखमुक्त आत्मा.

वरील तिन्ही व्याख्यांचा एकत्रित विचार करावायाचा झाल्यास असे म्हणता येईल की, मानवी शरीराची, मनाची व समाजाची सुस्थित म्हणजेच रोगमुक्त अवस्था म्हणजे आरोग्य होय.

ग्रामीण भागात अस्वच्छता, अशुद्ध व अपुरा पाणीपुरवठा, उघडी गटारे, वैद्यकीय सुविधांचा अभाव, दारिद्र्य यामुळे आरोग्यविषयक परिस्थिती फारशी चांगली नाही. ग्रामीण भागातील गरीब महिला आणि मुलांपर्यंत गुणवत्तापुर्ण अद्ययावत व परिणामकारक आरोग्यसेवा पुरेशा प्रमाणात पोहचविण्यासाठी भारत सरकारने १२ एप्रिल २००५ रोजी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (N.R.H.M.) राबविण्यास सुरुवात केली.

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (N.R.H.M.) :**

'राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान' हा सात वर्षामध्ये राबवला जाणारा कार्यक्रम असून या कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) बालमृत्यू आणि माता मृत्यूदर कमी करणे.
२) सार्वजनिक स्वच्छता, पोषक आहार, पाणी पुरवठा यासारख्या मुलभूत सेवांसोबत सार्वजनिक आरोग्य सेवा सर्वांना सुलभतेने उपलब्ध करुन देणे.
३) स्थानिक साथरोग नियंत्रणाबरोबरच इतर संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचा प्रतिबंध व नियंत्रण करणे.
४) सर्व लोकांना प्राथमिक आरोग्य व सेवा मिळणेबाबत उपाय योजना आखणे.
५) जननदर कमी करणे.

या उपक्रमाद्वारे २०१० पर्यंत महाराष्ट्राने साध्य करावयाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | आरोग्य निर्देशांक | भारत | महाराष्ट्र | २०१० पर्यंत महाराष्ट्राने साध्य करावयाची उद्दिष्ट्ये |
|---|---|---|---|---|
| १ | अर्भक मृत्यूदर | ५८ | ३६ | १५ |
| २ | माता मृत्यूदर | ३०१ | १४९ | १०० प्रति लाख जिवंत जन्मामागे |
| ३ | एकून जनन दर | २.९ | २.१ | १.८ |

**उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी अभियानांतर्गत अवलंबिलेली काही प्रमुख कारणे :**

१) आरोग्य सेवेअंतर्गत होणारा एकूण खर्च जी.डी.पी. च्या ०.९% वरुन २ ते ३ टक्के पर्यंत वाढविणे.
२) सार्वजनिक आरोग्य सेवांचे पालकत्व, नियंत्रण व व्यवस्थापन स्थानिक संस्थांकडून व्हावे यासाठी पंचायत प्रतिनिधींना प्रशिक्षण देणे.
३) प्रत्येक गावामध्ये महिला आरोग्य कार्यकर्ती 'आशा' ची निवड करणे.
४) ग्राम आरोग्य, पोषण, स्वच्छता व पाणीपुरवठा समितीच्या माध्यमातून प्रत्येक गावात 'ग्राम आरोग्य योजना राबविणे'.
५) उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयातील सेवांचा दर्जा सुधारणे.
६) स्थानिक पातळीवर ग्राम आरोग्य नियोजन आराखडा बनवून त्यांची अंमलबजावणी करणे.
७) सार्वजनिक आरोग्य सेवेमध्ये आयुष (आयुर्वेद, योग, निसर्गोपचार, युनानी, सिद्ध, होमीओपॅथी) यांचा समावेश करणे.

munotes.in

८) आरोग्य आणि कुटूंब कल्याण कार्यक्रमांना राष्ट्रीय, राज्य, जिल्हा व तालुकास्तरावर एकात्मिक रुप देणे.

९) जननी सुरक्षा योजना राबविणे.

**दुय्यम धोरणे :**

१) खाजगी वैद्यकीय क्षेत्रावर योग्य नियंत्रण

२) राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम अंमलबजावणीत खाजगी वैद्यकीय क्षेत्राचा सहभाग वाढविणे.

३) ग्रामीण भागातील आरोग्य सेवा ध्यानात घेऊन वैद्यकीय शिक्षण पद्धतीची पुनर्रचना करणे.

४) समाजाला पुरेसे आरोग्य विमा संरक्षण उपलब्ध करुन देणे.

५) समाजातील आरोग्य संवर्धक रुढींना चालना देणे.

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानात राज्य शासनाची भूमिका :**

१) राज्य व जिल्हा स्तरावर अभियान अंमलबजावणी कक्ष सुरु करणे.

२) लोकांच्या व आरोग्य सेवांच्या गरजा ध्यानात घेऊन नियोजन करणे.

३) पंचायत राज्य संस्थांना अधिक प्रशासकीय अधिकार देणे.

४) अभियान अंमल बजावणीसाठी वेळेवर व पुरेसे अनुदान उपलब्ध करुन देणे.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामध्ये मुलभूत आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करण्याबरोबरच इतर आरोग्य कार्यक्रमांवरही लक्ष केंद्रित केलेले होते. या कार्यक्रमात सुसूत्रता आणण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण समिती स्थापन करण्यात आली तसेच राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत जिल्हा स्तरावर जिल्हा आरोग्य अभियान समिती स्थापन करण्यात आली.

### २) जिल्हा आरोग्य अभियान (D.H.M.) :

सर्वांना गुणवत्तापुर्ण आरोग्य सेवा पुरविणे, समाजातील गरीब, दुर्लक्षित भागावर लक्ष केंद्रित करण्याचे मुख्य उद्दिष्ट राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचे आहे. यात प्राथमिक आरोग्य सेवांमध्ये काही मुलभूत बदल करुन आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करण्याबरोबरच इतर आरोग्य कार्यक्रमांवरही लक्ष केंद्रीत केले आहे. ज्याचा थेट समाजाच्या आरोग्याशी संबंध आहे. अशा सर्व बाबी लक्षात घेऊन या धोरणात सर्वत्र सुसूत्रता आणण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने राज्य आरोग्य अभियानाची स्थापना केली. तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्य आरोग्य संस्था व प्रत्येक जिल्हा स्तरावर जिल्हा आरोग्य अभियानाची स्थापना करण्यात आली.

**जिल्हा आरोग्य अभियान :**

अध्यक्ष - जिल्हा परिषदेचे अध्यक्ष

सह अध्यक्ष - जिल्हाधिकारी

उपाध्यक्ष - जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी

यामध्ये त्या जिल्ह्यातील सर्व लोकसभा सदस्य, विधानसभा सदस्य, अध्यक्ष स्थायी समिती, जिल्हा परिषद व कार्यक्रमांशी संबंधित असलेले इतर सर्व अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी - आयुष, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी इ. सदस्य असतात.

सदर समितीच्या वर्षातून किमान दोन सभा होतात.

**सभेचे विषय :**

१) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या वार्षिक कृती योजनेस मान्यता देणे.
२) आरोग्य व कुटुंब कल्याण कार्यक्रमासंदर्भात झालेल्या प्रस्तावावर विचार विनिमय.
३) वार्षिक कृती योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा.
४) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानासंदर्भात झालेल्या निर्णयावर कृती.

**विविध आरोग्य संस्थाद्वारे मिळणाऱ्या सेवा :**

**अ) उपकेंद्र :**

गावांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राचे उपकेंद्र असते. उपकेंद्रामध्ये माता आणि बालकांचे आरोग्य हा महत्त्वपूर्ण घटक मानून स्त्रियांची प्रसूतीपूर्वी काळजी घेणे, प्रसुतीच्या दरम्यान व प्रसुती पश्चात सेवा देणे. नवजात बालकाची काळजी व लसीकरण इ. महत्त्वपूर्ण गोष्टींकडे लक्ष दिले जाते. या व्यतिरिक्त कुटुंब नियोजन, पौंगडावस्थेतील आरोग्य सेवा, पाण्याच्या गुणवत्तेचे सनियंत्रण, परिसर स्वच्छता, उपचारात्मक सेवा, प्रथमोपचार, आशा च्या कामकाजांचे पर्यवेक्षण व समन्वय, पारंपारिक वर्क अटेंडन्टसेच व आशाचे प्रशिक्षण, जीवनविषयक महत्त्वाच्या घटनांची नोंद घेणे व अहवाल पाठविणे इ. गोष्टी पाहिल्या जातात.

**ब) प्राथमिक आरोग्य केंद्र :**

प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सकाळी चार तास व संध्याकाळी दोन तास बाह्यरुग्ण सेवा दिली जाते. अपघात, श्वानदंश, विंचूदंश, सर्पदंश व इतर तातडीच्या रुग्णांना २४ तास तातडीची सेवा दिली जाते. ज्यांना विशेषज्ञांच्या सेवेची आवश्यकता आहे अशा रुग्णांना प्रा. आ. केंद्राच्या वाहनातून अथवा वैद्यकीय अधिकाऱ्याजवळ असलेल्या उपलब्ध अनुदानातून भाड्याच्या वाहनातून संदर्भ सेवा देणे.

प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सहा बेडचा आंतररुग्ण विभाग असतो. त्याशिवाय प्रसूतीपूर्व व प्रसूती पश्चात सेवा देऊन मातांची काळजी घेतली जाते. नवजात अर्भक, आजारी बालक यांना आरोग्य सेवा उपलब्ध केली जाते. कुटूंब नियोजन, कुटूंब कल्याण सेवा, प्रजनन संस्थेचे आजार, लैंगिक आजारांचे व्यवस्थापन यांच्या प्रतिबंधनासाठी आरोग्य शिक्षण देणे, लैंगिक आजारांचे व्यवस्थापन यांच्या प्रतिबंधनासाठी आरोग्य शिक्षण देणे, एकात्मिक बालविकास सेवा योजनेबरोबर समन्वयाने आहारविषयक सेवा पुरविणे, शालेय आरोग्यासंदर्भात नियमित तपासणी करुन योग्य उपचार करणे, सार्वजनिक स्वच्छता, रोगसर्वेक्षण आणि साथीच्या आजारावर नियंत्रण ठेवणे, पाणी साठ्याचे निर्जंतुकीकरण, राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमासह इतर राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबविणे, नेहमीच्या व तात्काळ उपचार सुविधा पुरविणे, आरोग्य कर्मचारी, अवैद्यकीय अधिकारी, आशा इ. प्रशिक्षण देणे. वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सी.एम.ई. कॉन्फरन्सच्या माध्यमातून प्रशिक्षण घेणे, प्रसुतीपूर्व काळजी व प्रसूती दरम्यान काळजी याबाबत आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेणे, मुलभूत प्रयोगशालेय सेवा यामध्ये लघवी, संडास, रक्ताच्या तपासण्या तसेच उपकेंद्राच्या कामकाजावर सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमावर आशाच्या

कामकाजावर देखरेख ठेवणे, आयुषच्या सेवा मुख्य प्रवाहात स्थानिक लोकांच्या पसंतीनुसार समाविष्ट कराव्यात. जीवनविषयक घटनांच्या (जन्म, मृत्यू, मातामृत्यू, अर्भकमृत्यू) नोंदी ठेवून अहवाल पाठविणे. प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवांबाबतचे सर्व रेकॉर्ड अद्ययावत ठेवणे अशी महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली जाते.

**क) ग्रामीण रुग्णालय / उपजिल्हा रुग्णालय :**

ग्रामीण रुग्णालयात नेहमीच्या व तातडीच्या शल्यचिकित्सा केल्या जातात. तसेच तातडीच्या रुग्णावर उपचार केले जातात. विविध ऑपरेशन प्रसुती करणे, कुटूंब कल्याण सेवा, नवजात बालकांची काळजी, राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय किटकजन्य आजार नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम, राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम, एकात्मिक साथरोग सर्वेक्षण प्रकल्प राबविले जातात. साथीच्या आजारांसाठी निदानात्मक व उपचारात्मक सेवा दिल्या जातात. तसेच सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाच्या सेवा ग्रामीण रुग्णालयांमार्फत पुरविण्यात येतात.

**३) ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती :**

ग्रामीण जनतेला पिण्याचे शुद्ध पाणी पुरविणे कुपोषण व आरोग्यविषयक कार्यक्रम परस्परांशी निगडीत असल्यामुळे ग्रामस्तरावरुन त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी ग्राम आरोग्य समितीचे पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमध्ये विलीनीकरण करुन ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन करण्यात आली. या समितीमध्ये ५०% महिला सदस्य, अनुसूचित जाती व जमातीचे ग्रामपंचायतीचे सदस्य, आशा, अंगणवाडी व आरोग्यसेविका इ. सदस्य असतात.

**४) आशा :**

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना अंतर्गत विशेषतः ग्रामीण जनतेला आरोग्य सेवा यशस्वीरित्या आणि सातत्याने मिळाव्यात हा दृष्टीकोन समोर ठेवून ग्रामीण पातळीवर प्रत्येक गावामध्ये स्त्री आरोग्य सेविका आशा ची निवड करण्यात येते. आशा ही मान्यता प्राप्त सामाजिक आरोग्य कार्यकर्ती असून ग्रामस्थ व आरोग्य सेवेतील दुवा म्हणून ती काम करते. आशा ही सरकारी कर्मचारी अथवा मानधनी कर्मचारी नसून तिला केलेल्या कामानुसार मोबदला किंवा आर्थिक फायदा देण्यात येतो.

**५) रुग्ण कल्याण समिती :**

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामध्ये आरोग्य सेवांच्या दक्ष व्यवस्थापनेसाठी रुग्ण कल्याण समिती स्थापन केली जाते. रुग्ण कल्याण समिती ही नोंदणीकृत संस्था असून आरोग्य सेवांमध्ये सामुदायिक पालकत्व विकसित करणे व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणी प्रक्रियेवर देखरेख ठेवण्याचे काम ही समिती करते.

**रुग्ण कल्याण समिती उद्दिष्टये :**

१) दवाखान्यातील व कार्यक्षेत्रातील आरोग्य सेवांचा विकास करणे.

२) राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याच्या प्रक्रियेवर देखरेख ठेवणे.

munotes.in

३) प्राथमिक आरोग्य केंद्र / ग्रामीण रुग्णालय / जिल्हा रुग्णालयाच्या अखत्यारित असलेल्या कार्यक्षेत्रात आरोग्य सेवा / आरोग्य शिबिरांचे नियोजन करणे.

४) शासकीय सेवा किमान गरजा पाहून दिल्या जात आहेत याची खात्री करणे व लाभार्थीच्या याबाबत प्रतिक्रिया जाणून घेणे.

५) देणगी स्वरुपात किंवा इतर प्रकारे आर्थिक भर घालणे.

### ६) बंधमुक्त निधी :

बंधमुक्त निधीचा उद्देश हा गावपातळीवरील उपाययोजनाना प्राथमिकता देणे हा असून उपकेंद्रातील किरकोळ दुरुस्ती साथीच्या काळात नमुना पाठविण्याच्या वाहतुकीसाठी, उपकेंद्र स्वच्छतेसाठी खास करुन प्रसुतीनंतर स्वच्छतेसाठी खर्च, उपकेंद्रासाठी लागणाऱ्या बँडेजसारख्या वस्तुची खरेदी करण्यासाठी, सार्वजनिक ठिकाणच्या उपयोगासाठी लागणाऱ्या ब्लिचिंग पावडर आणि जंतुनाशकाच्या खरेदीसाठी, परिसर स्वच्छतेसाठी जसे साठलेल्या पाण्याचा निचरा करणे किंवा अळीनाशक उपाययोजनेसाठी मजूरी, आशा कार्यकृतींना आरोग्य विषयक कामांसाठीचे मानधन देण्यासाठी इत्यादी सारख्या कमी खर्चाच्या, तातडीच्या बाबींसाठी बंधमुक्त निधी दिला जातो. प्रत्येक उपकेंद्रासाठी रुपये दहा हजार व प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी रुपये पंचवीस हजार बंधमुक्त निधी दिला जातो.

### ७) आयुष (AYUSH) :

आयुष (AYUSH) या शब्द योजनेत A आयुर्वेद, Y योग व निसर्गोपचार, U युनानी, S सिद्ध व H होमिओपॅथी या उपचार पद्धतीचा समावेश होतो. या उपचार पद्धती आपल्याकडील अनेक राज्यांत प्रचलित असून मध्यप्रदेश, ओरिसा व राजस्थान मध्ये आयुर्वेदीक उपचार प्रचलित आहेत. तर तामिळनाडू व महाराष्ट्रात युनानी पद्धतीचे उपचार प्रचलित आहेत म्हणजेच आयुष औषधोपचार पद्धती व परंपरा उत्तम रितीने विशेषतः ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात स्विकारण्यात आल्या आहेत. ही औषधे सहज उपलब्ध होत असून ती संसाधनांचा वापर करुन बनविली जातात. ती सुरक्षित तसेच स्वस्तही असतात. औषधोपचारांच्या पारंपारिक पद्धतींचे सक्षमीकरण करणे तसेच आयुष यंत्रणेमार्फत मुख्य प्रवाहात आणणे हे या अभियानाचे प्रमुख ध्येय आहे.

### ८) पायाभूत सुविधा विकास कक्ष :

आरोग्य केंद्राचे बांधकाम शासनाच्या मानकानूसार लवकरात लवकर व्हावे व निधीचा सुयोग्य रितीने वापर व्हावा जेणेकरुन जास्तीत जास्त लोकांना आरोग्य विषयक सुविधा पुरविणे शक्य होईल यासाठी पुढील गोष्टी करण्यात आलेल्या आहेत. जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, उपसंचालक, आरोग्य सेवा (संबंधित आरोग्य मंडळ) व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या समितीने पायाभूत सुविधा कक्ष स्थापन केला आहे.

### ९) जननी सुरक्षा योजना :

ही योजना २००५-०६ पासून कार्यान्वित करण्यात आली असून डॉक्टर, नर्स यासारख्या कुशल व्यक्तीकंडूनच बाळंतपण करुन घेण्यास प्रोत्साहन मिळावे ज्यामुळे माता मृत्यू व नवजात अर्भक मृत्यू दर कमी करावा या हेतूने ही योजना सुरु करण्यात आली आहे. ही

योजना १०० टक्के केंद्र सरकारद्वारा प्रायोजित करण्यात आली असून या योजनेमार्फत दारिद्र्यरेषेखालील व अनुसूचित जाती जमातीतील महिलांना प्रसुतीपूर्व व प्रसूतीपश्चात कालावधीत स्वत:ची काळजी घेता यावी यासाठी आर्थिक मदत दिली जाते.

**१०) लसीकरण :**

लसीकरणामुळे बालकाच्या शरीरात विशिष्ट रोगाविरुद्ध लढण्याची प्रतिकार शक्ती निर्माण होते. लसीकरणानंतर एखाद्या रोगाच्या जंतूचा शरीरात प्रवेश होऊन देखील तो विशिष्ट रोग बालकास होत नाही. विविध रोगांपासून बाळाचे संरक्षण करण्यासाठी लसीकरणाच्या वेळापत्रकाप्रमाणे लस देणे आवश्यक असते. लसीकरणामुळे धनूर्वात, घटसर्प, डांग्या खोकला, क्षयरोग, गोवर, पोलिओ इत्यादी आजारांपासून संरक्षण मिळते व पर्यायाने मूल आरोग्यदृष्ट्या सुदृढ राहते.

अशा प्रकारे समाजातील सर्व स्तरांमधील लोकांना दर्जेदार, गुणवत्तापुर्ण अशी आरोग्यसेवा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामुळे उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न होत असला तरी सातत्याने वाढत्या लोकसंख्येमुळे प्राथमिक आरोग्य केंद्रावर प्रमाणापेक्षा जास्त जबाबदारी येते. मागास व दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र आज देखील सुविधांपासून वंचित आहे. शिवाय आरोग्य केंद्राची इमारत काही ठिकाणी योग्य नसणे, उपकरणांचा अभाव, तज्ञ डॉक्टर्सची कमतरता, वाहतूक साधनांचा अभाव इत्यादी सारख्या समस्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांना भेडसावत असून परिणामी ग्रामीण जनता उपचारापासून वंचित राहते.

**११) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना :**

नॅशनल इन्शुरन्स कंपनीच्या सहयोगाने राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना राबवली जात असून दारिद्र्य रेषेखालील तसेच दारिद्र्य रेषेवरील वार्षिक उत्पन्न रु. १ लाखापर्यंत शिधापत्रक धारक असलेल्या कुटुंबाना ही योजना लागू आहे. यात ह्रदयरोग, मूत्रपिंड प्रत्यारोपण, मेंदू, कर्करोग व मणक्याचे आजार समाविष्ट केले आहेत. ही योजना रोखरक्कमरहित (कॅशलेस) वैद्यकिय सुविधा पुरविण्यासाठी सुरु करण्यात आली असून प्रती वर्ष कुटुंब विम्याचा हप्ता शासन अदा करते व प्रति वर्ष रु. दीड लाखाची हमी दिली जाते.

यामध्ये ९७१ प्रकारच्या उपचारपद्धती व १२१ पाठपुरावा सेवांतर्गत ३० विशेषज्ञ सेवांचा समावेश होतो. या योजनेअंतर्गत २०१३-१४ मध्ये १,३२,३६८ शस्त्रक्रिया आणि उपचार करण्यात आले व त्यासाठी रु. ३४२.१० कोटी खर्च झाले. सन २०१४-१५ मध्ये डिसेंबर अखेर एकूण १,९२,२६५९ शस्त्रक्रिया आणि उपचार करण्यात आले व त्याकरिता रु. ४७०,३८ कोटी खर्च झाले.

**१२) नवसंजीवनी योजना :**

आदिवासी भागातील माता मृत्यू प्रमाण आणि अर्भक मृत्यूदर कमी व्हावेत या उद्देशाने १५ जिल्ह्यातील आदिवासी भागातील ८,४१९ गावांमध्ये नवसंजीवनी योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत प्रत्येक एक वैद्यकिय अधिकारी, निमवैद्यकीय कर्मचारी व एक वाहन असलेली अशी १७२ फिरती वैद्यकिय पथके तयार करण्यात आली आहेत.

ही पथके सर्व गावे व वाड्यांना भेटी देऊन कुपोषित व आजारी बालकांचा शोध घेऊन त्यांच्या घरी वैद्यकिय सेवा पुरवितात. माता मृत्यूदर आणि अर्भक मृत्यूदर कमी व्हावेत याकरिता नवसंजीवनी योजनेअंतर्गत मातृत्व अनुदान दाई बैठका, मान्सूनपूर्व उपाययोजना, आहार व बुडीत मजुरी तरतूद इ. सारख्या विविध योजना राबविण्यात येत आहेत.

आदिवासी भागातील गरोदर महिलांची नोंदणी, नियमित आरोग्य तपासणी व आवश्यक त्या औषधांचा पुरवठा व्हावा यासाठी नवसंजीवनी योजनेअंतर्गत मातृत्व अनुदान योजना राबविण्यात येत आहे.

**ग्रामीण आरोग्य समस्या :**

या विषयाकडे डॉक्टरच्या नजरेतून न पाहता खेड्यातल्या एखाद्या गरीब व्यक्तीच्या त्यातही स्त्रिच्या नजरेतून पहायला हवे. त्याशिवाय ग्रामीण आरोग्य समस्या समजणारच नाही. एका ग्रामीण भागात घडलेली घटना पाहूया, “दिंडोरी तालुक्यातल्या एका दुर्गम गावातून रात्री एक बैलगाडी निघाली, त्यात एक बाळंतीण, सोबत चिंताग्रस्त माणस, चार-पाच तासांनी बैलगाडी एका प्राथमिक आरोग्य केंद्रात पोहोचते, मात्र या ठिकाणी बाळतंपणाची तशी चांगली सोयच नाही, अवघड बाळंतपणाचा तर प्रश्नच नाही. मग गाडी पुढे निघते, आणखी तेरा किलोमीटरवर जरा बरे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. पण तिथवर पोहोचायचे कसे? रस्त्यावरच्या शेतातला एक शेतकरी मदतीला धावतो. पदरचे डिझेल घालुन तो बाळंतिणीला ग्रामीण रुग्णालयात पोहोचवतो. डॉक्टर तपासून बाळ पोटातच गुदमरुन गेल्याचे सांगतो. ऑपरेशन खर्चासाठी सातशे रुपये खर्च होतात. दोन दिवसांनी रिकामे पोट घेऊन दुःखात बाळंतीण परतते, एक तर मुल पोटात गेले त्यात सातशे रुपयांचा खड्डा.”

शासनाचा ‘सुरक्षित मातृत्व बालजीवित्व’ कार्यक्रम चालू आहे. काम चालू रस्ता बंद आहे खासगी रुग्णालये सर्वांनाच परवडत नाहीत. अजूनही ग्रामीण भागात अशी कुटुंबे आहेत की ज्यांना वर्षभर राबून दोन चार हजार रोकड शिलकी पडू शकत नाही. अडनिडीला बैल-बकरी विकणे, गहाणवर टाकणे, पैसे व्याजाने आणणे भाग पडते. तेच इतर आजाराचे, आजार म्हणजे संकटच, काही सरकारी रुग्णालयात रोगांवर योग्य उपचार होतील याची खात्रीच नाही, आणि खासगी रुग्णालयात जाणे सामान्य नागरिकाला परवडत नाही.

**ग्रामीण आरोग्यसमस्या निर्मितीची कारणे :**

**१) कुपोषित बालकांच्या संख्येत वाढ :**

मुलांचे आरोग्य, पोषण आणि वाढ हे देशाच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे. परंतु भारतात सुमारे ४०% मुले कुपोषित आहेत. गरिबी हे याचे एक महत्त्वाचे कारण आहे. कुपोषणाने आरोग्य बिघडते, कार्यक्षमता कमी होते आणि शालेय प्रगती खुंटते.

**२) स्वच्छतेबाबत असलेली उदासिनता :**

ग्रामीण भागात, आदिवासी भागात अजूनही स्वच्छतेसंदर्भात उदासिनता जाणवते. परिसरातील अस्वच्छता, दुर्गंधी अनेक रोग निर्मितीला कारणीभूत ठरते. उघडी गटारे, घरातील सांडपाण्याचा अयोग्य निचरा पद्धती, शौचालयांची दुरावस्था अनेक रोगांना निमंत्रण देतात. आजही काही ठिकाणी पिण्याचे स्वच्छ पाणी मिळणे कठीण बनले आहे.

**३) दारिद्र्यात झालेली वाढ :**

ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रभाव वाढत असला तरी त्यामानाने रोजगार उपलब्ध न झाल्याने बहुसंख्य लोकांना दारिद्र्यात खितपत पडावे लागते. दारिद्र्यात जीवन जगणाऱ्यांना दीर्घकाळ काम न मिळाल्यास असा समाजवर्ग अनुत्पादीत ठरतो. त्यांच्या मुलभूत गरजाच भागू न शकल्यामुळे अशा वर्गाला आरोग्याकडे लक्ष देणे शक्य होत नाही त्यामुळे साहजिकच आरोग्य बिघडते. औषधोपचारासाठी पैसेच नसल्यामुळे आजार वाढत जातो.

**४) वाढती लोकसंख्या :**

वाढत्या लोकसंख्येबरोबर अन्नधान्य, रोजगार संधी पुरेशा प्रमाणात न वाढल्यामुळे, बेकारी, दारिद्र्य, उपासमारी, भूकबळी इ. समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात. साहजिकच कुटुंबामध्ये खाणारी तोंडे वाढतात परंतु कमावणाऱ्या व्यक्तीची संख्या वाढत नाही. यातून उपासमारी, कुपोषण, आजार इ. सामोरे जावे लागते.

**५) लोकांचे अज्ञान, निरक्षरता व अंधश्रद्धा :**

ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रभाव वाढत असला तरी अजूनही काही ठिकाणी निरक्षर लोक दिसून येतात. काही ठिकाणी लहान कुटुंबाचे महत्त्व अद्यापही पटलेले दिसून येत नाही. अगदी सुशिक्षित लोकांमध्ये सुद्धा बुवा-बाजी, गंडा-दोरा इ. चे प्राबल्य असून आजारपणामध्ये डॉक्टरकडे न जाता इतर मार्गाचा अवलंब करताना दिसून येतात. साहजिकच आजारात वाढ झालेली दिसून येते.

**६) आरोग्यविषयक अपुऱ्या सोयी-सुविधा :**

राज्यात लोकसंख्येच्या मानाने आरोग्यविषयक सोयी-सुविधांची कमतरता असून शासनाने हाती घेतलेले विविध आरोग्यविषयक कार्यक्रम राबविणारे कर्मचारी दक्ष व काळजीपूर्वक कार्य करताना काही ठिकाणी दिसून येत नाही. ग्रामीण भागामध्ये तर असे कार्यक्रम तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचलेले दिसून येत नाही.

**७) आरोग्य यंत्रणेवरील वाढता ताण :**

बहुतांशी आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकिय पदे, इतर पदे रिक्तच असलेली दिसून येतात. तसेच ग्रामीण भागात राहण्यासाठी सोयी-सुविधांचा अभाव असल्यामुळे तज्ञ डॉक्टर, नर्स ग्रामीण भागात राहण्यास तयार नसतात. संरक्षणाचाही पुरेशी खात्री नसल्यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रे उपचाराअभावी बंद पडलेली दिसून येतात. लोकसंख्येच्या तुलनेत आरोग्य केंद्र, उपकेंद्राची संख्या न वाढल्यामुळे ग्रामीण भागात आरोग्याच्या समस्या वाढलेल्या दिसून येतात.

**८) आरोग्यविषयक योजनांवर घटत जाणारा खर्च :**

जागतिक आरोग्य संघटनेनुसार आरोग्यावरील खर्च हा सकल घरेलु उत्पन्नाच्या (GDP) ५% असावा. परंतु महाराष्ट्र राज्यात हा खर्च फक्त ०.६% आहे. आरोग्यावरील दरडोई खर्च राज्यात फक्त ३.१६५ आहे. यात शहरी भागासाठी सरासरी रु. २३६ तर ग्रामीण भागासाठी रु. ११२ आहे.

**ग्रामीण आरोग्यविषयक समस्या दूर करण्यासाठी उपाययोजना :**

१) स्वच्छ पाणीपुरवठा आणि परिसर स्वच्छता कार्यक्रम हाती घेणे.

२) कुपोषण रोखण्यासाठी योग्य उपाययोजना करणे.

३) सकस, पोषक आहार उपलब्ध करुन देणे.

४) ग्रामीण भागात उद्योग, व्यवसायाची निर्मिती करुन रोजगार निर्मिती करणे

५) छोट्या कुटुंबाचे महत्त्व लोकांना पटवून देणे.

६) वाढत्या लोकसंख्येनुसार सोयी-सुविधा कशा उपलब्ध होतील त्यादृष्टीने शासन स्तरावर प्रयत्न करणे.

७) ग्रामीण भागातील जनतेपर्यंत आवश्यकतेनुसार आरोग्यविषयक माहिती, सुविधा पुरविणे.

८) सर्व आरोग्य केंद्रामधील रिक्त वैद्यकिय, परिचारिका पदे, तात्काळ भरणे, तज्ञ डॉक्टर्स उपलब्ध करुन देणे, शस्त्रक्रियेसंदर्भातील उपकरणे आरोग्य केंद्रामध्ये उपलब्ध करुन देणे, त्याचा वापर करणे.

९) आरोग्यविषयक योजनांवरील खर्चात वाढ करणे.

## ७.५ दारिद्र्य



भारतातील प्रमुख सामाजिक समस्यांमध्ये दारिद्र्याचा उल्लेख करण्यात येत असून अमेरिका, इंग्लंड सारख्या विकसित देशांप्रमाणे आफ्रिका खंडातील अविकसित आणि भारताप्रमाणे विकासोन्मुख देशातही ही समस्या प्रत्ययास येते. दारिद्र्याची कारणमीमांसा वेगवेगळ्या प्रकारे करण्यात येत असली तरी मूलतः ही "समाज संरचनात्मक" (Structural) समस्या आहे.

समाज संरचनेतील काही समूहांना विशेष संधी व सवलती असतात. आर्थिक जीवनाचे ते सूत्रधार असतात. त्यांच्याकडे आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण झालेले असते. ज्यातून ते उच्च प्रतिचे जीवन जगत असतात. याऊलट समाज संरचनेतील काही समूहांना विकासाच्या प्रक्रियेत

चांगले जीवन जगण्याची संधी नाकारण्यात आलेल्या असतात. त्यांचे व्यवसाय निम्न दर्जाचे व कमी उत्पन्न देणारे असतात. त्यामुळे अशा समूहातील सदस्य आपल्या न्यूनतम जीवन विषयक गरजा भागवू शकत नाहीत. त्यांना दारिद्र्यावस्थेत जीवन जगावे लागते.

भारतातील स्वातंत्र्यपूर्व दारिद्र्य हे ब्रिटीशांच्या वसाहतवाद धोरणाचा परिणाम होता. तर स्वातंत्र्यानंतर सदोष नियंत्रण, दारिद्र्य निर्मुलनासाठी आवश्यक असलेल्या इच्छाशक्तीच्या अभाव, उत्पन्नातील विषमता व योग्य रोजगार धोरणांचा अभाव यामुळे भारतात दारिद्र्याच्या समस्येने तीव्र स्वरुप धारण केलेले आहे.

**दारिद्र्याचा अर्थ व व्याख्या :**

अन्न, वस्त्र व निवारा अशा मुलभूत गरजांची पूर्तता करण्याची क्षमता नसणे म्हणजे दारिद्र्य होय किंवा मूलभूत गरजांचा अभाव म्हणजे दारिद्र्य होय.

**१) जागतिक विकास अहवाल (२०००-०१) नुसार दारिद्र्याची व्याख्या :**

सुस्थितीपासून ढळढळीतपणे वंचित असणे म्हणजे दारिद्र्य होय.

**२) गिलिन आणि गिलिन यांच्या मते :**

दारिद्र्य ही संज्ञा निर्धनता, परावलंबित्व आणि निकृष्ट राहणीची दर्शक आहे.

**३) Adam Smith :**व्यक्तींना जीवनावश्यक गोष्टी आणि मनोरंजनात्मक साधने याचा किती प्रमाणात उपभोग घेता येतो, यावर ती किती दरिद्री आहे किंवा नाही हे ठरविता येते.

**४) Godard गोडार्ड :** व्यक्ती व त्यावर अवलंबून असलेल्या लोकांच्या आरोग्य आणि कार्यक्षमतेसाठी आवश्यक गोष्टींचा अपुरा पुरवठा म्हणजे दारिद्र्य होय.

**५) ब्रॉडले :** दारिद्र्य एक अशी अवस्था असते की, जिच्यामुळे व्यक्ती अपुऱ्या उत्पन्नामुळे किंवा अनियोजित खर्चामुळे शारीरिक आणि मानसिक कार्यक्षमतेसाठी आवश्यक असलेल्या जीवनमानाचा दर्जा गाठू शकत नाही.

**दारिद्र्य रेषा (Poverty Line) :**

"दारिद्र्य रेषा म्हणजे राहणीमानाची किमान पातळी होय." अलीकडील काळात किमान आवश्यक गरजांमध्ये अन्न, वस्त्र, निवारा, शुद्ध पेयजल, स्वच्छतेच्या सुविधा, शिक्षण व आरोग्य इ. बाबींचा समावेश केला जातो. म्हणून राहणीमानाच्या ज्या पातळीला केवळ अन्न, वस्त्र व निवारा इतर मूलभूत गरजा भागविता येत नाहीत. त्या पातळीला दारिद्र्य रेषा असे म्हणतात.

देशाच्या उष्ण हवामानात नागरी प्रत्येक व्यक्तीला किमान २१०० उष्मांकाची तर ग्रामीण प्रत्येक व्यक्तीला किमान २४०० उष्माकांची (प्रत्येक व्यक्तीला २२६० उष्मांक / कॅलरीज) गरज असते. यानुसार प्रत्येक व्यक्तीला आपल्याला मिळणाऱ्या उत्पन्नातून दररोज वरील प्रमाणात उष्मांक मिळवून देईल एवढ्या उपभोग्य वस्तू खरेदी करणेही शक्य नसेल त्यास दारिद्र्य मानले जाते व त्यालाच दारिद्र्य रेषेखालील जीवन मानले जाते. म्हणजेच दारिद्र्यरेषा म्हणजे उत्पन्नाची मर्यादा आहे. ज्या कुटुंबाचे / व्यक्तीचे उत्पन्न सीमा रेषेपेक्षा कमी असते ते

दारिद्र्य रेषेखाली असतात. अलीकडे त्यांना सर्रास बीपीएल असे (BPL - Below Powerty Line) संबोधले जाते.

राज्यात नागरी भागापेक्षा ग्रामीण भागात दारिद्र्याचे प्रमाण जास्त असून पुढील सारणीमध्ये ही टक्केवारी दर्शविली आहे.

| वर्ष | ग्रामीण | नागरी | राज्य |
|---|---|---|---|
| १९७३ - १९७४ | ५७.७ | ४३.९ | ५३.२ |
| १९९३ - १९९४ | ३७.९ | ३५.२ | ३६.९ |
| १९९९ - २००० | २३.७ | २६.८ | २५.० |
| २००९ - २०१० | २९.५ | १८.३ | २४.५ |

सारणीवरुन असे स्पष्ट होत की राज्यातील ग्रामीण व शहरी दारिद्र्याच्या प्रमाणात घट होत आहे.

**दारिद्र्याची कारणे :**

**१) लोकसंख्या वाढीचा उच्च दर :** राज्यातील दारिद्र्याचे मुख्य कारण म्हणजे लोकसंख्या वाढीचा उच्च दर होय. लोकसंख्या वाढल्यामुळे काम मागणाऱ्यांच्या संख्येत वाढ होऊन बेकारी वाढते. साहजिकच दरडोई उत्पन्न कमी झाल्यामुळे दारिद्र्यात भर पडते. वाढत्या लोकसंख्येमुळे मागील नऊ पंचवार्षिक योजनांमध्ये केलेली प्रगती लक्षात येत नाही. लोकसंख्येच्या अतिरिक्त वाढीमुळे निम्नस्तरावरील लोकांना मूलभूत गरजा भागविणे अशक्यप्राय झाले असून याचा परिणाम म्हणजे दारिद्र्याची समस्या जटील बनली आहे.

**२) नैसर्गिक कारणे :** नैसर्गिक वातावरणात अवर्षण, अतिवर्षण, भूकंप, ज्वालामुखी, वादळे, तापमानात बदल, महापूर असे आकस्मित व तिव्रस्वरुपाचे बदल होतात. यामुळे पिढ्यानपिढ्या जमवलेली संपत्ती, घरेदारे क्षणार्धात नष्ट होतात. पशू पक्ष्याची व मानवी समाजाची जिवित व वित्तहानी होते. लोक आपल्या जीवनावश्यक गरजा पूर्ण करु शकत नाहीत. थोडक्यात नैसर्गिक संकट दारिद्र्याचे कारण ठरतात.

**३) सामाजिक कारणे :** ग्रामीण भागातील निरक्षरता, परंपरावादी वृत्ती, नव्याचा विरोध करण्याची धारणा, सामाजिक पृथकता इ. कारणांच्या प्रभावाने दारिद्र्याचा प्रत्यय येतो. अंधश्रद्धा, सामाजिक गतिशीलतेचा अभाव, उद्योजकतेचा अभाव यासारख्या कारणांनी गरिबी कायम स्वरुपात आढळते. सांप्रदायिकता, गटागटातील संघर्ष, जाळपोळ याचा संबंध दारिद्र्याशी येतो.

**४) व्यक्तिगत कारणे :** दारिद्र्यासाठी व्यक्तिगत कारणे जबाबदार असून व्यक्ती मंदबुद्धी, अपंग, रोगी असेल तर अर्थार्जनावर मर्यादा पडतात. पर्यायाने कुटूंबाची आर्थिक स्थिती खालावते. आळशी, कामचुकार, दैववादी, जिद्दीचा व साहसाचा अभाव असलेली व्यक्ती आपल्या

गुणवैशिष्ट्यांमुळे व्यवसायात अयशस्वी ठरते. मद्यपान, अंमली पदार्थांचे सेवन, सट्टा खेळणारी व्यक्ती वाईट सवयींमुळे पैसा व्यर्थरित्या खर्च करते. साहजिकच दारिद्र्यात वाढ होते.

५) **कृषी व्यवसायाचे स्वरुप :** राज्यातील एकूण शेतीपैकी ७० टक्के शेती पावसाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. अनेक शेतकऱ्यांकडे अल्प जमीन असून जमिनीचे तुकडीकरण, कृत्रिम जलसिंचनाच्या अपुऱ्या सोयी, शेतीत वापरले जाणारे मागास तंत्र इ. कारणांमुळे शेतीमधून निघणारे उत्पन्न कमी असते. काही शेतकरी हे गरीब असल्यामुळे उत्पन्न कमी असते. काही शेतकरी गरीब असल्यामुळे शेतीत जास्त गुंतवणूक करु शकत नाही. तसेच फावल्या वेळेत शेतीला पूरक / जोड व्यवसाय करु शकत नाही.

६) **उत्पन्नातील विषमता :** साधन सपंत्तीच्या मालकी व वारसा हक्कामुळे राज्यात उत्पन्नाचे विभाजन खूपच असमान होते. श्रीमंत अधिक श्रीमंत होतात तर गरीब अधिक गरीब होतात.

७) **खाजगीकरण, जागतिकीकरण व उदारीकरण :** आर्थिक सुधारणांमुळे, जागतिक व्यापार संघटनेमुळे देशात अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या सुरु झाल्या. खाजगीकरण, आधुनिकीकरण यामध्ये यांत्रिकीकरण जास्त प्रमाणात झाल्यामुळे श्रमिकांची आवश्यकता कमी झाली. कृषी क्षेत्रातही यांत्रिकीकरण झाल्यामुळे तसेच राज्यात अनेक भागात जेसीबी, कल्टीव्हेटर, प्रेशर अशा यंत्राचा वापर सुरु झाल्यामुळे लोकांवर बेकारीची वेळ आली आहे. साहजिकच दारिद्र्यात वाढ झालेली दिसून येते.

८) **सदोष शिक्षणपद्धती :** उद्योग धंद्यांसाठी लागणारे कौशल्यपूर्ण तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांची अद्यापही राज्यात कमतरता असल्यामुळे कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतून घेतलेले शिक्षण व्यवसायिक शिक्षणाशी बरोबरी साधू शकत नाही. निरक्षर, अज्ञानी, अर्धकुशल, अकुशल, कामगारांना रोजगार मिळत नाही.

९) **परप्रांतियांचे स्थलांतर :** उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, राज्यस्थान तसेच इतर राज्यातून महाराष्ट्रात रोजगारनिमित्त लोक येतात. परप्रांतीय लोक कमी मजुरीवर काम करण्यास तयार असतात. परिणामी राज्यातील भूमीपूत्रांवर बेकार राहण्याची वेळ येते. बेकारीमुळे दारिद्र्यात भर पडते.

**दारिद्र्य निर्मुलन व रोजगार निर्मिती कार्यक्रम :**

राज्य व राष्ट्रीय पातळीवर दारिद्र्य व बेरोजगारी निर्मुलन करण्यासाठी अनेक प्रयत्न केले गेले. अनेक योजना आल्या व गेल्या. अनेक योजना कागदोपत्री राबविल्या गेल्या. काही योजनांमधून दारिद्र्य व बेकारी या समस्यांवर उपाय शोधण्याचे प्रयत्न झाले.

१) **जवाहर ग्रामसमृद्धी योजना :** १ एप्रिल १९९९ मध्ये जवाहर रोजगार योजनेच्या रचनेत बदल करुन सुधारीत स्वरुपात जवाहर ग्रामसमृद्धी योजना सादर करण्यात आली. ही योजना केंद्र सरकारने प्रायोजित केली असून या योजनेचा खर्च ७५.२५ अशा प्रमाणात अनुक्रमे केंद्र व राज्य सरकारने करावा असे ठरवले गेले या योजनेनुसार ग्रामीण भागात दिर्घकाळात उत्पादक

स्वरुपाचा रोजगार निर्माण करु शकतील अशा योजनांना प्राधान्य देवून ग्रामीण गरीबांना रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न करावा.

**२) राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान :** केंद्र शासनाने एप्रिल १९९९ पासून दारिद्र्य निर्मुलनासाठी स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना सुरु केली होती. या योजनेतील उणिवा लक्षात घेऊन केंद्रशासनाने गरिबीचे निर्मूलन करण्यासाठी नवीन धोरण निश्चित करण्यासाठी नवीन धोरण निश्चित करण्यासाठी प्राध्यापक आर. राधाकृष्ण समितीची स्थापना केली. या समितीच्या शिफारशी विचारात घेऊन १८ जुलै २०११ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेत केंद्र शासनाचा हिस्सा ७५ टक्के तर राज्यशासनाचा हिस्सा २५ टक्के आहे. राज्यातील सर्व गरीब कुटूंबापर्यंत पोहोचुन त्यांना कायमस्वरुपी उपजिविकेच्या संधी उपलब्ध करणे व गरीबी रेषेच्या वर येईपर्यंत त्यांना मदतीचा हात देऊन त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी सर्वतोपरी मदत करणे हा या अभियानाचा उद्देश होता. या अभियानाचा गरीबांच्या स्वयंसहाय्यता गटांचे संघटन करुन त्याद्वारे स्वयंरोजगार मिळविणे हा मुलभूत घटक मानण्यात आला.

**३) संपुर्ण ग्रामीण रोजगार योजना :** १ एप्रिल २००१ या दिवशी ही योजना सुरु करण्यात आली होती. या योजनेचा उद्देश ग्रामीण भागात रोजगाराबरोबरच अन्नधान्याची सुरक्षा, समाजोपयोगी दिर्घकाळ टिकतील अशी उत्पादक संपत्ती निर्माण करणे हा होता.

**४) प्रधानमंत्री ग्रामोद्योग योजना :** ग्रामीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असे आरोग्य, प्राथमिक शिक्षण, पिण्याचे पाणी, घरे, रस्ते, इत्यादींची सुविधा उपलब्ध करुन देऊन ग्रामीण व्यक्तीच्या जीवनाचा स्तर उंचावण्याचे ध्येय या योजनेत ठेवण्यात आले होते.

**५) प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना :** ही योजना इंदिरा गांधी बेघर योजनेप्रमाणे राबविण्याचे ठरविण्यात आले होते. या योजनेचा हेतू ग्रामीण भागातील गरीब व बेघर लोकांना राहण्यासाठी योग्य घरे बांधून द्यावी हा होता.

**६) इंदिरा आवास योजना :** १९९९-२००० या वर्षात ही योजना सुरु करण्यात आली. या योजनेनुसार ग्रामीण विभागात कच्ची घरे पक्की बांधणे व दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठीही योजना अंमलात आणली होती. या योजनेसाठी जिल्हे निवडताना मागासवर्गीय, भटक्या जमाती यांच्यासाठी घरे बांधण्यावर अधिक भर देण्यात आला.

**७) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :** मागेल त्याला काम उपलब्ध करुन देणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट असून ग्रामीण भागातील बेकारी व दारिद्र्याचे प्रश्न सोडविणे, प्रत्येक कुटुंबातील तरुण व्यक्तीला वर्षातून किमान १०० दिवस पूर्णवेळ काम उपलब्ध करुन देणे, व्यक्तीचा जीवनमानाचा दर्जा उंचावणे ही या योजनेची प्रमुख उद्दिष्ट्ये होती.

**८) पंतप्रधान रोजगार हमी योजना :** केंद्र सरकारकडून १५ ऑगस्ट २००८ पासून पंतप्रधान रोजगार योजना व ग्रामीण रोजगारनिर्मिती योजना या दोन योजना एकत्रित करुन पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम तयार करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

१) शहराकडे ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर थांबविणे.
२) पारंपारिक कारागीर / ग्रामीण अथवा शहरी भागातील बेरोजगारांना स्वयं रोजगार उद्योगाची उभारणी करुन रोजगाराच्या संधी निर्माण करणे.
३) व्यक्तीला आत्मनिर्भर बनविणे.

## ७.६ सारांश

मनुष्य साधनसंपत्तीच्या विकासामध्ये शिक्षण हा घटक अत्यावश्यक असून प्रस्तुत प्रकरणामध्ये शिक्षणाच्या इतिहासाचा आढावा घेतला असून प्राथमिक शिक्षणासाठी राबविण्यात आलेल्या सर्व शिक्षा अभियानाचा अभ्यास केला आहे. वंचित घटकाचे शिक्षण, पर्यायी शिक्षणाच्या योजना, प्राथमिक शिक्षणातील समस्या तसेच सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी उपाययोजनाही स्पष्ट केल्या आहेत. तसेच ग्रामीण भागातील समस्यांपैकी आरोग्य व दारिद्र्याची समस्या नष्ट केली असून ग्रामीण आरोग्य अभियानाद्वारे सरकारने केलेले प्रयत्न स्पष्ट केले आहेत. तसेच दारिद्र्य म्हणजे काय ते सांगून दारिद्र्याची कारणे व सरकारने सादर केलेल्या काही योजनांचा आढावा घेतला आहे.

## ७.७ स्वाध्याय

१) शिक्षणाच्या व्याख्या सांगून शिक्षणाचा इतिहास सांगा.
२) सर्वशिक्षा अभियानाबद्दल सविस्तर माहिती सांगा.
३) पर्यायी शिक्षणाच्या योजना स्पष्ट करा.
४) प्राथमिक शिक्षणाच्या समस्या स्पष्ट करुन सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी उपाययोजना सांगा.
५) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची माहिती सांगा.
६) दारिद्र्य म्हणजे काय ते सांगून दारिद्र्याची कारणे स्पष्ट करा.
७) टिपा द्या.
   १) वंचित घटकाचे शिक्षण
   २) प्राथमिक आरोग्य केंद्र
   ३) आयुष व जननी सुरक्षा योजना
   ४) दारिद्र्य रेषा

## ७.८ संदर्भसूची

१) प्रा. शशिकांत हरी अट्रावलकर, भारतीय अर्थव्यवस्थेची विकास धोरणे, शेठ पब्लिकेशन्स, २००५.

२) डॉ. दिलीप जगताप, डॉ. सुमित्रा पवार, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, अथर्व पब्लिकेशन, २०१४.

३) डॉ. दिलीप शं. पाटील, डॉ. स्मिता भोईर, प्रा. प्रवीण सनये, प्रा. रमेश म्हात्रे, ग्रामीण विकासाची तोंडओळख, दुर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, २०१०.

४) डॉ. आ.कि. खडसे, भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, हिमालया पब्लिशिंग हाऊस, २००४.

५) प्रा. रा.ना. घाटोळे, ग्रामीण समाजशास्त्र व सामुदायिक विकास, श्री. मंगेश प्रकाशन, २०००

६) डॉ. आनंद नाडकर्णी, आरोग्याचा अर्थ, ग्रंथाली प्रकाशन.

७) प्रा. पी.के. कुलकर्णी, आरोग्य आणि समाज, डायमंड प्रकाशन, पुणे, २००८

८) प्रा. एल.जी. देशमुख, इयत्ता अकरावी शिक्षणशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापुर, २००६

९) प्रा. अशोक डांगे, डॉ. विजय काकडे, जागतिक अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापुर १९९९.

१०) सौ. एम.आय. मोमीन, बाल आरोग्य परिचर्या, एम्. आय. प्रकाशन, कोल्हापूर, २०१०.

११) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, अधिकारी / पदाधिकारी यांचेसाठी मार्गदर्शक पुस्तिका, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन.

१२) डॉ. अरविंद दुनाखे, प्रगत शैक्षणिक तत्वज्ञान, नित्यनूतन प्रकाशन

१३) प्रा. शमसुदिन तांबोळी, महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००९

१४) प्रा. महेंद्र ज्वलंत ग्रामीण शैक्षणिक समस्या

१५) प्रा. विलास रणसुभे, शिक्षण, २००५

१६) प्रा. ए. वाय. कोंडेकर, बारावी समाजशास्त्र, फडके पब्लिकेशन, २००७

१७) प्रा. चंद्रकांत खंडागळे, भारतीय समाज, १९९८

१८) प्रा. चंद्रकांत खंडागळे, भारतीय समाज रचना आणि परिवर्तन, २००६


❖❖❖❖

munotes.in

# घटक -८

## ग्रामीण समुदायाच्या समस्या (भाग २)

- प्रा. विवेक शां. चव्हाण

**पाठाची रचना :**

८.१ उद्दिष्ट्ये
८.२ प्रस्तावना
८.३ कर्जबाजारीपणाची कारणे
८.४ कर्जबाजारीपणा कमी करण्याचे उपाय
८.५ शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे
८.६ शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठीचे उपाय
८.७ सारांश
८.८ स्वाध्याय
८.९ संदर्भसूची

## ८.१ उद्दिष्ट्ये

- कर्जबाजारीपणाची कारणे अभ्यासणे.
- कर्जबाजारीपणा कमी करण्याचे उपाय सुचविणे.
- शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे अभ्यासणे.
- शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी करण्यासाठी उपाय सुचविणे.

## ८.२ प्रस्तावना

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेती हा व्यवसाय भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. देशाचा विकास आणि प्रगती ही शेती व्यवसायावरच अवलंबून आहे. उपजिवीकेचे साधन म्हणून शेती व्यवसायाकडे पाहिले जाते. त्याचप्रमाणे शेतमजुरांना रोजगार उपलब्ध होतो. तसेच सक्रीय उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा देखील शेती क्षेत्रातूनच केला जातो. मात्र जगभरातील २/३ लोक फक्त शेती व्यवसाय शास्त्रशुद्ध तऱ्हेने करताना दिसतात. नवीन तंत्राच्या वापरातून उत्पादनात वाढ करताना दिसतात.

भारतात शेती व्यवसाय हा पारंपारिक पद्धतीने केला तसेच शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन अजूनही केवळ उपजिवीकेचे एक साधन म्हणूनच आहे. त्यामुळे शेती हा व्यवसाय आहे ही कल्पना अजूनही रुजू शकलेली नाही. त्याचप्रमाणे शेतकऱ्याचे अवलंबत्व पुर्णपणे शेतीवरच

राहल्यामुळे अन्य प्रकारचे उत्पन्नाचे स्त्रोत शोधले जात नाहीत. त्यामुळे उत्पन्न मर्यादित राहते. त्यात एकत्र कुटुंब पद्धती, कुटुंबातील सदस्यांची वाढती संख्या आणि त्यांच्या गरजांची पुर्तता करताना शेतीतून मिळणारे उत्पन्न हे अपुरे पडते. त्यातच रुढी, परंपरा, धार्मिक विधी, गारपीट, दुष्काळ इ. मुळे शेतीत होणारे नुकसान त्याचबरोबर कुटुंबाच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी शेतकऱ्यांना गावातील सावकार, व्यापारी, श्रीमंत शेतकरी, नातेवाईक, बँका किंवा पतसंस्था याच्याकडून कर्ज घ्यावे लागते. हे घेतलेले कर्ज योग्य पद्धतीने फेडले नाही तर हे कर्ज वाढतच राहते. त्याला कर्जबाजारीपणा असे म्हणतात. रॉयल कमिशनने 'भारतीय शेतकरी कर्जात जन्म घेतो, कर्जात वाढतो, कर्जात मरतो आणि आपल्या वारसावर कर्ज सोडून जातो'. या विधानाद्वारे ग्रामीण कर्जबाजारीपणा त्यातून निर्माण होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या असे कर्जबाजारीपणाचे भयावह स्वरुप दिसून येते.

## ८.३ ग्रामीण कर्जबाजाराची कारणे

ग्रामीण भागामध्ये शेतकरी आणि शेतमजुरांचे प्रमाण जास्त असलेले दिसून येते. भारतीय ग्रामीण समाज हा संपुर्ण ग्राम म्हणून विशिष्टपुर्व कालखंडामध्ये ओळखला जात होता. त्यानंतर ब्रिटीश कालखंडात ग्रामीण व्यवस्थेत त्यांच्या हस्तक्षेपामुळे व प्रशासकीय नितीमुळे ग्रामीण व्यवस्थेत बदल होत गेले. आणि त्यातून सामाजिक, आर्थिक व राजकिय समस्यांची निर्मिती होत गेली. ब्रिटीश कालखंडापासूनच ग्रामीण भागात दारिद्र्य, कर्जबाजारीपणा यांसारख्या समस्यांची निर्मिती झाली. आणि या समस्या ग्रामीण समाज व्यवस्थेला भेडसावू लागल्या. ग्रामीण भागातील कर्जबाजाराची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १) दारिद्र्य :

शेतकऱ्यांचे भयाण दारिद्र्य हे ग्रामीण कर्जबाजारीपणाचे प्रमुख कारण आहे. शेती व्यवसायासाठी तसेच उत्पादक व अनुत्पादक कारणासाठी कर्ज काढावे लागते. उत्पादक कारणासाठी काढलेले कर्ज फेडण्याची शक्यता असते मात्र निसर्गाने साथ न दिल्यास त्याचप्रमाणे बाजारातील परिस्थिती विपरित राहिल्यास हे कर्ज त्याला फेडता येत नाही. अनुत्पादक कारणासाठी काढलेले कर्ज हे शेतीतील यशावरच फेडले जाते. त्यामुळे जीवनातील प्रत्येक कार्यासाठी दारिद्र्यामुळे दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते. त्यातून कर्जबाजारीपणाची समस्या निर्माण होते.

### २) तुटीचा शेती व्यवसाय :

भारतात सिमांत व लहान भूधारकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. तसेच शेतमजुरांची देखील लहान शेतकऱ्यांना निसर्ग अनुकूल राहिल्यास शेतीतून उत्पन्न मिळू शकते. मात्र त्यावेळी विपरीत परिस्थिती निर्माण होते. त्यावेळी बहुसंख्य शेतकरी कुटुंबाचे अंदाजपत्रक तुटीचे ठरते व त्यांना कर्ज काढण्याशिवाय पर्याय शिल्लक राहत नाही.

### ३) शेतजमिनीचे तुकडीकरण :

भारतात वारसहक्क कायद्यानुसार पित्याच्या मृत्युनंतर त्यांची संपत्ती मुलांमध्ये वाटली जाते. त्यामुळे शेतजमीनीचे तुकडीकरण होत जाते. पर्यायाने एका पिढीकडे असणारी जमीन

चौथ्या पिढीकडे येतेवेळी अल्पभूधारक बनवीते. ही जमीन तुकडीकरणामुळे इतकी लहान होते कि ती कसणेही शक्य होत नाही. पर्यायाने कुटुंबाची गरज भागविण्यासाठी कर्ज घेतो.

### ४) बेरोजगारी :

ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी व अर्धबेकारी दिसून येते. त्यातच पावसावर अवलंबून असणारी शेतजमिन यामुळे एकच पिक घेतले जाते. परिणामी उर्वरीत काळात शेतकरी बेरोजगार राहतात. बेरोजगारीमुळे उपजिविकेसाठी कर्ज काढण्याशिवाय पर्याय राहत नाही.

### ५) शेतीवरील लोकसंख्येचा अतिरिक्त भार :

भारतात लोकसंख्येची सातत्याने वाढ झाल्याने दरडोई कृषी उत्पन्नात घट येऊ लागली आहे. तसेच शेतजमिनीच्या वितरणामध्ये असमतोल, लहान शेतकऱ्याचे प्रमाण वाढलेले आहे. त्यातून दारिद्र्याची निर्मिती होते. परिणाम जीवन जगण्यासाठी कर्ज घेण्याशिवाय पर्याय राहत नाही.

### ६) गृह उद्योगांचा ऱ्हास :

ग्रामीण भागामध्ये लघु आणि कुटीर उद्योगामुळे वेगवेगळ्या घटकांना रोजगार उपलब्ध होतो. ब्रिटीशांनी भारतातील कच्चा माल ब्रिटनमध्ये नेऊन पक्कामाल भारतात आणून विक्री केली. स्वस्त किंमत, चांगला दर्जामुळे या स्पर्धेत भारतीय उत्पादक टिकू शकला नाही. उदरनिर्वाहाचे साधनच गेल्याने चरितार्थ चालविण्यासाठी कर्ज हा एकमेव पर्याय राहिलेला दिसून येतो.

### ७) कृषी उत्पन्नात सातत्याचा अभाव :

भारतीय शेती निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गाच्या लहरीपणा. यामुळे उत्पन्न येईल याची शाश्वती नसते. दुष्काळाला सामोरे जावे लागते. तसेच शेतमजूरीमध्ये सातत्य नसल्याने आर्थिक विवंचनेत सापडला जातो. परिणामी शेतकरी व शेतमजूर यांच्या उत्पन्नात सातत्य नसल्याने कर्ज घ्यावे लागते.

### ८) वडिलोपार्जित कर्ज :

भारतीय शेतकरी कर्जात जन्म घेतो. कर्जात वाढतो, मरतो आणि मरताना कर्ज वारसांवर टाकून जातो. ग्रामीण भागातील सामाजिक रुढी आणि परंपरा शेतीपद्धत, जमीन विषयक कायदे, निसर्गावरील अवलंबित्व, भुधारकांचा अभाव, विपणनातील दोष इ. शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होते आणि आर्थिक शोषणामुळे शेतकरी कर्जाची परतफेड करु शकत नाही. हे कर्ज एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमीत होते.

### ९) अनुत्पादक न्यायालयीन खर्च :

शेतकरी कुटुंबाचे ग्रामीण भागात होणारे वादविवाद आणि कौटुंबिक भांडणे यातून मार्ग न निघाल्याने ते न्यायालयात जातात. या न्यायालयीन खटल्याचे निकाल लागण्यास बराच कालावधी लागतो. त्यामुळे यावर मोठ्या प्रमाणात खर्च होतो. शेतीतुन होणारे तुटपुंजे उत्पादन त्यातच न्यायालयीन खर्च यासाठी कर्ज काढण्याशिवाय पर्याय राहत नाही.

munotes.in

**१०) शेतमाल विपणनातील दोष :**

शेतकऱ्याने उत्पादीत केलेला माल ग्राहकाच्या हातात पडेपर्यंत कराव्या लागणाऱ्या वेगवेगळ्या प्रक्रियांचा समावेश शेतमाल विपणनात होतो. विपणनातील दोषांमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला योग्य मुल्य मिळत नाही. त्यामुळे त्याच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होत नाही. परिणाम कौटुंबिक खर्चासाठी कर्ज काढण्याशिवाय पर्याय राहत नाही.

**११) जमीनदार व सावकारांकडून शोषण :**

ग्रामीण भागात सिमांत अल्पभूधारकांचे तसेच भूमीहिनांचे प्रमाण अधिक असल्याने ते जमीनदार / सावकार यांच्या जमीन कसण्यासाठी घेतात. अशा जमीनीवर जास्त खंड आकारणे, कर्जाऊ पैसे देऊन शेतात राबविणे, कर्जफेडीलाही तगादा लावणे, कमी दराने माल खरेदी करणे, जास्त व्याज आकारणे, खोट्या सह्या घेऊन, जबरदस्तीने शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते. भोळा भाबडा शेतकरी आर्थिक स्थितीमुळे अन्याय सहन करत राहतो. कर्जबाजारी होतो.

भारतीय शेतकऱ्यांची कर्जबाजारापणाची वरील कारणे महत्त्वपूर्ण आहेत. यासर्व कारणांमुळे शेतकऱ्यामध्ये कर्जबाजारीपणा आढळून येतो.

**ग्रामीण कर्जबाजारीपणाचे परिणाम :**

ग्रामीण भागामध्ये शेतकरी आणि शेतमजुरांमध्ये कर्जबाजारीपणा आढळून येतो. बहुसंख्य हे अल्पभूधारक, अत्यल्प भूधारक शेतमजूर असलेले आढळून येतात. अज्ञान, निरक्षरता, धार्मिक मोठ्या प्रमाणात असल्यामुळे संधीसाधू, जमीनदार, सावकार या भोळ्या भाबड्या लोकांची फसवणूक करतात. हाताला काम नसल्याने चरीतार्थ चालविण्यासाठी कर्जाशिवाय पर्याय नसतो. त्यातून निर्माण होणारे परिणाम खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१) शेती उत्पादनावर परिणाम :**

जमीनदार / सावकार यांच्या कर्ज सापळ्यात अडकलेल्या शेतकऱ्यांची शारीरिक व मानसिक स्थिती ढळल्याचे दिसते. कर्जबाजारीपणामुळे कर्ज कसे फेडायचे या विवंचनेतच शेतकरी आढळून येतो. कामात लक्ष लागत नाही. त्याच्या खचलेल्या मनोबलाचा परिणाम शेती उत्पादनावर होतो.

**२) आत्महत्येचा विचार मार्ग :**

शेतकऱ्याच्या कर्जबाजारीपणामुळे त्याचे मानसिक खच्चीकरण मोठ्या प्रमाणात होते. बरेच शेतकरी अशा समस्यांना सामोरे जाऊ शकत नाही. बरेच शेतकरी टोकाची भूमिका घेऊन आत्महत्येचा पर्याय निवडतात. गेल्या काही दशकापासून शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

**३) भूमिहीन शेतमजूरांमध्ये वाढ :**

भारतातील बहुसंख्य शेतकरी अत्यल्प व अल्पभूधारक आहेत. आपत्तीजनक स्थितीत कर्ज काढण्याशिवाय पर्याय राहत नाही. कर्जाचे तारण म्हणून बऱ्याच वेळा निर्वाहचे साधन जमीन हेच ठेवावे लागते. कर्ज फेड न जमल्याने त्याला मालकी हक्क सोडावा लागतो. परिणाम भूमिहीनांमध्ये वाढ होते.

### ४) आर्थिक गुलामगिरी :

शेतकरी आणि शेतमजुरांना कर्जाची परतफेड करताना शेतमजुरांना गुलामीचे जीवन जगावे लागते. जो पर्यंत घेतलेल्या कर्जाची परतफेड होत नाही. तो पर्यंत सावकार, जमीनदार हे शेतकऱ्याची सुटका करत नाही. आपल्या शेतावर कमी मजुरी देऊन काम करुन घेतात. मानसिक शारीरिक त्रास दिला जातो.

### ५) दारिद्र्यात वाढ :

शेतकरी कर्ज घेत असते वेळी कर्जाची परतफेड शेतामधून पिक निघतानाच पिकाच्या स्वरुपात परतफेड करण्याची अट टाकली जाते. त्यामुळे येईल त्या किंमतीला माल द्यावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक शोषण होते. त्याच्या मालाला योग्य किंमत प्राप्त न झाल्यामुळे त्याच्या दारिद्र्यात वाढ होते.

### ६) व्यसनाधिनता :

कर्जाऊ स्वरुपात घेतलेले पैसे अनेक कारणांमुळे फेडता येऊ न शकल्याने शेतकरी कर्जबाजारीपणामुळे चिंताग्रस्त बनतो. त्यातून शेतीकडे दुर्लक्ष होते. अनेक प्रयत्न करुन देखील कर्जाची परतफेड होत नाही. मानसिक स्थिती खालावते त्यातून व्यसनांच्या आहारी जातो.

### ७) सामाजिक दुष्परिणाम :

शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपणाचे पर्यवसन शेतकऱ्यांची जमीन सावकारांची होते. या प्रक्रियेमुळे खेड्यातील बहुतेक जमीनीची मालकी असणारा सावकारांचा आणि सर्वस्व गमावून बसलेल्या शेतमजूराचा दुसरा वर्ग असे दोन वर्ग निर्माण होतात. त्यातून ग्रामीण जीवनात तणाव निर्माण होतो. बिहार, बंगाल व ओरीसा याठिकाणी भूमीहीन शेतमजूर बंड करुन उठले. त्यातून हिंसाचार, नक्षलवादी चळवळ इ. सामाजिक दुष्परिणाम झालेले दिसतात.

अशाप्रकारे कर्जबाजारीपणामुळे होणारे आर्थिक तसेच सामाजिक दुष्परिणाम आढळून येतात.

## ८.४ कर्जबाजारीपणा दूर करण्यासाठी उपाय योजना

ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. जिवनावश्यक गरजांची पुर्तता करता येत नाही. कर्जबाजारी झालेले शेतकरी पुढे भूमीहीन शेतमजुर होऊन मिळेल त्या मजुरीवर काम करतात. पर्यायाने त्यांचे नैतिक अध:पतन झालेले दिसून येते. त्यातून हिंसाचार आत्महत्या इ. सामाजिक प्रश्न निर्माण होतात. कर्जबाजारीपणाचे हे परिणाम दूर करण्यासाठी शासनाने काही प्रयत्न केले आहेत ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १) धोरणात्मक निर्णय :

स्वातंत्र्योत्तर काळात शेतकऱ्यांची कर्जबाजारीपणा कमी करण्यासाठी समाजवादी समाज रचना स्विकारण्यात आली. व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले, गरिबी निर्मुलनाचे कार्यक्रम राबविण्यात आले. रोजगार हमी योजना, सामाजिक सुरक्षितता योजना लागू

करण्यात आल्या, संजय गांधी निराधार योजना इ. सर्व योजना ग्रामीण कर्जबाजारीपणा दुर करण्यासाठी सुरु केल्या.

### २) जमीन हस्तांतरण बंदी :

सावकार, व्यापारी, जमीनदार इ. कर्ज घेतल्यास त्या कर्जाची परतफेड वेळेवर न झाल्यास शेतकऱ्याच्या जमीनीचे हस्तांतरण कर्ज देण्याऱ्या व्यक्तींना करता येत नाही. त्यावर सरकारने बंदी आणली. त्यामुळे शेतकऱ्याचे शेतमजुरात वर्गीकरण होत नाही.

### ३) कर्ज व्यवहारांवर नियंत्रण :

शेतकऱ्यांची कर्जबाजारीपणा दुर करण्यासाठी सरकारने वेगवेगळे प्रयत्न केले. या प्रयत्नामध्ये कर्जव्यवहारावर नियंत्रण टाकण्यात आले. कर्ज व्यवहार करताना नोंद करणे, कर्जाचा तपशिल ठेवणे. तसेच यात त्रूटी दिसल्यास परवाना रद्द करण्याची तरतूद करण्यात आली.

### ४) सहकारी संस्थांचा विकास :

ग्रामीण भागात सहकारी संस्थांच्या माध्यमातून प्रभावी पद्धतीने कार्य केल्यास ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणा दुर होण्यास मदत होईल. या दृष्टिकोनातून सहकारी संस्थांची वित्तीय रचना उभी केली. त्या दृष्टीने ग्रामीण भागात पतसंस्थांची स्थापना यातून कर्जबाजारीपणा दुर करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### ५) भारतीय रिझर्व्ह बँक :

भारतीय रिझर्व्ह बँकेने रिझर्व्ह बँक कायद्यातील तरतूदीनुसार शेतीसाठी कर्जपुरवठा विभाग सुरु केला. राज्य सरकारी बँक आणि नाबार्डच्या माध्यमातून रिझर्व्ह बँक आपले शेती विषयक कर्जपुरवठ्याचे धोरण राबवते.

याशिवाय ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणा दुर करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतले आहेत, ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) आपत्तीजनक स्थितीत शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करणे.

२) ग्रामीण भागात वेगवेगळ्या सवलती देऊन उद्योग स्थापन करणे.

३) बचतीची सवय लावणे.

४) शेतमाल विपणन व्यवस्थेतील दोष दुर करणे.

५) पंचायतराजच्या माध्यमातून गावाचा समतोल विकास घडवून आणणे.

६) शेतीमध्ये कायम स्वरुपी सुधारणा घडवून आणून शेतकऱ्याच्या जिवनात स्थिरता निर्माण करणे.

७) कमी व्याजदराने कर्जपुरवठा करणे.

८) शेती संबंधी साहित्य अल्प दरात उपलब्ध करुन देणे.

munotes.in

९) शेती संबंधी आवश्यक माहिती मासिके, वृत्तपत्र, दुरदर्शन इ. द्वारे प्रसारित करणे.

१०) पीक विमा, पशु विमा द्वारे शेतीतील नुकसान टाळणे

११) आवश्यक त्या ठिकाणी कर्जमाफी देणे.

ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणा दुर करण्यासाठी वरील सर्व उपाय सरकारने योजले आहेत.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्या :**




भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका महत्त्वपूर्ण मानली जाते. परंतू शेती क्षेत्राचा म्हणावा तसा विकास झालेला दिसत नाही. परिणामी त्याचे विपरीत परिणाम शेती विकासावर व अर्थव्यवस्थेवर झालेले दिसून येतात. त्यातच शेती क्षेत्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असलेले दिसून येते. तब्बल २०/६/१७ या कालावधीत जवळ जवळ ८०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या दिसून येतात. यामध्ये विदर्भातील शेतकऱ्यांची संख्या जास्त असलेली दिसून येते. विशेषतः २००० पासून शेतकरी वर्गामध्ये आत्महत्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. या वाढत्या आत्महत्यांमुळे समाज आणि शासन यांच्या समोर नवीन प्रश्न निर्माण झाले आहे. महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाडा, आंध्रप्रदेश, याचबरोबर राजस्थान, पंजाब, कर्नाटक, ओरीसा, केरळ यासारख्या प्रांतात देखील आत्महत्या होऊ लागल्या आहेत.

देशाने उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण ही धोरणे स्विकारल्यानंतर अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात आल्या. शेतीसंबंधी सामुग्री निर्माण करु लागल्या. पुर्वीच्या मानाने उत्पादन खर्चात वाढ झाली, अपेक्षित उत्पादन झाले नाही, कर्जबाजारीपणा वाढला. शेतीतील दुष्काळ, गारपिट, टोळधाड, विपणन व्यवस्थेतील दोषांमुळे शेतकऱ्यांच्या संकटात आणखी भर पडली. यामुळे शेतकरी वर्गात निराशा व उदासिनता निर्माण झाली. त्यातून व्यसनाधिनता वाढली. पुढे नैराश्येतून आत्महत्याचे प्रमाण वाढत गेले. मागील काही वर्षामध्ये झालेल्या आत्महत्यांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

munotes.in

**शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण पुढीलप्रमाणे :**

| वर्ष | दर लाखामागे प्रमाण |
|---|---|
| १९९६ | १३.३% |
| २००० | १७.५% |
| २००४ | १९.२% |

वरील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, २००० च्या दशकात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत गेले. २००१ ते २००५ या काळात सुमारे ८७,००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. तर १९९७ - २००५ या काळात सुमारे १,५०,००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. प्रत्यक्षात हे आकडे जास्त असण्याची शक्यता अभ्यासकांनी केली आहे.

काही निवडक राज्यांमध्ये आत्महत्येच्या प्रमाणाचा दर मोठा आढळून येतो.

| राज्य | दर लाखामागे शेतकरी आत्महत्या |
|---|---|
| १) तामिळनाडू | ३२% |
| २) कर्नाटक | ४०.८% |
| ३) छत्तीसगड | ४४.८% |
| ४) महाराष्ट्र | ५०.६% |
| ५) केरळ | ९४.७% |
| ६) आंध्रप्रदेश | ३३.२% |

munotes.in

भारतातील काही राज्यांमध्ये आत्महत्येचे प्रमाण दर मोठा आढळून येतो. तामिळनाडूमध्ये ३२%, आंध्रप्रदेशात ३३.२%, कर्नाटक मध्ये ४०.८%, महाराष्ट्रात ५०.६% आणि केरळ मध्ये दर लाखामध्ये आत्महत्येचे सर्वाधिक प्रमाण दिसून येते. आणि या संख्येत सातत्याने भर पडताना दिसत आहे. देशाच्या दृष्टिकोनातून ही गंभीर समस्या निर्माण होत आहे. या आत्महत्येला अनेक कारणे आहेत.

शेतकरी आत्महत्या अतिशय महत्त्वपूर्ण व संवेदनशील असा विषय असून राज्य मदत आणि पुनर्वसन खात्याकडून जाहिर केलेल्या आकडेवारीनुसार जानेवारी ते डिसेंबर २०१६ पर्यंत महाराष्ट्रातील ३ हजार ५२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून त्यापैकी १ हजार ६२१ शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना सरकारने प्रत्येकी १ लाख रुपयांची आर्थिक मदत केली असून १ हजार १६७ प्रस्ताव अपात्र ठरविले आहेत. तसेच २६४ प्रस्तावांची चौकशी सुरु आहे.

**विभागनिहाय आकडेवारी :**

| विभाग | आकडेवारी |
|---|---|
| १) अमरावती | १०८५ |
| २) औरंगाबाद | १०५३ |
| ३) नाशिक | ५७९ |
| ४) नागपुर | ३६० |
| ५) पुणे | ७५ |
| ६) कोकण | ० |

**(आधार ए.बी.पी. माझा न्युज, राहुल कुलकर्णी, उस्मानाबाद)**

केंद्र व राज्य सरकारकडून शेतकऱ्यांची सामाजिक, आर्थिक परिस्थिती उंचावण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत असून तरीही २०१३ पासून सरासरी १२००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून २०१५ मध्ये देशात एकूण १३३६२३ जणानी जीवन संपविले असून त्यापैकी १२ हजार ६०२ कृषी क्षेत्राशी निगडीत असून ८००७ शेतकरी आणि ४५०५ शेतमजूर होते. २०१४ मध्ये एकूण ५ हजार ६५० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून २०१५ मध्ये ८ हजार ७ जणांनी आत्महत्या केली. एकट्या महाराष्ट्रात २०१४ मध्ये २ हजार ५६८, २०१५ मध्ये ३ हजार ३० शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेली दिसून येते.

**(केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेली आकडेवारी)**

## ८.५ शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे

### १) कर्जपुरवठा करणाऱ्या साधनांचा अभाव :

शेतकऱ्याला शेतीसाठी भांडवलाची आवश्यकता असते. शेती संबंधी तत्सम कामे करण्यासाठी उदा. बी-बियाणे, खते, किटकनाशके, मजूरी, औजार यासाठी पैशाची गरज भागविणाऱ्या संस्थात्मक कर्जपुरवठ्याच्या सोयींचा विकास झाला नाही. परिणामी सावकारांकडून कर्ज काढण्याशिवाय पर्याय राहिला नाही. सावकाराकडील कर्जावरील दामदुप्पट व्याजामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला.



**२) हवामानातील बदल :**

भारतीय शेती ही निसर्गावर अवलंबून असलेली शेती आहे. निसर्गाने साथ दिली तरच उत्पादन येते. मात्र काही वर्षात अवर्षण, दुष्काळ, बदलते हवामान, यामुळे उत्पादनामध्ये सातत्याने घट झालेली दिसून येते. उत्पादनाचा खर्च निघेल एवढे देखील उत्पादन हातात पडेनासे झाले. परिणामी शेतकरी नैराश्यांच्या गर्तेत सापडून आत्महत्येस प्रवृत्त झाला.

**३) आदानांच्या वाढत्या किंमती (शेती साधने) :**

कृषी उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या आदानांच्या किंमती सातत्याने वाढताना दिसतात. आधीच आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या शेतकऱ्याला ही साधने खरेदी शिवाय पर्याय नसतो. परिणाम उत्पादन खर्चात सातत्याने भर पडते. परिणाम कर्जाच्या खाईत शेतकरी लोटला जातो व आत्महत्येस प्रवृत्त होतो.

**४) शेतमालाचे भाव :**

शेतीतून उत्पादन चांगले मिळाले तरी त्याला चांगली किंमत मिळेल याची शाश्वती नसते. कारण बाजारपेठेवर पुर्णपणे मध्यस्थांचे वर्चस्व दिसून येते. व्यापारी मंडळ संगतमताने शेतमालाला कमी भाव देतात व मोठ्या प्रमाणात नफा कमावतात. मात्र उत्पादनात महत्त्वपुर्ण भूमिका बजावणाऱ्या शेतकऱ्याच्या हातात काहीच राहत नाही.

**५) अपुऱ्या जलसिंचनाच्या सुविधा :**

भारतीय शेती ही पावसाच्या पडणाऱ्या पाण्यावर अवलंबून असल्याने ती हंगामी स्वरुपाची असलेली दिसून येते. परिणामी उत्पादन घेण्याची इच्छा असूनही साधनांअभावी शेती करता येत नाही. जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधांमुळे वाढत्या उत्पन्नाची हमी कमी झालेली दिसून येते.



**६) कर्जबाजारीपणा :**

शेतकऱ्याला उत्पादक कारणासाठी तसेच अनुत्पादन कारणासाठी भांडवलाची आवश्यकता असते. मात्र अनुकुल स्थिती राहील्यास कर्जाची परतफेडीची शक्यता असते. मात्र विपरीत परिस्थिती राहिल्यास कर्जाची परतफेड करणे शक्य नसते. कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी पुन्हा कर्जाशिवाय पर्याय नसतो. त्यातून कर्जबाजारीपणा वाढत जातो. शेवटी कर्जफेड करणे शक्य नसल्याने आत्महत्येचा मार्ग स्विकारतो.

**७) खोटी प्रतिष्ठा :**

ग्रामीण भागातल्या शेतकरी रुढी, परंपरांना चिकटून असल्याने सण, समारंभ, धार्मिक कार्य, लग्न इ. प्रतिष्ठेची मोठ्या प्रमाणात खर्च करतो, सामाजिक प्रतिष्ठेसाठी क्षमता नसताना मोठ्या कर्जाची उचल केल्याने तो अधिकाधिक चिंतेच्या गर्तेत सापडतो.

**८) निरक्षरता :**

ग्रामीण भागातील शेतकरी रुढी, परंपरांना चिकटून असतो तसा तो अडाणी, अशिक्षित असल्याने त्याच्या भोळ्या स्वभावाच्या गैरफायदा संधीसाधू लोक घेतात. त्याची उत्पन्नाची साधने हिरावून घेतात. परिणामी कुटुंबाचे पालनपोषण करु न शकल्याने तो आत्महत्येचा मार्ग स्विकारतो.

**९) मानसिकता :**

बहुतांशी शेतकरी अविचारी, कमकुवत मनाचे, परिस्थितीला सामोरे जाण्याचे धाडस नसल्याने आत्महत्येस प्रवृत्त होतात.

**१०) सहानुभूतीचा अभाव :**

कर्जबाजारी आणि वैफल्यग्रस्त शेतकऱ्याला समाजाकडून सहानुभूती आणि आधाराची गरज असते. त्याची कमतरता असल्याने तो उदासिनतेच्या गर्तेत सापडतो.

अशा विविध कारणांमुळे संपुर्ण देशभर शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत गेले आहे. त्यामुळे यातून मार्ग काढण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना सुचविल्या गेल्या त्या उपाययाजेना पुढीलप्रमाणे.

## ८.६ शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठीचे उपाय

शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी सरकारने प्रयत्न केलेले दिसून येतात. त्यासाठी वेगवेगळी धोरणे देखील सरकार राबवत आहे. त्याचे योग्य परिणाम झाले तर शेतकऱ्याच्या आत्महत्या रोखल्या जाऊ शकतात.

**१) कर्जपुरवठ्यासाठी सहकारी संस्थांची स्थापना :**

भारतीय शेतकरी हा प्रामुख्याने सावकार व जमीनदारांच्या कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला दिसून येतो. सावकाराची न फिटणारी मुद्दल, व्याजाचा दर त्यातून त्याचे शारीरिक तसेच मानसिक खच्चीकरण झालेले दिसून येते. या कचाट्यातून त्याची मुक्तता करण्यासाठी सहकारी संस्थांच्या माध्यमातून अल्पदराने कर्ज पुरवठा केल्यास आत्महत्या रोखल्या जाऊ शकतात.

**२) सावकारांवर कडक कारवाई :**

अलिकडच्या काळात विनापरवाना सावकारांचे प्रस्थ ग्रामीण भागात वाढत आहे. शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा, असहाय्यतेचा फायदा असे सावकार मोठ्या प्रमाणात घेताना दिसतात.

आणि त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे शोषण होताना दिसते. त्यामुळे विना परवाना धारक सावकारांचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करणे आवश्यक आहे.

**३) पुरेसा कर्ज पुरवठा :**

शेतकऱ्यांच्या उत्पादक तसेच अनुत्पादक गरजा लक्षात घेऊन त्यांना पुरेसा कर्ज पुरवठा सरकारी यंत्रणेद्वारे होणे आवश्यक आहे. तरच शेतकऱ्याच्या गरजांची पुर्तता होऊ शकेल.



**४) कृत्रिम टंचाईवर नियंत्रण :**

भारतीय शेतीचे स्वरुप हे हंगामी पद्धतीचे आहे. पावसाच्या पडणाऱ्या पाण्यावरच मोठ्या प्रमाणात शेती केली जाते. उत्पादन घेण्याचा कालावधी एकच असल्याने अशा हंगामात उत्पादक व विक्रेते, बियाणे, खते, किटकनाशकांची कृत्रिम टंचाई निर्माण करतात. त्यामुळे चढ्या भावाने अशा साधनांची खरेदी करावी लागते. त्यामुळे अशांवर सरकारने कडक कारवाई करणे आवश्यक आहे.

**५) बोगस विक्रेत्यांवर कारवाई :**

उत्पादनाच्या कालावधीत बीयाणे, खते, किटकनाशके इ. विक्रेत्याकडून बोगस पुरवठा होतो. त्याचा दर्जा तपासण्याची यंत्रणा शेतकऱ्याकडे नसते. परिणामी संबंधीत वस्तू योग्य परिणाम दाखवू न शकल्याने शेतकरी संकटात सापडतो. त्यासाठी अशा बोगस वस्तू व विक्रेत्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे.

**६) लघु उद्योगांना प्रोत्साहन :**

भारतीय शेती ही पारंपारिक पद्धतीने केली जात असल्याने, तसेच वर्षातून एकच पिके घेत असल्याने वर्षाचे उर्वरीत महिने काम न मिळाल्याने घरी बसावे लागते. जर ग्रामीण भागात लघु उद्योगांची स्थापना केल्यास फावल्या वेळेत रोजगार उपलब्ध होऊन एक आर्थिक स्थिरता निर्माण होऊ शकेल. म्हणून ग्रामीण भागात लघु उद्योगांच्या स्थापनेसाठी अल्पदराने कर्जपुरवठा, उत्पादन दरात सुट, कच्च्या मालाची उपलब्धता इ. धोरणात्मक निर्णय घेतल्यास लघु उद्योगाची स्थापना होऊन रोजगाराची सोय होईल.

munotes.in

### ७) सिंचन सोयी सुविधा :

ग्रामीण भागातील बहुतांशी शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने वर्षातून एकच पिक जमीनीतून घेतले जाते. इच्छा असून सुद्धा पिके पाण्या अभावी घेता येत नाही. सिंचनाच्या सुविधा निर्माण झाल्यास शेतकरी वर्षातून अधिक पिके घेऊन आपला आर्थिक विकास साध्य करु शकतो. म्हणून सिंचन सुविधांची आवश्यकता आहे.

### ८) किड व्यवस्थापन :

शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले पिक उत्पादन हे त्यावर पडणाऱ्या किड, रोगांमुळे वाया जाते. अज्ञानी शेतकऱ्याला त्याच्यावर काय उपाय योजना करावी हेच समजत नाही. म्हणून पिकांवरील रोग, किड्यांचा बंदोबस्त करण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

### ९) मार्गदर्शन व प्रशिक्षण :

शेतकरी शेती उत्पादन घेत असलेली जमीनीचा पोत, हवामानाची अनुकूलता, आदानांची उपलब्धता या सगळ्या गोष्टींचा विचार करुन पिक रचना कशी असावी याबाबत तज्ञांमार्फत शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण व मार्गदर्शन देणे आवश्यक आहे.

### १०) आरोग्य सुविधा :

निकृष्ठ आहार आणि आजारपण यातून शेतकऱ्याची कार्यक्षमता घटते. त्यामुळे शेतकऱ्याचा पैसा या कारणासाठीच खर्च होतो. परिणामी उत्पादनासाठी भांडवल कमी पडते. त्यामुळे शेतकऱ्यांना आहार तसेच आरोग्यविषयक सुविधा पुरविणे आवश्यक आहे.

### ११) शेतकऱ्यांच्या मुलांना आरक्षण :

शेतकऱ्यांच्या मुलांना आर्थिक निकषावर शैक्षणिक तसेच नोकरीच्या ठिकाणी आरक्षण देणे आवश्यक आहे. तसेच शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा खर्चाचा भार सरकारने कमी करावा.

### १२) पिक विमा :

भारतीय शेतीतील अनिश्चितता लक्षात घेऊन पिक विमा योजना नाममात्र हप्ता देऊन सुरु करावी. तसेच नुकसान झाल्यास त्याची ताबडतोब नुकसान भरपाई मिळावी.

### १३) शुन्य व्याजदराने कर्जपुरवठा :

बहुतांश शेतकऱ्यांच्या आत्महत्या ह्या आर्थिक कारणामुळे झालेल्या दिसून येतात. म्हणून शेतकऱ्यांना शेतीसाठी जास्तीत जास्त कर्ज शुन्य व्याजदराने दिल्यास तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास अशा शेतकऱ्याला नव्याने कर्जपुरवठा करावा. तो नाउमेद होणार नाही याची व्यवस्था सरकारने करावी.

## ८.७ सारांश

या प्रकरणात ग्रामीण समुदायाच्या समस्यांमधील ग्रामीण कर्जबाजारीपणाचा अभ्यास केला असून कर्जबाजारीपणाच्या कारणांचा अभ्यास केलेला आहे. ग्रामीण कर्जबाजारीपणाची समस्या कशा प्रकारे कमी करता येईल त्यासाठी उपाय योजना सुचविल्या आहेत. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे अभ्यासून आत्महत्या रोखण्यासाठीचे उपाय सुचविलेले आहेत.

## ८.८ स्वाध्याय

१) ग्रामीण कर्जबाजारीपणाची कारणमिमांसा करुन त्याचे दुष्परिणाम सांगा.
२) ग्रामीण कर्जबाजारीपणा निवारण करण्यासाठी उपाय सुचवा.
३) शेतकऱ्याच्या आत्महत्येची कारणे सांगून त्यावर उपाय सुचवा.
४) टिपा लिहा.
   १) ग्रामीण कर्जबाजारीपणाची कारणे.
   २) कर्जबाजारीपणा दुर करण्याचे उपाय.
   ३) शेतकऱ्याच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाय

## ८.९ संदर्भसूची


१) डॉ. दिलीप पवार, डॉ. सुमित्रा जगताप, महाराष्ट्राची अर्थव्यवसाय अथर्व पब्लिकेशन, २०१४.
२) प्रा. डॉ. सौ. शैला बिराजदार, प्रा. विश्वजीत बिराजदार, भारतीय अर्थव्यवस्था, अथर्व पब्लिकेशन - २०१४.
३) डॉ. गंगाधर वि. कायंदे-पाटील, शेतीचे अर्थशास्त्र, चैतन्य पब्लिकेशन्स, २००३.
४) डॉ. अशोक जैन, प्रा. शिवाजीराव अकोळकर, प्रा. रविंद्र घागस, प्रा. शिवाजीराव साटम, ग्रामीण विकास (द्वितीय वर्ष बी.ए.) दूरस्थ शिक्षण, मुंबई विद्यापीठ.
५) डॉ. व्ही.पी. बारखेडे, डॉ. ए.एन. पाटील, डॉ. व्ही.एस. शिंदे, प्रा. के. एस्. पाटील, प्रा. व्ही. टी. खातळे, कृषी अर्थशास्त्र अथर्व पब्लिकेशन्स, २०१५.
६) डॉ. नारायण चौधरी, ग्रामीण समाजशास्त्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक २००३.
७) चुनखडे ना.ए., वि.भ. पाटील, ग्रामीण समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापुर, १९९०.
८) नाडगोंडे गुरुनाथ, ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे २००२.
९) प्रा. अरुण मणेरीकर, कृषी विपणन आणि वित्तपुरवठा, प्राची प्रकाशन, मुंबई - २०००.
१०) प्रा. चंद्रकांत खंडागळे, भारतीय समाज, १९९८.
११) डॉ. भा. कि. खडसे, भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, हिमालया पब्लिशिंग हाऊस, २००४.
१२) प्रा. अशोक डांगे, डॉ. विजय काकडे, जागतिक अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापुर, १९९९.
१३) डॉ. दिलीप खैरनार, भारतीय ग्रामीण समाजशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, २०१०.
१४) प्रा. शशिकांत हरी अट्रावलकर, भारतीय अर्थव्यवस्थेची विकास धोरणे, शेठ पब्लिकेशन्स, २००५.
१५) प्रा. रा. ना. घाटोळे, ग्रामीण समाजशास्त्र व सामुदायिक विकास, श्री. मंगेश प्रकाशन, २०००.


❖❖❖❖

munotes.in

## प्रथम वर्ष कला शाखेतील **ग्रामीण विकास** अभ्यासक्रमांसाठी २०२०-२०१२ पासून सत्रांती परीक्षेसाठी प्रश्नपत्रिकेचा सुधारित नमुना

परीक्षेचा कालावधी = ३ तास एकूण गुण = १०० (प्रती सत्र)

सर्व 5 प्रश्नांना 20 गुण आहेत आणि सर्व प्रश अनिवार्य आहेत.

प्रत्येक प्रश्नात अंतर्गत निवड असेल.

प्र. १. कोणतेही दोन प्रश्न सोडवा (प्रकरण १)
२० गुण
अ
ब
क

प्र. २. कोणतेही दोन प्रश्न सोडवा (प्रकरण २)
२० गुण
अ
ब
क

प्र. ३. कोणतेही दोन प्रश्न सोडवा (प्रकरण ३)
२० गुण
अ
ब
क

प्र. ४. कोणतेही दोन प्रश्न सोडवा (प्रकरण ४)
२० गुण
अ
ब
क

प्र. ५. कोणतेही दोन प्रश्न सोडवा (प्रकरण १, २, ४, ४. प्रत्येक प्रकरणातून एक प्रश्न)
२० गुण
अ
ब
क
ड

munotes.in